The Department of Public Instruction, Bombay.

# THE LIFE OF

# ALEXANDER THE GREAT.

COMPILED FROM ENGLISH WORKS

BY

VINAYAK KONDDEO OKE.

(Sanctioned as a Reading, and Prize Book.)

3,000 Copies.

*Registered for Copy-right under Government of India's Act No. XXV. of 1867.*

Bombay:

GOVERNMENT CENTRAL BOOK DEPÔT.

1875.

All Rights reserved.

*Price* 13 *Annas.*

BOMBAY:
PRINTED AT THE EDUCATION SOCIETY'S PRESS, BYCULLA.

मुंबई इलाक्यांतील सरकारी विद्याशाळाखातें.

# शिकंदरबादशाहाचें चरित्र.

हें पुस्तक

अनेक इंग्लिश ग्रंथांच्या आधारानें

विनायक कोंडदेव ओक

ह्यांनीं केलें.

(सरकारीं शाळांत बक्षीस व वाचन ह्यांकरितां मंजूर केलें असे.)

३००० प्रती.

ह्या पुस्तकाची मालकी सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदिली आहे.

मुंबई.

गवर्नमेंत सेंत्रल बुक डिपो.

सन १८७५ इ०

ह्या पुस्तकासंबंधीं सर्व अधिकार सरकारानें स्वाधीन ठेविले आहेत.

किंमत १२ आणे.

मुंबईमध्यें
एजुकेशन सोसैटीच्या छापखान्यांत छापिलें.

# प्रस्तावना.

929/ OK
13 Ammy 31

प्लिनी ह्मणून एक नामांकित ग्रंथकार होऊन गेला. त्यानें एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, "आपली कीर्ति अचल राहावी अशी जर कोणाची इच्छा असेल, तर, त्यानें ग्रंथांत वर्णण्यासारखीं कृत्यें केलीं पाहिजेत." होय. ज्यांचीं नांवें आज हजारों वर्षें ह्या पृथ्वीवर गाजत आहेत, त्यांच्या हातून अशाच वर्णनीय कृति घडल्या आहेत. कबीरानें एके दोहोऱ्यांत ह्मटलें आहे, "मूरतसे कीरत बडी, बीन पंख उडजाय; मूरततो जाती रही, कीरत कभी न जाय." तसें रामरावण, कृष्णकंस, पांडवकौरव, इत्यादिकांचें झालें आहे. त्यांतच शिकंदर बादशाहाची गणना आहे. जगाच्या उत्पत्तीपासून आजपर्यंत त्याच्या एवढें राज्य आणि वैभव कोणत्याही दुसऱ्या राजानें संपादिलें नाहीं. सगळ्या बत्तीस तेतीस वर्षांच्या आयुष्यामध्यें त्याचे हातून जीं कृत्यें झालीं तीं खरोखर आश्चर्यकारक होत. इतिहासास दुसऱ्या कितीएक गोष्टींचा आधार जर सप्रमाण नसता, तर शिकंदर बादशाहाच्या कथेच्या सत्यतेविषयीं खचीत संशय उत्पन्न झाला असता. जगाच्या प्राचीन इतिहासामध्यें त्याची कथा अत्यंत वर्णनीय आहे. ती, अनेक इंग्लिश ग्रंथांच्या आधारानें मराठींत लिहून मराठी वाचणाऱ्यांस सादर केली आहे. ही त्यांस गोड लागावी, अशी परमेश्वराची प्रार्थना करून ही अल्प प्रस्तावना संपवितों.

# अनुक्रमणिका.

## भाग पहिला.

पृष्ठ.

विषयप्रवेश —फिलिपराजा—ओलिंपिआस हिशीं लग्न—शिकंदराचें जन्म—आरिस्तातल —विद्याभ्यास—घोड्याची गोष्ट—क्लिओपात्रि-शीं लग्न—फिलिपराजाचा खून—शिकंदर सिंहासनारूढ झाला—थीब्स धुळीस मिळविलें —स्वारीची तयारी—इत्यादि ........ १—३३

## भाग दुसरा.

सैन्याची सिद्धता—सरदारांच्या नेमणुका —हेलिस्पांत उतरला—लांपसाकस शहराचा बचाव—ग्रानिकस नदी शिकंदर उतरला—तेथें इराणी लोकांचें आणि त्याचें तुमुल युद्ध झालें—शिकंदराचा जय—लुटीच्या मालाची व्यवस्था—मिलितस, कारिआ हीं घेतलीं—इत्यादि ...................... ३३—६९

## भाग तिसरा.

शिकंदर आणि दारयस ह्यांची युद्धाची पुनः सिद्धता—इस्सॅस येथील तुमुलयुद्ध—दारयसाचा पराभव—त्याचे कुटुंबाशीं शिकंदराची

पृष्ठ.

वर्तणूक—पार्मिनिओ ह्यानें दमास्कस घेतलें—दारयसाचा पळ—शिकंदरानें सीऱ्या आणि फिनिशिआ हे देश जिंकिले—तायर घेतलें—गाझा घेतलें—शिकंदराचा सोशिकपणा—बातिस ह्याचा शेवट—अलेक्झांद्रिआ बांधिलें—यरुशिलेम हस्तगत झालें—इत्यादि.. ६९—१०४

## भाग चवथा.

दारयसास त्याच्या कुटुंबाच्या स्थितीचें वर्तमान कळलें—तेव्हांचे त्याचे उद्गार—तैग्रिस नदीकडे शिकंदराचें जाणें—दारयसाचें तहाचें बोलणें—अरबेला येथील प्रचंड युद्ध—दारयसाचा केवळ पराभव—अरबेला घेतलें—बाबुलोन येथें शिकंदराचा मुक्काम—सुसा घेतलें—पार्सिपोलिस घेतलें—मेजवान्या—इत्यादि .................. १०५–१३९

## भाग पांचवा.

शिकंदरानें पासारगदा घेतलें-दारयसाचा पाठलाग—त्याचें चित्तवेधक भाषण—नावर्झानीस आणि बीसस ह्यांनीं विश्वासघाताचा विचार केला—त्यांनीं दारयसास कैद केलें—बाक्त्रियामध्यें बीसस ह्याचा पराभव—दारयसाचा खून—त्यास मूठमाती—शिकंदराचें भाषण—झाद्राकार्ता येथें आमाझोन राणीची

पृष्ट.

त्याची भेट—शिकंदराचा ऐष आराम—त्याच्या कांहीं लोकांनीं त्यास ठार मारण्याचा कट केल्याची बातमी उठली—तो कट फुटला—त्याचा परिणाम—फिलोतास आणि पार्मिनिओ ह्यांचा भयंकर शेवट .......... १३९-१७३

## भाग साहावा.

शिकंदरावर रानटी लोकांचा हल्ला—त्यास जखम लागली—सीथियन लोकांकडील वकील—त्यांतील एकाचें भाषण—सैन्य नदीपलीकडे गेलें—स्पितामिनीज ह्यावर संकट—शिकंदर बाक्त्रियामध्यें गेला—पेत्रा आक्सिस ह्या किल्ल्यावर चढतांना महत्संकटें—तो किल्ला घेतला—मरकंदा येथील मुक्काम—क्षुल्लक कारणावरून क्लितस ह्याचा वध—त्याविषयीं पश्चात्ताप—दाही लोकांवर स्वारी—कालिस्थिनीस ह्याचा स्पष्टवक्तेपणा—त्याचा भयंकर परिणाम—इत्यादि ................ १७३-२०५

## भाग सातवा.

शिकंदराचा दरारा—त्यास अनेक राष्ट्रें शरण आलीं—दिपाला देशावर स्वारी—मासागा शहरची क्लिओफिस राणी—शिकंदरास जखम झाली—तो सिंधुनदाचे कांठीं प्राप्त झाला—तेथील राजा ओंफिस—बादशाहा नद

पृष्ठ.

उतरला—त्याचें पौरस राजाशीं तुमुल युद्ध—पौरसाचा पराभव—शिकंदराचा गंगेपर्यंत जाण्याचा विचार—त्याविषयीं सैन्यांतील लोकांची नाखुषी—त्यांस उद्देशून बादशाहाचें भाषण—त्यावर सीनिस ह्याचें उत्तर—शिकंदरास जखम लागली—आक्सैड्रेसी लोकांच्या शहरीं त्याचें विलक्षण शौर्य—साबेरी लोकांनीं त्याशीं तह केला .................... २०५-२४२

## भाग आठवा.

शिकंदर बादशाहा परत स्वदेशास जावयास निघाला—जेड्रोशियाच्या रानांतून जातांना त्याचे अतिशयित हाल—त्यांनंतरच्या मेजवान्या—निआर्कस ह्याचें जलपर्यटन—आरसिनीस ह्याचा पासारगदा येथें विनाकारण वध—तत्वज्ञानी कालानस—स्वारी पार्सीपोलिसमध्यें आली—सर्व शिपायांच्या कर्जाची फड—ग्रीस देशांत गडबड—दिमास्थिनीस, वक्ता, त्यास काळेपाण्याची शिक्षा—हेफीस्तियन ह्याचा मृत्यु—स्वारी बाबुलोनास आली—शिकंदर बादशाहा आजारी पडला—त्याचा मृत्यु—त्याच्या स्वभावाचें वर्णन—उपसंहार—इत्यादि. २४२-२८७

# शिकंदर बादशाहाचें चरित्र.

## भाग पहिला.

ग्रीसदेशामध्यें प्राचीन काळीं लहान लहान संस्थानें अनेक होतीं. तीं नेहमीं स्वतंत्र राहण्याविषयीं व प्रसंग आल्यास एकमेकांस जिंकण्याविषयीं प्रयत्न करीत असत. त्यांच्या उत्तरेकडे मासिदोन ह्या नांवाचें एक संस्थान होतें. तें पहिल्यापासून बरेंच बलिष्ठ होतें. तेथील राजे आपणांस, हर्क्युलिस नामा जो महा पराक्रमी पुरुष पूर्वी होऊन गेला, त्याचे वंशज ह्मणवीत असत. आपण अमुक मोठ्या पुरुषाचे वंशज आहों, असें ह्मणणें आणि त्याविषयीं गर्व वाहणें हें फार सोपें आहे; परंतु, तशीं पराक्रमाचीं कृत्यें करून, ती गोष्ट सर्व लोकांकडून कबूल करविणें हें फार अवघड आहे. मासिदोन येथील राजकुलामध्यें तसा एक महान् पराक्रमी पुरुष निपजला, आणि त्यानें आपल्या विलक्षण महत्कृत्यांनीं सर्व जगास चकित करून, आपला कुलमूलगर्व अन्वर्थ आहे असें दाखविलें. त्याला युरोपखंडांतले लोक अलेक्झांदर धि ग्रेत ह्मणतात; आणि आशिआखंडांतले लोक शिकंदर बादशाहा ह्मणतात. त्याचें चरित्र अत्यंत मनोरम आहे. तें अनेक ग्रंथकारांनीं आपापल्या रुचीप्रमाणें अनेक रीतींनीं लिहिलें आहे. तें थोडक्यांत लिहिण्यास आह्मी आरंभ करितों.

शिकंदर बादशाहाच्या कथेस आरंभ करण्यापूर्वी, त्याचा पिता जो फिलिप राजा त्याची थोडीशी हकीकत सांगितली पाहिजे, असें वाटतें. फिलिप हा मासिदोन येथील गादीवर इ० स० पूर्वी ३६० वे वर्षी बसला. तेव्हां तो सगळा चोवीस वर्षांचा होता. कोणतेंही कृत्य दृढनिश्चयानें आणि नियमित रीतीनें केल्यावांचून त्यांत यश मिळावयाचें नाहीं, अशी त्याची पक्की खातरी झाली होती. तेणेंकरून, लष्कराच्या व्यवस्थेमध्यें त्याची कैद फार कठीण असे. त्यानें आपल्या सैन्याची उत्तम सुधारणा करून, त्याच्या बळावर अथेन्स वगैरे संस्थानांस पादाक्रांत करून टाकिलें. दिमास्थनीस* ह्यानें एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, फिलिप राजाच्या वेळेपर्यंत सोनें आणि रूपें हीं व्यवहारामध्यें कोणीं हातांत धरूं नये असा कायदा होता; तो ह्यानें रद्द केला. आणि "द्रव्य हें शस्त्र तूं हातांत घे, ह्मणजे तुला पाहिजे तें जिंकितां येईल," असें मला देलफाय† ग्रामदेवतेनें स्वप्नांत प्रकट होऊन सांगितलें आहे, असें तो सर्वांस सांगूं लागला. ह्यांत खरें किती असावें, ह्याचें अनुमान सहज करितां येतें. तथापि, आपण जें करितों तें दोषपात्र नाहीं, शुद्ध आहे, असें लोकांच्या मनांत बिंबविण्यास कोणती युक्ति लढविली पाहिजे, हें त्याला चांगलें समजत होतें, ह्यांत संशय नाहीं.

फिलिप राजानें ओलिंपिआस नामक एका स्त्रीशीं लग्न

---

* दिमास्थनीस हा अथेन्स येथें जगत्प्रसिद्ध वक्ता आणि ग्रंथकार होऊन गेला.

† ही ग्रामदेवता ग्रीस देशांत त्याच नांवाच्या गांवांत होती. तिला लोक महान् दैवत समजून, तिच्या साक्षात्कारांवर आणि दृष्टांतांवर फार विश्वास ठेवीत.

केलें होतें; तिचे पोटीं शिकंदर हा इ० स० पूर्वी ३५६ वे वर्षी, मासिदोन संस्थानाची राजधानी पेल्ला येथें जन्मला. मुलाचीं लक्षणें त्याच्या गर्भवासांतून देखील बाहेर दिसतात, असा प्राचीन काळच्या लोकांचा समज असल्या मुळें ऑलिंपिआस हिच्या गरभारपणाच्या वेळच्या नानाप्रकारच्या चमत्कारिक गोष्टी पुस्तकांतून लिहिलेल्या आढळतात. स्वतः फिलिप राजाला एकदा असें स्वप्न पडलें कीं, आपण आपल्या पत्नीच्या उदरावर मोहोर करीत असतां तींत एकाएकीं सिंहाचें चित्र उठलें; तसेंच पुढें असें पाहिलें कीं एक भला मोठा सर्प तिच्या बिछान्यावर तिच्या कुशीस स्वस्थ निजला आहे. ह्या स्वप्नांवरून, ऑलिंपिआस ही चेटकी असावी, असा संशय राजाच्या मनांत उत्पन्न होऊन, तो तिजकडे पाहीनासा झाला, असें म्हणतात.

ऑलिंपिआस हिचे दिवस भरत येण्याच्या सुमारास फिलिप हा आपल्या सैन्यासहवर्त्तमान देश काबीज करण्याकरितां स्वारीस गेला होता. इकडे इ० स० पूर्वी ३५६ वे वर्षी पेल्ला येथें शिकंदर जन्मला. हें आनंदाचें वर्त्तमान, पोतिदिया हें मोठें शहर घेतल्यावर लागलेंच फिलिप ह्यास कळलें. त्याच वेळीं, त्याचा सरदार पार्मिनिओ ह्यानें इलिरियन लोकांचा पराभव केल्याची एक, व आपल्या घोड्यानें मोठ्या प्रतिष्ठेची शर्यत जिंकिल्याची दुसरी, अशा दोन आनंदप्रद वार्ता त्यास समजल्या. तेव्हां त्यास परम संतोष झाला. त्यानें मोठा उत्सव केला. तो आनंदभराचा वेळ जातांच, त्याच्या मनांत असें आलें कीं, सुखामागें मनुष्यास त्याच प्रमाणाचें दुःख प्राप्त होत असतें. तसें आपणास भोगायास लागूं नये, म्हणून, तो आपल्या देवाची

प्रार्थना करून ह्मणाला, "परमेश्वरा, मला हें इतकें सुख झालें आहे, ह्याच्या मागोमाग एवढें मोठें दुःख देऊं नको; मला लहानसें संकट येऊं दे, आणि तें लवकर येऊं दे, एवढीच विनंती आहे." एका कवीनें एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, ह्या जगामध्यें मनुष्य ह्म मोठ्या घड्याळांतल्या आंदोलकासारिखा आहे; ह्मणजे, त्याच्या एका बाजूस सुख आणि दुसऱ्या बाजूस दुःख-अशीं आहेत; तीं त्यास आळीपाळीनें भोगिलीं पाहिजेत. होय, ही गोष्ट खरी आहे. हिचीं उदाहरणें ह्या जगामध्यें वारंवार दृष्टीस पडतात. परंतु तीं लक्षांत ठेवून वागणारे असे लोक फार थोडे. असो.

ज्या रात्रीं शिकंदराचें जन्म झालें, त्याच रात्रीं आशिआ मैनरांतील एफिसस येथील दयाना देवीचें देवालय एरोस्त्रेतस नामक मनुष्यानें जाळून टाकिलें. ही इमारत फार मोठी आणि उत्कृष्ट रीतीनें बांधिलेली होती. तिची आख्या सर्व आशिआखंडांत असे. इकडे शिकंदर जन्मल्या बरोबर तिकडे ही इमारत दग्ध झाली, ह्यावरून त्याचे हातून सगळ्या आशिआखंडाचा विध्वंस होणार असें लक्षण प्रदर्शित झालें, असें इतिहासकारांनीं लिहिलें आहे. त्या प्रमाणेंच हें देवालय जाळण्याचा एरोस्त्रेतसाचा हेतुही फार विलक्षण होता. तो हेतु एवढाच कीं नांव प्रसिद्ध व्हावें. म्हणजे, त्यानें तो अपराध कबूल करते वेळीं असें स्पष्ट सांगितलें कीं, बरें किंवा वाईट कोणत्याही प्रकारचें एकादें महत्कृत्य न करितां, किड्यां मुंग्यां प्रमाणें, जन्मास यावें आणि मरावें, त्यापेक्षां, चांगल्या कृत्यावरून नाहीं तर नाहीं, परंतु वाईट कृत्यावरून तरी आपलें नांव आपले मागें राहावें, म्हणून मीं हें देवालय

जाळिलें ! एरोस्त्रेतस ह्याचें हें कृत्य अत्यंत निंद्य होतें, ह्याविषयीं कोणास शंका यावयाची नाहीं; परंतु, चमत्कार पहा कीं त्याचा हेतु अशा निंद्य कृत्याच्या योगानें सिद्धीस गेला ! कोणा मनुष्यास कोणते वेळीं काय बुद्धि होईल, आणि तिच्या भरीं भरून तो केव्हां काय करील ह्याचा नेम नाहीं.

फिलिपाच्या दरबारामध्यें अरिस्तातल ह्या नांवाचा एक मोठा तत्ववेत्ता होता. त्याच्या शिक्षेमध्यें आपले पुत्रास ठेवून सिंहासनारूढ होण्यास योग्य करावें, असें त्याच्या मनांत येऊन, शिकंदर जन्मल्यावर थोडक्याच दिवसांनीं त्यानें त्यास एक पत्र लिहिलें. त्यावरून, तो आपल्या मुलाच्या विद्याभ्यासाविषयीं किती कळकळ बाळगीत होता, हें स्पष्ट दिसून येतें. त्या पत्राचें तात्पर्य असें :—" मला पुत्र झाला, हें आपणांस कळलेंच असेल. परमेश्वरानें मला पुत्र दिला ह्याबद्दल मी त्याचे फार आभार मानितों, हें खरें आहे ; परंतु आपण जीवंत असतां हा पुत्र त्यानें मला दिला, हा त्याचा मजवर विशेष प्रसाद होय, आणि विशेषेंकरून ह्याबद्दल मी त्याचे फार फार आभार मानितों. तो माझा पुत्र आपला शिष्य जगामध्यें शोभावा, असा आपण त्यास ज्ञानप्रवीण कराल, ह्याविषयीं मला तिळभर देखील शंका नाहीं." हें पत्र वाचून कोणाही सहृदय पित्यास आनंद वाटल्यावांचून राहणार नाहीं. फिलिपासारखे राजे, म्हणजे ज्यांची संतती कशीही निपजली तरी तिला कशाची विवंता पडण्याची भीति नसते, ते देखील जर आपल्या मुलांच्या विद्याभ्यासाविषयीं इतकी काळजी वाहतात, तर साधारण प्रतीच्या लोकांनीं ह्याविषयीं किती जपलें पाहिजे, ह्याचें सहज अनुमान करितां येतें. रालिन म्हणून एक

नामांकित ग्रंथकार असें म्हणतो कीं, "प्रत्येक मुलगा आपले बापाचा शिकंदर आहे." होय, ही गोष्ट खरी आहे. परंतु, प्रत्येक मुलाचा बाप फिलिप नसतो, एवढेंच कमी. असो.

शिकंदरास थोडें कळूं लागल्यापासूनच त्याचे अंतःकरणांत महत्वाकांक्षा उत्पन्न होऊन वाढूं लागली. अगदीं लहानपणीं तो मुलांत खेळे तेव्हां देखील आपण इतर सर्वांपेक्षां सर्व चांगल्या गोष्टींमध्यें श्रेष्ठ आहों, असें स्थापित करण्याचा प्रयत्न करी. त्याला उणें उत्तर असें तिळभर देखील सोसत नसे. आपण राजपुत्र, इतर लोकांपेक्षां फार श्रेष्ठ आहों, ह्यास्तव त्यांची आपली बरोबरी होण्याचा प्रसंग होईल तितका प्रयत्न करून टाळावा, ह्याविषयीं तो फार जपे. तो फार चपळ होता. त्याला त्याच्या मित्रांनीं एकदा असें विचारिलें कीं, "घोड्यांच्या आणि रथांच्या शर्यतींमध्यें आपण स्वतः बक्षीस मिळविण्याचा प्रयत्न कराल कीं नाहीं?" त्यावर त्यानें उत्तर केलें, "होय; मी प्रयत्न करीन; पण माझ्या बरोबर त्या बक्षिसाकरितां प्रयत्न करणारे मजसारखे राजपुत्र असले तर; एरव्हीं नाहीं." तसेंच, फिलिप राजा, सर्व लहान मोठया लोकांच्या मेळ्यांत शिरून, चढाओढीनें अशा प्रकारचीं बक्षिसें मिळवून, त्यांच्या निशाण्या आपल्या नाण्यांमध्यें छापवीत असे, हें शिकंदरास अगदीं आवडेना.

फिलिप राजा मोठा पराक्रमी होता. त्याजपाशीं सैन्य पुष्कळ असून, तो नेहमीं नवीन देश काबीज करणें आणि लढाया ह्यांत गुंतलेला असे. आज हा प्रांत घेतला, उद्यां तें शहर सर केलें, परवां त्या अमुक लोकांस मोठया पराक्रमानें जिंकिलें, अशा आनंदाच्या वार्त्ता पेला येथें वारंवार येत, आणि तेव्हां सर्व लोक मोठा उत्सव

करीत. परंतु, त्या प्रसंगीं शिकंदराचें मुख अगदीं म्लान दिसे. ह्याचें कारण प्रथम कोणास कळलें नाहीं. पण एके वेळीं त्याच्या सोबत्यांनीं त्यास विचारिलें, तेव्हां त्यानें मोकळ्या मनानें असें स्पष्ट उत्तर दिलें कीं, "अरे मित्रांनो, जें कांहीं करायाचें आणि मिळवायाचें आहे, तें सगळेंच जर बाबांनीं करून आणि मिळवून टाकिलें, तर मग म्यां करावें तें काय!" ह्या उत्तरावरून शिकंदराचें धीटपण आणि जगास पराक्रम करून दाखविण्याची मोठी उमेद, हीं स्पष्ट दिसून येतात. त्याप्रमाणें प्रत्यक्ष पित्याविषयींचा मत्सरही व्यक्त होतो. तथापि, अशा प्रकारचें मुलाचें भाषण ऐकून बापास संतोष वाटेल, संताप यावयाचा नाहीं, हें खचीत. पहा, आपणाविषयीं दुसऱ्याची मत्सरबुद्धि कोणासही सोसावयाची नाहीं; पण तीच मुलाचे ठायीं आढळली म्हणजे बापास संतोषप्रद होतें! मनुष्याच्या स्वभावाची रचना फार विचित्र आहे!

कोणे एके समयीं फिलिप राजा आपल्या सैन्यासहवर्तमान स्वारीस बाहेर गेला असतां इराणच्या राजाकडील कांहीं वकील मासिदोनच्या दरबारामध्यें आले. तेव्हां शिकंदर केवळ दाहा अकरा वर्षांचा होता. तरी, त्यानें, आपला मोठेपणा राखून, त्यांचें आगतस्वागत असें केलें कीं, तें पाहून ते अगदीं चकित झाले. इराणामध्यें हवेंत तरंगणारे चमत्कारिक बाग आहेत; तेथील राजा मोठा संपत्तिमान असून फार विलासी आहे; त्याचें मंदिर केवळ इंद्रभुवन आहे; इत्यादि अनेक गोष्टी शिकंदरास कळल्या होत्या; आणि त्या वयामध्यें त्या गोष्टींविषयीं विशेष हकीकत विचारावी, हें साहाजिक होतें. परंतु, त्यांविषयीं एक अक्षरही न विचारितां, आशिआखंडाच्या उत्तरप्रदेशांत जाण्यास मार्ग कोणते आहेत,

अमुक अमुक स्थलांच्या मध्यें अंतर किती आहे, इराणच्या राज्याचा बंदोबस्त कसकसा ठेविला आहे, त्या राजानें कोणकोणत्या जागीं कोणकोणांशीं कधीं कधीं लढाया केल्या, तो आपल्या शत्रूशीं कसा वागतो, आणि आपलें राज्य कोणत्या रीतीनें चालवितो, ह्यांविषयीं नानाप्रकारचे प्रश्न करून पुष्कळ माहिती करून घेतली. ही त्याची वृत्ति पाहून वकीलांस मोठें नवल वाटलें. तें इतकें कीं, त्यांतला एकजण तेथच्या तेथें दुसऱ्यास म्हणाला कीं, "अहो, आपला राजा मोठा संपत्तिमान आहे, हें खरें; पण हा राजपुत्र खरोखर मोठा बुद्धिवान आहे." मनुष्यास स्वपक्षाचा अभिमान कितीही जरी असला, तरी परपक्षाचें वर्चस्व जें उघड उघड दिसतें, तें कबूल करावें लागतें. आपणास मोठें म्हणून घेण्यास ज्याला संपत्तीवांचून दुसरें कांहीं साधन नाहीं, तो मनुष्य स्वतः अगदीं अप्रयोजक आहे, असें समजलें पाहिजे.

पूर्व संकेताप्रमाणें फिलिप राजानें शिकंदरास आरिस्तातल ह्याच्या हाताखालीं विद्याभ्यास करावयास ठेविलें. आपला गुरु महा विद्वान् आणि पूज्य आहे, अशी शुद्ध निष्ठा मनांत धरून शिकंदर आरिस्तातलास भजत असे; आणि आपलें गुरुत्व प्रकट करण्यास शिकंदरासारखा बुद्धिमान आणि हव्यासी शिष्य दुसरा मिळावयाचा नाहीं, असें समजून त्याजवर तो फार लोभ करी, आणि त्यास जें शिकवावयाचें तें मनापासून मेहनत करून शिकवी. तेणेंकरून, फार दिवस न लागतां, शिकंदर मोठा मार्मिक विद्यार्थी झाला. शिकंदराला योग्य गुरु आरिस्तातल, आणि आरिस्तातलाला योग्य शिष्य शिकंदर, अशी सर्व लोकांत आख्या झाली. गणित, नीतिशास्त्र, न्यायशास्त्र, मानसशास्त्र, चित्रविद्या, इत्यादि

अनेक गहन गहन विषय त्यानें त्यास पढविले. त्यांमध्यें तो चांगला प्रवीण झाला. नीतिशास्त्र, हें राजे लोकांस विशेष उपयोगाचें आहे, असें त्याला पक्कें समजलें होतें, म्हणून तो त्याजकडे विशेष लक्ष देऊं लागला. लोकांत त्याची मोठी वाहवा झाली. आपला पुत्र असा चांगला निपजला म्हणून फिलिप राजासही फार संतोष वाटला. तथापि, हें सर्व फल आरिस्तातलाच्या कृपेचें आहे, हें तो पूर्णपणें जाणत असे. त्यानें त्याला चांगली नेमणूक करून दिली होती; आणि स्तागिरा ह्या नांवाच्या शहरांत त्याचें जन्म झालें होतें; तें शहर वेढे लढाया इत्यादिकांच्या योगानें बेचिराख झालें होतें, तें ह्या विद्वान गुरुजींचें उतराई होण्याकरितां, त्यानें पुनः पूर्ववत् बांधून वसविलें. तेथें आरिस्तातल येऊन जाऊन राहात असे. त्या गांवांतल्या आपल्या बागेमध्यें दगडी आसनांवर बसून अथवा वृक्षांच्या दाट छायेखालीं इकडे तिकडे हिंडून तो आपल्या शिष्यवर्गास काय पढवावयाचें तें पढवी, असें सांगतात. तीं आसनें पुढें कितीएक वर्षेंपर्यंत दिसत होतीं, व दूरदूरचे लोक तीं मोठ्या पूज्य बुद्धीनें पाहात असत, असें ग्रंथांतरीं लिहिलें आहे.

शिकंदर हा आरिस्तातल ह्यास केवळ पित्याप्रमाणें मानीत असे. त्यानें त्याची कधीं अवज्ञा केली नाहीं. तो शिकवील तें शिकावें आणि तो सांगेल तें ऐकावें, असा त्याचा वर्तनक्रम होता. तो वारंवार उघड असें म्हणे कीं, "बापानें मला जन्म दिलें, आणि गुरूनें त्या जन्माचें सार्थक्य केलें, ह्याकरितां ते उभयतां मला एकसारखे वंद्य आहेत." होय, ही गोष्ट खरी आहे. आधीं मुळीं जन्मच जर न झालें, तर त्याचें पुढें सार्थक्य तें कसें व्हावें; बरें, जन्म झालें, आणि

जर त्याचें सार्थक्य न झालें, तर जन्म झाल्याचें फल तें काय? मरणोत्तर प्राणगतीची गोष्ट तूर्त असो. परंतु, ऐहिक हव्यासांचा विचार केला असतां, ज्ञानसंपादनासारखें जन्मसार्थक्य दुसरें नाहीं, असें सहज लक्षांत येतें. व्यास, वाल्मीकि, होमर, व्हर्जिल इत्यादि कवींचीं नांवें जीं आज चिरायु होऊन राहिलीं आहेत, ह्यास मुख्य कारण त्यांचें ज्ञानसंपादन नव्हे काय? मनुष्य लोकांमध्यें इतर गुणांनीं कितीही श्रेष्ठ असला, तरी आपलें ज्ञानश्रेष्ठत्व स्थापित केल्यावांचून त्याची तृप्ति होत नाहीं. शिकंदर हा संपत्ति वैभवादिकेंकरून आपल्या लोकांमध्यें श्रेष्ठ होता, आणि त्याची मानमान्यता मोठी होती; तरी त्याला शिकविलेलीं फार खोल आणि फार उपयुक्त अशीं कांहीं प्रकरणें जेव्हां त्या गुरूनें लोकांत प्रसिद्ध केलीं, तेव्हां त्यास फार वाईट वाटलें; आणि त्यानें त्याविषयीं त्याला लागलेंच एक पत्र लिहिलें; त्याचें तात्पर्य असें:—"जी विद्या आजपावेतों लोकांस केवळ गुरुमुखद्वारें प्राप्त होत असे, ती लिहून सर्वत्र प्रसिद्ध केली, हें आपण चांगलें केलें नाहीं. जें ज्ञान मीं आपणांपासून संपादिलें आहे, तें जर आपण असें सर्व लोकांस सहज द्याल, तर त्यांजपेक्षां मी श्रेष्ठ आहें हें म्यां कशाच्या द्वारें दाखवावें? माझा अधिकार किती मोठ्या प्रांतांवर चालत आहे, आणि माझें राज्य किती मोठें आहे, हें दाखवून जगास दिपविण्यापेक्षां मोठमोठ्या गहन विद्यांच्या संपादनानें त्यांस आपण थक्क करून सोडावें, हें मला फार आवडलें असतें. परंतु, आतां त्याचा काय उपयोग?"

शिकंदराच्या तरूणपणच्या नानाप्रकारच्या गोष्टी पुस्तकांतून लिहिल्या आहेत. त्यांमध्यें एक फार चमत्कारिक

आहे, ती येथें सांगतों. त्या देशामध्यें त्या काळीं आपल्या घोड्यानें मोठी शर्यत जिंकिली असतां लोक मोठी प्रतिष्ठा समजत असत. तेणेंकरून, मोठमोठे राजेरजवाडे जितका उत्तम घोडा मिळण्यासारखा असे, तितका पुष्कळ द्रव्य खर्चून विकत घेत-असत. कोणे एके वेळीं फिलोनिकस ह्या नांवाच्या मनुष्यानें एक मोठा घोडा विकण्याकरितां फिलिप राजाकडे आणिला, आणि त्याची किंमत तेरा *तालेंत सांगितली. आपणासमक्ष फेरफटका करवून तो घोडा कसा आहे हें पाहण्याकरितां तो आपल्या प्रधानमंडळीसह एका मोठ्या पटांगणांत गेला. त्यां बरोबर शिकंदरही होता. तो घोडा बांध्यानें, रूपानें, आणि रंगानें फार चांगला वाटला; परंतु, तो त्या वेळीं एकाएकीं इतका बिथरला कीं, वर बसण्याची तर गोष्ट दूरच; पण त्याला नुसतें कोणीं थोडें चुचकारलें, तर तें देखील सोसेना. सौदागरानें असा घोडा विकावयास आणून आपणास व्यर्थ श्रम दिले, असें वाटून फिलिप राजास फार राग आला; आणि त्यास त्यानें सांगितलें कीं "असला हा घोडा आम्हांला नको, तूं आपला तो परत ने." हें फिलिपाचें उत्तर इतर मंडळीस बरोबर वाटलें; परंतु, शिकंदरास तें न-आवडून तो म्हणाला, "पहा, हा घोडा फार उत्तम आहे; परंतु, ह्या लोकांस परीक्षा नसल्या मुळें, व ह्यास आपल्या कह्यांत आणण्याचें धैर्य व शाहाणपण ह्यांचे ठायीं नसल्यामुळें, हे त्याला वाईट म्हणून हातचा गमावीत आहेत, हें चांगलें नाहीं काय करावें?" हें तो प्रथम बोलला तेव्हां त्यांजकडे कोणीं फारसें लक्ष दिलें नाहीं. परंतु असे उद्गार त्याच्या तोंडांतून

---

* तेरा तालेंत ह्मणजे सुमारें २५९८७ रुपये ८ आणे; ह्या वरून, एका तालेंताची किंमत काय ती पहा.

दोन तीन वेळां निघालेले राजाच्या कानीं पडले, तेव्हां तो त्याजकडे वळून म्हणाला, "कायरे बाबा, काय म्हणतोस? ही इतकी मंडळी आहे, हिजमध्यें कोणाला कांहीं कळत नाहीं, आणि तुला मात्र काय तें कळतें ना? तूं बसतोस का ह्या घोड्यावर?" शिकंदरानें उत्तर दिलें, "होय बसतों." फिलिप म्हणाला, "बरें, तुला बसतां न आलें, तर ह्या आपल्या अविचाराबद्दल तूं काय दंड देशील?" शिकंदरानें उत्तर केलें, "मी ह्या घोड्याची किंमत भरून देईन."

हीं भाषणें ऐकून सगळी मंडळी हंसूं लागली. परंतु, तिकडे लक्ष न देतां, शिकंदर नीट त्या घोड्याजवळ गेला; आणि प्रथम त्याची लगाम धरून, तो जो सूर्याकडे शेंपूट करून उभा होता, त्यास त्यानें सूर्याकडे तोंड करून उभें केलें. तेव्हां तो लागलाच शुद्धीवर आल्यासारखा होऊन स्वस्थ राहिला. म्हणजे, पूर्वीं त्याचीच सावली त्याच्या दृष्टीस पडून, ती हालली म्हणजे तो तिला बिचकत असे; ती सांवली आतां त्याच्या मागें पडून त्याला दिसेनाशी झाली, आणि तो स्थिर झाला. त्यानें त्याला प्रथम गोड गोड शब्दांनीं गोंजारिलें, पाठीवर थापटिलें, आणि योग्य समय पाहून त्याजवर आरोहण केलें. आरंभीं त्या घोड्यास त्यानें हळूहळू चालविलें, आणि बऱ्याच अंतरावर नेलें. तेव्हां तो मंडळीस दिसेनासा झाला. शिकंदर हा असें धाडस करून अशा व्रात्य घोड्यावर बसून गेला आहे, त्याचें काय होईल कोण जाणे, अशी फिलिपराजास आणि सर्व मंडळीस मोठी काळजी पडली. इतक्यांत तो घोडा दामटीत मोठ्या उल्हासानें तेथें आला. तेव्हां सर्वांस फार आनंद झाला. राजाचा संतोष त्रैलोक्यांत माईना! त्याचे नेत्रांस आनंदाश्रु आले, आणि त्यानें प्रिय

पुत्रास गाढ आँलिंगन देऊन म्हटलें," बाबा शिकंदरा, हें मासिदोनचें एवढेंसें राज्य तुझ्या पराक्रमास कांहींच नाहीं; बाळा, सदैव विजयी हो, आणि आपल्या पराक्रमास शोभण्या-सारखें राज्य मिळीव." पुत्रास आशीर्वाद देण्यास प्रत्येक पित्यास मोठा संतोष वाटतो. परंतु, आशीर्वाद खरा करून दाखविणारे असे शिकंदर फार थोडे. असो.

मुलांवर आईबापांची जी ममता असते, ती निरपेक्ष असते; म्हणजे, त्या ममतेबद्दल मुलांनीं आपणांस अमुक द्यावें, असें त्यांचें मनांत कधीं येत नसतें. तरी, मुलगा प्रौढ होऊन त्यानें आपणास संसारकृत्यांस साह्य केलें तर आपलें दैव फार मोठें, असें बापास वाटत असतें. परंतु, तें सर्वांच्या प्रारब्धीं नसतें. त्यांत विशेषेंकरून राजे लोकांत तर असे दैववान फार विरळ असतात. कारण, त्यांचीं मुलें लहानपणापासून लाडकावलेलीं आणि स्वच्छंद वागण्यास संवकलेलीं असतात. परंतु, फिलिप राजाची गोष्ट तशी नव्हती. सुदैवेंकरून त्यास पुत्र चांगला प्राप्त झाला होता, आणि त्यांत, त्यास त्यानें, सगळे लाड एकीकडे ठेवून, आरिस्तातलाच्या हवालीं केलें होतें; तेणेंकरून तो चांगला विद्यासंपन्न होऊन, फिलिप राजास फार आवडूं लागला. त्याच्या योग्यतेविषयीं त्याची पुरी खातरी झाली. तो सोळा वर्षांचा झाला तेव्हां त्यानें त्याला आपला प्रतिनिधि नेमिलें; म्हणजे, आपण स्वारीच्या वगैरे कामांकरितां देशाबाहेर गेलों असतां मागें राज्याचा कारभार त्यानें चालवावा, असें ठरविलें. त्याप्रमाणें बैझांतियम प्रांतावर स्वारी करण्यास तो जेव्हां सैन्यासहवर्तमान बाहेर गेला होता, तेव्हां मासिदोनच्या राज्याचें सर्व सूत्र त्यानें शिकंदराच्या हातीं दिलें होतें. त्या थोडक्या वेळांत मादरी

नामक लोकांनीं बरेंच मोठें बंड उभारिलें होतें, तें त्यानें मोठ्या पराक्रमानें मोडून टाकिलें. तो वयानें मात्र लहान होता; परंतु बुद्धीनें आणि विचारानें फार प्रौढ होता, असें तेव्हांच्या थोड्याशा वेळच्या कारकीर्दीवरून सर्व लोकांस दिसून आलें. तेव्हांची एक गोष्ट पुस्तकांतून लिहिलेली आहे, ती येथें सांगतों, म्हणजे आमच्या म्हणण्याचें सत्यत्व सहज लक्षांत येईल. ती गोष्ट अशी.—कोणी एक साधारण मनुष्य एके वेळीं त्याजकडे येऊन म्हणाला कीं, 'सुईच्या नेड्यांतून राळ्यांचे दाणे पार फेंकण्याचा अभ्यास मीं केला आहे, तो आपण पाहावा.' तें ऐकून जवळच्या लोकांस फार आश्चर्य वाटून ते त्याची फार वाहवा करूं लागले. शिकंदरास त्याचें फारसें नवल वाटलें नाहीं; तथापि मंडळीच्या आग्रहास्तव त्यानें तो खेळ त्याजकडून करविला. तो आटोपल्यावर, त्यानें त्यास योग्य बक्षीस म्हणून एक टोपलीभर राळे दिले. ह्यांतलें तात्पर्य येवढेंच कीं, जी कला उपयुक्त नाहीं, ती जरी कितीही अवघड असली, तरी तिची प्रशंसा करणें किंवा तिला उत्तेजन देणें हें विचारी पुरुषास शोभत नाहीं, असें त्यानें दर्शविलें; ही पारख फार थोड्यांना असते. खरी विद्या व उपयुक्त कलाकौशल्य इत्यादिकांस आश्रय देणें, अथवा हीं वृद्धि पावत अशा तजविजी योजिणें, हें काम यथास्थितपणें करतां येण्यास ही वर सांगितलेली पारख मनुष्यामध्यें असली पाहिजे.

शिकंदरावर प्रथमतः फिलिप राजाची फार मर्जी होती खरी; तरी पुढें कांहीं एका गोष्टीवरून ती अगदीं उडाली; तिचा प्रकार असा. क्लिओपात्रा ह्या नांवाची एक फार सुस्वरूप तरुण स्त्री होती, तिजविषयीं फिलिपास कामवासना

उत्पन्न झाली. तेव्हां त्यानें तिशीं लग्न लाविलें. त्या समारंभामध्यें तिचा चुलता अतालस हा दारू पिऊन गुंगून तेथील मंडळीस मोठ्यानें म्हणाला, "अहो मासिदोनियन लोकांनो, फिलिप राजा आणि क्लिओपात्रा ह्यांच्या ह्या लग्न-संबंधापासून मासिदोनच्या गादीस चांगला औरस वारस उत्पन्न व्हावा, अशी देवाची प्रार्थना करा." हे शब्द कानीं पडतांच शिकंदर हा अत्यंत कोपायमान झाला, आणि अतालस ह्याजकडे वळून म्हणाला, "अहो, तुम्ही मला दासी-पुत्र समजतां काय?" असें बोलून त्यानें आपले हातांतला दारूचा पेला ताडकर त्याच्या कपाळावर मारिला. हें फिलिपानें दुरून पाहिलें. तेव्हां त्याला अतिशयित संताप आला, आणि त्यासरशी त्यानें आपली तरवार बाहेर काढिली. ती परजून मोठ्या आवेशानें तो, आपल्या मेजापासून उठून, शिकंदर ज्या मेजाशीं बसला होता, त्याजकडे चालला. त्यावेळीं त्यास दारूचा अमल चढलेला असल्यामुळें, त्याचे पाय एकांत एक गुंतून तो मध्येंच अडखळून धाडकर भुईवर पडला. ही उपहासाची संधी साधून शिकंदर उभा राहून तेथील सर्व लोकांस अनुलक्षून मोठ्यानें म्हणाला, "मासिदोनियन लोकहो, जो हा तुमचा राजा युरोप खंडांतून आशिआ खंडांत जावयाची तयारी करीत होता, त्याला, मध्यें पडल्याशिवाय, ह्या मेजापासून ह्या मेजापर्यंत चालवत नाहीं बरें!" तें ऐकून तर फिलिप राजास अतिशयित त्वेष आला. तो इतका कीं, त्या प्रसंगीं मंडळी जर मध्यें न पडती, तर त्यानें शिकंदरास खचीत ठार मारिलें असतें. परंतु सुदैवेंकरून तें संकट टळलें, हें फार चांगलें झालें. तथापि, ह्या वेळेपासून फिलिप राजा हा ओलिंपिआस आणि

शिकंदर ह्यांस अगदीं पाण्यांत पाहूं लागली. त्यांत क्लिओ-पात्रा ही मोठी कृत्या होती; तिनें व तिच्या आप्तांनीं त्या माय-लेकरांविषयीं नानाप्रकारच्या गोष्टी राजास ऐकवून, त्याचें मन अगदीं भारून टाकिलें. इतकें घडल्या नंतर, राजधानी-मध्यें राहण्याचा आपला काळ राहिला नाहीं असें मनांत आणून, शिकंदरानें आपल्या आईस एपिरस येथें नेऊन ठेविल, आणि इलिरिकम देशामध्यें आपण पळून जाण्याचा निश्चय केला. ह्या प्रकारेंकरून फिलिप राजा आणि शिकं-दर ह्यांच वैमनस्य पडलें.

इतक्यांत दीमारातस म्हणून कोणी एक गृहस्थ फिलिप राजाचा आप्त होता. तो त्यास भेटावयास आला. त्यांच्या इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर, "ग्रीसच्या संस्थानां-मध्यें ऐक्य कसें काय आहे!" असें राजानें त्यास विचा-रिलें. तव्हां त्यानें उत्तर केलें, "ग्रीसच्या संस्थानांमध्यें ऐक्य कसें काय आहे ह्याची आपण फार बारीक चौकशी करितां. पण स्वतः आपल्या कुटुंबामध्यें जो एवढा कलह माजला आहे, त्याचें आपणांस कांहींच वाटत नाहीं, ह्याचें मोठें आश्चर्य वाटतें!" हें भाषण ऐकून फिलिप राजा शुद्धीवर आला, आणि त्यानें आपली चूक पदरीं घेऊन, लागलेंच शिकंदरास परत येण्याविषयीं सांगून पाठविलें. चूक ही प्रत्येक मनुष्याकडून होत असते; परंतु, अल्प सूचनेवरून ती कबूल करणें आणि सुधारणें हें सर्वांस साधत नाहीं.

फिलिप राजानें सर्व ग्रीस देश स्वपराक्रमानें जिंकून पादा-क्रांत कसा केला, ह्याची कथाही फार चमत्कारिक आहे. परंतु, ती जरा लांबट आहे, म्हणून येथें लिहिवत नाहीं. तो शूर होता, असें पुष्कळ ग्रंथकारांचें मत आहे; तथापि, देश

जिंकण्याच्या कामीं त्याच्या शौर्यापेक्षां त्याच्या कपटयुक्ति त्यास फार उपयोगीं पडल्या, ही गोष्ट कोणी नाकबूल करीत नाहीं. मोठें सैन्य बरोबर घेऊन आशिआखंडांत जावें, आणि तेथील इराण वगैरे देश काबीज करून घ्यावे, असें त्याच्या मनांत फार होतें; व त्याची त्यानें तयारीही चालविली होती. परंतु, मध्यंतरीं एक दुसरेंच प्रकरण उत्पन्न होऊन, त्याचे विचार मनचे मनांत राहिले. तें प्रकरण असें.—त्याला क्लिओपात्रा ह्या नांवाची एक कन्या होती. तिचें लग्न, एपिरसचा राजा आलेक्झांदर ह्याशीं लावण्याचा त्यानें निश्चय केला. त्याप्रमाणें सर्व सिद्धता झाली; नियमित कालीं लग्न लागलें; आणि नंतर मेजवान्या वगैरे नाना प्रकारचे सोहळे चालले. त्या वेळीं फिलिप हा ग्रीसदेशामध्यें सर्वत्र विजयी झाला होता; तेणेंकरून सगळे राजेरजवाडे त्या समारंभास तेव्हां आले होते. तेव्हां एके दिवशीं तो एका नाटकास गेला. तेथें मासिदोनियन लोक आणि इतर ग्रीक लोक त्याची वाट पाहात तटस्थ बसले होते. फिलिप आंत जातांच ते सर्व उठून उभे राहिले, आणि तो जाऊन आपल्या जागेवर बसल्यावर ते मोठ्या आदबीनें खालीं बसले. तेथें जी काय मौज व्हावयाची होती ती आटपल्यावर, मंडळी उठून बाहेर जाण्याच्या गडबडींत, पासानिआस ह्या नांवाच्या एका तरूण मासिदोनियन मनुष्यानें पुढें सरून तरवार उपसून, तिच्या प्रहारांनीं फिलिप राजास ठार मारिलें; ह्याच्या कारणाचा शोध करितां असें समजलें कीं, क्लिओपात्रेचा चुलता अतालस ह्यानें, दारूच्या धुंदीमध्यें, त्याचा एकदा फार अपमान केला होता, व त्याचा विचार करण्याविषयीं तो फिलिप राजाच्या मागें पुष्कळ दिवस लागला

होता. परंतु, अतालस हा कृपेंतला मनुष्य असल्यामुळें, राजाच्यानें त्याला कांहीं बोलवेना. तरी, फिर्याद खरी आहे, असें त्याला वाटलें होतें, म्हणून, पासानिआस ह्याची कशी तरी समजूत करण्याकरितां, त्यास त्यानें नेहमीं आपणापाशीं राहण्याची एक चाकरी दिली होती. परंतु, तेवढ्यानें त्याच्या मनाची जखम न भरून येतां, त्यानें ही संधी साधून असा सूड घेतला! स्वाभिमानी मनुष्याच्या अंतःकरणास अपमान हा केवळ वज्रासारखा लागतो. आणि त्या अपमानाचा सूड घेण्यास तो आपला जीव देण्यासही मागें पुढें पाहात नाहीं. फिलिप राजास मारण्यास पासानिआस ह्यास ह्या पूर्वीं सवड सांपडली नव्हती, असें नव्हे; तर अशा उत्सवाच्या प्रसंगीं त्याचा प्राण घेतल्यानें सूड उगविल्याचें समाधान आपणास विशेष होईल, अशा समजुतीनें त्यानें हें कृत्य त्या वेळीं केलें असावें, असा सुज्ञ ग्रंथकारांचा तर्क आहे. इष्ट कार्य झाल्याबरोबर निसटून निघून जाण्याची तयारी पासानिआस ह्यानें ठेविली होती; परंतु, तेथल्या राजनिष्ठ लोकांनीं त्यास लागलाच पकडून तेथच्या तेथें तेव्हांच्या तेव्हां ठार मारिलें. हा साधारण मनुष्य मेला, ह्याची गोष्ट असो; परंतु राजानें एका फिर्यादीचा निकाल योग्य रीतीनें न करितां, तिची कशीबशी थापाथाप केली, तेणें करून त्याला प्राणांस मुकावें लागलें; ह्यावरून राजत्व हें किती धोक्याचें आहे, ह्याचा विचार करावा. असो.

ह्या प्रकारेंकरून फिलिप राजा इ० स० पूर्वीं ३३६ वे वर्षीं मृत्यु पावला. तो मोठा शूर आणि सुज्ञ होता; त्याच्या कितीएक गोष्टी लक्षांत ठेवण्या सारिख्या आहेत. त्यांतल्या थोड्याशा येथें लिहितों.—अथेन्सकरांशीं तो युद्ध करीत

असतां, तेथील कितीएक वक्त्यांनीं त्याच्या व्यंगांवर उघड सभांमध्यें पुष्कळ वाच्यता केली होती. ती ऐकून त्याला वाईट वाटलें नाहीं. इतकेंच केवळ नव्हे, तर तो उलटें असें म्हणत असे कीं, त्यांच्या सूचनांनीं मी पुष्कळ शाहाणा झालों, हे त्यांचे मजवर मोठे उपकार आहेत. त्यानें आपणापाशीं नेहमीं एक चाकर ठेविला होता. त्याचें काम एवढेंच होतें कीं, तो सभेमध्यें सिंहासनारूढ होऊं लागला म्हणजे, "फिलिपा, तूं मर्त्य (मरावयाचा) आहेस, हें लक्षांत ठेव," एवढें त्यानें त्यास सांगावें. ही गोष्ट लक्षांत ठेवून जो मनुष्य वागेल, त्याचे हातून सहसा अकर्म व्हावयाचें नाहीं.— अथेन्सकरांकडचे कांहीं वकील कांहीं गाऱ्हाणीं कळविण्याकरितां त्याजकडे आले होते. त्यांजपाशीं बोलणें चाललें असतां, फिलिप राजानें त्यांस विचारिलें, अहो, माझे हातून होण्यासारखें असें तुमचें एकादें काम आहे काय? असेल तर सांगा, मी करितों." तें ऐकून त्या वकीलांपैकीं दिमोकारिसनामक एकानें त्यास उत्तर दिलें कीं, "होय महाराज, सांगतों ऐका. आपण जर आत्महत्या करून घ्याल, तर आपले आम्हांवर फारफार उपकार होतील." हे शब्द ऐकून दुसऱ्या एकाद्याला तर अतिशयित संताप आला असता; परंतु, फिलिप राजानें, रागाचा एक शब्दही तोंडाबाहेर न काढितां, आणि क्रोधाचें एकही चिन्ह न दाखवितां, मोठ्या शांततेनें त्यास म्हटलें, "अहो, तुम्ही आतां जा, आणि आपल्या वरिष्ठांस असें सांगा कीं, जे लोक असे कलह उत्पन्न करणारें भाषण करण्यास मागें पुढें पाहात नाहींत त्यांपेक्षां, जे कोणी तें भाषण निमूटपणें ऐकून घेतात आणि त्याची क्षमा करितात, ते अधिक शाहणे आणि साम करण्या-

विषयीं अधिक सिद्ध आहेत, असें समजलें पाहिजे."—कोणी एक गरीब बायको कांहीं फिर्याद घेऊन वारंवार त्याजकडे येत असे; आणि जेव्हां जेव्हां ती येई तेव्हां तेव्हां "मला आतां वेळ नाहीं" असें तिला सांगून तो मागें लावून देई. शेवटीं अति त्रासून तिनें त्याला म्हटलें "महाराज, आपणांला जर वेळ नाहीं, तर आपण प्रभु झालां कशाला?" हें बोलणें त्या विचारी राजाच्या मनास लागलें, आणि लागलेंच तिचें काय म्हणणें होतें तें त्यानें ऐकून घेतलें; आणि तेव्हांपासून पुढें 'मला वेळ नाहीं' असें उत्तर त्यानें कोणास दिलें नाहीं.—त्याच्या शौर्याविषयीं त्याच्या पक्षाच्या लोकांनीं जरी कितीही स्तुति केली असती, तरी ती कोणाला खरी वाटली नसती. परंतु, त्याचे शत्रु जे अथेन्सकर त्यांचा मोठा नामांकित वक्ता जो दिमास्थनीस, ह्यानें जें त्याविषयीं म्हटलें आहे, तें शब्दशः खरें मानण्यास कोणालाही शंका घ्यावयाचें कारण नाहीं. दिमास्थनीस ह्यानें आपल्या लोकांस असें सांगितलें आहे कीं, "ज्या फिलिप राजाशीं आपण एवढें तुमुल युद्ध केलें, त्यास, सर्वांगावर मोठे मोठे वार लागले आहेत, डोळ्यांत बाण घुसले आहेत, गळ्याचें हाड मोडलें आहे, दोन्ही पाय जायबंदी झाले आहेत, आणि सर्व जखमांतून रुधिर वाहात आहे, अशा अवस्थेमध्यें मीं त्याला पाहिलें, तेव्हां देखील तो, स्वदुःखांची परवा न करितां, मोठ्या धैर्यानें आपल्या सैन्यास उत्तेजन देत मधून फिरत होता. खरोखर त्याला असें वाटत होतें कीं, इतके अवयव व्यंग झाले, त्यांबरोबर आणखीही कांहीं गेले तरी जावोत, परंतु, जे बाकी राहतील ते ह्या लोकांमध्यें अब्रूनें राहोत!" खरें आहे. अवयवांची कथा काय! जे खरे शूर आहेत, ते स्वयशोरक्ष-

णार्थ प्राण खर्चिण्यासही सिद्ध होतात. असो. ह्या गोष्टीं-वरून, फिलिप राजाच्या स्वभावाचें थोडें बहुत तरी अनुमान करितां येईल.

आतां, ह्या कथेचा मुख्य नायक जो शिकंदर त्याच्या चरित्रास आरंभ केला पाहिजे. फिलिप राजा मृत्यु पावतांच शिकंदर हा गादीवर बसून आपणास राजा म्हणवूं लागला; तेव्हां तो अवघा वीस वर्षांचा होता. तो वयानें जरी लहान होता, तरी, आरिस्तातलाच्या हाताखालीं राहून त्यानें राज्य-व्यवस्थाशास्त्र उत्तम प्रकारें म्हटलें होतें, तेणेंकरून, सिंहा-सनारूढ झाल्याबरोबर, तो एकाद्या पुष्कळ अनुभव घेत-लेल्या वृद्ध बिरबलाप्रमाणें सर्व राज्य स्वतः हाकूं लागला. त्याचें धैर्य आणि त्याचें शहाणपण पाहून लोक अगदीं थक होऊन गेले. फिलिपानें, कांहीं संस्थानें खेरीज करून, बहुतेक ग्रीस देश आपलासा करून टाकिला होता, व आजू-बाजूच्या त्रासदायक रानटी लोकांशीं लढाया करून त्यांचा-ही इंगा बराच जिरविला होता; तरी ते, जरा सवड सांप-डली म्हणजे लागलीच गडबड करीत. त्यांशीं युक्तीचा साम करावा, असें शिकंदर बादशाहास त्याच्या प्रधानांनीं पुष्कळ सांगितलें. परंतु, अशी पड घेतली असतां, ते लोक कदाचित् अधिक त्रास देऊं लागतील, आणि त्यांजवर आपलें वजन राहणार नाहीं, असें मनांत आणून त्या तरुण शूर राजानें त्यांचें बोलणें एके बाजूस ठेवून, सर्व सैन्याची एकदम सिद्धता करून, त्यासहवर्त्तमान दान्यूब नदीपर्यंत स्वारी केली; ती नदी फार मोठी आहे, तरी, ती इतक्या लोकांनिशीं एका रात्रींत ओलांडिली; आणि एका मोठ्या युद्धामध्यें त्रिबा-लीचा राजा सिरमस ह्याचा केवळ पराभव केला. ह्याचा

असा हा विलक्षण पराक्रम पाहून, आसपासचे रानटी लोक अगदीं भयभीत होऊन त्यास शरण आले.

ह्याप्रमाणें तो दूरच्या प्रदेशांत लढाईमध्यें गुंतला आहे, असें पाहून, त्याशीं बांकून वागणारीं जीं ग्रीसमधलीं संस्थानें होतीं, त्यांनीं गडबड मांडिली. त्यांत अथेन्सकर तर फारच उतावीळ झाले होते. त्यांचा विख्यात वक्ता दिमास्थनीस हा त्यांस वीररसयुक्त भाषणें ऐकवून वारंवार उत्तेजित करीत होता, आणि ते स्वदेशाभिमानानें अगदीं वेडे होऊन, स्वसंस्थानाच्या स्वातंत्र्यरक्षणार्थ, इतर सर्वस्वाचा पाड काय, पण प्राण देखील खरचिण्यास उद्युक्त झाले होते. थीब्स संस्थानांत तर शिकंदर मेला अशी गप्प उठली होती, आणि तिच्या योगानें तेथील लोक मासिदोनचा सूड उगविण्याच्या तयारीस लागले होते. दिमास्थनीस मोठा राज्यकारस्थानी होता; तो नुसतीं भाषणें करून राहिला नाहीं. त्यानें, आशिआमैनरांतील शिकंदराचा सुभेदार अतालस, म्हणजे क्लिओपात्रा हिचा चुलता, ह्यास बंड करण्याविषयीं मोठ्या आग्रहाचीं अनेक पत्रें लिहिलीं. त्याप्रमाणें करण्यास त्याचें मन प्रथम वळलें होतें; परंतु, शिकंदर हा मोठा धूर्त आणि प्रतापी आहे, त्याजपुढें आपलें कांहीं चालावयाचें नाहीं, असें त्यास वाटून, भयानें आणि आपलें प्रामाणिकपण दर्शविण्याच्या हेतूनें, त्यानें तीं सगळीं पत्रें राजास पाहावयास पाठविलीं. तीं वाचिल्यावर शिकंदराच्या मनांत अतालसाविषयीं मोठा संशय आला; आणि थोडीशी चौकशी करून पाहिल्यावर तो खरा असा त्यास वाटला. तेव्हां, हेकातिअस म्हणून जो त्याचा दुसरा एक सरदार आशिआमैनरामध्यें गेला होता, त्यास त्यानें अतालस ह्यास ठार मारण्याविषयीं

लिहून पाठविलें. त्याप्रमाणें तें काम त्यानें बजाविलें. अशा प्रकारें तो अतालस मेला म्हणून बरें झालें; नाहींतर, आशिआमैनरांत बंड करून त्यानें मोठा अनर्थ केला असता. खरे शाहणे आहेत ते मनुष्याच्या बाह्याचारास भुलत नाहींत.

शिकंदर बादशाहा हा मोठा स्वाभिमानी होता. त्याला उणें उत्तर असें यत्किंचित्‌ही सोसत नसे. दिमास्थनीस हा आपले लोकांस युद्ध करण्याविषयीं आग्रहपूर्वक सांगत असतां एकदा असें म्हणाला कीं, "अहो, शिकंदर हें कालचें पोर, त्याच्या ओंठावरचा जार अझून वाळला नाहीं, तो काय करणार?" हे शब्द कोणीं शिकंदरास सांगितले. तेव्हां तो म्हणाला, "कांहीं चिंता नाहीं; दिमास्थनीस ह्यानें मला पोर म्हटल्यानें मी पोर होत नाहीं; आतां घोडेमैदान जवळच आहे; मी आतां अथेन्स शहरावर जातों, आणि मी पोर आहें कीं पराक्रमी थोर आहें, हें त्या दिमास्थनिसाला दाखवितों." जल्पना करणें हें चांगलें नव्हे हें खरें आहे; तथापि, स्वपराक्रमाभिमानी जे पुरुष असतात, त्यांस आपली प्रतिज्ञा बोलून दाखविल्यावांचून राहावत नाहीं. ह्या वृत्तीपासून एक मोठा लाभ आहे. तो असा कीं, प्रसंगोपात्त एकादा पराक्रमी पुरुष मनांत जरी किंचित् खचला असला, तरी, त्याला, त्याच्या बोलण्याची आठवण होऊन, जनलज्जेच्या भीतीनें, अधिक उत्तेजन येऊन, स्वप्रतिज्ञा शेवटास नेण्याविषयीं महाप्रयत्न करावे लागतात.

थीब्स संस्थानांतले लोक शिकंदरास पाण्यांत पाहत होते, व ते त्याचा मोड करून टाकण्याच्या अगदीं तयारींत होते. हें समजून तो मोठ्या सैन्या सहवर्त्तमान, एकाएकीं त्या शहरासमोर आला, आणि आंतल्या लोकांचा विचार कसा

काय आहे, तो पाहूं लागला. त्यांजवर एकदम हल्ला करून त्यांस धुळीस मिळविणें हें त्याला योग्य वाटलें नाहीं. म्हणून त्यानें त्यांस असें सांगून पाठविलें कीं, तुमचे पुढारी फीनिक्स आणि प्रोत्यूथीस हे दोन गृहस्थ आमच्या हवालीं करा, म्हणजे मग तुमच्या आमच्या विचारानें कोणता तरी एकादा ठराव करूं; आणखी दौंडी पिटवून थीबन लोकांस असें कळविलें कीं, सगळा वैरभाव टाकून जर तुम्ही मला शरण याल तर मी तुम्हांस तुमच्या अपराधांची क्षमा करीन. परंतु, ते लोक तरी मोठे अभिमानी होते. त्यांनीं शिकंदरास परत असें सांगून पाठविलें कीं, तुम्ही आपले कडचे फिलोतास आणि आंतिपातर हे गृहस्थ आधीं आम्हांकडे ओलीस पाठवून द्या, म्हणजे मग तुमच्या बोलण्याचा आम्ही विचार करूं. आणखी शिवाय, त्यांनीं ग्रीसमधल्या इतर स्वतंत्र संस्थानांतील लोकांस असें कळविलें कीं, ग्रीस देशाच्या स्वातंत्र्याचें संरक्षण व्हावें अशी ज्यांची इच्छा असेल, त्यांनीं ह्या प्रसंगीं येऊन आम्हांस मिळावें.

ह्या प्रकारेंकरून त्या दोन्ही अभिमानी पक्षांची अट पडली. परंतु, अशा प्रसंगीं बलिष्ठ पक्षास अधिक स्फुरण चढत असतें. त्याप्रमाणें मासिदोनियन लोकांच्या आंगांमध्यें वीरश्री चढली, आणि ते त्या उद्दाम थीबन लोकांचा सूड घेण्याविषयीं उतावीळ झाले. शिकंदरानें आपल्या सैन्याचे भाग करून, त्यांजवर योग्य सरदार योजून, आणि कोणकोणत्या ठिकाणीं कसकसा हल्ला करावयाचा हें पक्कें ठरवून, त्यांवर हल्ला करण्याची सिद्धता केली. आंतले आंगास थीबन लोकही तसेच सज्ज झाले. बाहेरचे लोक आंत प्रवेश करण्याविषयीं व आंतले लोक बाहेरच्यांस मागें हटविण्या-

विषयीं आपल्या सामर्थ्यानुरूप झटूं लागले. परंतु, मासिदोनियन लोकांची सर्व प्रकारची तयारी थीबन लोकांच्या तयारीपेक्षां पुष्कळ अधिक होती. तेणेंकरून त्यांचा पाय पुढें पडला. कांहीं लोक शहरच्या भोंवतालच्या भिंतीस खिंडारीं पाडून व कांहीं असामी शिड्या लावून त्यांजवरून आंत शिरले. ते दृष्टीस पडतांच थीबन लोकांची धारण पांचांवर बसली. ते अगदीं घाबरून गेले. तरी तितक्यांत त्यांनीं आपली तरवार गाजविली. त्यांनीं मासिदोनियन लोकांस दोन हात दाखविले. परंतु, शेवटीं त्यांस पळ काढावा लागला. सर्व शहरामध्यें थीबन पुढें आणि मासिदोनियन मागें, अशी पळपकड माजली. फिलिप राजाचे आणि शिकंदराचे आप्त मित्र, आणि पिंदार ह्या नांवाचा अति विख्यात कवि इतक्यांचीं घरें खेरीज करून बाकीचीं सगळीं जमीनदोस्त करून टाकिलीं. स्त्रीपुरुष, लहानमोठे, किंवा सुज्ञासुज्ञ ह्याचा कांहीं एक भेद मनांत न आणितां मासिदोनियन लोकांनीं थीब्स शहरांतल्या लोकांची कत्तल उडविली. तेव्हां एकंदर सहा हजार मनुष्यें प्राणांस मुकलीं, असें सांगतात. आणि जीं ३०,००० मनुष्यें बाकी जीवंत राहिलीं होतीं, तीं सर्व गुलाम करून विकिलीं. अशा रीतीनें थीब्स शहराची धूळधाणी होऊन गेली.

ह्या गडबडीमध्यें एक चमत्कारिक गोष्ट घडली, ती येथें सांगितली पाहिजे. शिकंदराच्या सैन्यामध्यें थ्रेसियन ह्या नांवाचे कांहीं लोक होते. त्यांनीं थीब्स शहरांतील तिमोक्लिआ ह्या नांवाच्या एका सुशील स्त्रीचें घर पाडिलें, तिचें सर्व द्रव्य लुटलें, आणि तिला आपल्या सरदाराकडे नेलें. ती फार सुंदर होती, आणि तो मोठा विषयी होता. तेव्हां पुढें काय झालें हें सांगावयास नको. तो पापप्रकार आटो-

पल्यावर त्या सरदारास असें वाटलें कीं, हिजपाशीं पुष्कळ द्रव्य असून तें हिनें कोठेंतरी लपवून ठेविलें असावें. त्याविषयीं त्यानें तिला विचारिलें तेव्हां तिनें असें सांगितलें कीं, "शहर घेण्याच्या गडबडीच्या आरंभीं मीं आपलें द्रव्य माझ्या बागांतल्या विहिरींत टाकिलें आहे, ती विहीर, पाहिजे असल्यास मी आपणांस दाखवितें." द्रव्यलोभ फार कठीण आहे. तो सरदार, त्या द्रव्याच्या आशेनें, त्या स्त्रीबरोबर त्या बागामध्यें गेला, आणि, तिला जवळ उभी करून आपण विहिरीच्या कांठावर उभा राहून आंत डोकावून पाहूं लागला. तेव्हां तिमोक्लिआ हिनें त्यास पटकर आंत लोटून दिलें, आणि वरून मोठमोठे दगड मारून त्याचा प्राण घेतला. नंतर तिला शिपायी लोकांनीं पकडून, शिकंदराकडे नेलें. ती त्याजपुढें उभी राहिली तेव्हां, ती निःस्पृह, सुशील, पापभीत, आणि मोठी पाणीदार बायको आहे, असें तिच्या चर्येवरून त्यास दिसून आलें. तेव्हां तूं कोणाची कोण असें त्यानें तीस विचारिलें. त्यास तिनें उत्तर दिलें कीं, "चिरोनिआ येथें ग्रीसच्या स्वातंत्र्यरक्षणार्थ फिलिप राजाशीं जें तुमुल युद्ध झालें, त्यामध्यें पतन पावलेला महापराक्रमी जो थिआजिनीस त्याची मी बहीण आहें महाराज!" हें भाषण ऐकून शिकंदर बादशाहा फार चकित झाला; त्याला तिची दया आली; आणि त्यानें तिला तिच्या मुलांसहवर्त्तमान सोडून दिलें.

थीब्स शहराची अशी वाताहात इकडे चालली असतां, अथेन्स संस्थानांतले लोक आपल्या प्रजासत्ताक राज्याविषयीं मोठा गर्व वाहून, स्वपराक्रमाच्या घमंडींत शिकंदराचा पराभव करून टाकण्याची तयारी करीत होते. त्यांस स्वर्ग दोन

बेटें राहिला होता, व मासिदोन देशाचा नवा राजा शिकंदर हा आपल्या पुढें घटकाभर देखील टिकावयाचा नाहीं, असें त्यांस वाटत असे. इतक्यांत, कांहीं थीबन लोक, आपले जीव घेऊन पळत पळत लपून बसायास तेथें आले, आणि त्यांनीं तिकडच्या सर्व अनर्थांचें भयंकर वर्तमान अथेन्सकरांस सांगितलें. तेव्हां ते दचकले, आणि, असा पराक्रमी आणि क्रूर जो शिकंदर तो जर एकाएकीं आपणांवर आला तर आपलें काय होईल, ह्याविषयीं काळजी करूं लागले. एकादें संकट कदाचित् येईल, किंवा पुढें केव्हां तरी येईल, असें असलें म्हणजे माणसाला त्याविषयीं फारसें कांहीं वाटत नाहीं. परंतु, तें खचीत आणि अमक्या वेळेस येणार असें समजलें, म्हणजे मग त्याविषयीं तो भयभीत होऊन विचार करूं लागतो. आणखी, ह्या अथेन्सकरांनीं शिकंदराविरुद्ध उठून बंड करण्याविषयीं कितीएक लोकांस उत्तेजन दिलें होतें, हें त्यांचें त्यांना आठवत होतें; आणि हें आपलें कपट त्या मासिदोनच्या नव्या राजास कळलें आहे व त्यावरून आपणांवर त्याचा मोठा दांत आहे, हेंही ते जाणत होते. परंतु, ह्या वेळीं शिकंदरानें अगदीं वेगळें स्वरूप धारण केलें. तो अथेन्स शहराजवळ आला तेव्हां आंतले लोक अगदीं गडबडून जाऊन मोठ्या विचारांत पडले होते; त्यांस त्यानें असें सांगून पाठविलें कीं, तुम्ही कृतकर्मांचा पश्चात्ताप करून जर सामोपचारानें वागाल, तर मजकडून तुम्हांस तिळ मात्र देखील उपद्रव व्हावयाचा नाहीं. त्यास ते मान्य झाले; आणि त्यांनीं आपला संतोष प्रदर्शित करण्याकरितां शिकंदर बादशाहाकडे पाठवावयास एक मंडळी योजिली. तींत दिमास्थनीस हा होता. ती मंडळी तिकडे

जावयास मौंत सिथीरान पर्यंत आली सुद्धां. परंतु, तेथें दिमास्थनिसच्या काळजानें ठाव सोडिला. त्याला शिकंदर बादशाहा मूर्तिमंत दृष्टीपुढें दिसूं लागला, आणि त्याच्या भयानें त्याला एक पाऊल देखील पुढें टाकवेना. तेव्हां त्या मंडळीस तेथून परत अथेन्स शहरांत यावें लागलें. नंतर, दिमादीज, फोसियन एस्किनीज इत्यादि कांहीं लोक मासिदोनच्या राज्याचे कल्याणचिंतक होते, त्यांची मंडळी त्या लोकांनीं शिकंदर बादशाहाकडे पाठविली. तिची त्यानें मुलाखत घेतली. आणि त्यांचें बोलणें ऐकून घेऊन, त्यांजबरोबर अथेन्सकरांस असें पत्र लिहिलें कीं, तुम्ही आपले मुख्य मुख्य आठ दाहा वक्ते आधीं आमच्या स्वाधीन करा, म्हणजे मग आम्ही तुमच्या विनंतीचा काय तो विचार करूं. त्या वक्त्यांच्या यादीमध्यें दिमास्थनिसाचें नांव घातलें होतें. तेव्हां तर त्याची धारण पांचांवर बसली. त्याबरोबर हैपरिदीज, चारीस, आणि चारिरिमस असे मुख्य वक्ते मागितले होते. आणखी त्यानें त्या पत्रामध्यें साफ असें म्हटलें होतें कीं, ग्रीस देशांतील स्वस्थता नष्ट होण्यास व आलीकडचें थीब्स येथील बंड उद्भवण्यास मुख्य कारण हे आहेत, ह्यास्तव योग्य न्यायाधीशांकडून ह्यांची चौकशी करवून ह्यांस शिक्षा देण्याचा आम्हीं निश्चय केला आहे. ह्या प्रसंगीं दिमास्थनीस ह्यानें असें चित्तवेधक भाषण केलें कीं, आपलेकडील वक्ते शिकंदराच्या स्वाधीन करण्याविषयीं जीं अथेन्सकरांचीं मनें वळलीं होतीं, तीं बदलून जाऊन, त्या राजाचा क्रोध शांत करण्यास कोणी दुसरे चांगले लोक त्याजकडे पाठवावे, असें त्यांनीं ठरविलें. तो आपल्या भाषणामध्यें असें म्हणाला

कीं, "शिकंदर बादशाहा हा लांडगा आहे; तुम्ही सर्व अथेन्सकर हीं गरीब मेंढरें आहां; आणि आम्ही वक्ते हे कुत्रे आहों; जर मेंढरांनीं आपण होऊन रक्षक कुत्र्यांस लांडग्या-च्या हवालीं केलें, तर त्यांच्या जीवांचें रक्षण एक पळभर तरी होईल काय?" असे अनेक दृष्टांत देऊन त्यानें त्यांचीं मनें आपलींशीं करून घेतलीं. एका ग्रंथकारानें असें म्हटलें आहे कीं, अथेन्सकरांचीं मनें हे मेघ होत; ह्या मेघांस, दिमास्थनीस ह्याचें वक्तृत्व हा वायु स्वेच्छेनुरूप पाहिजे तिकडे वळवीत असे. हें अगदीं खरें आहे.

अथेन्सामध्यें फोसियन हाही मोठा वजनदार आणि प्रामाणिकपणा व निस्पृहता ह्यांविषयीं आख्यात असा पुरुष होता. त्यास त्याचें मत विचारिल्यावरून त्यानें साफ असें सांगितलें कीं, "ह्या आपल्या अथेन्स संस्थानावर जो एवढा प्रसंग गुदरला आहे, त्यास कारण हे वक्ते आहेत. त्यापेक्षां त्यांस शिकंदराच्या स्वाधीन करावें, हें बरें दिसतें. तुम्हीं स्वतः मजविषयीं म्हणाल, तर मी आपल्या देशाच्या स्वातंत्र्य-रक्षणार्थ मरायास तयार आहें." असें भाषण केल्याचें वर्तमान शिकंदराच्या कानीं गेलें. तेव्हां फोसियन ह्याचा स्पष्टवक्तेपणा आणि सरलता ह्यांचें त्यास मोठें आश्चर्य वाटलें; आणि त्यानें त्यास १०० तालेन्त बक्षीस पाठविलें. जो मनुष्य तो पैसा घेऊन आला होता, त्यास फोसियनानें विचारिलें, "राजानें हें बक्षीस मला कशाकरितां पाठविलें?" त्या मनुष्यानें उत्तर केलें, "आपण सत्यवादी आणि सत्याचरणी आहां, असें पाहून महाराजांनीं आपणांस हें बक्षीस धाडिलें आहे, ह्याचा आपण स्वीकार करावा." त्यावर फोसियन म्हणाला, "राजाला सांगा कीं, सत्य भाषण आणि

सत्याचरण हीं माझीं मजपाशीं आपण जर तशींच अचल राहूं द्याल, तर मी आपला फार आभारी होईन. हें जें तुम्हीं आणिलें आहे, तें जर मा घेतलें, तर, ज्या माझ्या व्रतावरून तें राजा मला द्यावयास पाहात आहे, त्या व्रताचा भंग होईल." हें उत्तर फार लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

अशी पुष्कळ वाटाघाट झाल्यावर अथेन्साहून कांहीं लोक शिकंदर बादशाहाकडे गेले, आणि त्यांनीं त्यास अनेक गोष्टी सांगून त्याचा राग शमविला. तरी क्यारिडिमस नामक वक्त्यावरचा त्याचा कटाक्ष कमी झाला नाहीं. त्यानें त्यास देशाबाहेर घालविलें. शिकंदरानें इतर सर्व लोकांच्या अपराधांची क्षमा केली असून, ह्या एकट्याविषयींच असा कडकपणा कां धरिला, असा प्रश्न सहज उत्पन्न होतो. ह्याचें उत्तर असें कीं फिलिप राजाचा खून करण्याचा जो कट झाला होता, त्यामध्यें ह्या पुरुषाचें अंग होतें, असा त्याला पक्का संशय आला होता. मनुष्यांस सत्कर्म करण्यास जसा कांहीं हेतु लागतो, तसा वाईट कामासही लागतो. आणखी ह्या गोष्टीवरून दुसरें असें दिसून येतें कीं, शिकंदरास त्याच्या बापाच्या वधाच्या कटाची सर्व हकीकत समजली होती, आणि जसा हात साधेल तसा त्यांतील लोकांचा सूड उगविण्याचा निश्चय त्यानें केला होता.

ह्याप्रमाणें ग्रीस देशांतल्या संस्थानांचीं आपसांतलीं वैमनस्यें लयास गेलीं, आणि त्या सर्वांतले लोक इराणचा बादशाहा जो दारयस, तो आपणांवर स्वारी करून येत आहे त्याचें निवारण कसें करावें ह्या विचारांत पडले. ह्या बादशाहानें फिलिप राजाच्या वेळीं ह्या लोकांस चांगला हात दाखविला होता, त्याचें स्मरण होऊन ते ह्या वेळीं फार भ्याले होते.

म्हणून, त्यांनीं पूर्वीं फिलिप राजास जसें सर्वांनुमतें आपल्या सैन्यांचें मुख्य नेमिलें होतें, तसें ह्या वेळीं त्यांनीं आपल्या सगळ्या सेनांचें आधिपत्य शिकंदर बादशाहास दिलें. तेणेंकरून शिकंदर बादशाहास फार संतोष झाला. आणि तो आपल्या स्वारीची तयारी करूं लागला. त्याचा ग्रीस देशामध्यें व इतर जवळच्या प्रांतीं जय झाला, आणि त्यास सेनाधिपति नेमून त्याचा सर्व लोकांनीं बहुमान केला, ह्या गोष्टींविषयीं आपला आनंद त्यास प्रदर्शित करावयास कारिंथ येथें आसपासचे मोठमोठे द्रव्यवान आणि विद्वान लोक जमा झाले होते. त्या वेळीं सिनोपी येथें दायओजिनिस ह्या नांवाचा एक मोठा नामांकित तत्वज्ञानी होता; तोही ह्या समाजांत येईल, असें शिकंदर बादशाहास वाटलें होतें. परंतु, तो तेथें आला नाहीं. तेव्हां आपण त्याच्या घरीं जाऊन त्यास भेटावें असें मनांत आणून, तो बादशाहा, आपले कांहीं लोक बरोबर घेऊन त्याजकडे गेला. तेव्हां सकाळचा प्रहर होता. थंडी बरीच पडली होती; आणि हा तत्वज्ञानी ऊन खात अंगणांमध्यें स्वस्थ पडला होता. त्याची दृष्टि शिकंदराकडे जातांच तो उठून बसला राहिला, आणि त्याजकडे एकसारखी टक लावून पाहूं लागला. त्याची ती वृत्ति पाहून तो राजा क्षणभर स्तब्ध उभा राहिला. नंतर त्यास मोठ्या नम्रतेनें सलाम करून त्यानें म्हटलें, "महाराज, आपणांस कशाची अपेक्षा आहे?" तें ऐकून दायओजिनिसानें उत्तर दिलें, "आपण कृपाकरून तेवढी आपली सांवली मजवरून काढावी, एवढीच अपेक्षा आहे!" _ हे शब्द कानीं पडतांच राजा त्याजपासून अंमळ दूर जाऊन नवल करीत उभा राहिला! एवढ्या समर्थ प्रभूनें अपेक्षा कशाची आहे असें विचारिलें असतां,

मोठें एकादें इनाम मागावयाचें सोडून दायॲजिनिसानें असें वेडगळासारखें मागणें मागितलें, हें पाहून जवळचे लोक त्याचा उपहास करूं लागले. तेव्हां शिकंदर बादशाहा त्यांस म्हणाला, "अहो, तुम्ही त्या पुरुषाचा उपहास कां करितां? मी खरोखर सांगतों कीं, जर मी शिकंदर नसतों, तर मोठ्या संतोषानें दायॲजिनिस झालों असतों." ह्याचें तात्पर्य एवढेंच कीं, पूर्ण सुख जें आहे तें इष्ट वस्तूच्या प्राप्तीमध्यें अथवा तृप्तीमध्यें आहे; मी राजा असून मला पाहिजे ती वस्तु मिळत आहे, म्हणून मला ही स्थिति आवडते; पण ही जर मला नसती, तर इतर मध्यमावस्थांपेक्षां मींही तृप्तावस्था पतकरिली असती, असें शिकंदर बादशाहानें त्यांस दर्शविलें.

आशिआखंडावर स्वारी करण्याची तयारी झाल्यावर अगदीं निघतांना, शिकंदरानें आपल्या हाताखालच्या बडे लोकांस व सरदारांस मोठमोठीं बक्षिसें व इनामें दिलीं; तीं इतकीं-कीं हा आपल्या स्वतःच्या उपभोगाकरितां कांहीं राहू देतो आहे कीं नाहीं, असा जवळच्या लोकांस मोठा संशय पडला. तेव्हां, परदिकास म्हणून कोणीएक गृहस्थ जवळ होता, त्यानें त्यास विचारिलें, "महाराज, आपण जें तें दुसऱ्यांस देऊन टाकीत अहां, तरमग आपण स्वतःकरितां काय राखून ठेवणार?" हा प्रश्न ऐकतांच, "आशा" असें एका शब्दाचें उत्तर त्यानें त्यास दिलें. ह्याचें तात्पर्य असें कीं, मी जें हें लोकांस देत आहें, तें धान्य पेरल्यासारखें आहे; हे माझे हितकर्ते मोठमोठे पराक्रम करून ह्याचें शतपट पीक मला मिळवून देतील, अशी मला पूर्ण 'आशा' आहे, असें त्यानें त्यांस प्रदर्शित केलें. शिकंदर बादशाहा किती विचारी

आणि किती दूरदृष्टि होता, हें त्याच्या एवढ्याश्या एकदोन उत्तरांवरूनच स्पष्ट दिसून येतें.

आपण पर प्रदेशीं स्वारीस जाणार, ह्यास्तव मागें आपलें राज्य संभाळण्यास कोणी तरी चांगला हुशार मनुष्य नेमिला पाहिजे असें मनांत आणून शिकंदरबादशाहानें त्या कामावर अंतिपातर नामक गृहस्थाची योजना केली, आणि त्याचे हाता खालीं १२००० पायदळ आणि १५०० स्वार इतकें सैन्य ठेविलें. त्यानें स्वतः आपणाबरोबर ३०००० पायदळ आणि पांचहजार स्वार इतकी सेना घेतली. हींत पायदळामध्यें १२००० मासिदोनियन होते. इराणचा बादशाहा दारयस ह्याचें राज्य फार मोठें होतें; त्यामध्यें वेगवेगळ्या धर्मांचे, वेगवेगळ्या जातींचे, आणि वेगवेगळ्या भाषा बोलणारे असे अनेक प्रकारचे लोक असून, सर्वांचें सरकार एक, ह्याशिवाय दुसरें कोणत्याही प्रकारचें ऐक्य नव्हतें, हें शिकंदरास ठाऊक होतें. आणि तेणेंकरूनच त्याला त्या राज्यावर चाल करण्याची विशेष उमेद आली होती. तो हें आपलें सैन्य बरोबर घेऊन इ० स० पूर्वीच्या ३३४ व्या वर्षाच्या वसंत-ऋतूमध्यें मासिदोन देशांतून बाहेर पडून आशिआखंडाकडे चालता झाला. नंतर पुढें कायकाय झालें ह्याचें कथन पुढच्या भागीं करूं.

---

## भाग दुसरा.

तारुण्याचा भर आणि विपुल संपत्ति ह्या दोन वस्तु पुरुषास प्राप्त झाल्या म्हणजे त्याचें मन विषयाकडे वळणें हें साह-

जिक आहे. परंतु जे पुरुष खरे थोर असतात, ते ह्या मादक अवस्थेच्या अमलास एकीकडे ठेवून, आपल्या पदवीस योग्य अशा कृत्यांकडे लक्ष लावितात. शिकंदरबादशाहा अशा प्रकारचा पुरुष होता. तो आशिआखंडावर स्वारी करण्यास आपल्या राजधानींतून निघण्याची तयारी करीत असतां त्याचे मर्जींतले सरदार आंतिपातर आणि पार्मिनीओ ह्यांनीं त्यास असें सुचविलें कीं, आपण फार दूरच्या आणि मोठया धोक्याच्या स्वारीस जाणार आहां, ह्यास्तव आधीं लग्न करून घेऊन, गादीच्या वारसाची कांहीं योजना करून ठेवावी, आणि मग काय करणें तें करावें. ह्यावर शिकंदरानें त्यांस असें उत्तर दिलें कीं, "माझ्या पित्यानें एवढें मोठें सैन्य युद्धोपयोगी करून ठेविलें असतां, त्यास तसेंच जागचे जागीं दिवस काढीत राहूं द्यावें आणि लग्न करून मुलगा होण्याची वाट पाहात बसावें, हें मला फार लाजिरवाणें वाटतें. तें मी कधीं करणार नाहीं." हें उत्तर शिकंदरास भूषणप्रद आणि जे कोणी विचारी पुरुष हें ऐकतील त्यांस अत्यंत बोधप्रद आहे. जगामध्यें थोर म्हणवून घेण्यास मनुष्याचे ठायीं अशा प्रकारचे कांहीं असाधारण गुण असावे लागतात. असो.

पहिल्या भागाच्या अंतीं सांगितल्याप्रमाणें मोठी सेना बरोबर घेऊन शिकंदर बादशाहा आशिआखंडाकडे जावयास चालता झाला. त्याच्या हाताखालचे बहुतेक सरदार पन्नाशी उलटलेले, पुष्कळ युद्धप्रसंग पाहिलेले, मोठे शूर, आणि गंभीर असे होते. पायदळाचें स्वामित्व पार्मिनिओ ह्यास दिलें होतें. त्याचा मुलगा फिलोतास ह्याचे हाताखालीं अठराशें स्वार होते. आणि कालास ह्या नांवाच्या सरदारासही तितक्याच थिसलीच्या स्वारांचें मुख्य केलें होतें.

आणखी ह्यांशिवाय, निरनिराळ्या संस्थानांकडून आलेले सुमारें ६०० स्वार होते, त्यांचें मुख्यत्व त्यांच्या त्यांच्या सरदारांकडेसच ठेविलें होतें. हे सगळे सरदार शिकंदरास फार उत्तम मसलत देत आणि त्याच्या अर्ध्या वचनांत वागत. आपल्या प्रभूस यश प्राप्त होण्याचे कामीं आपलें सर्वस्व गेलें, तरी चिंता नाहीं, असें ते समजत. शिकंदरासारख्या शूर आणि विचारशील राजास असे एकनिष्ठ सरदार मिळाल्यावर यशःप्राप्तीचा पाड काय?

युरोप आणि आशिआ ह्यांच्यामध्यें हेलिस्पांत म्हणून एक भूमध्यसमुद्राचा फांटा आहे, त्याचे कांठीं शिकंदराची स्वारी सर्व सैन्यासहवर्त्तमान प्राप्त झाली. तेथें त्यानें, त्या काळच्या रीतीप्रमाणें, आपणास आशिआखंडामध्यें सुरक्षितपणें जातां यावें आणि त्या ठिकाणीं यश प्राप्त व्हावें, म्हणून पुष्कळ देवतांची आराधना केली, आणि तत्संबंधीं जे संस्कार करावयाचे होते, ते लक्षपूर्वक केले. नंतर तो आपली सेना बरोबर घेऊन नावांत बसला. तो आशिआखंडांत येण्याविषयीं इतका उतावीळ झाला होता कीं, आपलें गलबत लवकर लवकर चालावें म्हणून तें वल्हविण्यास तो स्वतः लागत असे. तो त्या समुद्रांत अर्ध्या वाटेवर आला तेव्हां त्यानें, नेपत्युन म्हणून ज्या देवास ते लोक जलदेव मानीत असत, त्यास एक बैल वाहिला, आणि तत्संबंधीं सर्व विधि केला. आशिआखंडाचा किनारा जवळ येत चालला आहे, असें पाहून त्याला परम संतोष झाला. नौका अगदीं किनाऱ्याशीं लागतांच, त्यानें प्रथम आपला उंची पोषाक घातला, आपलीं सगळीं शस्त्रास्त्रें घेतलीं, आपल्या देवतांचें स्मरण केलें, आणि मोठ्या हर्षानें, आणि आपणास येथें खचीत जय मिळणार अशा खातरीनें आ-

शिआखंडाच्या जमिनीवर पाऊल टाकिलें. नंतर मागून सर्व सैन्य उतरलें. ह्या स्वारीमध्यें आपणास यश प्राप्त होणार ह्याविषयीं शिकंदर इतका निःशंक होता कीं, त्यानें आपल्या सैन्याबरोबर अन्नसामग्री अगदीं थोडी एक महिना पुरण्या जोगी घेतली होती, आणि रोकड तर केवळ सत्तर तालेन्तस् त्याजपाशीं होतें. ठीकच आहे; त्याला असें वाटत असे कीं नवीन देश एकदा आपले हातीं आला म्हणजे आपणास तेथें कोणत्याही गोष्टींची वाण पडावयाची नाहीं.

आशिआखंडामध्यें हेलिस्पांतच्या आसमंतात् लहान लहान अनेक राष्ट्रें होतीं. तीं बहुतेक रानटी लोकांचीं असून, इराणचा बादशाहा दारयस हा आपला स्वामी असें कबूल करीत असत. त्यांनीं जेव्हां ही शिकंदराची स्वारी एकाएकीं प्राप्त झालेली पाहिली, तेव्हां तीं अगदीं चकित होऊन ह्याचे म्हणण्यास मान्य झालीं. आज हें राष्ट्र घे, उद्यां दुसरें काबीज कर, असें करीत करीत, शिकंदरबादशाहा दिवसें दिवस आपली सत्ता वाढवीत चालला. हें वर्तमान दारयसाच्या आसपासच्या सुभेदारांस समजलें होतें; परंतु, शिकंदरास आड येण्यास त्यांची छाती होईना. आणखी त्या शूर बादशाहानें आपल्या वीररसप्रधान भाषणांच्या योगानें आपल्या हाताखालच्या शिपायांस इतकें स्फुरण आणिलें होतें कीं, जेव्हां ते बाहेर पडत, तेव्हां त्यांच्या मुखचर्यांवर युद्धभीति तिळभरही न दिसतां, आपणांस जय खचीत आणि सहज मिळावयाचा असा त्यांचा पूर्ण भरंवसा जसा मूर्तिमंत दृष्टीस पडे. तो लांपसाकस शहराजवळ आला, तेव्हां आंतल्या लोकांनीं बंड उभारून त्यास आड येण्याची खटपट मांडिली ती त्यास कळली. तेव्हां तें

शहर अगदीं जमीनदोस्त करून टाकावयाचें, असा त्यानें निश्चय केला. त्या शहरामध्यें आनाक्सिमिनीस म्हणून एक मोठा विद्वान् पुरुष राहत होता. त्याजवर फिलिप राजाचा फार लोभ असे. आणि तो कांहीं दिवस शिकंदराचा गुरु होता; तेणेंकरून तोही त्यास पूज्य मानीत असे. हा विद्वान् पुरुष कांहीं अगत्याच्या कामाकरितां मोठ्या जलदीनें आपणाकडे येत आहे, असें शिकंदरानें पाहिलें. तेव्हां त्याचे मनांत असें आलें कीं, लांपसाकस शहर धुळीस मिळविण्याचा जो विचार आपण मनांत आणिला आहे तो रहित करण्याची भीड घालण्यास हा आपणाकडे येत असावा. म्हणून तो जवळ प्राप्त होतांच त्यानें शपथपूर्वक त्यास असें सांगितलें कीं, "तुम्ही जें मला आतां विचारणार आहां, तें मी कधींही मान्य करावयाचा नाहीं." हें ऐकून त्या चतुर विद्वानानें त्यास म्हटलें, "महाराज, मी आपल्या मर्जीबाहेर नाहीं. माझी विनंती एवढीच आहे कीं, आपण लांपसाकस शहर अगदीं होतें कीं नव्हतें असें करून टाकावें." हे शब्द ऐकून शिकंदर बादशाहा कुंठित आणि थक्क झाला, आणि तें शहर उद्ध्वस्त करण्याचा विचार त्यानें सोडून दिला. अशा युक्तीच्या भाषणानें त्या विद्वानानें आपल्या शहराचा बचाव केला. आनाक्सिमिनीस ह्याची समयसूचकता आणि धूर्तता पाहून मोठा चमत्कार वाटतो; परंतु तो एवढा विद्वान् असून खोटें बोलला, येणेंकरून मात्र किंचित् विस्मय होतो.

शिकंदर लांपसाकस येथून निघाला तो, इलियन प्रांतांतून फ्रिजिया प्रांतामध्यें ग्रानिकस नामक एक मोठ्या नदीच्या कांठीं आला. तिच्या पलीकडच्या तीरावर, दारयस बादशाहाचे जवळजवळच्या इलाख्यांचे सुभेदार व कांहीं सरदार

एक लक्ष पायदळ व दहा हजार स्वार इतक्या सैन्यासहवर्तमान युद्धास सज्ज होऊन राहिले होते. त्या सरदारांमध्यें मेम्नन ह्या नांवाचा एक सरदार फार जुना आणि पुष्कळ लढाया मारिलेला असा होता. त्यानें आपलें मत असें दिलें कीं, शिकंदराच्या सैन्याच्या आंगावर चालून जाऊन पडणें हें आपणांस तूर्त योग्य नाहीं; तर, कांहीं सरदारांनीं, तो उतरला आहे त्या प्रदेशाच्या आसमंतात् भागीं जाऊन, तेथील दाणाचारा आणि पाणी इतकें नाहींसें करावें कीं, तेणेंकरून तो राजा घाबरून आपल्या मुलखाकडे परत चालता होईल; आणि असें एकदा झालें, म्हणजे मग तो पुनः इकडे येण्याचें नांव घ्यावयाचा नाहीं. ही मसलत बरी होती. परंतु, ती इतर सरदारांस मानवली नाहीं. फ्रिजिया प्रांताचा सुभेदार आर्सितीज हा तर उघड असें म्हणाला कीं, ही गोष्ट मला अगदीं कबूल नाहीं; आणि हे ग्रीक लोक माझ्या ताब्यांतल्या मुलखांत धामधूम करण्याच्या विचारांत आहेत, त्यांस घालवून देण्यास मी एका पलाचा ही विलंब लावणार नाहीं. आणखी दुसरा एक जण तर असें बोलला कीं, ही मोहीम पुष्कळ दिवस लांबावी, आणि दारयसाच्या लष्करांत आपली पोळी अशीच पिकती राहावी, ह्या हेतूनें मेमनन हा असली रडकी मसलत देतो. वास्तविक पाहिलें असतां, तो गृहस्थ मोठा योद्धा आणि आपल्या प्रभूचें खरें हित साधणारा होता; आणि तेणेंकरून दारयस हा त्याजवर फार लोभ करीत असे. परंतु, मनुष्याची परीक्षा सर्वांस सारखी नसल्यामुळें अशा थोर मनाच्या पुरुषांसही अल्पमति जनांच्या तोंडचीं उणीं उत्तरें सोसावीं लागतात, तेथें उपाय नाहीं. मेमनन ह्यांचें म्हणणें एके बाजूस राहून ह्या प्रसंगीं

इतर सरदारांच्या विचाराप्रमाणें एकदम समोर युद्ध करण्याचें ठरलें.

ही ग्रानिकसनदीच्या पलीकडच्या तीरची हकीकत झाली. आलीकडच्या तीरावर शिकंदराच्या लष्करांतही मोठी गडबड होऊन राहिली होती. ती नदी मोठी दिसे आणि तिजविषयींची माहिती फारशी कोणास नव्हती. त्यामुळें पुढच्या उपक्रमाविषयीं तेथील मोठमोठ्या लोकांत मतभेद पडला. त्याची सर्व हकीकत देण्यास येथें जागा नाहीं. तथापि, त्यांतील मुख्य पुरुष शिकंदर आणि पार्मिनिओ ह्यांचा जो ह्यासंबंधी पत्रव्यहार झाला, तो थोडक्यांत येथें दाखल करितों; म्हणजे त्या मतांमध्यें भेद काय होता, व त्यांविषयीं शेवटचा निकाल काय ठरला, हें सहज लक्षांत येईल. आपण ही नदी एकदा उतरून पलीकडे जाऊं केव्हां आणि त्या दारयसाच्या सैन्याचा पराभव करूं केव्हां असें शिकंदरास झालें होतें, हें पार्मिनिओ ह्यास समजलें. परंतु, अशी त्वरा करणें हें प्रशस्त नव्हे, असें त्यास वाटून त्यानें त्याविषयीं त्याला लागलेंच एक पत्र लिहिलें, त्याचें तात्पर्य असें:— "हल्लीं जसे आपण ह्या नदाच्या कांठीं सैन्यासहवर्तमान तळ देऊन राहिलों आहों, तसेंच आणखी कांहीं दिवस राहावें, हें मला बरें दिसतें. निदान आजची रात्र तरी दम धरावा. शत्रूंपाशीं आपल्या इतकें पायदळ नाहीं, ही गोष्ट खचीत आहे. त्या अर्थीं त्यांच्यानें आपणांवर चाल करवणार नाहीं इतकेंच नव्हे, तर ते आज रात्रीं तेथें राहावयाचे सुद्धां नाहींत, असें मला वाटतें. आणि, ते आणखी सैन्य आणण्याकरितां तेथून हालले, म्हणजे आपल्या सैन्यास ही नदी उतरण्यास बरें पडेल. ही नदी कितीएक ठिकाणीं फार खोल आहे, हिच्या बाजूस

कितीएक मोठमोठ्या घसरणी आहेत, आणि कितीएक जागीं दरडी पडलेल्या आहेत, तेव्हां अशा गैरमाहितीच्या नदींतून पार जाण्यास एकदम निघणें हें फार भयंकर आहे. आणि आपले थोडथोडे लोक जर पलीकडे जाऊन उतरूं लागले, तर शत्रूचे लोक तिकडे शस्त्रास्त्रांनीं सिद्ध आहेत, ते त्यांचा तेव्हांच चुराडा करून टाकितील. अशी पहिल्या प्रथमच जर आपल्या सैन्याची दाणादाण झाली; तर लोकांची हिंमत खचेल, शत्रूला अधिक आवेश येईल, आणि मोठ्या विजयाचा जो एवढा आव घातला आहे, तो सगळा फुकट जाईल, आणि जनांत हंसें होईल, ह्याचा चांगला विचार करा." हें पत्र वाचिल्यावर शिकंदरानें त्याला लागलेंच उत्तर लिहिलें. त्याचें तात्पर्य असें :—" पार्मिनिओ, तूं म्हणतोस तें सगळें खरें आहे, आणि त्याचें तात्पर्य मी पूर्णपणें समजतों. परंतु, तूंच असें पहा कीं, हेलिस्पांत हा एवढा समुद्र असतां, तो उतरून इकडे येण्यास आपण भ्यालों नाहीं ;-आणि ह्या यःकश्चित् ओढ्यानें आपणांस एवढ्या विचारांत पाडावें, आणि भिववावें, हें मोठें लाजिरवाणें नव्हे काय? कसेंही संकट प्राप्त झालें तरी त्यांतून पार पडण्याविषयींची माझी हिंमत, आणि मासिदोनच्या लोकांचें शौर्य, हीं मनांत आणिलीं असतां, असें कान पाडून पडून राहणें हें अगदीं अश्लाघ्य आहे, असें तुला देखील वाटल्यावांचून राहणार नाहीं." ह्याप्रमाणें पत्रव्यवहार झाल्यावर शिकंदरानें शत्रूंवर चालून जाण्याचा निश्चय केला.

त्याप्रमाणें सर्व सिद्धता झाली. शिकंदरानें आपला घोडा आणवून आपण त्यावर बसला. तसा पार्मिनिओही घोड्यावर स्वार झाला. सगळें सैन्य रांगांनीं उभें करून लहान

लहान टोळ्यांनी नदींत चालविलें. उजवीकडे शिकंदर चालला, आणि डावी बाजू पार्मिनिओ ह्यानें संभाळिली. ही सेना मोठें धैर्य धरून जयघोष करीत आपणाकडे येत आहे, असें जेव्हां दारयसाच्या सैन्यानें पाहिलें, तेव्हां त्यांतील लोक तिजवर बाणांचा वर्षाव करूं लागले. त्या बाणवृष्टीच्या योगानें शिकंदराच्या कितीएक लोकांस मोठमोठ्या जखमा झाल्या, परंतु बाकीचे लोक तिळभर देखील भ्याले नाहींत. ते एक एक पाऊल पुढें टाकीत आलीकडच्या किनाऱ्यास येऊन पोहोंचले. तेव्हां उभय पक्षांचें तुंबळ युद्ध माजलें. प्रथमतः मासिदोनियन लोकांचा पराभव होतो, असें लक्षण दिसूं लागलें. तेव्हां शिकंदर स्वतः घोड्यावर बसून पुढें आला, आणि त्यानें स्वतः पुढें सरून, चार शब्दांत आपल्या लोकांस इतकें उत्तेजन दिलें कीं, ते सर्व एकदम वाघांप्रमाणें आपल्या शत्रूंवर चालून जाऊन तुटून पडले, आणि एका क्षणांत त्यांनीं त्यांची दाणादाण करून टाकिली. दारयसाचा सरदार मेमनन आणि त्याचा पुत्र हे दोघे आपल्या जीवांकडे न पाहतां जरी लढत होते, तरी त्यांचें कांहींच चाललें नाहीं. त्यांचे लोक दशदिशा पळूं लागले, ते उभे राहीनात. दारयसाचा जांवाई स्पित्रोबेथस, हा ऐओनिआ प्रांताचा दुय्यम सुभेदार होता, तोही ह्या समरामध्यें, आपणाबरोबर दुसरे चाळीस सरदार घेऊन, मासिदोनियन सैन्याचा नाश मोठ्या झपाट्यानें करीत होता. हें शिकंदराच्या दृष्टीस पडलें तेव्हां त्याला मोठा आवेश आला, आणि त्या सरसा तो जो निघाला, तो एकदम स्पित्रोबेथस ह्याशीं येऊन भिडला. मासिदोनचा राजा असा आपणांसन्निध आलेला पाहून ते सर्व जण त्याजवर

तुटून पडले. शिकंदर आणि स्पित्रेबिथस हे एकमेकांस बरच्या मारूं लागले. ते दोघे जीवांची आशा सोडून लढत आहेत, आणि एकमेकांचे प्राण घेण्याविषयीं महत्प्रयत्न करीत आहेत, असें पाहून, जवळचे कितीएक सरदार थक्क होऊन तोंडांत बोटें घालून उभे राहिले. कितीएक आपापल्या पक्षांस जय प्राप्त होण्याविषयीं आपल्या प्रमुख योद्ध्यांस साह्य करीत होते. असें चाललें असतां स्पित्रेबिथस हा एक मोठी तरवार घेऊन शिकंदराचे अंगावर धांवला, आणि तिनें त्याला एक लहानसा वारही केला. आणि पुनः ती उगारून तो त्यावर मोठा प्रहार करणार, इतक्यांत शिकंदरानें आपली बरची एकाएकीं त्याच्या तोंडांत भोंसकून, त्याला आपल्या पायांशीं मूर्छित पाडिलें. तो तेथें तात्काळ मरण पावला. हें दृष्टीस पडतांच स्पित्रेबिथस ह्याचा सखाभाऊ रोसासेस हा हातांत एक मोठी फरशी घेऊन शिकंदरावर धांवून आला, आणि त्यानें ती लागलीच त्याच्या डोक्यांत घातली. ती केसांवरून निसटती गेली. तेणेंकरून त्याला अधिक आवेश येऊन, त्यानें, मोठा प्रहार करण्याकरितां पुनः उगारिली. आणि तो ती आतां त्याच्या मस्तकांत घालणार, इतक्यांत शिकंदराचा सरदार क्लितस ह्यानें आपल्या तरवारीनें त्याचा वर केलेला हात वरच्यावर छाटून आपल्या प्रभूचा प्राण वांचविला! अशी सरदारांची दुर्दशा पाहून दारयसाच्या सैन्यांतील लोकांचें धैर्य नाहीसें झालें, आणि आपल्या प्रभूचें शौर्य पाहून मासिदोनियन लोकांस फार स्फुरण चढलें. मग काय विचारावें! इराणी सैन्यास देमाय धरणीठाय झालें. तें दशदिशा पळूं लागलें. अशा प्रकारेंकरून शिकंदर बादशाहास जय प्राप्त झाला.

दारयसाकडील सैन्यामध्यें सुमारें तीन हजार ग्रीक लोक होते. ते युद्धविद्येमध्यें प्रवीण होते, त्यांवर शिकंदरानें चाल केली. तेव्हां ते एका बंदोबस्ताच्या ठिकाणीं जाऊन बसले. त्यांस स्वाधीन होण्याविषयीं निरोप पाठविल्यावर त्यांनीं प्रत्युत्तर असें दिलें कीं, आमच्या जीवांस धका न लावण्याविषयीं जर शपथपूर्वक वचन द्याल, तर आम्ही तुमच्या सांगण्याप्रमाणें करितों. हें उत्तर शिकंदर बादशाहास मोठें अपमानास्पद वाटून फार क्रोध आला; आणि त्यांजवर एकदम हल्ला करून त्यांतले सुमारें हजार बाराशें लोक त्यानें चरचरां कापून काढविले, आणि बाकीचे सुमारें दोन हजार असामी ह्यांस धरून, कैद करून, मासिदोनिआ देशास पाठविलें.

ह्या ग्रानिकस नदीवरच्या युद्धामध्यें इराणच्या बादशाहाच्या सैन्याचा फार नाश झाला. त्यांतील मोठमोठे पराक्रमी सरदार पतन पावले. फ्रिजिआचा सुभेदार आर्सितीज हा या युद्धाच्या गर्दीच्या वेळेस भयभीत होऊन तेथून निघाला; तो नीट आपल्या अधिकाराच्या ठाण्यावर जाऊन बसला. तेव्हां त्याच्या मनांत असें आलें कीं, ही लढाई जी इतकी निकरास आली, ती माझ्या आग्रहामुळें आली; आणि ह्या गोष्टीचा त्याला अतिशयित पश्चात्ताप होऊन, त्यानें आत्महत्या करून घेतली. रालिन ह्मणून एक मोठा नामांकित इतिहासकार होऊन गेला. तो ह्याविषयीं असें ह्मणतो कीं, "हा समरांगणामध्यें युद्ध करतां करतां पडता, तर तें मरण त्याला विशेष भूषणप्रद झालें असतें." होय, ही गोष्ट खरी आहे. आणि ही, आत्महत्या करून घेते वेळीं कदाचित् आर्सितीज ह्याच्या देखील मनांत उभी राहिली असेल. परंतु उपयोग काय? प्राणावर बेतली ह्मणजे

मनुष्यास त्याच्या संरक्षणाव्यतिरिक्त दुसरें कांहीं सुचत नसतें. असो. युद्धामध्यें वीस हजार पायदळ आणि अडीच हजार स्वार इतकें दारयसाचें सैन्य प्राणास मुकलें. शिकंदराचेही कांहीं लोक मरण पावले. ते ह्या वरच्या संख्येशीं लावून पाहिले असतां अगदींच थोडे दिसतात. कितीएक ग्रंथकारांनीं तर त्यांची संख्या चारपांचशेंच्या आंत सांगितली आहे.

हें लढाईचें काम आटपल्यावर, शिकंदर बादशाहा आपल्या सैन्याची अवस्था कशी काय आहे ती पाहावयास लागला. ह्या युद्धामध्यें त्यानें स्वत: जीवावरचीं संकटें भोगिलीं होतीं, त्यांच्या योगानें त्याची मोठी वाहवा झाली होती. तींत तो गुंग झाला नाहीं. आपल्या शक्तीप्रमाणें जसे आपण महत्प्रयत्न केले आहेत, तसे आपल्या लष्करांतल्या लहानापासून थोरापर्यंत सर्व लोकांनीं केले आहेत, असें समजून, तो शूर आणि थोर पुरुष सर्वांची हकीकत लक्षपूर्वक ऐकत असे. कोणी कितीही लांबण लावीत बसला तरी तो त्याचा कंटाळा करीत नसे. ही वृत्ति राजास अत्यंत भूषणप्रद होय. आणखी हिच्या योगानें राजा फार लोकप्रिय होतो. शिकंदर बादशाहा हा आपल्या लोकांच्या हकीकती ऐकून स्वस्थ बसला नाहीं. कोणास कोठें जखम लागली आहे, कोण कशानें आजारी पडला आहे, आणि कोणाला कशाची गरज आहे, हें पाहात तो नेहमीं फिरत असे, आणि त्याविषयीं मोठ्या काळजीनें सर्व तजवीज बरोबर ठेवीत असे. अशा राजाविषयीं त्याच्या प्रजेच्या ठायीं विपुल पूज्यभाव असावा, हें साहजिक आहे.

जे थोर मनाचे पुरुष असतात, ते खरा सद्गुण कोणाचेही ठायीं असला तरी त्यास मान देतात. ह्या ग्रानिकस नदीवरच्या समरामध्यें इराणच्या बादशाहाकडचे जे मोठमोठे

सरदार पतन पावले होते, त्यांचीं प्रेतें तेथें पुरून त्यांजवर थडगीं बांधण्याविषयींची परवानगी तिकडच्या लोकांनीं शिकंदरापाशीं मागितली; ती त्यानें त्यांस मोठ्या संतोषानें दिली. ही केवळ इराणी लोकांविषयींच गोष्ट नव्हे. तर, जे ग्रीक लोक, बहुत दिवसांपासून दारयसाच्या लष्करांत चाकरीस असून, ह्या प्रसंगीं रणांगणीं पडले, त्यांच्या नांवांचींही पाहिजे असल्यास थडगीं बांधावीं असें त्यानें सांगितलें. अशा आचरणेंकरून, शौर्य आणि स्वराजनिष्ठा हे जे दोन गुण आहेत, ते शत्रूंच्या ठायींही जरी असले, तरी ते मानपात्र आहेत, असें त्यानें दर्शविलें. राजांसारख्या थोर पुरुषांनीं असें उत्तेजन दिल्यावांचून जगामध्यें सद्गुणांची वृद्धि व्हावयाची नाहीं. ह्या गोष्टींचें विवेचन करीत असतां, शिकंदरानें जे २००० ग्रीक लोक बिड्या घालून कैद करून, मासिदोनिआ देशामध्यें पाठविले, त्यांविषयीं रोलिननामा ग्रंथकार असें लिहितो कीं, "परदेशच्या लोकांस अनुकूल होऊन स्वदेशाशीं लढणें हें महत्पाप आहे, असें ग्रीक लोकांच्या धर्मशास्त्रांत सांगितलें आहे, म्हणून त्यास असें करावें लागलें." म्हणजे, त्यांस शासन केलें ह्यांत त्यानें कांहीं चूक केली नाहीं, असें त्याच्या लिहिण्याचें तात्पर्य आहे. चमत्कार पहा. शिकंदराचा पराभव करण्याकरितां जीव जात पर्यंत जे ग्रीकलोक लढले, त्यांची वाहवा करून त्यानें त्यांची थडगीं बांधण्यास परवानगी दिली; आणि ज्या बिचाऱ्या दोन हजारांस तशी मरावयाची संधी सांपडली नाहीं, ते गुन्हेगार समजून त्यानें त्यांस तुरुंगांत टाकिलें! जो सद्गुण पुरता साधेल तो खरा सद्गुण; आणि तोच जर अर्धवट लाधला, तर तो दुर्गुण व्हावा काय? असो.

ह्या लढाईमध्यें इराणी सैन्याचें पुष्कळ सामानसुमान शिकंदराच्या सैन्याच्या हातीं लागलें. तें सगळें त्यानें मासिदोनिअन लोकांसच घेऊं दिलें नाहीं; तर, त्यांतल्या सुमारें तीनशें उत्तम ढाला अथेन्सकरांस पाठवून दिल्या. त्या ढालांवर व जें दुसरें कांहीं सामान त्यानें शत्रूंपासून घेतलें होतें, त्यावर "हें आशिआखंडांतल्या रानटी लोकांपासून, फिलिपराजाचा पुत्र शिकंदर ह्यानें ग्रीक लोकांच्या साह्यानें घेतलें," असें खोदविलें होतें. ह्यावरून त्यास लौकिकाची हौस किती होती, हें उघड दिसून येतें. तथापि, ह्या लेखाच्या योगानें त्यानें ग्रीक लोकांस आपल्या यशाचे वांटेली कबूल केलें, हें त्याच्या थोरवीस फार भूषणप्रद आहे; कारण राजे लोकांच्या मनांत इतके बारीक विचार बहुधा येत नसतात. ह्या लुटीच्या सामानांपैकीं, सोन्यारुप्याचीं ताटें, मोठे मोठे रुजामे, नामीनामी बहुमोल पडदे इत्यादि ऐषआरामाच्या वस्तु त्यानें आपल्या मातुश्रीकडे पाठवून दिल्या. त्या पाहून तिला किती संतोष झाला असेल बरें!

ग्रानिकस येथील लढाईमध्यें जो शिकंदरास जय प्राप्त झाला, त्याच्या योगानें त्याच्या शौर्याविषयीं चोहींकडे फार आख्या झाली. आणि सर्व लोक त्यास भिऊं लागले. दारयसाच्या राज्याच्या पश्चिमेकडील सरहद्दीवर समुद्रकांठीं सार्दिस म्हणून एक फार मजबूद शहर होतें. त्या समोर त्याची स्वारी येतांच आंतले लोक भयभीत होऊन त्यास शरण आले. तेव्हां शिकंदरानें त्यांस तिळभर देखील इजा न देतां, त्यांजवर आपला अमल बसविला, आणि त्यांच्या शहराचा कारभार त्यांच्या गामूल वहिवाटीप्रमाणें चालावा, असा ठराव केला. ह्याप्रमाणें सार्दिस शहराची तजवीज लावि-

त्यावर, तो च्यार दिवसांनीं एफिसस येथें आला. तेथेंही त्यास कोणी आड आलें नाहीं. तें शहर हस्तगत होतांच, त्यानें तेथील लोकांमध्यें अशी द्वाही फिरविली कीं, यावत्कालपावेतों राजभाग म्हणून जें कांहीं दारयसास पोंचत होतें तें सर्व दयाना देवीच्या संस्थानाकडे द्यावें. त्याप्रमाणें सर्व लोक वागूं लागले. दयाना ह्या देवीचें येथील देवालय, शिकंदर बादशाहा जन्मला त्या-रात्रीं दग्ध झाल्याविषयीं मागें लिहिलें आहे, तें तेथच्या लोकांनीं पुनः बांधण्याचा कारखाना सुरू करून ह्या सुमारास बरेंच आकारास आणिलें होतें, तें त्यानें स्वतः जाऊन पाहिलें. त्या कामावर मुख्य कारागीर दिनोक्रेतिस ह्या नांवाचा होता. त्याची कुशलता पाहून शिकंदर बादशाहास मोठें नवल वाटलें. पुढें ह्याच कारागिरास त्यानें इजिप्त देशांतील आलेक्झांद्रिआ शहर बांधण्याच्या कामावर योजिलें होतें. हें देऊळ बांधण्यास त्या लोकांनीं कितीएक लक्ष रुपये खरचिले होते, व आणखी कितीएक लक्ष खरचिण्याची तजवीज लावून ठेविली होती. हा सगळा पैसा मी देतों, पण कसेंही करून माझें नांव त्या देवळावर घाला, असें शिकंदरानें त्यांस मोठ्या आग्रहानें सांगितलें. तें त्यांस अगदीं रुचलें नाहीं; परंतु, शिकंदराचा कोप न होतां ही गोष्ट कशी तरी टाळिली पाहिजे, असा त्यांस मोठा विचार पडला. तेव्हां त्यांतले जे कोणी शाहणे आणि चतुर होते, त्यांनीं पुढें होऊन बादशाहास म्हटलें कीं, "महाराज, एका देवानें दुसऱ्या देवाचें देऊळ बांधावें हें शोभत नाहीं." तें ऐकून तो बादशाहा मनांत खूष होऊन स्तब्ध राहिला, आणि त्यानें तो नाद सोडिला. ह्या वरील गोष्टींवरून शिकंदराची महत्वाकांक्षा, आणि त्या चतुर

पुरुषाचें समयोचित भाषण करण्याचें सामर्थ्य हीं दिसून येतात.

शिकंदर एफिसस येथें होता तोंच थेल्स आणि माग्ने-शिआ ह्या शहरांतील लोकांकडील वकील त्यास येऊन भेटले, आणि त्यांनीं त्याचें स्वामित्व कबूल केलें. नंतर शिकंदरबादशाची स्वारी मिलितस शहरावर गेली. तेथील लोक मोठे अभिमानी असून, त्यांस असें वाटत होतें कीं दारयसाकडून आपणांस पाहिजे तेव्हां पाहिजे तेवढें साह्य मिळेल. आणि तेणेंकरून ते आपल्या शहराच्या वेशी लावून घेऊन आंत स्वस्थ बसले. त्या शहराजवळ समुद्रा-मध्यें लहानसें इराणी आरमार होतें, त्यावर त्या लोकांची सगळी आशा होती, व ती सफल करण्यास त्या आरमारानें ही कितीएक वेळां प्रयत्न करून पाहिले; परंतु ते सर्व व्यर्थ गेले. इतकेंच केवळ नव्हे; तर, शिकंदराच्या भयानें त्या आरमारास आपली जागा सोडून पळून जावें लागलें. ग्रानिकस येथील समरांगणांतून मेमनन जो निघाला, तो, आपल्या कांहीं निवडक शिपायांसहवर्तमान, ह्या मिलितस शहरच्या किल्ल्यामध्यें येऊन मोठ्या बंदोबस्तानें राहिला होता. आणि होईल तिककें करून त्या शहराचें व किल्ल्याचें रक्षण करावयाचें, असा त्याचा निर्धार होता. शहराभोंवतीं एक मोठी मजबूद भिंत होती, आणि आंत पुष्कळ दिवस पुरण्या-सारखी अन्नसामग्री होती, हें शिकंदरास ठाऊक होतें. तरी त्या शूर पुरुषानें आपला नेहमींचा बाणा सोडिला नाहीं. त्यानें एकदम हल्ला करून त्या भिंतीस मोठमोठीं खिंडारीं पाडिलीं, आणि आंत चाल करण्याविषयीं आपले लोकांस हुकूम केला. त्याप्रमाणें कितीएक प्रसंगीं ते आंत घुसले; परंतु, आंतल्या

लोकांच्या कडव्या तयारीमुळें त्यांस मागें हटावें लागलें. तरी शेवटीं त्यांनीं आपल्या शौर्याची छाप त्यांजवर पाडिली. बाहेरून हल्ला करणाऱ्यांचें विलक्षण धैर्य पाहून, आंतले लोक घाबरले, आणि शिकंदराच्या सैन्याच्या स्वाधीन होण्यास कबूल झाले. त्याप्रमाणें ते सगळे मासिदोनियन लोकांच्या हातीं लागले. परंतु, शिकंदरानें त्यांस त्यांच्या अपराधांची क्षमा करून मोठ्या ममताळूपणानें वागविलें, येणेंकरून त्यांस फार आनंद झाला. ह्या ठिकाणीं जे परके लोक सांपडले, ते मात्र त्यानें गुलाम म्हणून विकविले. मेमनन ह्यानें येथें कांहीं हालचाल केली नाहीं. जेव्हां शहरांतले लोक शिकंदराच्या हस्तगत होऊं लागले, तेव्हां तो, आपल्या लोकांसहवर्त्तमान, गुपचूप पळून गेला, असें एका इतिहासकारानें लिहिलें आहे.

ह्याप्रमाणें मिलितस काबीज केल्यावर शिकंदर बादशाहा कारिआ देशामध्यें हालिकारनासस शहर घेण्यास गेला. ह्या शहराभोंवतीं गांवकुसूं चांगलें मजबूद असून, किल्ला फार बळकट होता. त्यामध्यें मेमनन हा दारयसाचा मोठ्या मेहेरबानींतला शूर सरदार, बरोबर निवडक निवडक उत्तम शिपाई, अन्नसामग्री आणि विपुल युद्धसामग्री इतकें घेऊन कडीकोट बंदोबस्तानें राहिला होता. आणि आपलें शौर्य किती आहे व आपण स्वराजनिष्ठ किती आहों, हें ह्या ठिकाणीं पराक्रम करून लोकांस दाखवावें, असें त्याच्या मनांत फार होतें. त्याप्रमाणें त्यानें आपल्या किल्ल्याच्या रक्षणार्थ आपल्या उद्योगाची अगदीं पराकाष्ठा करून सोडिली. त्या कामांत त्यास एफिआलतीस नामक दुसऱ्या एका सरदारानें फार साह्य केलें. त्याप्रमाणें बाहेर शिकंदराच्या सैन्यानें

त्यास वेढा घातला होता, त्यानेंही आपल्या उद्योगाची कमाल करून सोडिली. त्या लोकांनीं बाहेरचा खंदक कितीएक ठिकाणीं मोठ्या प्रयत्नानें भरून, आपलीं लढाईचीं यंत्रें त्या शहराभोंवतालच्या भिंतीशीं आणून भिडविलीं. त्यांस आंतल्या लोकांनीं आग लावून त्यांचा अगदीं विध्वंस करून टाकिला. मासिदोनियन लोकांनीं आपल्या शस्त्रांच्या योगानें बाहेरच्या भिंतीस कितीएक ठिकाणीं खेंडारीं पाडिलीं. आणि ते आंत जाऊन पाहूं लागले तों, तिच्या मागें दुसरी नवी भिंत, जशी आतां भुईंतूनच निघाली आहे कीं काय, अशी त्यांच्या दृष्टीस पडली! ही भिंत अर्धवर्तुळाकार बांधिली होती, आणि तिजवर मोठमोठे बुरूज होते. त्यांजवर उभे राहून आंतल्या लोकांनीं बाहेरच्यांवर शस्त्रांचा भडिमार चालविला, त्याच्या योगानें पुष्कळ लोक मरण पावले. ज्या मानानें कोटाच्या भिंती मजबूद असतात, त्या मानानें आंतल्या लोकांचे ठायीं धैर्य अधिक असतें, असें जे म्हणतात, तें ह्या ठिकाणीं स्पष्ट दिसून आलें. हा वेढा पुष्कळ दिवसपर्यंत पडला होता. आणि ह्यामध्यें नानाप्रकारचीं विलक्षण संकटें इतकीं आलीं होतीं कीं, त्या सैन्याचा नायक शिकंदर हा अत्यंत धैर्यशाली पुरुष होता, म्हणूनच त्याचा निभाव लागला; त्याचे जागीं जर दुसरा एकादा साधारण पुरुष असता, तर त्याची आणि त्याच्या लोकांची दुर्दशा कधींच होऊन गेली असती. शिकंदराच्या सद्दीचा जोर असा होता कीं, त्याच्या लोकांवर जों जों संकटें अधिकाधिक येत, तों तों त्यांस यशप्राप्तीच्या उद्योगाविषयीं अधिकाधिक स्फुरण चढे! आणि तेणेंकरून, ज्या कामाला ते हात घालीत त्यांत त्यांची फत्ते होई. मासिदोनियन लोकांपुढें आपल्याच्यानें टिकाव

धरवणार नाहीं, असें मेमनन ह्यास वाटून, तो शहर सोडून गुपचूप निघून गेला. तरी त्यानें किल्ल्यामध्यें कांहीं लोक मोठ्या बंदोबस्तानें ठेविले होते. हा जो शहरांतून निघाला, तो, तेथील कांहीं श्रीमंत लोकांसहवर्तमान, जलमार्गानें, जवळच कास नामक एक बेट होतें, त्यावर जाऊन उतरला. इकडे शिकंदरानें तें शहर धुळीस मिळविलें. परंतु, त्यानें किल्ल्याकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. कारण, आसपासच्या मुलुखावर आपला अमल बसला म्हणजे, किल्ला हस्तगत होण्यास अगदीं देखील उशीर लागावयाचा नाहीं, असें तो जाणून होता. आणि पुढें त्याप्रमाणेंच घडून आलें.

कारिआ देशाची राणी आर्तिमिसिआ ही मरण पावल्यावर, तिचा भाऊ इद्रियस हा राज्य करूं लागला. परंतु, वास्तविक म्हटलें असतां, त्या देशाच्या परिपाठाप्रमाणें, ती गादी इद्रियसाची बायको जी आदा* म्हणून होती, तिला मिळणें योग्य होती. त्या इद्रियसाचे मागून, ओरोनोबेतीस ह्या नांवाचा एक पुरुष, दारयसाच्या बळावर तेथें राज्य करीत होता. आणि आदा हिचे स्वाधीन आलिंदी ह्यानांवाचा एक किल्ला मात्र होता. अशी स्थिति असतां शिकंदराची स्वारी त्या देशांत आली, तेव्हां आदा हीस परम संतोष झाला. तिनें लागल्याच त्या किल्ल्याच्या किल्ल्या त्यास नेऊन दिल्या, आणि त्यास ती आपला मुलगा मानूं लागली. ही तिची वृत्ति पाहून शिकंदरास बरें वाटलें. आणि हालिकारनासस हें शहर त्यानें तिचे हवालीं केलें. ह्या प्रकारें करून आदा ही त्या देशाचें राजपद पावली. ही बायको मोठी शाहणी आणि धूर्त होती. शिकंदर जों पावेतों त्या देशामध्यें होता,

* ही आदा इद्रियसाची सख्खी बहीण असून त्यानें तिशीं लग्न केलें होतें!

तों पावेतों, नित्य त्याला नाना प्रकारचीं उत्तम उत्तम पक्वान्नें खायास ती पाठवीत असे. असे कांहीं दिवस लोटल्यावर एके वेळीं शिकंदरानें तिला सांगून पाठविलें कीं, "तुझ्या ह्या इतक्या पक्वान्नांचा मला कांहीं उपयोग नाहीं. माझा गुरु लिओ निदास ह्यानें मला दोन आचारी दिले आहेत, त्यांनीं माझे सर्व मनोरथ पूर्ण होतात. त्यांपैकीं एक आचारी हा कीं, प्रतिदिनीं प्रातःकाळीं पुष्कळ चालावें, हा बोध; आणि दुसरा आचारी हा कीं जेवतांना थोडी भूक आहे तोंच खाणें बंद करावें, हा बोध; ह्यांच्या हातच्या अन्नांचें सेवन मी नित्य करितों, तेणेंकरून मला दुपारचें जेवण आणि सायंकाळचा फलाहार हीं फार सुखप्रद होतात."

ह्या नंतर आशिआमैनरांतील बहुतेक राजेरजवाडे शिकंदराचें वर्चस्व कबूल करण्यास सिद्ध झाले. तेणेंकरून, त्यास फारसे श्रम न पडतां एका प्रांतांतून दुसऱ्या प्रांतांत असें बरेंच स्वस्थपणें जायास सांपडलें. इतक्यांत हिंवाळा लागला. त्यामुळें त्यास एके ठिकाणीं छावणी करून राहावें लागलें. तेव्हां, त्याच्या लष्करामध्यें त्या वर्षीं लग्न झालेले जे कोणी शिपायी होते, त्यांस त्यानें, आपल्या तरुण स्त्रियांच्या समागमें दोन महिने घालविण्याकरितां परत मासिदोनिआ देशास पाठविलें. तें काम तरी त्यानें त्यांजवरच सोंपिलें नव्हतें. तर त्यांस बरोबर घेऊन जाऊन परत नेमल्या वेळीं आणण्यास तीन अमलदार नेमिले होते. ही जी त्यानें व्यवस्था केली, तिजवरून तो आपल्या लोकांच्या सुखाकडे किती बारीक दृष्टीनें पाहात असे, हें स्पष्ट दिसून येतें. ह्या विषयींची सूचना, लहानपणीं विद्याभ्यास करवितेवेळीं, त्यास आरिस्तातलानें केली होती; आणि ही गोष्ट

त्याच्या मनांत एवढें मोठें वय होई तों पर्यंत राहिली होती, हें खरोखर चमत्कारिक आणि विलक्षग बुद्धीचें लक्षण होय.

हिंवाळा सरत आला तेव्हां, शिकंदर, पुढच्या वर्षाची म्हणजे, इ० स० पूर्वींच्या ३३३ व्या सालची, मोहीम कोणत्या प्रकारें करावयाची, ह्याविषयीं विचार करूं लागला. लष्कराची तयारी करून एकदम दारयसावर चालून जावें, किंवा आधीं समुद्रकांठचे प्रांत जिंकून घेऊन मग त्या कामास लागावें, ह्याविषयीं त्यानें पुष्कळ वाटाघाट केली. शेवटीं, एकीकडून प्रांत काबीज करीत पुढें चाललें म्हणजे मागाहून कोणत्याही प्रकारचा त्रास व्हावयाचा नाहीं, असें त्यास वाटून त्यानें तो क्रम धरिला. त्याला प्रथम फासेलिस शहर लागलें. तें समुद्रकांठीं असून, त्याजवळून जाण्याचा मार्ग समुद्रास इतका जवळ होता कीं, भरतीच्या वेळीं तो अगदीं जलमय होऊन जाई, आणि ओहोट वळला म्हणजे कोरडा खडखडीत पडून, त्यावरून वाटसरू लोक खुशाल जात येत असत. शिकंदराचें लष्कर त्याच्या जवळ आलें तेव्हां, त्यावर सगळें पाणीचपाणी होऊन गेलें होतें. तणेंकरून त्याचे लोक त्यांत पाऊल टाकावयास बिचकले. परंतु, संकट प्राप्त झालें म्हणजे त्याचें निवारण करण्याची शक्ति व हौस त्यास स्वभावतःच फार असल्यामुळें, त्यास विशेष स्फुरण चढून त्यानें आपला घोडा आधीं त्या पाण्यामध्यें पुढें घातला, आणि आपल्या सैन्यास हुशारी देऊन मागोमाग यावयास सांगितलें. तेव्हां तें सगळें सैन्य, त्या रस्त्यावर कंबरभर पाणी असतां, त्यावरून सुरक्षितपणें पार पडलें. कितीएक भोळे ग्रंथकार असें लिहितात कीं, त्या प्रसंगीं परमेश्वरानें समुद्राचें पाणी दुभागून वाट दिली! ही

गोष्ट किती खरी आहे, हें सांगावयास नको. तथापि, आपणावर ईश्वराची विशेष कृपा आहे, आणि तो आपणास संकटसमयीं साह्य करितो, असें लोकांस प्रदर्शित करण्याची संधी आली असतां शिकंदर ती फुकट जाऊं देत नसे, ही गोष्ट खरी आहे.

तो ह्या फासेलिस शहरापाशीं असतां, त्यास असें समजलें कीं, आपणास विषप्रयोगानें मारविण्याची खटपट दारयस करीत आहे, आणि त्यास आपले कडील कोणी सरदार द्रव्याच्या आशेनें अनुकूल झाला आहे. तेव्हां त्यानें लागलाच त्या प्रकरणाचा तपास चालविला. त्यावरून, त्याचे थिसिलियन स्वारांवरचा मुख्य सरदार आलेक्झांदर हा त्यांत मुख्य आहे इतकें साबीद होऊन, कार्यसिद्धि झाल्यावर एक सहस्र तालेंत बक्षीस देण्याविषयींच्या वचनाचें दारयसाचें पत्र जें त्यास येत होतें, तें मधच्यामध्येंच जासुदाचे हातीं पकडलें. नंतर अलेक्झांदरानेंही आपले सर्व अपराध कबूल केले. त्यास शिकंदरानें फार मोठी शिक्षा केली. जसें राजाचें पद मोठें, तशीं त्याच्या जीवाला भयेंही मोठींच असतात.

ह्यानंतर तो फ्रिजियाच्या गार्दियम नामक मुख्य शहराकडे वळला. हें शहर सानगारिअस नामक नदीवर वसलेलें होतें. त्यामध्यें एक चांगला बळकट किल्ला होता. हें शहर हस्तगत झाल्यावर, तेथील चमत्कारिक वस्तु त्यानें पाहिल्या. त्यांमध्यें, प्राचीन काळीं गार्दियन नामक कोणी राजा होऊन गेला होता, त्याचा जुना रथ त्यास कोणीं दाखविला. त्याच्या जुवाच्या दोरीची गांठ अशी विलक्षण रीतीनें बांधिलेली होती कीं, तिचा आरंभ कोठें आणि शेवट कोठें,

हें कोणासही समजत नसे. आणखी तिजविषयीं असें भविष्य होतें कीं, ज्याचे हातून सर्व आशिआखंड काबीज व्हावयाचें असेल, तोच ही गांठ सोडूं सकेल, इतरांस ती कधींही सुटावयाची नाहीं. हें ऐकिल्यावर ती हरप्रयत्नानें सोडावयाची, असा शिकंदरानें निश्चय केला. कारण, ती तशीच टाकून जर आपण पुढें गेलों, तर आपले हातून आशिआखंड काबीज व्हावयाचें नाहीं, असें आपल्या बरोबरच्या लोकांच्या मनांत येऊन, त्यांची वीरश्री कमी होईल, आणि आपल्या श्रेष्ठत्वास कदाचित् न्यूनता प्राप्त होईल, असें त्यास वाटलें. आणि तें खरें होतें. ती गांठ खरोखरच फार बिकट होती. तिच्या दोरीचीं शेवटें कोठें आहेत, हें मुळींच कळेना. ती सोडण्याविषयीं शिकंदरानें नानाप्रकारच्या युक्ति करून पाहिल्या. परंतु, त्या सर्व व्यर्थ गेल्या. तेव्हां त्यानें आपली तरवार उपसून तिनें ती गांठ आपल्या हातानें मधोमध कापून टाकिली! ह्या प्रमाणें ती गार्दियन गांठ, कशाही प्रकारें उकलून, आपले हातून आशिआखंड खचीत काबीज होणार, असें त्यानें आपल्या लोकांच्या मनांत बिंबविलें! चतुर भूपति आपणांविषयींची लोकांतली पूज्यबुद्धि वाढविण्याविषयीं निरन्तर प्रयत्न करीतअसतात. कारण, ही बुद्धि राजपदरक्षणाचें एक मुख्य साधन आहे, असें ते समजतात. आणि तें खरें आहे.

शिकंदरबादशाहा मोठ्या तयारीनें गार्दियम पावेतों येऊन पोहोंचला आहे, असें दारयस ह्यास कळतांच, तो त्यास मागें हटविण्याचा विचार करूं लागला. त्याच्या सरदारांतला प्रमुख पुरुष मेमनन ह्यानें त्यास अशी युक्ति सुचविली कीं, शिकंदर इकडे गुंतला आहे, तों आपण आपलें सैन्य त्याच्या

मासिदोन प्रांतावर पाठवावें, ह्मणजे तो त्याच्या रक्षणार्थ आपोआप माघारा निघून जाईल; त्यास, हल्ला करून हांकून लावण्याच्या भानगडींत आपण पडूनये. ही युक्ति दारयसास मानवली. आणि ती सिद्धीस नेण्याकरितां त्या कामावर त्यानें मेमनन ह्याचीच योजना केली. मासिदोनावर हल्ला करण्यास कांहीं जलमार्गानें आणि कांहीं पायमार्गानें असें पुष्कळ सैन्य निघालें. त्या सर्वांचें आधिपत्य मेमनन ह्यास दिलें.

दारयसाची योजना फार उत्तम होती. मेमननासारखा हुशार सरदार त्याचे लष्करांत दुसरा कोणी नव्हता. दारयसाच्या इतर सरदारांनीं जर त्याची मसलत ऐकिली असती, तर ग्रानिकसच्या लढाईंत अपयश आलें नसतें. मेलितस आणि हेलिकारनासस ह्या दोन ठिकाणीं त्यास मासिदोनियन लोकांपासून जरी पुष्कळ त्रास भोगावा लागला होता, तरी त्यानें आपल्या राजाची चाकरी सोडिली नाहीं. तो खरा एकनिष्ठ होता. तो ह्या प्रसंगाच्या सुमारास कॅास ह्या नांवाच्या एका बेटावर जाऊन राहिला होता. तेथें त्यास ह्या नव्या मोहिमीच्या मुख्य अधिकाराचीं वस्त्रें मिळालीं. त्या ठिकाणीं सर्व फौजेनें जमावें असा हुकूम फिरला. त्याप्रमाणें सर्व सिद्धता होऊन त्याची स्वारी निघाली. त्यानें, आज हें शहर घे, उद्यां तें शहर घे, असें करतां करतां, मितिलिनी नामक एका शहरास वेढा घातला. आणि तें शहर हस्तगत होण्याचें काम शेवटास जाण्या पूर्वींच, तो एकाएकीं आजारी पडून मरण पावला. तेव्हां त्या सैन्यास कोणी योग्य नायक नाहींसा होऊन, तें प्रत स्वदेशाकडे आलें. मेमनन गत झाल्याचें वर्त्तमान दारयस ह्यास जेव्हां समजलें, तेव्हां त्यास अति वाईट वाटून त्याचे डोळ्यांतून

खळखळां अश्रुधारा चालल्या! मेमनन जीवंत असता तर त्याचे हातून ती मोहीम सिद्धीस जाती किंवा न जाती, हा विचार वेगळा. परंतु, आपल्या एवढ्या मोठ्या सैन्यामध्यें त्याचे सारखा दुसरा सरदार नाहीं, असें जें दारयसास वाटलें, त्यावरूनच त्याच्या योग्यतेचें चांगलें अनुमान करितां येतें. शिकंदरावर पाठविण्यास आपणापाशीं कोणी योग्य मनुष्य राहिला नाहीं, असें दारयसास वाटून, त्यानें सैन्याचें आधिपत्य आपण स्वतः पतकरण्याचा निश्चय केला. त्याप्रमाणें हुकूम फिरले, आणि त्याचें सर्व लष्कर बाबुलोन येथें जमलें. ह्याच्या संख्येविषयीं इतिहासकारांमध्यें मतभेद पुष्कळ आहे. कोणी म्हणतात हें चार लक्ष होतें, कोणी म्हणतात पांच लक्ष होतें, आणि कोणी म्हणतात साहा लक्ष होतें. पहा, अंतर शेंकड्यांचें नाहीं, आणि हजारांचेंही नाहीं; तर लक्षांचें आहे. ह्यांत सैन्याची खरी संख्या कोणती हें बरोबर समजत नाहीं. तथापि, ह्या वेळीं दारयसाचें सैन्य फार मोठें होतें, हें खरें दिसतें.

इकडे शिकंदर गार्दियम येथून निघाला तो पाफ्लागोनिआ आणि कापादोसिआ ह्या प्रांतांत आला; आणि त्यानें ते दोन्ही प्रांत ताबडतोब काबीज करून घेतले. तो ह्या प्रांतांमध्यें असतांच त्याला मेमनन निवर्तल्याचें वर्त्तमान समजलें. तेव्हां, दारयसावर चालून जाण्याची त्यास विशेष हुशारी आली. ह्मणजे हा सरदार गमावल्यामुळें दारयसास जितकें वाईट वाटलें, तितकें ह्याच्या मृत्यूच्या वर्त्तमानानें शिकंदरास अधिक युद्धस्फुरण चढलें, असें म्हटलें तरी चालेल. ह्यानंतर शिकंदर बादशाहा, मोठ्या झपाट्यानें, मोठमोठ्या मजला करीत सिलिसिआ मध्यें सायरसक्यांप म्हणून एक

ठिकाण होतें, तेथें आला. तेथून त्याला सैन्यासहवर्त्तमान अतिनिरुंद आणि खडकाळ अशा अगदीं उभ्या घांटानें वर चढावें लागलें. ह्या घांटाच्या वरच्या प्रांतावर दारयसाचा एक सुभेदार होता. त्यानें जेव्हां शिकंदराचें हें विलक्षण धैर्य आणि प्रचंड सैन्य पाहिलें तेव्हां तो अगदीं चकित होऊन, तेथून पळून गेला. सद्दी असली म्हणजे सर्व गोष्टी अनुकूल होतात, असें म्हणतात तें खरें आहे. वास्तविक पाहिलें असतां त्या सरदारास शिकंदर ह्या वेळीं अशा अडचणींत सांपडला होता कीं, तो जर त्यावर व त्याच्या सैन्यावर नुसता दगडांचा वर्षाव करिता, तर त्यांचा तेथें केवळ नाश होऊन, त्यांचें वर्तमान सांगण्यास मासिदोन देशास परत जाण्यास कदाचित् एकजण देखील जीवंत राहिला नसता. परंतु, तो काल शिकंदराचा होता, त्याप्रमाणें त्या सरदारास भय वाटून तो पळून गेला; आणि शिकंदर सुरक्षितपणें वर चढून आला. तो तेथें त्याला तारसस नामक शहर लागलें. तेथें हा मासिदोनचा राजा येत आहे असें जेव्हां तेथच्या लोकांस समजलें, तेव्हां त्यांनीं आपापलां घरेंदारें जाळून टाकण्याचा सपाटा चालविला; ह्याचा हेतु एवढाच होता कीं, त्याच्या लष्करास तेथें राहावयास थारा मिळूं नये. तो त्यांचा हेतु पुरता सिद्धीस गेला नाहीं; कांकीं, पार्मिनिओ ह्या सरदारानें मोठ्या त्वरेनें आपल्या हाताखालच्या लोकांसहवर्तमान पुढें येऊन त्याचा बंदोबस्त केला.

ह्या तारसस शहरांतून सिदनस म्हणून एक लहानशी नदी वाहते. तिचें पाणी स्फटिकवत् स्वच्छ असून, तिचीं दोन्हीं तीरें मोठमोठ्या अनेक वृक्षांनीं भरलेलीं असल्यामुळें त्यांच्या छायेनें तें नेहमीं फार गार असतें. शिकंदर बादशाहा, ऐन दुपारच्या वेळीं, प्रखरउन्हांतून मोठी मजल करून, सर्व शरीर

धुळीनें भरलें आहे, आंगांतून मनस्वी घाम चालला आहे, आणि घसा अगदीं सोखला आहे, असा होऊन तिच्या तीरीं आला. तेव्हां त्याला ती नदी पाहून परम आल्हाद झाला: त्यानें लागलेच आपले कपडे काढिले, आणि आंघोळ करण्याकरितां पाण्यांत बुडी मारिली. ती बुडी मारितां क्षणींच त्याला एकाएकीं हिंवाची एवढी मोठी हुडहुडी भरली कीं, ती कांहीं केल्या राहीना. त्याला त्याचे तंबूमध्यें नेऊन त्याच्या जवळच्या लोकांनीं नानाप्रकारचे उपचार करून पाहिले, तरी त्याला तिळभर देखील गुण पडेना. हा आपला राजा आतां वांचत नाहीं असें पाहून, त्याच्या सैन्यांतल्या लोकांनीं शोकाचा एकच कल्होळ मांडिला. शिकंदराची वाचा कांहीं वेळ बसली होती, व तो विचुक बोलत होता, तेव्हां तर त्यांचें तोंडचें पाणी पळालें होतें. परंतु लवकरच तो शुद्धीवर येऊन माणूस ओळखूं लागला. तेव्हां त्यांच्या अंमळ जीवांत जीव आला. हें चाललें होतें इतक्यांत, दारयस मोठ्या सैन्यासहवर्तमान आपल्या सैन्यावर चालून येत आहे, अशी वार्ता त्याचे कानीं पडली. तेव्हां तो अतिशयित चिंताग्रस्त झाला. तो आपलें दुखणें अगदीं विसरला, आणि पुढें काय युक्ति योजावी, ह्या विचारास लागला. आणखी त्यास विशेष काळजी लागण्यास कारण असें झालें होतें कीं, शिकंदरास हरएक प्रयत्नानें जो कोणी ठार मारील, त्यास मी एक सहस्र तालेंत बक्षीस देईन, असा जाहीरनामा दारयसानें नुकताच चोहींकडे प्रसिद्ध केला होता. शिकंदराबरोबर वैद्य पुष्कळ होते. परंतु, त्याची प्रकृति कशानें बरी होईल, ह्याचें अनुमान बरोबर न करतां आल्यामुळें, ते औषध देण्यास धजे-

नात. आणखी त्यामध्यें ह्या जाहीरनाम्याचा संशय. ह्मणजे, नीट झालें तर सर्व बरें, आणि जरकरतां भलतेंच कांहीं झालें, तर त्या बक्षिसाच्या आशेनें वैद्यानें कांहीं केलें कीं काय,असा संशय उत्पन्न होऊन त्याची दुर्दशा व्हावयाची. ह्यामुळें त्यास कोणी हात घालीना. चमत्कार पहा. शिकंदर बादशाहा आजारी; आणि आपल्या सर्व औषधींसहवर्तमान त्याचें वैद्यमंडळ बरोबर; असें असतां, त्यास साधारण सीतज्वरावर कोणीं औषध देऊं नये काय?

शिकंदराच्या दुखण्यास कोणीच हात घालीत नाहीं, आणि आपण स्वस्थ बसलों असतां, आपलें स्वामिसेवेचें कर्तव्य कर्म केलें नाहीं असें आपणास वाटून आपलें मन आपणास चैन पडूं द्यावयाचें नाहीं, असा विचार करून, फिलिप नामक एका आकार्नानियन वैद्यानें शिकंदरास देण्यास एक औषध तयार करण्याचा उद्योग चालविला. तें सिद्ध होण्यास तीन दिवस लागतील, हें त्यानें राजास आधींच सांगितलें होतें. आणखी त्यानें असें कळविलें होतें कीं माझ्या औषधाचा गुण एकदम यावयाचा नाहीं, हळूहळू येईल. हें फिलिपाचें धैर्य पाहून बाकीच्या वैद्यांनीं तोंडांत बोटें घातलीं. औषधाच्या तयारीचे तीन दिवस पुरे होण्यापूर्वी शिकंदरास पार्मिनिओनें एक पत्र पाठविलें. त्यांत मुख्य आशय एवढाच होता कीं, "आपण फिलिप ह्याचें औषध घेणार आहां म्हणून ऐकतों, त्यास माझी विनंती अशी आहे कीं, आपण त्याविषयीं फार सावधगिरीनें वागावें. दारयसानें फिलिप ह्यास जाहीरनाम्याप्रमाणें एक सहस्र तालेंत देऊं करून, शिवाय आपल्या बहिणीशीं त्याचें लग्न लावून देण्याचें वचन दिलें आहे. असें मला समजलें आहे." हा

मजकूर वाचून शिकंदरास फार वाईट वाटलें. पार्मोनिओ हा आपला पिढीजादा परम प्रामाणिक एकनिष्ठ सरदार आहे, तो भलतेंच कधीं लिहिणार नाहीं; आणि फिलिप तर आपला बाळमित्र, त्याचा जीव आपणाकरितां किती तुटतो हें आपणांस पहिल्यापासून माहीत आहे, त्यापेक्षां त्याचे हातून केवळ द्रव्यलोभार्थ असें विपरीत कर्म घडावयाचें नाहीं; असे विचार त्याचे मनांत येऊन, त्याचें चित्त द्विधा झालें. खरें काय तें कळेना, आणि काय करावें हें सुचेना, अशी त्याची अवस्था झाली. आधींच तो फार दुखणाईत होता, आणि त्यांत त्याला अशी मनोव्याधि उत्पन्न झाली; तेणेंकरून त्याला झोंप अगदीं येईना आणि चैन मुळींच पडेना. तें पत्र, त्यानें तसेंच गुंडी करून, आपल्या उशीखालीं ठेविलें. त्याविषयीं तो कोणापाशीं एक शब्द सुद्धां बोलला नाहीं.

तीन दिवस लोटतांच, नेमाप्रमाणें, फिलिप ह्याचें औषध तयार झालें. तें घेऊन तो शिकंदराच्या तंबूमध्यें आला, आणि त्यानें तें त्याच्या हातीं दिलें. तें एका हातांत घेऊन, राजानें दुसऱ्या हातानें उशीखालचें पत्र काढून फिलिपापुढें टाकून त्यास तें वाचायास सांगितलें. तें वाचतांच त्याला भय तर वाटलें नाहींच, परंतु इतका संताप आला कीं, त्याच्या योगानें त्याचे तोंडांतून एक शब्द देखील प्रथम बाहेर निघेना. तो धाडकर राजाच्या पायांशीं पडला, आणि ओरडून मोठ्या निश्चयानें आणि आवेशानें म्हणाला, "महाराज, मजवर राजहत्या करण्याच्या दुष्ट हेतूचा जो हा भयंकर दोष कोणा चांडाळानें आणिला आहे, तो, आपण बरे झालां म्हणजे सर्व दूर होईल. आतां माझें मागणें मिळून एवढेंच आहे कीं, आपण अगदीं स्वस्थ असावें; मनामध्यें

कशाचीही शंका धरूं नये. आपणांस जें हें वर्त्तमान समजलें आहे ह्याचें भय आपण तिळभर देखील धरूं नये. म्हणजे, माझें औषध लागू होऊन आपणांस चांगला आराम पडेल. आपल्या खऱ्या हितचिंतकानें ही बातमी आपणांस सावधगिरीकरितां म्हणून कळविली, हें खरें आहे; परंतु, अशा प्रकारच्या गोष्टी अशा प्रसंगीं आपणांस कळवाव्या, किंवा न कळवाव्या, ह्याचा त्यानें पुरता विचार केला नाहीं, असें वाटतें. तथापि, महाराज, आपण कांहीं एक किंतू मनांत ठेवूं नये. माझ्या औषधानें आपणांस खचीत गुण येईल, हें खचीत समजावें." हें ऐकून घेऊन शिकंदरानें फिलिपास आपले हातीं उठवून जवळ बसविलें, आणि म्हटलें "फिलिपा, तूं उगाच असा संताप करून घेऊं नको. बाबा, तुझ्या मनाला दोन घोर लागले आहेत असे दिसतात; म्हणजे एक माझ्या आरोग्याचा, आणि दुसरा तुझ्या स्वतःच्या निर्दोषत्वाचा! कांहीं चिंता नाहीं. ते दोन्ही एकदम नाहींतसे होतील."

इतकें बोलणें झाल्यावर शिकंदर बादशाहानें तें औषध घेतलें. त्यानंतर कांहीं वेळानें अकस्मात् तो बेशुद्ध होऊन त्याची वाचा बसली, आणि जीव आहे किंवा नाहीं हें समजण्याची शेवटची खूण जी नाडी, ती देखील उडत आहे कीं नाहीं, ह्याविषयीं शंका वाटूं लागली. मग काय विचारावें! जवळचे इतर लोक अगदीं भिऊन गेले. परंतु, फिलिप हा घाबरला नाहीं. त्यानें युक्तीनें हळूहळू राजापाशीं बोलण्यास आरंभ करून, त्याच्या आईविषयीं, त्याच्या बहिणींविषयीं, त्यानें मिळविलेल्या पूर्वींच्या जयांविषयीं, आणि आतां पुढें जो मोठा जय मिळवायाचा आहे त्याविषयीं त्यास इतक्या मनो-

वेधक गोष्टी सांगितल्या कीं, त्यांच्या योगानें, त्या औषधाचा जो अमल त्यास चढला होता, तो उतरून, तो चांगला सावध होऊन जवळच्या माणसांशीं पूर्ववत् बोलूं लागला. तीन दिवस लोटल्यावर, शिकंदर बादशाहा, आपला नेहमींचा पोषाक करून आपल्या सैन्याच्या समोर आला. तो इतके लवकर इतका बरा झाला, असें पाहून सर्व लोकांस परम आल्हाद झाला. त्या सर्वांनीं फिलिप ह्याचे फार फार आभार मानिले. expressed their thanks

Hot tempered
शिकंदर बादशाहा हा स्वभावानें कडक आणि स्वरूपानें उग्र असा जरी होता, तरी, आपल्या लोकांची आपणावर भक्ति असावी, व त्यांनीं आपणाशीं मोकळ मनानें वागावें, अशी त्याची फार इच्छा असे. in endearing terms ह्मणून तो हरहमेषा त्यांत मिसळे, त्यांशीं बोले, त्यांच्या हकीकती शांतपणें ऐकून घेई, त्यांस कमी असे तें देई, आणि त्यांस संतुष्ट ठेवण्यास निरंतर प्रयत्न करी. ही रीति फार ग्राह्य आहे. जाहाज कितीही उत्तम बांधिलेलें असलें तरी, जर समुद्र अनुकूल नसला तर तें चालावयाचें नाहीं; ह्मणजे, त्याचे अंगाचे गुणांचा कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं. parallel to the ... तोच संबंध राजा आणि त्याचे सैन्य ह्यांच्यामध्यें आहे.

ह्याप्रमाणें शिकंदर इकडे आजारी पडून त्याच्या लष्कराचें कुच बंद झाल्याचें कळतांच, दारयसास त्याजवर चालून जाण्याविषयीं मोठें उत्तेजन आलें. आधींच तो मोठा गर्विष्ट आणि डौली होता; आणि त्यांत, त्याच्या दरबारचे लोक त्याचें स्तुतिस्तोत्र घडोघडी करून त्यास हरभऱ्याच्या झाडावर चढवींत. तेणेंकरून त्यास असें वाटूं लागलें कीं, आपलें सैन्य सर्व जगामध्यें अजिंक्य आहे. परंतु, वास्तविक प्रकार

तसा नव्हता. त्याच्या सैन्याचा डामडौल मोठा होता, व त्याचे सरदार आपणांस मोठे योद्धे मानून हव्या तशा गप्पा मारीत असत. ह्या वेळीं त्याचें सर्व लष्कर आसीऱ्याच्या मैदानामध्यें उतरलें होतें. तेथें त्यास उत्तम उत्तम असे पुष्कळ घोडे मिळाले. तेणेंकरून त्यास विशेष गर्व चढला असे. आपल्या अजिंक्यपणाविषयीं दारयस सर्वांशीं मोठ्या खातरीनें बोले. त्याच्या सैन्यामध्यें क्यारिदेमस ह्या नांवाचा एक अथेन्सकर होता. त्यास दारयसानेंच तेथून हांकून लाविलें होतें. त्यापाशीं हें गर्वाचें भाषण जेव्हां तो इराणचा राजा बोलला, तेव्हां त्यानें, त्याची भीड न धरितां त्यास असें उत्तर दिलें कीं, " महाराज, खरें बोलेल तो गुन्हेगार, असा काळ आला आहे; मी आतां खरें बोललों तर तें आपणांस बरें वाटावयाचें नाहीं. परंतु, आपले कानावर खराखरा प्रकार घालण्याचा हाच योग्य प्रसंग आहे, आणि हा जर मीं फुकट दवडिला, तर ह्याविषयीं मला मग पश्चात्ताप होईल असें मला वाटतें; ह्मणून आतांच काय बोलायाचें आहे तें बोलतों. अधिकोत्तराची माफी करणें सरकाराकडे आहे. हें जें आपलें सैन्य आहे, तें कदाचित् आपल्या शेजारच्या राजांस फार भयप्रद असेल. आपलें सैन्य जो कोणी प्रथमतःच पाहील, त्यास, जिकडे तिकडे सुवर्णरत्नांचा चकचकाट पाहून फार आश्चर्य वाटेल, व हें सैन्य सर्व जगांत अजिंक्य आहे, असेंही कदाचित् त्याच्या मनांत येईल. परंतु, मासिदोनियन शिपायी, जे आहेत, ते असल्या अलंकारभूषणांच्या लखलखाटास पाहून डचकावयाचे नाहींत. खरें शौर्य तरवारीच्या पाण्यांत आहे, सोन्यारूप्याच्या भूषणांत नाहीं, हें त्यांस माहीत आहे. ते बाह्यात्कारी डौला-

विषयीं मुळींच काळजी वाहात नाहींत. आपण उभें कसें राहावें, शत्रूवर हल्ला कसा करावा, आणि कोणता प्रसंग प्राप्त झाला असतां कसें वागावें, ह्याविषयींच्या विचारांत ते नेहमीं मग्न असतात. त्यांच्यांतला प्रत्येक मनुष्य आपल्या वरिष्ठाची आज्ञा मानण्याविषयीं तत्पर असतो. ओळीनें उभें राहणें, मागें जाणें, पुढें होणें, डाव्या उजव्या बाजूस वळणें, शत्रूस आंगावर घेणें, शत्रूशीं सामना करणें, इत्यादि युद्ध-कौशल्याच्या गोष्टींत ते इतके निष्णात आहेत कीं त्यांच्या त्या हालचाली पाहून एकाद्यास मोठें नवल वाटेल. ते जे ह्या मोहिमीवर आले आहेत, ते सोन्याच्या किंवा रुप्याच्या आशेनें आले नाहींत; ते ह्या धातूंस यःकश्चित् मानितात. ते गरीब आहेत तरी, आपल्या देशाच्या संबंधानें आपलें कर्तव्य काय आहे, हें जाणून ते युद्धास सिद्ध झाले आहेत. त्यांस खावयास अमुकच अन्न लागतें असें नाहीं. ते वेळेस मिळेल तें खाऊन राहातात. तसेंच, निजावयास नुसती जमीन असली तरी त्यांस पुरते. ते दिवसा चारी प्रहर शत्रूशीं टक्कर देण्यास एका पायावर उभे असतात. अशा वृत्तीचे शस्त्रधारी लोक आपल्या सैन्याच्या दगडाच्या भडिमारास अथवा कोलितांच्या जाळास भिऊन मागें सरतील, असें आपलें मन तरी आपणांस सांगतें काय? त्या सैन्याचा पराभव करण्यास त्याच सैन्या सारखें दुसरें सैन्य पाहिजे. इतरांची डाळ शिजावयाची नाहीं. मासिदोनियन लोकांस जिंकावें, अशी जर आपणांस फार इच्छा असेल, तर त्यांच्याच देशांतून युक्ति प्रयुक्तीनें कांहीं लोक आणवावे; म्हणजे आपला हेतु सिद्धीस जाईल." हें ऐकून दारयसास मोठा संताप आला. आपली स्वतःची निंदा कोणीं केली तर

एक वेळ पुरवते, परंतु, शत्रूची स्तुति सोसवत नाहीं, असा मनुष्याचा स्वभाव आहे. क्यारिदेमस बोलला तें सर्व खरें होतें. त्याजकडे लक्ष न पुरवितां, दारयस क्रोधायमान होत्साता त्यास ठार मारण्याचा हुकूम करिता झाला. तरी क्यारिदेमस ह्याच्या निस्पृहतेमध्यें तिळभर देखील न्यूनता आली नाहीं. अगदीं मारण्याच्या वेळीं, तो दारयसास लक्षून म्हणाला, "राजा, ज्या तुझ्या शत्रूविषयीं मीं तुला खरीखरी माहिती सांगून त्याच्या पराभवाची युक्ति सुचविली, तो माझाही वैरी आहे. तो आतां फार दूर नाहीं; जवळ आला आहे; आणि तुला हितबुद्धीनें जी मीं मसलत सांगितली, तिचा हेतु भलताच समजून, तूं मला विनाकारण देहान्त शासन करवीत आहेस, ह्याचें प्रतिफल तुला खचीत खचीत भोगावें लागेल. तुला तुझा वैरी योग्य शासन करील. कांहीं चिंता करूं नको. राजा, प्रथम तुझा स्वभाव फार चांगला होता. परंतु, तूं धनांध झाल्यामुळें तो बदलून अगदीं वाईट झाला आहे. राजा, मनुष्याचे ठायीं कितीही उत्तम उत्तम गुण असले, तरी, त्यास संपत्ति प्राप्त होतांच, ते नाहींतसे होऊन, तो अनन्वित कर्मांस प्रवृत्त होतो, हें तुझ्या चरित्रावरून पुढच्या पिढ्यांच्या लोकांस स्पष्टपणें दिसून येईल." ह्याच्या वधास बरेच दिवस लोटले नाहींत तोंच दारयसास त्याविषयीं मोठा पश्चात्ताप झाला; आणि, आपण असा चांगला स्पष्टवक्ता पुरुष निरर्थक ठार मारविला, असें त्याचें मन त्याला खाऊं लागलें. परंतु उपयोग काय? जें झालें तें झालें. तें फिरविण्याचें सामर्थ्य त्याचे ठायीं नव्हतें. तेणेंकरून त्यास वाईट वाटलें. हेंच त्याला देहान्त शासन न करितां, प्रतिबंधांत ठेविलें असतें, अथवा देशपार केलें असतें, तर त्यास पुनः पूर्वस्थितीस

आणितां आलें असतें. ह्यास्तव, जी गोष्ट आपणास पुनः फिरवितां यावयाजोगी नाहीं, ती करण्यास हात घालण्यापूर्वी मनुष्यानें फार विचार केला पाहिजे. नाहीं तर 'बैल गेला आणि झोंपा केला' असें होतें. असो.

आपणास खचींत जय प्राप्त होणार असा भरंवसा मनांत धरून, दारयस आपल्या अवाढव्य सैन्यासहवर्त्तमान, मोठमोठ्या मजला करीत, युफ्रेतीस नदीकडे चालला. त्याच्या स्वारीचा थाट मोठा वर्णनीय असे. तो असा :—सर्वांच्यापुढें मोठमोठीं रुप्याचीं स्थंडिलें असत. त्यांमध्यें त्याचा पवित्र अग्नि असे. त्यांच्या मागें मागी ह्या नांवाचे धर्माधिकारी लोक अग्निस्तोत्रें म्हणत चालत. आणखी त्यांजबरोबर, वर्षाच्या दिवसां इतके, म्हणजे तीनशें पांसष्ट जांभळा पोषाक केलेले तरुण पुरुष असत. त्यांच्या मागें जुपितराचा* भव्य रथ चाले. त्याला पांढरे शुभ्र घोडे लाविलेले असत. त्याचे मागें एक रिकामा घोडा असे. त्याला ते सूर्याश्व ह्मणत. त्याचे बरोबर उंची पोषाक केलेले कांहीं चाबूकस्वार चालत. त्यांचे हातांत सोन्याच्या काठ्या असत. त्यांचे मागून, उत्तम सोनेरी व रुपेरी नक्षी काम केलेले असे दाहा रथ चालत. त्यांच्या मागें, सुमारें दाहाबारा अगदीं वेगळ्या वेगळ्या देशाचे घोडेस्वार, आपापल्या देशरीतीप्रमाणें भिन्नभिन्न वस्त्रभूषणांनीं आणि शस्त्रास्त्रांनीं युक्त होत्साते मोठ्या डौलानें निघत. ते फार चमत्कारिक दिसत. त्यांच्या मागें १०,००० इराणी योद्धे चालत. त्यांचा सर्व पोषाक सुवर्णमय असून, त्याजवर हिरेमाणकेंही जडलेलीं होतीं. हे लोक दारयसाच्या धैर्याचे मुख्य स्तंभ होते. ह्यांस त्यानें अमर असें नांव दिलें होतें.

* ग्रीक आणि रोमन लोकांचा देव.

त्यांचे मागें, सुमारें तीस पावलांवर, राजाचे आप्तजन, उंची उंची पोषाक करून सुंदर रथांत बसून जात. ते सुमारें दीड हजार असत. त्यांची राहण्याची ऐट बायकांसारखी असून त्यांच्या वस्त्रांवर सुवर्ण आणि रत्नें ह्यांवांचून दुसरें कांहीं दिसत नसे. ह्यांच्या मागें दोरिफोरिस ह्या नांवाचे लोक चालत. त्यांचें मुख्य काम एवढेंच असे कीं त्यांनीं राजाचा पोषाक घेऊन राजापुढें चालावें. ह्या लोकांच्या मागें, दारयस हा एका अत्युत्तम रत्नांदिकांहीं युक्त अशा उंच रथावर बसलेला असून, त्याच्या आजूबाजूस सोन्यारुप्याच्या देवांच्या अनेक मूर्ति असत. त्याच्या रथाची धुरी हिरेमाणकांनीं केवळ मढविलेली होती. जूंही तसेंच होतें. जुवाच्या दोहों टोकांवर, युद्ध आणि शांतता ह्यांचे सुवर्णाचे पुतळे बसविलेले असून, त्यांच्या मध्यें जडावाचा एक गरूडपक्षी, पंख उघडून उडण्यास आतां जसा काय अगदीं सिद्ध आहे, असा बसविलेला होता. दारयसाचा सर्व पोषाक उंची जांभळ्या रंगाचा असून, तो नखशिखान्त, जडावाच्या कामानें जणु अगदीं मढला होता. त्याच्या रथाच्या प्रत्येक बाजूस त्याचे अगदीं जवळचे असे दोन-दोनशें आप्तजन चालत. त्यांच्या मागें १०,००० भालेवाले असत. त्यांच्या भाल्यांवर सोन्यारुप्याची नक्षी काढिलेली असे. त्यांचे मागें २०,००० पायदळ चाले. आणि सर्वांच्या मागें राजाचे ४०० खासे घोडे असत. ही छोट्या लष्कराची स्वारी झाली. हिच्या मागें शें सवाशें कदमावर, दारयसाची मातुश्री सिसिगांबिस आणि त्याची बायको ह्या दोघी आपापल्या रथांत बसलेल्या असत. त्यांच्या दासी मोठमोठ्या घोड्यांवर बसून त्यांच्या समागमें चालत. त्यांच्या मागच्या रथांत राजाचीं मुलें, त्यांचे शिक्षक, आणि खोजे वगैरे इतर

नौकर लोक असत. त्यांच्या मागें दारयसाच्या ३६० वेश्या; त्यांचे पेहराव त्याच्या राणीच्या पेहरावासारखे होते. त्यांचे मागें ६०० खेंचरें आणि ३०० उंटें इतक्यांवर भरलेला दारयसाचा खजीना असे. आणि ह्याशिवाय मागें बाजारबुणगें किती होते, ह्याची गणती नसे. ही जनानखान्याची स्वारी. ह्या वर्णनांत कांहीं अतिशयोक्ति आहे, असें वाचकांस कदाचित् वाटेल. परंतु, ह्यांत अतिशयोक्तीचा एक शब्द देखील नाहीं असें खचीत समजावें. एवढें हें लटांबळ बरोबर घेऊन, साठ लक्ष मुख्य सैन्यासहवर्तमान दारयस शिकंदरावर यावयास निघाला! नंतर त्या दोघां पराक्रमी राजांचीं युद्धें कोठकोठें झालीं, व त्यांचे परिणाम काय झाले, ह्यांचें विवरण पुढच्या भागीं करूं.

---

## भाग तिसरा.

शिकंदर आणि दारयस हे एकमेकांपासून बऱ्याच अंतरावर होते; तरी ते परस्परांच्या हालचालींविषयीं फार बारीक बातम्या ठेवीत असत. दारयस आपणावर यावयास मोठ्या त्वरेनें निघाला आहे, असें शिकंदरास समजतांच, त्यानें आपला सरदार पार्मिनिओ ह्यास सीऱ्या देशांतला मार्ग धरून ठेवण्यास बरोबर कांहीं सैन्य देऊन पाठविलें. आणि आपण आपल्या सेनेसहवर्तमान तारसस येथून जो निघाला, तो दुसरे दिवशीं अंचिआला नामक शहरास येऊन पोहोंचला. हें शहर सार्दानापालस ह्यानें बांधिलें होतें, अशी दंतकथा असे; आणि त्या पुरुषाचें थडगें तेथें त्या वेळेपर्यंत तसेंच होतें. त्यावर असें खोदविलें होतें कीं,

"सार्दानापालस ह्यानें आंचिआलिआ आणि तार्सस हीं दोन शहरें एका दिवसांत बांधिलीं ; प्रवासीजनहो, जा, खा, प्या, आणि आनंद करा ; कारण, बाकी सर्व व्यर्थ आहे." हें बहुतांशीं खरें आहे. आंचिआलिआ येथून शिकंदर निघून सोली येथें आला. तेथें त्यानें, आपल्या समजुतीप्रमाणें, पुष्कळ देवदेव केला. नंतर तो तारसस येथें पुनः परत गेला. तेथून निघून, एक दोन मुकामांनीं, कासताबाला येथें पोंहचला. तेथें त्यास असें वर्तमान समजलें कीं दारयस हा आपल्या सर्व सैन्यासहवर्तमान असीऱ्या देशामध्यें सोचोस येथें, ह्मणजे सिलिसियापासून दोन दिवसांच्या वाटेवर, छावणी करून राहिला आहे. तेव्हां लागलीच त्यानें आपल्या सर्व सरदार लोकांची सभा करून, पुढें काय करावयाचें असें त्यांस विचारिलें. त्या एकनिष्ठ सेवकांनीं त्यास एकमतें असें सांगितलें कीं, आह्मी सर्वजण इराणी लोकांवर चालून जाण्यास एका पायावर सिद्ध आहों. आणि शिकंदरास तेंच पाहिजे होतें. नंतर लागलीच दुसरे दिवशीं त्याची स्वारी तेथून निघाली ती, सीऱ्या मध्यें पार्मिनिओनें जो मार्ग धरून ठेविला होता, त्या मार्गानें, इससस नामक एक शहर त्या सरदारानें जें नुकतेंच घेतलें होतें तेथें प्राप्त झाली. त्यानें आपल्या लष्करांतले आजारी झालेले लोक ह्या ठिकाणीं ठेविले, आणि सैन्याचा कुच मोठ्या त्वरेनें पुढें चालविला. परंतु, हवा अगदीं बिघडून गेल्यामुळें त्यास मिरिआंद्रोस येथें मुकाम करावा लागला.

इकडे दारयस असीऱ्याच्या मैदानामध्यें आपल्या अवाढव्य सैन्यासहवर्तमान उतरला होता. त्यास शिकंदराच्या त्वरेचें वर्तमान कळतांच, त्यानें आपल्या सरदार व मुत्सद्दी

लोकांची एक मोठी सभा भरून, पुढें काय करावयाचें ह्याची वाटाघाट चालविली. तेव्हां त्याच्या चाकरीस जे कांहीं ग्रीस देशचे लोक राहून मोठ्या योग्यतेस चढले होते, त्यांनीं अशी मसलत दिली कीं, शत्रु आंगावर चालून येई तोंपर्यंत आपण असेंच येथें युद्धास सिद्ध होऊन राहावें; आणि ही गोष्ट जर आपले पसंतीस नच पडेल, तर, सैन्यांतले कांहीं शेलके शेलके सरदार बरोबर थोडेसे लोक देऊन शिकंदरावर पाठवावे. ही मसलत दरबारच्या कितीएक लोकांस कपटमूलक वाटली. त्यांनीं दारयसास असें सुचविलें कीं, हे ग्रीसचे लोक अशा भलभलत्या मसलती देऊन आपला घात करावयास पाहत आहेत, ह्यांजवर आपण विश्वास ठेवूं नये; इतकेंच केवळ नव्हे, तर त्याबद्दल त्यांस राजद्रोही समजून शासनें करावीं. दारयस हा जात्या गरीब आणि दयाळू होता. त्यास हा आरोप ऐकून फार वाईट वाटलें. तो म्हणाला, "अहो, ते लोक एवढें विश्वासघातकर्म करायाच्या विचारांत असतील, असें माझ्या मनांत देखील येत नाहीं. मी जर आज असें करीन, तर माझ्या शब्दावर कोणी विश्वास ठेवील काय! चांगली मसलत दिल्याबद्दल आजपर्यंत कोणीं कोणाला शिक्षा केली आहे काय! आणि, जें तोंडांतून बाहेर काढिलें असतां आपणास महत्संकट प्राप्त होण्याचा संभव आहे, असें मनुष्यास वाटेल, तें त्याच्यानें बोलवणार नाहीं, हें अगदीं स्पष्ट आहे." असें आपल्या दरबारच्या लोकांस उत्तर देऊन, दारयसानें त्या ग्रीक सरदारांचे आभार मानिले. आणि, सर्व सेनेसहवर्तमान शिकंदरावर जाण्याचा निश्चय त्यानें ज्या कारणांवरून केला होता, तीं कारणें त्यानें सविस्तर त्यांस ऐकविलीं. वास्तविक पाहिलें असतां,

तो राजा होता, त्यास आपल्या निश्चयाचीं कारणें आपल्या हाताखालच्या लोकांस सांगण्याचें प्रयोजन नव्हतें. परंतु, आपण जें कांहीं करितों तें सकारण करितों, निष्कारण, ह्मणजे उगाच लहर लागली ह्मणून करितों असें नाहीं, असें आपल्या लोकांस प्रदर्शित करण्याची त्याची इच्छा असे, असें दिसतें. हा गुण राजांस अत्यंत भूषणप्रद होय.

शिकंदर बादशाहा इस्सस शहरानजीक जाऊन राहिल्याचें वर्त्तमान वर लिहिलें आहे, तें वाचकांच्या लक्षांत असेलच. तो आपल्या सर्व सैन्यासहवर्त्तमान युद्धास सिद्ध होता. परंतु, तो जें कांहीं करी तें विचारपूर्वक करी, तेणेंकरून त्याची गति मंद दिसे, आणि तो आपणास भिऊन दबकला आहे, असें दारयसास वाटे. परंतु तसा कांहीं एक प्रकार नव्हता. दारयस मोठमोठ्या मजला करीत इस्सस येथें येऊन पोहोंचला, आणि तेथें त्यास शिकंदराकडचे जे लोक सांपडले, त्यांची त्यानें कत्तल उडविली. नंतर उभय पक्षांकडील सरदार कांहीं वेळपर्यंत दुरूनदुरून एकमेकांच्या सैन्यबळांचा अजमास काढीत हिंडत होते. दारयसाची सेना आपल्या सेनेपेक्षां फार मोठी आहे, असें जेव्हां हेरांनीं शिकंदरास सांगितलें, तेव्हां तो कांहींसा चिंताक्रांत झाला, आणि त्याच्या मनांत नानाप्रकारचे विचार उभे राहू लागले. दारयसाचा पराभव, परमेश्वराच्या कृपेनें, आपले हातून झाला, तर फारच उत्तम; पण तसें जर नच घडलें, तर युद्ध करतां करतां समरांगणीं पडून मरावें, एवढें तरी देवांनीं मला द्यावें, अशी तो वारंवार प्रार्थना करी. पराभवापेक्षां मरण बरें, असें ज्यांस वाटतें तेच खरे शूर होत. इस्सस शहराजवळ एक मोठें मैदान होतें. त्यांतून पिनारस नामक

नदी वाहात होती. त्या मैदानामध्यें हीं दोन्हीं सैन्यें सज्ज झालीं. उभयपक्षांकडील वीर एकमेकांच्या आंगावर चालून येऊं लागले. आपलीं शस्त्रें बाहेर काढून सर्व शिपायी मारूं किंवा मरूं अशा धैर्यानें पुढें सरसावले. तिकडे दारयस आणि इकडे शिकंदर हे आपापल्या योद्ध्यांस उत्तेजन देत होते. दारयस एका मोठ्या उंच रथावर बसला होता, त्याजकडे शिकंदराची सगळी नजर होती; आणि स्वहस्तें वध करायास जर हा सांपडेल, तर आपले सर्व मनोरथ सफल झाले असें होईल, असें त्यास वाटे. एकएक पाऊल पुढें सरतां सरतां दोहों कडचीं सैन्यें अगदीं जवळ जवळ येऊन हातपिटीस आलीं. शत्रूकडचा जो कोणी हातीं लागेल त्यास मारून टाकावें, आणि आपलें शौर्य प्रदर्शित करावें, ह्या घाईंत प्रत्येक वीर गढला होता. तितक्यामध्यें शिकंदर बादशाहा, मोठी शिताबी करून, दारयसाच्या रथावर हल्ला करण्यास निघाला; हें, दारयसाचा भाऊ ओक्साथ्रीस ह्यानें पाहिलें. तेव्हां तो, बरोबर कांहीं घोडेस्वार घेऊन, त्याच्या साह्यास धांवत आला. त्याचे आणि शिकंदराचे दोन हात झाले. त्यांत ओक्साथ्रीस ह्याचें जरी कांहीं चाललें नाहीं, तरी त्याचें शौर्य आणि धैर्य पाहून, उभयपक्षांकडच्या इतर योद्ध्यांनीं तोंडांत बोटें घातलीं! शिकंदरानें दारयसाच्या रथावर शस्त्रास्त्रांचा वर्षाव करून त्याचे घोडे इतके घायाळ केले कीं, आतां आपण शत्रूच्या हातीं सांपडतों कीं काय असें भय वाटून, तो त्या रथांतून उतरून, मोठ्या लगबगीनें दुसऱ्या रथांत बसला. अशी आपल्या प्रभूची अवस्था पाहून इराणी सैन्यांतील वीरांनीं धैर्य सोडून पलायन आरंभिलें. ज्याला जिकडे भावलें तिकडे तो पळत सुटला. कोणी

कोणाचा धनीना कोणी कोणाचा चाकर,अशी अवस्था झाली. दारयसाचे लोक पुढें आणि शिकंदराचे मागें, असा प्रकार सर्वत्र दिसूं लागला. ह्या झटापटीमध्यें शिकंदराला देखील लहानशी जखम झाली होती. पण तिजपासून त्याला फारशी इजा झाली नाहीं.

अशी पळापळ झाली होती तरी, दारयसाच्या सैन्यामध्यें जे ग्रीक लोक होते, ते आपल्या ठिकाणावरून हालले नव्हते; ते जातीचे शूर होते, आणि त्यांचें मासिदोनियन लोकांशीं प्राचीन काळापासून हाडवैर होतें; तेणेंकरून त्यांस अधिक स्फुरण चढून, ते शिकंदराच्या लोकांशीं मोठ्या निकरानें लढूं लागले. ही झटापट बरीच लांबली होती; व शेवटीं जय कोणाचा होईल ह्याची शंकाही उभय पक्षांच्या मनांत पुष्कळ वेळ पर्यंत घोळत होती. परंतु, शेवटीं शिकंदराच्या पक्षास यश आलें. ह्या प्रसंगीं सिल्युकस वगैरे त्याचे १२० सरदार पतन पावले. ही त्याची मोठी हानि झाली खरी. -तरी, शेवट यशस्कर झाल्यामुळें त्याचें त्यास फारसें दुःख वाटलें नाहीं. फायदेशीर सवदा झाला म्हणजे, खरोखर हानि असते ती देखील मनुष्यास हानि नाहींशी भासूं लागते.

युद्धाच्या आरंभीं दारयसाच्या घोडे स्वारांनीं शिकंदराच्या अजिंक्य नामक सैन्यभागावर हल्ला करून त्याची दाणादाण केली होती. ती गोष्ट मनांत ठेवून, युद्ध आटपण्याच्या सुमारास शिकंदराच्या लोकांनीं, आपण भिऊन पळून जात आहों, असें दाखवून, त्यांस पुरतें आपल्या अंगावर येऊं दिलें. आणि, जयाच्या खातरीनें ते इराणी लोक, वेड्यासारखे अव्यवस्थित होत्साते आपणांवर आले असें दृष्टीस पडतांच

मासिदोनच्या सैन्यांतील थेसालियन लोकांनीं त्यांवर एकदम हल्ला करून त्यांची अशी दाणादाण करून सोडिली कीं, त्यांस देमाय धरणी ठाय झालें. आणखी, दारयस गाडींत बसून, थोड्याशा लोकां सहवर्तमान पळून जातांना ह्याच वेळीं त्यांच्या दृष्टीस पडला. तेव्हां तर सर्वांचीं धैर्यें खचलीं, हातांतलीं शस्त्रें गळालीं, आणि दारयसाच्या सर्व सैन्याचा विसकट होऊन, शिकंदर बादशाहास पूर्ण यश प्राप्त झालें. ह्या प्रकारेंकरून इस्सस येथील युद्ध आटोपलें. प्राचीन इतिहासामध्यें ज्या गोष्टी फार महत्वाच्या ह्मणून वर्णिल्या आहेत, त्यांतच ह्या युद्धाची गणना आहे. शिकंदर आणि दारयस ह्यांचें ग्रानिकस नदीवर जें प्रथम युद्ध झालें, तें मागें वर्णिलेंच आहे. तें वाचकांच्या लक्षांत असेलच. इस्सस येथें जो हा त्यांचा प्रसंग झाला, तें त्यांचें द्वितीय युद्ध होय.

दारयस गाडींत बसून पळत सुटला, तो एका फार खडकाळ ठिकाणीं प्राप्त झाला. तेथें त्याची गाडी चालेना; आणि पुढें पळत गेल्या शिवाय त्याच्यानें तर राहवेना. तेव्हां त्यानें आपली ढालतरवार तेथें टाकिली, राजचिन्हयुक्त मोठा आंगरखा होता, तोही तेथें फेंकून दिला, आणि एका घोड्यावर आरोहण करून पलायन पुढें चालविलें. हें सर्व शिकंदरास समजलें होतें; तरी, आपल्या सैन्याची व्यवस्था बरोबर लाविल्याशिवाय शत्रूच्या मागें लागणें बरोबर नाहीं असें त्यास वाटून, त्यानें कांहीं वेळ तेथेंच राहून, आपल्या मनाप्रमाणें सर्व तजवीज केली. तितका वेळ दारयसास फावला, आणि तो पुढें लांब निघून गेला. मागें, ह्याचें पुष्कळ सामानसुमान मासिदोनियन लोकांच्या हातीं लागलें. शिवाय पुष्कळ लोक पाडाव केले ते वेगळेच. पाडाव

केलेल्या मनुष्यांमध्यें दारयसाची आई सिसिग्यांबिस, त्याची राणी, त्याच्या दोघी मुली, आणि त्याचा एक लहान मुलगा अशीं मनुष्यें होतीं. बाकीचा जनानखाना खजीन्याबरोबर पूर्वींच दमास्कसास पाठवून दिला होता ह्मणून बरें; नाहींतर तीं सगळीं ह्या प्रसंगीं मासिदोनियन लोकांच्या हातीं लागतीं. ह्या वेळीं २००० तालेन्तस दारयसाच्या खजीन्यांत शिकंदरास सांपडले. ह्या प्रचंड युद्धामध्यें दारयसाकडचीं एकंदर एकलक्ष दाहाहजार मनुष्यें प्राणांस मुकलीं असें प्लुतार्च नामक ग्रंथकारानें लिहिलें आहे. दारयस स्वतः ह्मणे कीं, ह्या प्रसंगीं एकलक्ष तीसहजार माणसें मेलीं. खरी संख्या काय असेल ती असो; परंतु ती एक लक्षाहून अधिक असली पाहिजे, हें खचीत दिसतें.

दारयसाचें लष्कर पळूं लागलें तेव्हां त्याच्या सामानाची केवळ लूट झाली. जें ज्याच्या हातीं लागलें तें त्यास मिळालें. शिकंदराचे लोक गबर होऊन गेले. दारयसाचा खासा तंबू आंतील खाशा माणसांसुद्धां व उत्तमोत्तम बहुमोल सामानसुमानासुद्धां त्यांचे हातीं लागला, तो त्यांनीं आपल्या प्रभूकरितां ह्मणून राखून ठेवून त्याच्या हवालीं केला. तो पाहून त्यास मोठा आनंद झाला. त्यांत सुखासनावर बसून थोडासा विसावा घेतल्यावर शिकंदर जवळच्या मंडळीकडे वळून ह्मणाला, "चला, आपण दारयसाच्या स्नानाच्या जागीं जाऊन स्नान करूं, ह्मणजे आपला सगळा शीण हरेल." तें ऐकून तेथला एकजण त्यास हात जोडून ह्मणाला, "महाराज, आतां ती जागा दारयसाची कां ह्मणतां? आपली ह्मणा. कारण, शत्रूचें जें कांहीं आपण घेतलें आहे, तें सर्व आपलेंसें झालें आहे." नंतर त्यानें तेथील

सोन्यारुप्याचीं मोठमोठीं भांडीं, पडदे. कनाती, टप, पलंग वगैरे हिरेमाणकांनीं गुंफलेलें आणि सुगंधित पदार्थांनीं घमघमलेलें नानाप्रकारचें मिजासीचें सामान पाहिलें. तेव्हां तो अगदीं थक्क होऊन गेला, आणि आपल्या मित्रांकडे वळून ह्मणाला, "एकूण राजविलास असा असतो, असें दिसतें!" असे शब्द त्याचे तोंडांतून निघण्याचें कारण एवढेंच कीं त्या वेळेपर्यंत त्याला-इष्क किंवा मिजाज कशी ती माहीत नव्हती.

स्वतःच्या मांडीस झालेल्या जखमेस पट्टीबिट्टी बांधिल्यावर सायंकाळच्या सुमारास, शिकंदर, त्या तंबूमध्यें, आपल्या मोठमोठ्या सरदारांसहवर्तमान भोजनास बसला. इतक्यांत त्यानें पलीकडच्या खोलींतून कोणी आक्रोश करीत आहेत, असा शब्द ऐकिला. तो कोणाचा काय वगैरे पूसतपास करितां त्यास असें समजलें कीं, दारयसाचा मोठा आंगरखा आपल्या एका शिपायाच्या हातांत दृष्टीस पडल्यापासून, त्याचीं मुलें माणसें, तो खचीत मरण पावला असें समजून, अत्यंत दुःखाकुल होत्सातीं रडत आहेत. हें कानीं पडतांच शिकंदराचें चित्त दयेनें द्रवलें, आणि एवढ्या मोठ्या राजाच्या आईस आणि बायकामुलांस असा दुःखाचा प्रसंग प्राप्त झाला, असें मनांत येऊन त्यास फार वाईट वाटलें. त्याविषयीं त्याच्यानें एक शब्द देखील तोंडाच्या बाहेर काढवेना. त्याच्या नेत्रांतून खळखळां अश्रुधारा वाहूं लागल्या. हें पाहून जवळच्या मंडळीस मोठा विस्मय झाला. ते त्याच्या तोंडाकडे टकमक पाहत स्तब्ध बसले. कांहीं पळांनीं तो गहिंवर गेल्यावर, त्यानें लिओनातस ह्यास जवळ बोलावून आणून सांगितलें कीं, 'तुह्मी दारयसाच्या कुटुंबाच्या माण-

सांकडे जाऊन, तो मेला नाहीं असें त्यांस कळवून त्यांचें सांत्वन करावें.' त्याप्रमाणें तो कांहीं लोक बरोबर घेऊन, त्या माणसांच्या खोलीच्या दाराशीं जाऊन उभा राहिला. तों तो दरवाजा लागलेला असून आंत एकच आकांत उसळला होता. इतक्यांत दाराच्या फटींतून बाहेरच्या एका शिपायाची तरवार आंतल्या कोणा माणसाच्या दृष्टीस पडली. तेव्हां, हे शिपायी आपणांस ठार मारण्याकरितां शिकंदरानें पाठविले आहेत असें वाटून, त्या माणसांनीं जो कहर केला, त्याचें वर्णन देखील करवत नाहीं. आपणांस कोणी दार उघडीत नाहीं, असें पाहून, लिओनातस हळूच दरवाजा लोटून एकटा आंत गेला. त्यास पाहतांच आतलीं सर्व लहान मोठीं मनुष्यें, मोठा आक्रोश करीत धांवत धांवत येऊन त्याच्या पायांशीं लोळूं लागलीं; आणि अत्यंत दीन मुद्रेनें त्यास ह्मणालीं, "महाराज, आह्मी मरायास तयार आहों. त्याविषयीं आमची कांहीं तक्रार नाहीं. परंतु, आमची विनंती एवढीच आहे कीं, आमचा प्रभु दारयस ह्याचा प्रेतसंस्कार आधीं आह्मांस यथाविधि करूं द्या, आणि मग आमचे प्राण घ्या." त्यावर लिओनातस ह्यानें त्यांस असें सांगितलें कीं, "मला शिकंदर बादशाहानें तुह्मांकडे पाठविलें आहे. तुह्मी अगदीं भिऊं नका. तुमचा दारयस जीवंत आहे. त्याच्या जीवास धक्का लागला नाहीं. तुह्मीं स्वस्थ असावें. तुह्मांस येथें कांहीं कमी पडावयाचें नाहीं. तुमचा सर्व मानमरातब पूर्वीप्रमाणें राहील. असा आमच्या बादशाहाचा तुह्मांस निरोप आहे." हें ऐकून तीं माणसें अमळ सावध झालीं. राजसुख भोगलेल्या मनुष्यांस पराधीनता प्राप्त होणें हें अत्यंत दुःखप्रद होय.

युद्धाचे दुसरे दिवसीं आपल्या लष्करांतील जखमी वगैरे लोकांचा समाचार घेतल्या नंतर, शिकंदर स्वत: दारयसाच्या मुलांमाणसांकडे गेला. तेव्हां त्याजबरोबर हिफीस्तियन हा त्याचा मित्र मात्र होता; दुसरें कोणी नव्हतें. हिफीस्तियन हा त्याचा बाळमित्र होता; तो त्यावर फार लोभ करीत असे; आणि त्यास आपल्या सर्व गुह्य गोष्टी सांगत असे. ते दोघे समवयस्क, स्वरूपानें बहुत करून एकसारखे, आणि एकसारखा पोषाक केलेले असे होते. परंतु, हिफीस्तियन हा शिकंदरापेक्षां कांहींसा उंच होता. ते दोघे बसलेले दृष्टीस पडतांच, दारयसाची आई सिसिग्यांबिस ही, हिफीस्तियन ह्यास शिकंदर समजून त्याच्या पायां पडली. इतक्यांत, तो शिकंदर नव्हे, असें जवळच्या एका मनुष्यानें तिला सुचवून तो कोणता तें बोटानें दाखविलें. तेव्हां तिला मोठा संकोच झाला. आणि ती शिकंदराच्या पायांपडून हात जोडून ह्मणाली, "महाराज, मी आपणांस पूर्वीं कधीं पाहिलें नव्हतें, ह्मणून अशी चुकलें; कृपाकरून माफी करावी." त्यावर शिकंदरानें उत्तर दिलें, "कांहीं चिंता नाहीं आई. हिफीस्तियन हा शिकंदरच आहे!" ह्यांतील आई हा शब्द ऐकून सिसिग्यांबिस हिला फार समाधान होऊन मोठें नवल वाटलें; आणि 'हिफीस्तियन हा शिकंदरच आहे,' हें ऐकून हिफीस्तियन ह्यास परम आल्हाद झाला. त्या दोघांनीं शिकंदराचे तेथच्या तेथें फार फार आभार मानिले. वाचा सर्व मनुष्यांस असते. परंतु तिची योग्य योजना करण्यास समर्थ असे पुरुष जगामध्यें फार थोडे आढळतात.

इससस येथील युद्धामध्यें शिकंदराचे जे सरदार पडले होते, त्यांच्या थोरवीस योग्य अशीं त्यांचीं क्रियाकर्मांतरें त्यानें

करविलीं, इतकेंच केवळ नव्हे; तर, इराणी सैन्यांतले जे सरदार पतन पावले होते, त्यांचीं क्रियाकर्मांतरें योग्यतानुरूप करण्याविषयीं त्यानें सिसिग्यांबिस हीस सांगून पाठविलें, आणि त्याबद्दल खर्चासही कांहीं पैसा दिला. ह्यावरून शिकंदर हा किती थोर आणि उदार मनाचा पुरुष होता, हें सहज समजतें. सिसिग्यांबिस ही त्याचे उपकार वारंवार आठवीत असे. एकेसमयीं ती त्यास ह्मणाली, "राजा, हे तुझे उपकार आतां मी कोठेंरे फेडूं? अरे, मी पाडाव केलेली बायको असतां तूं मला आई आई ह्मणतोस, आणि एकाद्या मोठ्या राजपत्नीप्रमाणें माझी मानमान्यता ठेवितोस, ह्याचें मी आतां किती तरीरे वर्णन करूं? राजा, पूर्वीं मी कोण होतें आणि आतां माझी अवस्था काय आहे, हें मी पूर्णपणें समजतें आहें. मीं जरी मोठें वैभव भोगिलें आहे, तरी ही आतांची दशा सोसण्यास मला कांहीं कठीण पडत नाहीं. तथापि, आमची ही दीनावस्था, त्वां आह्मांवर दया करून, आह्मांस जाणवावी, कठोरपणा करून जाणवूं नये, हें तुझ्या थोरवीस उचित आहे." नंतर त्यानें दारयसाचा लहान मुलगा आपले जवळ घेतला. तो जरी अगदीं अल्पवयस्क होता, तरी तो त्या परक्या पुरुषास न भितां, उल्हास वृत्तीने त्याचे गळ्यांत हात घालून त्याशीं खेळूं लागला. तें पाहून शिकंदर हिफीस्तियन ह्याजकडे वळून ह्मणाला, "अहो, दारयसाचा स्वभाव असा कांहीं अंशीं जर सदय असता तर बरें झालें असतें."

दारयस हा मोठा देखणा पुरुष होता. आणि त्याची बायकोही तशीच पांचचार हजार बायकांत सुस्वरूप होती. हें शिकंदरास कोणीं सांगितलें होतें. त्यावरून त्यानें असा

बंदोबस्त केला होता कीं ती कोठेंही आणि कोणत्याही वेळीं आपल्या दृष्टीस पडूं नये; येवढेंच केवळ नव्हे; तर, तिच्या सौंदर्याचें वर्णन देखील त्यास ऐकावयास येईल असें कोणीं करूं नये, अशी त्याची सक्त ताकीद होती. ह्या वेळीं शिकंदरबादशाहा अगदीं भरज्वानींत होता; ही गोष्ट मनांत आणिली ह्मणजे, त्याचें हें आचरण त्यास अत्यंत भूषणप्रद दिसतें. मनुष्याचें मन षड्रिपूंच्या स्वाधीन किती आहे, हें ह्या तरुण बादशाहास उत्तम रीतीनें कळत होतें, असें ह्मटलें पाहिजे. कोणीं ग्रंथकारानें असें लिहिलें आहे कीं, आपण पाडाव केलेलीं मनुष्यें आहेत, असें मनांत येऊन दारयसाच्या कुटुंबाच्या माणसांस जें वाईट वाटे, तें खेरीज करून बाकी सर्व प्रकारचें सुख त्यांस मिळावें, अशी तजवीज शिकंदरानें ठेविली होती. शत्रूकडच्या माणसांचे हाल करण्यास कोणास बुद्ध्या क्रूरपण धरावें लागत नाहीं; कारण बहुतकरून सर्व माणसांची वृत्तिच तशी असते. परंतु तें मनांतलें स्वाभाविक शत्रुत्व काढून टाकून त्याचे ठायीं दया आणि प्रीति ह्यांची स्थापना करणें ह्यास मोठें शाहाणपण आणि पुष्कळ क्रोधदमन लागतें. तें तरुणपणीं शिकंदर बादशाहाचे ठायीं होतें.

दमास्कस पार्मिनिओ ह्यानें घेतलें, असें मागें सांगितलें आहे, त्याची हकीकत फार चमत्कारिक आहे, ती येथें सादर करितों. त्या शहराचा सुभेदार हा दारयसाचा मोठा विश्वासू मानिलेला चाकर होता; ह्यास्तव इस्सस येथील आणीबाणीच्या वेळीं त्यानें आपला खजीना व कांहीं आवडतीं माणसें तेथें त्याच्या आश्रयास पाठवून दिलीं होतीं. परंतु, ह्या जगांतील इतर वस्तूंप्रमाणें विश्वासूपणाही अल्पा-

युषी असतो. त्याच्या अस्तित्वास कांहीं विशेष कारणें असतात; तीं नष्ट झालीं ह्मणजे तो अर्थात्च लयास जातो. दमास्कसच्या सुभेदाराचा विश्वासूपणा ह्या प्रकारचा होता. आपला धनी दारयस हा पराभव पावून पळत सुटला आहे, आणि त्याचे हातून आपलें बरें होण्याची आशा उरली नाहीं, असें त्यास वाटून, तो निमकहराम झाला. तरी आपला निमकहरामीपणा भितरेपणानें झांकावा, अशी त्यास इच्छा होऊन, त्यानें शिकंदरास असें लिहून पाठविलें कीं, "दारयसाचें जें कांहीं मजपाशीं आहे, तें सर्व मी आपणांस देण्यास सिद्ध आहें; उद्यां सूर्योदयीं, सर्व खजीना लांबविण्याच्या मिषानें मी तो हमालांच्या पाठींवर लादून, त्यांजबरोबर कांहीं शिपायी देऊन त्या सर्वांस शहराबाहेर पाठवीन; त्यांस आपल्या लोकांनीं जरा धमकाविल्या बरोबर ते आपलीं ओझीं तेथच्या तेथें टाकून सगळे पळून जातील; मीही लागलाच भयभीत झाल्यासारखा गडबडून जाईन; म्हणजे, हें शहर-आणि ह्यांतलें सर्व कांहीं आपले हातीं लागेल." हें पत्र पार्मिनिओ ह्यानें फोडिलें, आणि त्यांत लिहिल्याप्रमाणें सर्व गोष्टी घडून आल्या. नाना प्रकारचे रत्नजडित अलंकार, मोठमोठीं भरजरी वस्त्रें, सोन्यारूप्याचीं लहान मोठीं अनेक पात्रें, आणि इतर बहुमोल सामान, ह्यांनीं तें शहराबाहेरचें सर्व मैदान भरून जाऊन चित्रविचित्र दिसूं लागलें. ह्या ठिकाणीं मासिदोनियन लोकांस पुष्कळ द्रव्य सांपडलें, इतकेंच केवळ नव्हे; तर तेथें दारयसाचीं कांहीं आप्त मनुष्यें आणि कितीएक मोठमोठ्या सरदारांच्या बायका, हीं त्यांच्या हातीं लागलीं. त्या गर्भश्रीमंतांच्या सुंदर आणि सुकुमार स्त्रिया आपापल्या मुलांस हातांत धरून फरफरां ओढीत नेत

होत्या, आणि खळखळां अश्रु ढाळीत होत्या, हें पाहून तेथच्या सर्व लोकांस मोठें दुःख झालें. तीस हजार मनुष्यें आणि सात हजार घोडीं गाढवें इतकीं सामानानें लादलेलीं पार्मिनिओ ह्याच्या हातीं लागलीं. दारयसाच्या ३२९ वेश्या येथें होत्या, त्या त्या सरदाराच्या स्वाधीन झाल्या. त्या नृत्यगायनांत फार कुशल होत्या. दारयसाच्या कचेरींतलें आणि बरोबरचें सामानसुमान स्वच्छ ठेवावें, तें नीटनेटकें आहे कीं नाहीं हें पाहावें, त्यास सुगंधित पदार्थ लावावे, आणि तें सुरेख दिसेल असें नेहमीं राखावें, ह्या एवढ्या कामाकरितां जे कांहीं लोक ठेविले होते, त्यांतले ४९२ असामी पार्मिनिओ त्यानें येथें धरिले. दारयसाच्या पूर्वी जे राजे इराणच्या सिंहासनावर बसले होते, ते फार बेताबातानें वागल्यामुळें त्यांच्या खजीन्यांत पुष्कळ रोकड जमून, बहुमोल सामानही अपरिमित भरलें होतें. तें सर्व ह्या वेळीं बाहेर पडून शिकंदर बादशाहाच्या सैन्यास मिळालें. दारयसासारख्या पराक्रमी आणि फौजबंद राजाच्या संपत्तीची अशी वाताहात व्हावी काय? जें जवाहीर परकीय मनुष्यांच्या कधीं दृष्टीस पडावयाचें नाहीं, तें परकीय मनुष्यांपुढें रस्त्यांत लोळावें काय? होणारा पुढें उपाय नाहीं, ही गोष्ट खरी आहे. मोठमोठ्या भूपतींच्या संपत्तीची अवस्था जर अशी झालेली आहे, तर, साधारण मनुष्यांच्या यःकश्चित् तुटपुंजीचा पाड काय? आपला पैसा ह्मणजे आपला जीव, असें समजणाऱ्या धनलोभी मनुष्यांस ही गोष्ट फार विचारणीय आहे.

समरांगणीं दारयसाची अवस्था काय झाली, हें मागें सांगितलेंच आहे. तो एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं आणि दुसऱ्या ठिकाणाहून तिसऱ्या ठिकाणीं, असें भ्रमण

करीत सोकास येथें आला. तेथें त्यानें आपल्या सैन्यांतले ४००० लोक पुनः जमविले; आणि तो मोठ्या त्वरेनें, तैग्रीस नदीकडे थाप्साकस येथें प्राप्त झाला. तिकडे पार्मिनिओनें दमास्कस घेऊन, तेथील सर्व द्रव्य नीट बंदोबस्तानें ठेवून, आसपासचे प्रदेश घेण्याचा क्रम चालविला. शिकंदराची स्वारी ही सीऱ्यांतून, शहरें घेत घेत तिकडे चालली होती. ह्या वेळेच्या सुमारास त्याचा दरारा एवढा बसला होता कीं, त्याची स्वारी जवळ आल्याचें कळल्या बरोबर शहरांतले लोक थरथरां कापूं लागून त्याचे स्वाधीन होत. तो माराथोस येथें आला तेव्हां त्यास दारयसाकडून आलेलें एक पत्र पोंचलें. त्यांत दारयसानें आपणास राजा ह्मटलें होतें, परंतु शिकंदरास राजा न ह्मणतां, एकाद्या साधारण मनुष्याप्रमाणें लेखिलें होतें. त्या पत्राचें तात्पर्य असें होतें कीं, " शिकंदरा, आमचीं कुटुंबाचीं माणसें तूं धरून ठेविलीं आहेस, त्यांचा खंड काय तो सांग, ह्मणजे तो पोंचता करून त्यांस आह्मी सोडवून आणवूं. राज्याविषयींचा निकाल युद्धाच्या योगानें तुझे मनांत करून घ्यावयाचा असला, तर सारखें सारखें सैन्य समरांगणांत आणून काय होतें तें पाहा. पण तुला जर माझी बऱ्याची गोष्ट ऐकावयाची असली, तर मी तुला खरेंच मनापासून सांगतों कीं, तुझ्या वाडवडिलांचें जें राज्य आहे, तेवढ्याच्या उपभोगानें त्वां तृप्त राहावें, दुसऱ्याच्या राज्यांत हात घालूं नये, हें योग्य आहे. ही गोष्ट स्वतः आह्मांस कबूल आहे, हें आह्मी शपथपूर्वक सांगतों. आणि ही जर तूं शपथपूर्वक पतकरून तीप्रमाणें वागशील, तर आपण उभयतां एकमेकांशीं निरंतर मोठ्या स्नेहभावानें वागूं." हें उद्धटपणाचें पत्र वाचून शिकंदरास फार संताप आला, आणि

लागलेंच त्यानें त्याचें उत्तर लिहिलें. त्याचें तात्पर्य असें. "तुमच्या पूर्वजांनीं आमच्या देशच्या लोकांस जो त्रास दिला आहे, तो अद्याप आह्मांस आठवत आहे. आमचा पिता फिलिप ह्यास ठार मारण्याचे कामीं मारेकऱ्यांस तुमची आं-तून फूस होती, ही गोष्ट जगजाहीर आहे. आह्मांला जो कोणी ठार मारील त्यास १००० तालेन्त देण्याविषयींचा जाहीरनामा तुह्मीं नुकता परवां लाविला होता, हें आह्मी जाणतों. एवढ्या मोठ्या सैन्याचें आधिपत्य तुह्मांकडे असून तुह्मी अशा हलकट रीतीनें शत्रूस मारण्याविषयींचा जाही-रनामा लावावा, हें तुह्मांला शोभतें काय? असो. आह्मी जो उद्योग करीत आहों, तो केवळ स्वसंरक्षणार्थ आहे, पर-नाशार्थ नाहीं. आह्मीं आशिआखंडाचा बराच भाग जिं-किला आहे. आणि एका लहानशा लढाईंत तुमचा पराभव केला आहे. तुह्मीं युद्धप्रसंगीं अगदीं अप्रयोजकपणाची वर्तणूक केली आहे, त्यापेक्षां आह्मीं तुमची विनंती मान्य क-रावी, असें कांहीं राहिलें नाहीं. तथापि, जर तुह्मी स्वतः आह्मांपुढें येऊन अति नम्रपणानें आह्मांस विनंती कराल, तर आह्मी तुमचीं सगळीं मुलें माणसें, कांहीं एक खंड न घेतां, तुमच्या हवालीं करूं. शत्रूस जिंकावें कसें हें आह्मीं तुह्मांस दाखविलेंच आहे; आणि असे जर तुह्मी दांतीं तृण धरून आह्मांपुढें याल, तर शत्रूवर उपकार कसे करावे, हें आह्मी तुह्मांस दाखवूं. आह्मांस शरण येण्यास तुह्मांला जर भय वा-टत असेल, तर आम्ही तुम्हांस शपथपूर्वक असें सांगतों कीं ह्या कामीं आम्हांकडून तुम्हांस तिळभर देखील इजा व्हाव-याची नाहीं. परंतु, ही एक गोष्ट तुम्ही चांगली लक्षांत ठेवा कीं, तुम्हीं जें दुसरें पत्र आम्हांस लिहाल, त्यांत आम्हांस

नुसतें राजा म्हणून चालणार नाहीं, तर आम्ही तुमचे राजे आहों, असें तुम्हीं स्पष्ट दर्शविलें पाहिजे." हें पत्र थर्सिपसनामक एका मनुष्याबरोबर शिकंदरानें दारयसाकडे रवाना केलें.

नंतर शिकंदर बादशाहा फिनिशिआ देशांत गेला. तेथें त्यास बिब्लोस नामक शहर लागलें. तेथले लोक स्वसंतोषानें त्याच्या स्वाधीन झाले. पुढें तो सिदोनिआवर गेला. तेथील राजा स्त्राबो हा दारयसाच्या अर्ध्या वचनांत वागत असे, आणि सिदोनिआवर इराणी लोकांचा प्राचीन काळापासून दांत असे. अशी स्थिति असल्यामुळें, शिकंदर जवळ आला असें कळतांच त्या लोकांस मोठा आनंद झाला. त्यांनीं त्याचें स्वामित्व परम संतोषानें पत्करिलें. त्यानंतर शिकंदरानें स्त्राबो ह्यास पदच्युत करून, हिफीस्तियन ह्यास असें सांगितलें कीं, स्त्राबो ह्याच्या जागीं स्थापण्यास कोणी योग्य मनुष्य तुम्हीं आपल्या परीक्षेनें निवडून काढावा. हिफीस्तियन हा तेथें एका घरीं बिऱ्हाड घेऊन राहिला होता. त्या घरचें कुटुंब बरेंच मोठें असून, त्याची मानमान्यता त्या शहरामध्यें चांगली असे. त्या घरामध्यें दोघे भाऊ मुख्य कर्ते होते. त्यांतून एकास सिंहासनारूढ करावें असें त्यानें मनांत आणून ती गोष्ट त्यांजपाशीं काढिली. तेव्हां त्यांनीं त्यास असें स्पष्ट सांगितलें कीं, "सिंहासनारूढ होण्यास राजवंशांतल्या पुरुषाखेरीज इतर पुरुष योग्य नाहींत, अशी ह्या देशाची फार प्राचीन काळापासून चालत आलेली वहिवाट आहे, ह्यामुळें आमच्यानें आपलें म्हणणें कबूल करवत नाहीं, माफी असावी." जी वस्तु मिळविण्याकरितां मोठमोठे शाहणे पुरुष देखील जीवावरचीं संकटें भोगितात, ती सहज, अप्रयत्न, आपोआप

घरीं चालून आली असतां ज्यापेक्षां हे गृहस्थ पतकरीत नाहींत, त्यापेक्षां हे कोणी मोठे महात्मे असावेत, असें हिफीस्तियन ह्यास वाटलें. आणि तो त्यांस म्हणाला, "मित्रांनो, तुमची ही अशी सुवृत्ति चिरकाल असो. राजत्व पतकरण्यांत जें सुख आहे, त्यापेक्षां राजत्व नाकारण्यांत अधिक आहे, हें गुह्य पूर्णपणें जाणलेले असे तुम्हीच काय ते माझ्या दृष्टीस पडलां. बरें तर, आतां ह्या सिंहासनावर बसविण्यास राजकुलांतला कोणी चांगला पुरुष तुम्हीच दाखवून द्या. त्याजमध्यें हा एक गुण विशेष असला पाहिजे कीं, जें हें राज्य मला मिळालें आहे तें तुम्हां अमुक दोघां भावांच्या कृपेचें फळ आहे, असें त्यानें यावज्जीव आठवावें." तेव्हां त्यांनीं थोडा वेळ विचार करून, आबदोलोनिमस ह्याचें नांव सांगितलें. हा पुरुष राजकुळांतला होता. परंतु, त्याचें नातें फार दूरचें असल्यामुळें व त्याच्या कुटुंबावर, दुर्दैवेंकरून, नानाप्रकारचीं संकटें आल्यामुळें त्याची अवस्था अशी झाली होती कीं, पोटास जाडेंभरडें अन्न मिळविण्यास त्याला सर्व दिवसभर काबाडकष्ट करावे लागत. तथापि, त्याच मनुष्यास तेथच्या गादीवर बसवावयाचें, असा हिफीस्तियन ह्यानें निश्चय केला.

नंतर ते दोघे भाऊ आबदोलोनिमस ह्यास शोधावयास निघाले, आणि त्यांनीं आपणांबरोबर राजाधिकाराचीं वस्त्रेंही घेतलीं. तेव्हां तो गरीब बिचारा मनुष्य, मान खालीं घालून, एका बागेमध्यें काम करीत होता. त्याचे जवळ जाऊन, त्या दोघां भावांनीं त्यास राजा समजून फार आदबीनें मुजरा केला; आणि त्यांपैकीं एकानें त्यास ह्मटलें, "अहो, तुह्मी आतां हीं रगटीं फेंकून देऊन, आह्मीं बरोबर आणिलीं आहेत हीं राजाधिकाराचीं वस्त्रें घाला. आपलें पहिलें सगळें

लघुत्व सोडून देऊन, प्रभुत्व धारण करा. परंतु, ज्या सद्गुणांच्या योगानें तुह्मांस हें राजपद प्राप्त झालें आहे, ते सद्गुण राजपदारूढ झाल्यावर विसरूं नका. आतां आपण सर्वांमध्यें थोर होणार, आणि इतर सर्वांचे जीव आपले हातीं असणार, ह्यास्तव मागणें मिळून एवढेंच आहे कीं आपण आपली ही पूर्वस्थिति विसरूं नका." हें ऐकून आबदोलोनिमस ह्यास इतकें आश्चर्य झालें कीं, ही स्वप्नावस्था तर नव्हेना, अशी त्यास भ्रांति पडली. तो त्या दोघांभावांकडे वळून ह्मणाला, "अहो महाराज, मज गरीबाचा आपण असा उपहास कां मांडिला आहे हा? हा आपणांस शोभतो काय?" तेव्हां त्यांनीं त्यास झालेलें सगळें वर्तमान ऐकविलें, तेणेंकरून, ते जें ह्मणत होते तें सर्व खरें आहे, असें त्यास वाटलें. मग त्यांनीं त्यास स्नान घातलें, आणि त्याजकरितां जो पोषाक आणिला होता तो त्यास नेसविला. नंतर त्याला राजवाड्यांत नेऊन राजासनावर बसविलें, ह्याचें सर्व लोकांस मोठें आश्चर्य वाटलें. शिकंदर बादशाहानें त्यास बोलावून नेऊन आपले जवळ बसविलें, आणि ह्मटलें, "आपल्या स्वरूपावरून आणि चर्येवरून आपण कोणाचे वंशज आहां, ह्याविषयीं माझी खातरी झाली आहे. परंतु, आपण गरीबी कशी काढिली, हें आपले मुखानें ऐकण्याची माझी फार इच्छा आहे." तें ऐकून तो ह्मणाला, "महाराज, परमेश्वर धन्य आहे! मीं गरीबी कशी काढिली, हें म्यां काय सांगावें? ज्या निर्मल अंतःकरणानें म्या दारिद्र्य वाहिलें त्याच निर्मल अंतःकरणानें हा राजाधिकार वाहण्यास परमेश्वरानें मला सामर्थ्य द्यावें, एवढी प्रार्थना आहे. मला जें जें लागलें, तें तें ह्या माझ्या हातांनीं मला मिळवून दिलें. आणि

जेव्हां मजपाशीं कांहीं एक नव्हतें, तेव्हां मला अमुक पाहिजे असें कधीं माझ्या मनांत आलें नाहीं." हें उत्तर ऐकून आबदोलोनिमस हा कोणी मोठा महात्मा आहे, अशी शिकंदराची खातरी झाली. त्यानें त्यास स्त्राबो ह्याचें सर्व राज्य देऊन, दारयसाच्या लश्कराच्या लुटींपैकीं पुष्कळ बहुमोल सामान दिलें; आणि शिवाय, त्याच्या राज्यास एक जवळचा नवीन प्रांत जोडिला. ह्याप्रमाणें आबदोलोनिमस हा रंकाचा राय झाला. ह्यास मुख्य कारण, त्याचें जन्म राजवंशांत झालें होतें हें होय; आणि दुसरें कारण त्याचें सज्जनपण होय. अशा गोष्टी ऐकिल्या ह्मणजे, जगामध्यें देव ह्मणून कांहीं एक वस्तु आहे, असें मनांत आल्यावांचून राहातें नाहीं. असो.

ह्याप्रमाणें सीर्‍या आणि फिनीशिआ हे दोन्ही देश शिकंदरास पादाक्रांत झाले; परंतु, तायर ह्मणून जें एक मजबूद शहर होतें, तें त्यास घ्यावयाचें राहिलें होतें. तें शहर, एकाद्या बेटाप्रमाणें चारीबाजूंनीं समुद्रानें वेष्टिलेलें होतें; त्याचे भोंवतालची भिंत फार रूंद असून सुमारें दोन अडीचशें हात उंच होती; आणि आंतील लोक मोठे शूर आणि निश्चयाचे होते. हें सर्व जाणून शिकंदर कडीकोट तयारी करून त्याजकडे चालला. तो आपणांवर येत आहे असें त्यांतील लोकांस कळतांच त्यांनीं वेशी लावून घेतल्या; भिंतींच्या तटांवर चांगले बंदोबस्ताचे पाहारे ठेविले; शत्रु बाहेर आले असतां त्यांजवर वरून शस्त्रवृष्टि करतां यावी, अशी योजना केली; आणि ते युद्धास सिद्ध होऊन बसले. त्या शहराच्या भिंतीशीं सैन्य नेण्यास, शिकंदरानें, मोठ्या प्रयत्नानें, समुद्रामध्यें धोंडे, माती, झाडें इत्यादिकांच्या राशी

पर्वतांएवढ्या करून, त्यांवरून मार्ग बनविला. तो तायरच्या पाणबुड्यांनीं पाण्यांतून येऊन दोन तीन वेळां मोडिला; व आंतल्या लोकांनीं आणखी पुष्कळ त्रास शिकंदरास व त्याच्या लोकांस दिला. तरी त्यास न जुमानितां, व हिंमत न खचूं देतां तो आपल्या सैन्यासहवर्तमान त्या भिंतीशीं गेला. शिवाय, तायरच्या लोकांचीं पुष्कळ जाहाजें शहराच्या रक्षणार्थ आणि शिकंदराच्या पराभवार्थ झटत होतीं. त्यांशीं सामना करण्यास त्यानें आपलीं पुष्कळ गलबतें आणिलीं. हा तायरचा वेढा एकसारखा सात महिने पडला होता. शिकंदर एवढ्या धैर्याचा पुरुष होता तरी, कित्येक प्रसंगीं, हें शहर आपणांस अजिंक्य आहे, असें त्याच्या मनांत येऊन तो चिंताक्रांत होई. शहरांतले लोक तर अगदीं भांबावून गेले होते. त्यांस ध्यानींमनीं स्वप्नीं शिकंदर दिसत असे. त्या शहरामध्यें आपोलो म्हणून एका त्यांच्या देवाची मोठी थोरली एक पितळेची मूर्त्ति होती. तो आपोलो आपणांस सोडून शिकंदराकडे जावयास पाहात आहे, असा त्यांतल्या एकाजणास दृष्टांत झाला. त्यावरून त्यांनीं त्याच्या पायांस एक मोठा सुवर्णाचा सांखळदंड बांधून, तो, आपला दुसरा देव हर्क्युलिस ह्याचे पायांशीं पक्का खिळून टाकिला! ह्यावरून देवाविषयीं त्यांच्या भावना कशा होत्या, हें स्पष्ट दिसून येतें. तायरच्या लोकांनीं आपल्या शहराच्या संरक्षणाविषयीं आपली पराकाष्ठा करून पाहिली; परंतु शिकंदरापुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं. त्यानें दृढ निश्चयानें, जीवावर उदार होऊन, जो शेवटचा हल्ला केला, त्यासरसे ते पुढें येऊन मोठ्या शौर्यानें, हातांत शस्त्रें घेऊन मरण पावले. ही त्यांतल्या तरूणांची गोष्ट झाली. जे वृद्ध होते

ते शत्रूच्या शस्त्रांस भिऊन पळत सुटले नाहींत; तर आपापल्या घरांपुढें मरणाची मार्गप्रतीक्षा करीत उभे राहिले होते, असें एका ग्रंथकारानें लिहिलें आहे. असे जे शूर पुरुष, ते परमधन्य होत. जगाच्या इतिहासामध्यें असें दुसरें उदाहरण सांपडावयाचें नाहीं. नुसते भिंतींच्या तटांवर ६००० तायर लोक मारले गेले. ह्यावरून, शहर हस्तगत झाल्यावर जेव्हां आंत कत्तल उडाली, तेव्हां किती मनुष्यें प्राणांस मुकलीं असावीं, ह्याचा अजमास सुज्ञ वाचकांनीं करावा. शिकंदरानें आपोलोस शृंखळामुक्त करून, त्यास फिलालेक्शांदर म्हणजे शिकंदराचा मित्र असें नांव ठेविलें. हें वर्त्तमान इ० स० पूर्वी ३३२ व्या वर्षाच्या सप्तंबर महिन्यांत घडलें.

तायर शहरास वेढा पडल्यापासून तें शिकंदराच्या हस्तगत होईपर्यंत कितीएक चमत्कारिक गोष्टी झाल्या. त्या सर्वांचें कथन करण्यास येथें अवकाश नाहीं. तथापि, त्यांतल्या एक दोन मोठमोठ्या तरी येथें सांगितल्या पाहिजेत. वेढा पडल्यावर सुमारें दोन तीन महिन्यांनीं, शिकंदरानें पाडाव केलेल्या मनुष्यांपैकीं, कोणी एक खोजा निसटून पळाला तो नीट दारयस होता तेथें गेला. त्यास पाहतांच राजानें विचारिलें, "कायरे, आमचीं मुलेंमाणसें जीवंत आहेत ना?" त्यावर त्या खोजानें उत्तर केलें, "महाराज, त्यांविषयीं आपण कांहीं चिंता करूं नये. तीं सगळीं सुखरूप आहेत. आणि तीं आपणांपाशीं असतां जशीं सुख भोगीत होतीं तशीं सुख भोगीत आहेत. त्यांची मानमान्यता ही चांगली आहे." त्यानंतर दारयसानें त्यास दुसरा प्रश्न असा केला कीं, "आमच्या राणीच्या पातिव्रत्याचें कसें काय आहे? तिच्या अबलत्वामुळें किंवा दुसऱ्या कोणाच्या

प्रबलत्वामुळें त्याचा भंग झाला आहे कीं काय? खरें सांग." खोजानें उत्तर दिलें, "महाराज, त्याविषयीं तिळभर देखील शंका धरूं नये. राणीसाहेबांचें पातिव्रत्य जशाचें तसें अढळ आहे. राजा शिकंदर हा ह्याविषयीं अत्यंत नेमनिष्ठ आहे. परद्वारसंबंधानें त्याचें आचरण फार शुद्ध आहे. तो आपल्या राणीसाहेबांस उत्तम रीतीनें वागवितो. हें मर्जी असल्यास मी शपथपूर्वक सांगतों." हें बोलणें ऐकून दारयसास मोठें नवल वाटलें, आणि त्याचें अंतःकरण आनंदानें भरून गेलें. त्यानें बाहु उभारून आणि आकाशाकडे डोळे करून मोठ्यांनीं म्हटलें, "हे सर्वसमर्थ परमेश्वरा, ह्या जगांतील राज्यव्यवस्थेचें सर्व सूत्र तुझ्या हातीं आहे. जें राज्य कृपा करून त्वां मला दिलें आहे, तें तुझी इच्छा असल्यास, मजकडे राहूंदे, परंतु, म्यां ह्यापुढें राजपदारूढ नसावें, अशी जर तुझी इच्छा असली, तर माझें राज्य, इतर कोणास न देतां शिकंदर बादशाहास दे, अशी माझी विनंती आहे." पहा, निर्मलाचरणानें मनुष्य शत्रूस देखील अत्यंत पूज्य आणि स्तुतिपात्र वाटतो; मग इतर मनुष्यांस तसा वाटावा, ह्यांत काय नवल आहे? सदाचरणावर ज्यांची निष्ठा नाहीं, त्यांनीं ह्या गोष्टीचा विचार करावा.

आणखी पुढें कांहीं दिवसांनीं दारयसानें एक वकिलांची मंडळी शिकंदराकडे तायरच्या वेढ्यांत पाठविली. तिजबरोबरच्या पत्रांत त्यानें असें लिहिलें होतें कीं, "मी आपल्या कुटुंबाच्या खंडाबद्दल आपणांस एक हजार तालेंत (म्हणजे सुमारें दीड कोटि रुपये) देण्यास सिद्ध आहें. आणि माझी कन्या स्तातिरा ही आपणांस विधिपूर्वक लग्न लावून देतों. आणि, युफ्रेतीस नदीपर्यंत आशिआखंडांतला जो मुलूख आपण

जिंकिला आहे, तो तिजबरोबर मीं आपणांस आंदण दिला आहे, असें आपण समजावें. ऐहिक वैभव अशाश्वत आहे, त्याचा कांहीं नेम नाहीं. अझून देखील माझे हाताखालीं असंख्य सेना आहे. युफ्रेतीस, तैग्रीस, आराक्सिस आणि हैदास्पिस ह्या ज्या महानद्या आहेत, त्या इराणच्या राज्याच्या रक्षणार्थ मोठमोठ्या बुरूजांसारख्या आहेत. त्या उतरून आलीकडे येणें हें कर्म सोपें आहे, असें आपणांस वाटतें काय? अशा दऱ्याखोऱ्यांत दिवस घालवीत बसून काय होणार आहे? उघड्या मैदानांत या. परंतु, माझ्या एवढ्या अफाट सैन्यापुढें आपले एवढेसे लोक घेऊन येण्यास आपणांस खचीत लाज वाटेल." हें पत्र वाचिल्यावर शिकंदरानें आपली सगळी प्रधान मंडळी बोलावून आणून पुढें काय करावयाचें असें त्यांस विचारिलें. तेव्हां पार्मिनिओ ह्याचें मत असें पडलें कीं, दारयस जें म्हणत आहे तें एकदम कबूल करून कलह मिटवावा, हें बरें. त्यावर कोणी कांहीं बोलेना, तेव्हां तो आणखी असें म्हणाला कीं. "मी जर शिकंदर असतों, तर मीं हें खचीत मान्य केलें असतें." तें ऐकून शिकंदरानें उत्तर केलें "हो, मी जर पार्मिनिओ असतों, तर मी देखील ह्या म्हणण्यास मान्य झालों असतों.' इतकें झाल्यावर, शिकंदरानें दारयसास जबाब लिहिला, तो असा:—" तुम्ही जें द्रव्य मला देण्यास सिद्ध झालां आहां, त्याची मला गरज नाहीं. ज्या वस्तूचें स्वामित्व तुह्मांकडे नाहीं, ती तुह्मी मला देण्याचा डौल घालतां, हा तुह्मांस अगदीं शोभत नाहीं. तुह्मी श्रेष्ठ किंवा आह्मी श्रेष्ठ, ह्याविषयींचा संशय, तुह्मांखेरीज इतर कोणास राहिला नाहीं. हा तुमचा संशय एका लढाईनें नाहींसा होईल. ज्या पुरुषानें समुद्र ओलांडिले आहेत, त्यास तुह्मी

नद्यांचें भय दाखवितां, ह्यांत काय अर्थ आहे! तुह्मी पाहिजे तिकडे जाऊन बसा. हा शिकंदर तुह्मांस धुंडून काढायास चुकावयाचा नाहीं." हें उत्तर पोंचल्यावर, तहाची आशा सोडून, दारयस युद्धाच्या तयारीस लागला. असो.

तायरशहर घेतल्यावर शिकंदराची स्वारी सीऱ्या देशाचें मुख्य शहर गाझा ह्याजकडे वळली. तेथें बातिस ह्यानांवाचा एक खोजा सुभेदार होता, त्यावर दारयसाचा फार लोभ असे, आणि तो आपणास एकनिष्ठ राजसेवक ह्मणवीत असे. त्यानें कांहीं अरब लोक आपल्या चाकरीस ठेविले होते. त्यांजवर त्याचा फार भरंवसा होता. त्या शहराभोंवती एक मोठी भिंत होती; तिच्या योगानें शिकंदराच्या सैन्यास आंत जातां येईना. ह्मणून त्यानें ती भिंत पायापासून खणून काढण्याचें काम मोठ्या झपाट्यानें सुरू केलें.

ह्या ठिकाणीं शिकंदर, यशःप्राप्त्यर्थ, कांहीं अनुष्ठान करीत असतां, एक मोठा मांसाहारी पक्षी वरूनचालला होता, त्याच्या तोंडांतून जो एक लहानसा दगड पडला, तो राजाच्या खांद्यास लागला. त्याचा अर्थ जवळच्या देवभोळ्या जोशांनीं असा केला कीं, हें शहर महत्प्रयत्नांनें हस्तगत होईल, परंतु, त्यामध्यें राजाच्या जीवास भय आहे; ह्यास्तव त्यानें, शत्रूच्या शस्त्रास्त्रांच्या माराच्या पलीकडे जाऊन राहावें. हें शिकंदरानें प्रथम कबूल केलें; आणि त्याप्रमाणें तो दूर जाऊन राहिला. परंतु, शहरांतल्या लोकांनीं बाहेरच्यांवर जेव्हां मोठ्या निकरानें हल्ला केला, तेव्हां पहिली सूचना विसरून ह्मणा, अथवा तींत कांहीं अर्थ नव्हता असें समजून ह्मणा, तो त्या दूरच्या ठिकाणाहून धांवत धांवत त्या युद्धाच्या ठिकाणीं प्राप्त झाला. तेथें, शत्रूवर निकरानें हल्ला करण्या-

विषयीं तो आपल्या सैन्यास उत्तेजन देत असतां, शहराच्या भिंतीवरच्या कोणीं मनुष्यानें जो एक मोठा बाण मारिला, तो सूं सूं सूं करीत येऊन त्याच्या खांद्यांत शिरला. त्याच्या त्याला अतिशयित दुःसह वेदना होऊं लागल्या. परंतु जवळ जो त्याचा कोणी जोशी होता, त्यानें लागलेंच त्यास असें सांगितलें कीं, "आतां आपल्या जीवास कांहीं भय नाहीं; इतकेंच नव्हे; तर, ज्यापेक्षां ही जखम आजचे आज आपणांस झाली आहे, त्यापेक्षां हें शहर आज खचीत आपले हस्तगत होणार, हें खचीत समजावें." हें ऐकून, शिकंदराचें लक्ष त्या वेदनांकडून निघालें, आणि शत्रूवर एकदम मोठा हल्ला करण्याच्या तयारीकडे लागलें. भिंतीच्या पायाशीं जागोजाग खळगे खणिले होते, तेणेंकरून ती धडाधड कोसळून, शहरामध्यें जाण्यास वाटा पडल्या. मग काय विचारावें? गाझा शहरामध्यें मासिदोनियन लोक मोठ्या आवेशानें शिरले; आणि त्यांनीं आंतले सर्व लष्करी लोक चराचर कापून काढिले! सुभेदार बातिस ह्यास कैद करून सरदार लोकांनीं शिकंदरापुढें आणिलें. तेव्हां त्याचें सर्वांग जखमांनीं भरलें होतें. त्यास, वास्तविक ह्मटलें असतां, शिकंदरानें मोठी शाबासकी द्यावी आणि त्याची वाहवा करावी, हें त्याच्या नित्याच्या उदार वर्तनक्रमाप्रमाणें योग्य होतें. परंतु, ह्या प्रसंगीं त्याची वृत्ति कशानें अगदीं बदलून गेली होती कोण जाणे. बातिस दृष्टीस पडतांच, तो त्याच्या आंगावर पिशाच्या प्रमाणें खवळून जाऊन ह्मणाला, "अरे मूर्खा, तूं कांहीं केलेंस तरी तुझ्या इच्छेप्रमाणें तुला मरण यावयाचें नाहीं. तुझा मी पुरता सूड घेणार, आणि त्याकरितां ज्या ज्या प्रकारचें दुःख माझ्यानें तुला देववेल, त्या त्या प्रकारचें दुःख मी

तुला देणार, तें सोसण्यास सिद्ध हो." हें सगळें बातिस ह्यानें खालीं मान घालून स्तब्धपणें ऐकून घेतलें. कारण, राजा ह्या वेळेस फार क्रोधायमान झाला आहे, त्यापक्षीं तूर्त कांहीं एक बोलूं नये हें बरें, असें त्यास वाटलें. परंतु, त्याविषयीं शिकंदराच्या मनांत विपरीत कल्पना येऊन तो ह्मणाला, "पहा हा गुलाम कसा मुका उभा राहिला आहे तो! हट्ट केवढा आहे तो पहा! त्याचे तोंडांतून एकतरी अक्षर निघत आहे काय? तो खालीं वांकून मजकडे दीन मुद्रेनें पाहात देखील नाहीं! कांहीं चिंता नाहीं; मी ह्याचा सगळा हट्ट एका क्षणांत बाहेर काढीन. तोंडांतून शब्द आतां न कां निघेना; पाठीवर चाबूक बसल्यावर हा कण्हेल तर खरा! मगतर नाहीं मुका राहणार!" पूर्वींच्या वृत्तीचा विचार केला असतां, असे शब्द शिकंदराच्या तोंडांतून निघाले असावे कसे, ह्याचा मोठा चमत्कार वाटतो. मनुष्याच्या स्वभावाचा महिमा अगाध आहे.

शिकंदर बादशाहाचा क्रोध नुसत्या शब्दांनीं शमला नाहीं. त्यानें बातिस ह्याचे नानाप्रकारीं हाल करविले. आणि शेवटीं, त्याच्या खोंटेस एक भोंक पाडवून, त्यांत दोरी घालून, त्यास आपल्या रथाच्या चाकास बांधिलें, आणि सगळ्या शहरांतून तो रथ भरधांव काढून, त्या खालीं त्यास ठेंचठेंचून ठार मारिलें. मनुष्याच्या अंतःकरणाच्या क्रूरपणाचा अंत लागावयाचा नाहीं. बातिस ह्यानें आपलें कर्तव्य कर्म योग्य रीतीनें बजाविलें होतें, त्यापक्षीं त्यास बक्षीस देणें योग्य होतें. त्याची अवस्था अशी व्हावी काय.- सद्गुण जो असतो, तो तरी नेहमीं सद्गुणातच मोडतो, असें नाहीं. स्थलकालपरत्वें त्याची गणना दुर्गुणांतही होते. लोकरीतीपुढें उपाय नाहीं.

गाझाशहर हस्तगत झाल्यावर, शिकंदर बादशाहानें तेथें आपले लोकांचा पाहारा ठेवून, आपल्या सैन्यासहवर्तमान, ईजिप्त देशाची वाट धरिली. तो देश पुष्कळ वर्षें पर्यंत इराण सरकारच्या ताब्याखालीं होता. तरी, त्या लोकांचें आणि त्या सरकाराचें कधीं जमत नसे. ते लोक त्या सरकाराचे जे हुकूम मानीत ते केवळ जुलुमानें मानीत; त्यांचे ठायीं राजनिष्ठेचा गंध सुद्धां नव्हता. इतकेंच केवळ नव्हे; तर, दुसरा कोणीही राजा आपणांवर येवो, पण हें इराण सरकार कसें तरी जावो, असें त्यांस झालें होतें. अशा स्थितीमध्यें, शिकंदर बादशाहाची स्वारी आपणांकडे येत आहे असें त्यांच्या दृष्टीस पडलें तेव्हां त्यांस किती आनंद झाला असेल हें सांगावयास नको. आणखी, दारयसाचे जे कोणी सरदार तेथें होते, त्यांस असें दिसून आलें कीं, देशांतले सगळे लोक आपणांस प्रतिकूल असून शत्रु अत्यंत प्रबळ आहे, त्याअर्थी आपलें कांहीं चालावयाचें नाहीं; ह्मणून, त्यांनींही शिकंदराच्या वाटेस आड येण्याचा विचार मनांत आणिला नाहीं. त्या देशाचें मोठें शहर मेंफिस येथें माझीअस ह्या नांवाचा इराणसरकारचा सुभेदार होता, तो बराच पाणीदार होता. परंतु, आपला राजा दारयस हा आतां अगदीं दुर्बल झाला आहे, त्याजकडून आपणास साह्य मिळण्याची आशा नाहीं, असें पाहून, त्यानें तें शहर शिकंदराच्या स्वाधीन केलें. तेथें त्यास आठशें तालेन्त (एक लक्ष वीस हजार रुपये) रोख सांपडले. आणखी ह्याखेरीज लक्षावधि रुपयांचें राजाचें उंची उंची सामान येथें त्याचे हातीं लागलें. ह्या प्रकारेंकरून, कांहीं एक प्रयास न पडतां, सगळा ईजिप्त देश शिकंदराचे स्वाधीन झाला.

शिकंदर मेंफिस येथें असतां, एके वेळीं नैल नदीमध्यें गलबतांत बसून, तें हांकीत हांकीत क्यानोपिक नांवाच्या एका दुसऱ्या नदींत गेला. तेथून त्याचें जाहाज मारिओतिस ह्या नांवाच्या सरोवरांत शिरलें. ह्या सरोवराच्या आणि समुद्राच्या मध्यें जी लहानशी संयोगीभूमि त्याचे दृष्टीस पडली, तिच्या सौंदर्यानें आणि शहर बांधण्याविषयींच्या तिच्या अत्युत्तम योग्यतेनें त्याचें मन वेधिलें. तें स्थल पहिल्यापासूनच इतकें रमणीय होतें कीं, ईजिप्तच्या लोकांनीं त्यावर पुष्कळ दिवसांपासून कांहीं लोकांचा पाहारा ठेविला होता, आणि ते ज्यांचा द्वेष करीत असत, त्यांस ते तेथें कधीं येऊं देत नसत. शिकंदर हा शिल्पविद्येंत बराच निपुण होता. त्यास ती जागा पाहिल्या बरोबर, येथें एकदां मी एक शहर केव्हां बांधीन, असें झालें. त्याप्रमाणें, लागलेच, त्यानें आपल्या बरोबरचे इंजनेर लोक तेथें पाठवून, तेथें शहर कसें बांधावयाचें ह्याचे नकाशे काढविले, आणि त्याच्या कामाचीही सुरवात केली. हेंच शहर सर्व ईजिप्त देशामध्यें फार उत्तम असें होऊन, त्यास, अलेक्झांदर ह्या नांवावरून, अलेक्झांद्रिआ असें युरोपचे लोक म्हणूं लागले; आणि त्यासच, शिकंदर ह्या नांवावरून शिकंदर्या असें कोणीं नांव दिलें.—

नंतर त्याची स्वारी यरूशलेमाकडे वळली. तेथें पोंहचण्यास त्यास पुष्कळ कोस चालावें लागलें. तो रस्ता आफ्रिकेच्या ओसाड प्रदेशांतून होता, त्यामुळें तर त्याच्या सैन्याचे फार हाल झाले. एक दोन मजला झाल्या नंतर ते अशा अफाट आणि विलक्षण मैदानांत प्राप्त झाले कीं, पायांखालीं सगळी रेती, वर आकाश, आसपास पांच पांच कोस शोध केले तरी झाडाचें हिरवें पान किंवा पाण्याचा एक

थेंब त्यांच्या दृष्टीस पडेना. आणि ह्या सुमारास दुसरें असें झालें होतें कीं, त्यांच्या बरोबर प्यावयाच्या पाण्याचा जो थोडासा सांठा होता, तो सरून गेला होता. दुपारच्या वेळीं प्रचंड वाऱ्यानें ती तापलेली रेती आकाशांत समुद्राच्या लाटांप्रमाणें इतकी उडे कीं, तिच्या राशीखालीं हें सर्व सैन्य एका क्षणांत दडपून मरून जाईल कीं काय कोण जाणें, असें सर्वांस भय पडे. हवेमध्यें गरमी इतकी असे कीं, तिच्या योगानें सर्व मनुष्यें तडफड तडफड करून, हाय हाय असें ओरडत पडत. जिकडे तिकडे पाणी, पाणी, पाणी असा शब्द ऐकूं येई. ह्या यातनांपेक्षां मरण बरें, असें सर्वांस झालें. परंतु, परमेश्वराची करणी पहा किती अगाध आहे ती! तें सर्व सैन्य जीवांची आशा सोडून मरणाची मार्गप्रतीक्षा करीत पडलें असतां, आणि आकाश रोजच्या प्रमाणें स्वच्छ असतां, एके दिवशीं अगदीं दुपारच्या वेळीं एकाएकीं मेघ आले, त्यांनीं सर्व दिशा भरून गेल्या; मोठमोठयांनीं मेघगर्जना होऊं लागली; आणि प्रचंड वारा सुटून त्याबरोबर एवढा मोठा पाऊस पडूं लागला कीं, लहान धार मुसळा एवढी! मग काय विचारावें? त्या लोकांस जो हर्ष झाला तो त्यांच्या पोटांत माईना! कितीएक जण तर इतके तान्हेले होते कीं, भांड्यांत पाणी धरून पिण्याइतका धीर त्यांस निघेना, म्हणून ते, आ करून पावसांत उताणे पडले, आणि घटा घटा घटा पाणी पिऊं लागले, असें एका ग्रंथकारानें लिहिलें आहे!

गाझा शहराची व त्यांतील लोकांची दुर्दशा शिकंदरानें कशी केली, हें सर्व वर्तमान यरूशलेमच्या लोकांस आधीं समजलें होतें. तेणेंकरून, तो आपणांवर चालून येत आहे

असें ऐकून, ते अगदीं भयभीत झाले. आपल्या जीवांचा बचाव कोणत्या रीतीनें करावा, हा त्यांस मोठा विचार पडला. यांचा मुख्य धर्माध्यक्ष जादियस ह्यानें त्या सर्वांस एके ठिकाणीं बोलावून आणून असें सांगितलें कीं, मासिदोनियन लोक फार कडवे आहेत, त्यांच्या पुढें आपला टिकाव लागावयाचा नाहीं, ह्यास्तव सर्वांनीं परमेश्वरास अनन्यभावें शरण जाऊन त्याचें साह्य मागावें, म्हणजे ह्या संकटाचें निवारण होईल. परंतु पुढें काय चमत्कार झाला तो पहा. तो धर्माध्यक्ष रात्रीं नित्याप्रमाणें जाऊन निजल्यावर त्यास परमेश्वरानें स्वप्नांत असें सांगितलें कीं, "मासिदोनियन लोक तुमच्या शहरावर येत आहेत, ह्यास्तव, त्यांच्या आदरातिथ्या-करितां तुम्ही आपलें नगर सुशोभित करा, वेशी उघड्या ठेवा, आणि मोठ्या उत्सवानें त्यांस सामोरे जाऊन भेटा. म्हणजे मी परमेश्वर तुमच्या संकटाचें निवारण करीन." हें स्वप्न त्या धर्माध्यक्षानें सर्व लोकांस कळविलें. तें त्यांस शब्दशः खरें वाटलें. आणि त्यांनीं त्याप्रमाणें आचरण केलें. यरूशलेमांतले लोक एवढ्या उत्साहानें आपणास सामोरे येत आहेत, असें जेव्हां शिकंदराच्या दृष्टीस पडलें, तेव्हां त्यास मोठें आश्चर्य वाटलें, आणि त्यांची खरी निष्ठा पाहून त्यास फार आनंद झाला. त्या सामोऱ्या आलेल्या लोकांस-हवर्तमान तो मोठ्या थाटानें शहरांत आला. तेथें मुख्य धर्माध्यक्षाची आणि त्याची गांठ पडली. तेव्हां शिकंदरानें लागलाच त्याला साष्टांग नमस्कार घातला. हें पाहून, बरोबरच्या राजेरजवाड्यांस मोठा चमत्कार वाटला, आणि ह्यांतलें इंगित जाणण्याची इच्छा उत्पन्न झाली. ते एका-मेकांच्या तोंडांकडे पाहून चकित होत्साते स्तब्ध बसले.

जेथें शस्त्रास्त्रांचे धडाके उडावयाचे तेथें आदरपूर्वक आगतस्वागत झालें, हें खरोखर मोठें नवल होतें. शिकंदर हा पुरुष मोठा तेजस्वी असल्यामुळें, त्या गुह्याविषयींचें तथ्य काय आहे हें विचारण्यास तेथें कोणास धैर्य होईना. परंतु, पार्मिनिओ ह्याजवर त्याचा लोभ विशेष होता, आणि त्याशीं तो नेहमी मोकळ्या मनानें बोलत असे; त्यावरून, त्यास पुढें सरून विचारविण्याविषयीं मंडळीनें फार आग्रह केला. तेव्हां तो त्याजवळ जाऊन मोठ्या नम्रतेनें म्हणाला, "महाराज, आपणांस ह्या भूमंडळावरचे सर्व राजे साष्टांग प्रणिपात करितात, असें असतां, आपण ह्या यहुदी* लोकांच्या धर्माध्यक्षाच्या पायां कां पडलां!" त्यावर शिकंदरानें उत्तर दिलें, "अरे, मी यहुदी लोकांच्या धर्माध्यक्षाच्या पायां पडलों नाहीं; तर, हा परमेश्वराच्या पवित्र धर्माचा अध्यक्ष आहे, हें जाणून मी ह्यास साष्टांग नमस्कार केला. मी मासिदोनिआमध्यें दिअम येथें जेव्हां होतों, तेव्हां, हा पुरुष एके रात्रीं माझ्या स्वप्नांत आला होता. त्या वेळीं माझे मनांत आशिआखंड कसें जिंकावें, हा विचार घोळत होता. तो अंतर्साक्षित्वानें जाणून ह्या पुरुषानें मला सांगितलें कीं, 'तूं आशिआखंड जिंकण्याकरितां स्वारीची तयारी कर आणि त्यावर चालून जा, ह्मणजे अदृश्य रूपानें मी तुझ्या सैन्याच्या अग्र भागीं चालून कोणीकडून कसें जावें हें दाखवीन, आणि इराणचें राज्य तुझ्या हातीं लागे असें करीन, तूं कांहीं चिंता करूंनको.' हेंच स्वरूप मीं स्वप्नांत पाहिलें होतें, असें हा धर्माध्यक्ष दृष्टीस पडतांच मला आठवलें. ह्याच्या प्रसादानें मी आशिआखंड जिंकीन, दारयसाचा पराभव

---

* पालेस्टैनच्या लोकांस मराठींत यहुदी लोक म्हणतात.

करीन, आणि इराणचें राज्य घेईन, असा मला खचीत भरंवसा आहे. ह्याचे कृपेनें माझे सर्व मनोरथ पूर्ण होतील, ह्याविषयीं मला तिळभर देखील संशय नाहीं."

ह्यानंतर तो तेथील भजनालयांत गेला. आणि, त्या धर्माध्यक्षाच्या सांगण्याप्रमाणें तेथें त्यानें पुष्कळ देवदेव केला. तत्संबंधीं होमहवनें आटपल्यांवर, त्या धर्माध्यक्षानें त्यास दानियलाचें *पुस्तक दाखविलें. त्यामध्यें, ग्रीक लोकांचा राजा इराणचें राज्य घेईल, असें भविष्य लिहिलें होतें. तें मोहगम होतें, तरी तें आपणाविषयींच आहे, असें त्याचे मनांत येऊन त्यास मोठा आनंद झाला; आणि हातीं घेतलेलें काम विशेष उत्साहानें करण्याची अधिक उमेद आली. यरूशलेम येथें सिकंदरानें तेथील धर्माध्यक्षाचा बहुमान केला, आणि त्याच्या ह्मणण्याप्रमाणें अनेक विधि केले, ह्यांत कांहीं नवल नाहीं; कारण ज्या ज्या देशांत जावें, त्या त्या देशच्या धर्माधिकाऱ्यांस मनापासून भजावें, आणि त्यांच्या देवतांच्या संतोषार्थ ते सांगतील तसें वर्तावें, असा शिकंदराचा नेहमींचा परिपाठच होता, असें एका ग्रंथकारानें लिहिलें आहे. हा परिपाठ त्यालाच आपोआप सुचलेला होता, किंवा त्याविषयीं आरिस्तातलानें त्यास बोध केला होता, हें कांहीं बरोबर समजत नाहीं. तथापि, हा परिपाठ घालण्याची बुद्धि होण्यास मनुष्यास फार पोक्त विचार असला पाहिजे, हें सांगावयास नको. देश रानटी असो किंवा सुधारलेला असो; त्यांतील लोकांची श्रद्धा त्यांचे धर्माचे ठायीं दृढ असावयाची; आणि त्या धर्मास अनुसरून जो कोणी वर्तेल, त्याविषयीं त्यांचा अभिप्राय चांगला होऊन, ते त्यास अनुकूल व्हावयाचे, किंवा

* हें पुस्तक ख्रीस्ती पवित्र शास्त्रांत आहे.

निदान प्रतिकूल तरी व्हावयाचे नाहींत; ही गोष्ट मनांत धरून शिकंदरबादशाहा परदेशामध्यें वागे; हें त्याच्या चातुर्यास अत्यंत भूषणप्रद होय.

शिकंदरबादशाहा यरूशलेम शहरामध्यें होता तेव्हां सर्व यहूदी लोकांशीं फार चांगल्या रीतीनें वागला. तो, मासिदोनियन लोकांइतके दुसरे कोणतेही लोक चांगले मानीत नसे; परंतु, यहुदी लोक त्यांसारखे आहेत, असें त्यानें स्पष्ट बोलून दाखविलें. आणि जे हक्क त्यांस त्यानें दिले होते, ते ह्यांस दिले. तेणेंकरून त्यांस परमसंतोष झाला. आपणांस जागोजाग जयच मिळत आहेत, अपजयाचें नांव देखील कधीं कानीं पडत नाहीं, त्यापेक्षां आपण कोणी देवावतार आहों, असें शिकंदरास वाटूं लागलें. तें त्याचें मनोगत जाणून यहूदी लोकांतले थोरथोर गृहस्थ त्यास जुपितराचा पुत्र म्हणूं लागले. आरिस्तातलाच्या सुज्ञ शिष्यास असा विलक्षण गर्व व्हावा, हें फार विचित्र दिसतें. परंतु, कोणीं कांहीं केलें तरी मनुष्याचा मूळचा स्वभाव जावयाचा नाहीं, हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

यरूशिलेमामध्यें बरेच दिवस घालविल्यावर, शिकंदर बादशाहा मालसमारिओतिस ह्या ठिकाणीं गेला. तो तेथें स्वस्थ राहिला नाहीं. थोडीशी विश्रांति घेतल्यावर तो लागलाच, अलेक्झांद्रिया शहराचें काम कोठपर्यंत आलें आहे, हें पाहावयास गेला. तें काम त्यानें आपल्या इच्छेप्रमाणें फार जलदीनें शेवटास नेलें; आणि त्या शहरामध्यें जे कोणी जाऊन राहातील, त्यांस अमुक अमुक प्रकारचे विशेष हक्क व विशेष सोई प्राप्त होतील, असें प्रसिद्ध केलें. त्यावरून कितीएक लोक तेथें जाऊन राहिले. शिवाय, त्यानें किती

एक मासिदोनियन लोक तेथें स्थायीक होण्यास पाठवून दिले. नंतर तो मेंफिस येथें पुन: गेला. इतक्यांत हिंवाळा लागला, तो त्यानें तेथेंच घालविला. तो त्या ठिकाणीं स्वस्थ मजा मारीत राहिला नव्हता. त्यानें नुकताच ईजिप्त देश घेतला होता, त्याजवर आपला अमल कोणत्या रीतीनें चालवावा, ह्या गोष्टीचा विचार करून, त्याप्रमाणें सर्व योजना केली. ती अशी :—त्यानें त्या देशाचे कांहीं लहान लहान भाग करून, त्यांतील प्रत्येकावर एक एक मासिदोनियन सुभेदार नेमिला, आणि त्या सर्वांनीं प्रत्येक महत्त्वाची गोष्ट खुद्द आपणास विचारून करावी, इतर कोणाचा हुकूम ऐकूं नये, असें ठरविलें. ह्या सुभेदारांकडे मुख्यत्वें लष्कराचें आधिपत्य होतें. त्यानें देशांतील मुलकी अधिकार दोलोस्पिस ह्या नांवाच्या एका मोठ्या इजिप्शियन मनुष्याकडे सोंपिला. ह्याचें कारण असें कीं, कोणत्याही देशांतील मुलकी काम चालविण्यास अधिकाऱ्याला त्या देशांतील लोकांच्या रीतीभातींचें व समजुतींचें ज्ञान फार चांगलें असलें पाहिजे, तें जर त्याला नसलें, तर त्याचे हातून मोठमोठे अन्याय घडतात; आणि हें ज्ञान, परकीय लोकांनीं कितीही जरी प्रयत्न केले, तरी त्यांस व्हावें तसें प्राप्त होत नाहीं; हें त्यास पक्कें ठाऊक होतें. हा विचार इतक्या प्राचीन काळीं शिकंदर बादशाहाच्या मनांत आलेला असून व त्याविषयीं आजपावेतों इतकी चर्चा झालेली असून, तो कितीएक अर्वाचीन राज्यांस ग्राह्य वाटत नाहीं, ह्याचें मोठें नवल वाटतें. असो.

# भाग चवथा.

मागच्या भागांत सांगितल्याप्रमाणें ईजिप्त देशाची व्यवस्था लाविल्यावर, शिकंदराचें मन दारयसाकडे वळलें. तो आपल्या सैन्याची पुनः सर्व सिद्धता करून, पालेस्तैन प्रांतांतून, आपल्या शत्रूच्या पाठीमागें लागण्यास निघाला. इतक्यांत, सीऱ्या आणि पालेस्तैन ह्या देशांवर आंद्रोमाकस म्हणून जो एक आपला विश्वासू मित्र त्यानें सुभेदार नेमिला होता, त्यास, सामारिआ शहरच्या लोकांनीं दंगा करून, त्याचे घरास आग लावून ठार मारिलें, असें वाईट वर्तमान त्यास समजलें. तेणेंकरून त्यास त्या लोकांचा फार राग आला, आणि त्या कृत्यांत ज्यांचें ज्यांचें अंग होतें असें दिसलें, त्यांस त्यानें ठार मारविलें; ज्यांवर पुरता पुरावा झाला नाहीं त्यांस देशपार केलें; आणि ह्यांचे जागीं मासिदोनियन लोकांकडून वस्ती करविली. हें प्रकरण आटपत होतें इतक्यांत, दारयसाची बायको जी पाडाव केलेल्या लोकांत स्वारीबरोबर होती ती मरण पावली. हें वर्त्तमान कानीं पडतांच, शिकंदर, दारयराची मातुश्री सिसिग्यांबिस हिच्या तंबूंत गेला. तेथें राणीचें प्रेत मध्यें पडलें आहे, तिची सासू त्याजपाशीं आक्रोश करीत आहे, इतर आप्त जनांच्या नेत्रांतून खळखळां अश्रुधारा वाहात आहेत, आणि, दारयसाचा अल्पवयस्क मुलगा, झालें आहे काय, माणसें रडतात कां, आणि आपणावर केवढें संकट आलें आहे, हें कांहीं एक न समजतां त्या सर्वांकडे भिरीभिरी पाहात, गरीब बिचारा दूर एका कोंपऱ्यांत बसला आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें. तेणेंकरून त्याला फार वाईट वाटलें; आणि

त्यांत त्या मुलाकडे पाहून तर खरोखर त्याचा कंठ दाटून आला. त्यानें त्या लेंकरास जवळ घेऊन, त्या दुःखित मनुष्यांचें सांत्वन केलें. आधींच परवशता, आणि त्यांत प्रिय राज्ञीचें मरण, तेव्हां त्यांच्या दुःखास पार नाहींसा झाला. तरी, दुःखांत सुख एवढें होतें कीं, शिकंदर त्यांजवर फार लोभ करीत असे. त्यानें, तिच्या पदवीस योग्य, अशा रीतीनें तिची प्रेतक्रिया करविली, आणि तत्संबंधीं सर्व खर्च आपल्या खजीन्यांतून देवविला.

ह्या गडबडीमध्यें दारयसाच्या माणसांपैकीं एक खोजा डोळा चुकवून पळून गेला. तो त्यास भेटला तेव्हां त्यानें त्याला प्रथमतः त्याच्या राणीच्या मरणाचें वर्त्तमान सांगितलें. तें ऐकून दारयसास फार वाईट वाटलें. तो दुःखाचा पहिला हुंदका गेल्यावर, त्यानें त्या खोजास एके बाजूस काढून आणा शपथा घालून असें विचारिलें कीं, "अगदीं अखेरपर्यंत माझ्या राणीच्या पातिव्रत्याचा भंग नाहीं ना झाला?" त्यावर त्या खोजानें उत्तर दिलें, "महाराज, त्याविषयीं शंका धरूं नये. शिकंदरासारखा नीतिमान पुरुष ह्या भूमंडळावर दुसरा कोणी व्हावयाचा नाहीं. त्यानें आपल्या राणीसाहेबांविषयीं पापवासना कधीं मनांत सुद्धां आणिली नाहीं; मग पापदृष्टीनें त्यांजकडे पाहण्याची वार्त्ता कशास पाहिजे? भलभलत्या कल्पना घेऊन आपण आपल्या पवित्र राणीसाहेबांचा अपमान त्यांच्या पश्चात् कां करितां बरें! आणि, ह्या दुःखामध्यें अशा व्यर्थ कल्पनांनीं आपण आपल्या मनास कां त्रासवितां बरें! शिकंदर आपला शत्रु खरा; तरी, तो असा नीतिमान आहे, ही गोष्ट आपल्या सांत्वनास फार चांगली आहे, हें खचीत समजावें. त्याचें जें शौर्य आपणांस कळून

आलें आहे, त्यापेक्षां त्याचें नीतिमानपण आपल्या कुटुंबास अधिक समजलें आहे. महाराज, शिकंदरबादशाहा हा मोठा शाहणा, शूर, मितव्ययी, निर्व्यसनी सदाचरणशील आणि उदार आहे, हें मी शपथपूर्वक आपणांस सांगतों." हें ऐकतांच दारयसाचे ठायीं शिकंदराविषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न झाली. आणि तो लागलाच आपल्या कचेरीमध्यें जाऊन उभा राहून, हात वर करून डोळे झांकून म्हणाला, "परमेश्वरा, हें माझें राज्य माझ्या वंशजांस प्राप्त होऊन त्यांनीं तें उपभोगावें, अशी माझी फार इच्छा आहे, ती तूं पूर्ण कर. परंतु, हे सर्वव्यापका, जर तुझी अशी इच्छा नसली, आणि हें राज्य आमच्या वंशाच्या हातून जाऊन दुसऱ्यास मिळावें असा जर तुझा संकेत असला, तर ह्या माझ्या सिंहासनास शिकंदर बादशाहाखेरीज दुसऱ्या कोणाचा पाय न लागावा, असें तूं कर." पहा, वास्तविक ह्मटलें असतां शिकंदर हा त्याचा शत्रु होता. परंतु, त्याचे ठायीं सद्गुण असल्यामुळें दारयसाचे मुखांतून असे उद्गार निघाले. सद्गुणांच्या योगानें शत्रु असतात ते मित्र होतात, असें जें मोठमोठ्या कवींनीं ह्मटलें आहे, तें खरें आहे.

इकडे शिकंदराची स्वारी मोठ्या तयारीनें निघाली, ती सर्व सैन्यासहवर्तमान थाप्साकस येथें येऊन, तेथें जो युफ्रेतीस नदीचा पूल लागला त्यावरून पार गेली. नंतर त्यानें आपला कुचाचा रोंख तैग्रिस नदीकडे वळविला; कारण, दारयस आपणास त्या सुमारास भेटावा, असा त्याचा अजमास झाला होता. तिकडे दारयस, आपलें तहाचें बोलणें शिकंदर कबूल करीत नाहीं असें खचीत समजून, त्याशीं सामना करण्याच्या तयारीस लागला. तो प्रथम बाबुलोन

शहरीं आला; आणि ग्रानिकसच्या लढाईच्या वेळीं त्याजपाशीं जितकें सैन्य होतें, त्याच्या अर्धा इतकें लष्कर त्यानें तेथें जमविलें. नंतर तो निनव्ही शहराकडे चालला. त्याच्या सेनेनें मेसोपोतामियाचीं सगळीं मैदानें भरून गेलीं. तों, शिकंदर जवळ जवळ येत आहे, असें त्यास समजलें. ह्मणून त्यानें आपल्या स्वारांचा सरदार, बरोबर १००० निवडक स्वार देऊन, त्या दिशेकडे पाठविला; आणि निनव्ही येथील सुभेदार माझिअस ह्यासही कांहीं लोकांसहवर्तमान तिकडे जाण्याविषयीं आज्ञा केली. त्या दोघांस त्यानें निक्षून असें सांगितलें कीं, शिकंदरास मागें हटविण्याचें काम तुमचे हातून झालें तर फारच उत्तम; पण जर तें नच होई, तर, निदान त्याच्या यावयाच्या मार्गांतला दाणा, चारापाणी वगैरे उपजीविकेचे पदार्थ अगदीं नाहींतसे करून टाका, ह्मणजे पुरे. ही आज्ञा शिरसामान्य करून ते दोघे मोठ्या ईर्ष्येनें दारयसाचा निरोप घेऊन निघाले.

शिकंदराची स्वारी, एकेएके दिवसांत आठआठ दाहादाहा कोसांची मजल करीत, तैग्रीस नदीच्या कांठीं प्राप्त झाली. त्या नदीस लहान लहान पुष्कळ नद्या मिळत असल्यामुळें, तिचा प्रवाह फार मोठा वाहात असतो; आणि तिच्या पाण्यास ओढ इतकी असते कीं, तिच्या सपाऱ्याबरोबर मोठमोठे दगड देखील वाहून जातात. तिला असा विलक्षण वेग असल्यावरूनच तीस इराणी भाषेमध्यें तैग्रीस ह्मणजे बाण असें नांव पडलें आहे. त्या नदीस पाणी कितीही थोडें असलें, तरी तिजमधून जाणाऱ्याच्या पायांखालची रेती सटासट निघून जाऊन, त्यास आपला जीव संभाळतां संभाळतां पुरे पुरे होतें. ही गोष्ट शिकंदरास ठाऊक होती;

आणि त्या वेळीं तिला पाणी साधारण पुरुषाच्या कंबरेच्या वर येई इतकें होतें, तरी तो तिळभर देखील गडबडला नाहीं. त्यानें प्रथमतः आपण स्वतः पायीं पुढें होऊन, पाणी कोठें किती आहे, ह्याचा ठाव काढिला, आणि क्रमानें आपलें सैन्य आपणामागें बोलाविलें. तेव्हां नदींत पाय ठेवण्यास पुष्कळांस भय वाटलें. परंतु, हुकुमापुढें कोणाचें कांहीं चालावयाचें नाहीं हें जाणून, निमूटपणें आपापलें सामान डोक्यांवर घेऊन, नदीमध्यें एकएक पाऊल पुढें टाकण्याचा क्रम त्यांनीं चालविला. त्याचा हुकूम त्या लोकांस मानावा लागला, पण नदीस त्याचें काय? तिचा प्रवाह एकसारखा झपाट्यानें वाहातच होता. शिकंदराच्या लोकांनीं प्रथम कांहीं पावलांपर्यंत जेमतेम टिकाव धरिला. परंतु, पुढें त्यांच्या पायांखालची वाळू निसटून जाऊं लागून, ते लटलटां कांपूं लागले. कितीएक असामी चांगले जोरदार होते, ते तसेच हळूहळू पुढें चालले. परंतु, बाकीच्यांची अगदीं गाळण झाली. ते धडाधड नदींत पडले; आणि त्यांचीं ओझींपाझीं वाहून जाऊं लागलीं. तीं धरण्याविषयीं जी धडपड त्यांनीं केली, त्या धडपडीच्या योगानेंच त्यांचे फार हाल झाले. पलीकडच्या किनाऱ्यावर शिकंदर बादशाहा उभा राहून मोठ्यांनीं ओरडून त्यांस सांगत असे कीं, 'तुमचें इतर सर्व गेलें तरी जाऊं द्या, पण तेवढीं हत्यारें घेऊन इकडे या म्हणजे पुरे.' परंतु, त्यांनीं आपसांत एवढा गोंगाट केला होता कीं, त्या बादशाहाचा एक शब्द देखील त्यांस ऐकूं आला नाहीं. शेवटीं, ते वाहात वाहात जाऊन खालीं एका थोड्या पाण्याच्या उतारावर पोहोंचले; आणि मग त्यांतून ती नदी उतरून आलीकडे आले. त्यांचें सामानसुमान

वाहात गेलें तें गेलेंच! शत्रूसमोर उभें राहून युद्ध करणें हें तर फार कठीण आहेच; परंतु, तो प्रसंग प्राप्त होण्यापूर्वीं मार्गादिकांमध्यें जीं अशीं आकस्मिक संकटें उद्भवतात, तीं, त्या युद्धप्रसंगापेक्षां अधिक त्रासप्रद होतात, हें फार वाईट आहे. रणामध्यें घाय सोसल्यानें जें दुःख होतें, तें तज्जन्य यशाच्या योगानें कांहीं नाहींसें होतें; पण, हे मार्गादिकांतले हाल जमेंत ना खर्चांत, असें असल्यामुळें ते विशेष दुःसह वाटतात. असो.

शिकंदराचें सैन्य कसेंबसें तैग्रीस नदी उतरलें, आणि आलीकडे येऊन राहिलें. लोक श्रमानें अगदीं थकून गेले होते, म्हणून तेथें दोन दिवस मुक्काम केला होता. त्या दुसऱ्या दिवशीं पौर्णिमा पडली असून, त्या रात्रीं सुमारें नऊ दाहा वाजण्याच्या सुमारास चंद्रास ग्रहण लागलें. ग्रहण लागलेला चंद्राचा भाग काळा तांबडा दिसूं लागतांच, मासिदोनियन लोकांच्या मनांत असें आलें कीं, आपले हातून कांहीं मोठें पातक घडल्यामुळें परमेश्वरानें आपला क्रोध ह्या चंद्राच्या स्वरूपविकृतीनें प्रकट केला आहे, आतां आपलें काय होईल कोण जाणे. असें वेड डोक्यांत शिरून देवभोळे आडाणी लोक एकदा बिथरले, म्हणजे ते काय करतील आणि काय बोलतील ह्याचा नेम नाहीं; असें जें शिकंदर नुसतें ऐकत होता, त्याची प्रतीति त्यास ह्या वेळीं चांगली आली. त्यांनीं त्याजवर शिव्याशापांचा जो वर्षाव केला, त्याचें वर्णन सुद्धां करवत नाहीं. ते उघडपणें बंड करून उठण्याविषयीं कुजबुजूं लागले. तेव्हां, ह्यांची समजूत कशी पाडावी आणि हें विघ्न कसें टाळावें, ह्याविषयीं शिकंदरास मोठा विचार पडला. इतक्यांत त्याला असें आठवलें कीं, इजिप्शियन जोश्यांवर

आपल्या मासिदोनियन लोकांचा चांगला विश्वास आहे, ह्यास्तव त्यांजकडून ह्या गुह्याचा अर्थ समर्पक रीतीनें सांगविला म्हणजे, हे भ्रांतीनें वेडे झालेले लोक ताळ्यावर येऊन आपल्या इष्ट कार्यास लागतील. त्याप्रमाणें त्या जोश्यांस आपल्या तंबूंत बोलावून आणून त्यांस त्या गुह्याचीं इष्टानिष्ट फळें सर्व मंडळीस ऐकविण्याविषयीं आज्ञा केली. त्यांस ग्रहण लागण्याचीं खरीं कारणें माहीत होतीं; परंतु तीं आपण सांगत बसलों असतां, अशा अल्प काळांत ह्या अडाणी लोकांस समजावयाचीं नाहींत, असें मनांत आणून, आणि राजाच्या मर्जीचा रोंख पाहून असें सांगितलें कीं, "सूर्य हा विद्यमानीं मासिदोनियन लोकांच्या पक्षाचा आहे, आणि चंद्र हा इराणी लोकांच्या पक्षाचा आहे. चंद्रास ग्रहण लागलें आहे, ह्यांत आपल्या पक्षास अनिष्ट कांहीं नाहीं. तर, इराणी लोकांचा आतां लवकरच पराभव होणार ह्याचें हें सूचक चिन्ह आहे, हें खचीत समजावें." हें ऐकिल्यावर मासिदोनियन लोकांच्या मनांतली भीति उडाली. आणि ते पहिल्याप्रमाणें धैर्य धरून युद्धाच्या तयारीस लागले.

ह्याप्रमाणें लोकांची ईर्षा पुन्हा जागृत होतांच शिकंदर त्यांस घेऊन पुढें निघाला. इतक्यांत, दारयसाचें सैन्य अगदीं जवळ आलें आहे, असें हेरांनीं त्यास येऊन सांगितलें. तेव्हां त्यानें लागलेंच आपलें सैन्य युद्धास सज्ज केलें. शत्रु पुढें येतो केव्हां आणि आपण त्याजवर झडप घालतों केव्हां, असें त्यांस झालें होतें. परंतु, हे जे लोक आले म्हणून कळलें, ते दारयसानें मार्ग उद्ध्वस्त करण्यास पाठविलेले केवळ एक हजार लोक होते, आणि खुद्द त्याची स्वारी त्या ठिकाणाच्या मागें दहाबारा कोसांवर होती, अशी पक्की

खबर त्यास समजल्यावरून, त्यानें मार्गक्रमणाचा आपला पहिला पाठ पुन्हा धरिला.

ह्याच वेळाच्या सुमारास, किंवा कांहीं वेळ ह्याच्या आधीं दारयसाचीं जीं पत्रें शिकंदराच्या सैन्यांतील ग्रीक लोकांस आलीं होतीं, तीं पकडलीं. त्यांत मोठमोठ्या बक्षिसांची आशा दाखवून शिकंदरास ठार मारण्याविषयीं किंवा निदान धरून देण्याविषयीं, मोठ्या आग्रहानें त्यानें त्यांस लिहिलें होतें. दारयसासारख्या राजास अशीं लाजिरवाण्या युक्तीचीं पत्रें लिहिण्यास लाज वाटावयाची होती. परंतु, विनाशकाल यावयाचा असला, म्हणजे विपरीत बुद्धि व्हावयाची, असें जें म्हणतात तें दारयसास झालें. तीं पत्रें पाहून शिकंदरास फार क्रोध आला; आणि तीं आपल्या सर्व सैन्यास उघड वाचून दाखवावीं असें त्याच्या मनांत आलें. तेव्हां पार्मिनिओ ह्यानें त्यास असें सुचविलें कीं, आपल्या लष्करांतल्या ग्रीक लोकांच्या अंतःकरणांत जरी आपणांविषयीं पूर्ण पूज्य बुद्धि आहे, तरी हीं पत्रें ऐकून बक्षिसाच्या लोभानें कोणाच्या बुद्धीस काय विपर्यास होईल हें सांगवत नाहीं, ह्याकरितां हीं पत्रें अशींच गुप्त ठेवावीं हें बरें. ही सूचना शिकंदरास योग्य वाटली, आणि त्यानें तीं पत्रें कोणास दाखविलीं नाहींत.

दारयसानें शिकंदराशीं तहाचें बोलणें ह्या पूर्वीं दोन वेळां लाविलें होतें, आणि दोन्ही वेळां शिकंदरानें तें नाकारिलें होतें, हें मागें लिहिलेंच आहे. ह्यापुढें दारयसानें त्याविषयीं तोंडाबाहेर अक्षर काढावें, असें कांहीं राहिलें नव्हतें. परंतु, त्यानें आपल्या मुलांमाणसांस ज्यापेक्षां इतक्या ममतेनें वागविलें आहे, त्यापेक्षां तो फार दयाळू आणि कोंवळ्या मनाचा असावा, असें अनुमान करून, दारयसानें

आपले कडील दहा वकील तहाचें बोलणें लावण्यास त्याजकडे धाडिले. त्यांजबरोबर त्यानें जें पत्र दिलें होतें, त्यांत असें लिहिलें होतें कीं, "आपण आमच्या कुटुंबाचें चांगलें संरक्षण करून, त्याची उत्तम मानमान्यता ठेविली, ह्याबद्दल आह्मी आपले फार आभारी आहों. तहाचीं कलमें पूर्वीं जीं आह्मीं लिहिलीं होतीं, त्यांपेक्षां आतांचीं कलमें आपणांस फार फायदेशीर आहेत. ह्यास्तव आपण हीं कबूल करावीं. ह्या कलमांवरून हेलिस्पांत आणि युफ्रेतीस ह्यांच्या मधला सर्व मुलूख आपणांस मिळणार आहे." त्याचें उत्तर शिकंदरानें असें लिहिलें कीं "ज्या राजांचें एकमेकांशीं युद्ध चाललें आहे, त्यांनीं एकमेकांचे आभार मानणें ह्यांत कांहीं अर्थ नाहीं. तुमच्या कुटुंबाशीं मी जो इतक्या ममतेनें आणि दयालुत्वानें वागलों, तो तुह्मांला भिऊन किंवा तुह्मांला संतुष्ट करण्याकरितां वागलों, असें तुह्मीं समजूं नये. मला तें आचरण संतोषप्रद वाटलें ह्मणून मीं तें केलें; दुसरें कांहीं नाहीं. दुःखितांस दुखविणें हें महत्पाप आहे, असें मी समजतों, आणि माझे हातून तें कधीं घडावयाचें नाहीं. मी पाडाव केलेल्या लोकांवर अथवा बायकांवर आपला राग काढणार नाहीं. हातांत शस्त्रें घेऊन जे कोणी युद्धास सिद्ध असतील, त्यांस मात्र मी आपला पराक्रम दाखवीन. तुह्मी जर मजपाशीं निष्कपट रीतीनें वागत असतां, तर तुमच्या बोलण्याचा विचार मीं कदाचित् केला असता. परंतु, तुमचे दाखवायाचे दांत आणि खायाचे दांत वेगळे वेगळे आहेत, हें मला पक्कें समजलें आहे. तुह्मी बाह्यात्कारें माझीं इतकीं आर्जवें करितां, आणि आंतून, माझ्या सैन्यांतील लोकांस, बक्षिसें देऊं करून, मला मारावयास सांगतां, हें मला ठाऊक

नाहीं, असें तुह्मी समजतां काय? समजत असाल, तर तें केवळ अज्ञानमूलक आहे. तुमचें आचरण असें कपटीपणाचें आहे, ह्मणून, होईल तितका उद्योग करून तुमच्या पाठीमागें लागण्याचा निश्चय मीं केला आहे. मी तुह्मांस आतां राजा समजत नाहीं; तर, कैदी किंवा मारेकरी समजतों. जगास जसे दोन सूर्य सोसावयाचे नाहींत, तसे दोन सार्वभौम राजेही आवडावयाचे नाहींत. तुह्मी दांतीं तृण धरून आज मला शरण या, किंवा उद्यां मजशीं युद्ध करण्यास सिद्ध व्हा, उगाच मनांत मांडे खाऊन वेळ घालवूं नका." हें पत्र पाहून, तहाविषयीं दारयसाची निराशा झाली; आणि लढतां लढतां प्रारब्धानें होईल तें होईल, असें समजून तो युद्धाच्या उद्योगास लागला.

दारयस भयभीत झाला आहे, त्यास आपण सहज जिंकून टाकूं, अशा भरंवशानें शिकंदरबादशाहा, कुच करीत करीत ४०००० पायदळ आणि ८००० स्वार इतक्या सैन्यासहवर्तमान, आरबेला नामक गांवानजीक प्राप्त झाला. तेथें मोठें थोरलें एक मैदान होतें, त्यामध्यें त्याचें लष्कर उतरलें. दारयसही तिकडून त्या ठिकाणाजवळच येऊन उतरला. त्याजबरोबर ६००००० पायदळ, आणि ४०००० स्वार इतकें सैन्य होतें! संख्येच्या मानानें पाहिलें असतां, शिकंदराची फौज दारयसाच्या फौजे पुढें अगदीं कांहीं नाहीं, अशी वाटते. परंतु, दारयसाच्या फौजेमध्यें सगळें गबाळी वुणगें भरलें होतें; ह्मणजे, त्यामध्यें रणशूर ह्मणण्यासारखे पुरुष फार थोडे होते. आणि शिकंदराच्या फौजेमध्यें खोगिरभरतीचे असे लोक मुळींच नव्हते. त्याचा प्रत्येक शिपाई युद्धविद्येमध्यें प्रवीण, शस्त्रास्त्रांनीं युक्त, आणि राजकार्यार्थ

प्राण देण्यास सिद्ध असा होता. ह्यावरून ह्या दोन सेनांच्या मध्यें काय अंतर होतें हें दिसून येईल.

ह्या दोन सैन्यांच्या तळांमध्यें अंतर सुमारें दोन अडीच कोसांचें होतें. दारयसानें आपल्या लष्करास हालचाल करण्यास फार चांगली सपाट जागा साधिली होती. तशी शिकंदराच्या लष्करास नव्हती. त्याच्या आजूबाजूनें टेंकड्याटुकड्या होत्या; तरी तो मोठ्या सावधगिरीनें तेथें राहिला होता. तेणेंकरून त्याच्या लोकांस शत्रूचें कांहीं एक भय वाटत नसे. दारयस अगदीं पड घेऊन राहिला होता, तो आपण होऊन युद्धास आरंभ करील असें दिसेना. तेव्हां, आपण होऊन त्याचे अंगावर चालून जावें, किंवा त्याचे प्रमाणेंच स्वस्थ पडून राहावें, हा शिकंदरास मोठा विचार पडला. त्यानें आपले सगळे सरदार बोलावून आणून त्यांस त्याविषयीं मसलत विचारिली. त्या वेळीं अनेकांचीं अनेक मतें पडलीं. पार्मिनिओ हा त्याविषयीं बोलत असतां असें ह्मणाला कीं, "शत्रूचें सैन्य फार मोठें आहे; ह्यास्तव, रात्रीं अंधेरांत त्याजवर एकदम हल्ला केला असतां त्यांचा पराभव होण्यास उशीर लागावयाचा नाहीं." ही सूचना शिकंदरास अगदीं आवडली नाहीं. तो लागलाच त्याजकडे वळून त्यास बोलला, "अरे, पार्मिनिओ, तूं मला जय चोरून मिळवायास सांगतोस काय ? छिः! छिः! छिः! असे शब्द तोंडांतून पुन्हां काढूं नको! जय चोरणें हें मला शिकंदराला शोभावयाचें नाहीं! मी ढवळ्या दिवसा उघड समर करून दारयसावर जय मिळवीन, हें खचीत लक्षांत ठेव!" ह्याला ह्मणावें खरा शूर आणि खरा योद्धा! खरोखर पराक्रमी पुरुषांचीं मनें अशींच थोर असतात. अर्धमेला झालेल्या

शत्रूची मान तरवारीनें कापण्याविषयीं बहिरामानें अकबरास एके वेळीं सांगितलें असतां, त्यानें त्यास अशाच प्रकारचें उत्तर दिल्याविषयीं इतिहासांतरी लिहिलें आहे.

अशा प्रकारें पुष्कळ वाटाघाट झाल्यावर, शत्रूवर उद्यां दिवस उगवल्या बरोबर आपण होऊन हल्ला करावयाचा, असा विचार शिकंदरानें ठरविला, आणि सर्व सरदारांस आपापल्या ठिकाणीं जावयास सांगितलें. हें इतकें आटो-पण्यास बरीच रात्र झाली. सरदार लोक, आपापल्या लोकांस सूर्योदयापूर्वीं सिद्ध असण्याविषयीं हुकूम देऊन, आपापल्या तंबूंत जाऊन निजले. पाहांट झाली. आज्ञे प्रमाणें पायदळ घोडे स्वार वगैरे सर्व सैन्य कडीकोट तयारी करून उभें राहिलें. राजा उठून बाहेर येतो केव्हां, आणि कुच करण्याची परवानगी आपणांस देतो केव्हां, असें त्यांस झालें. वाटपाहण्यामध्यें एक एक घटका जातां जातां मोठें उजाडलें, तरी शिकंदर बाहेर आला नाहीं, हें पाहून सर्व सैन्यास मोठें आश्चर्य वाटलें. शेवटीं, पार्मिनिओ हा त्याच्या तंबूमध्यें गेला, आणि त्यानें त्यास उठविलें. राजा उठून उभा राहिल्यावर तो त्यास ह्मणाला, "महाराज, एवढ्या प्रबळ शत्रूवर हल्ला करण्याची एवढी कडीकोट तयारी झालेली असून, अशा आणीबाणीच्या प्रसंगीं आपणांस गाढमूढ झोंप कशी आली!" त्यास शिकंदरानें उत्तर दिलें, "अरे, शत्रु तसाच मोठा असता, आणि त्याजवर जय प्राप्त होईल कीं न होईल ही शंका असती, तर काळजी लागून झोंप न येती. परंतु, हा दारयस आपण होऊन आमच्या तडाक्यांत सहज सांपडण्याजोगा आयता पुढें पुढें येत आहे, आणि तो अगदीं बलहीन झाला आहे, हें आह्मांस

ठाऊक आहे. मग आह्मांस गाढमूढ झोंप न लागेल तर काय होईल!" ह्यावरून जयप्राप्तीविषयींचा भरंवसा शिकंदरास किती होता, ह्याचें सहज अनुमान करितां येतें.

इकडून शिकंदराची स्वारी हल्ला करण्यास निघाली, हें वर्त्तमान तिकडे दारयसास कांहीं वेळापूर्वीं कळून, तोही आपलें सैन्य सज्ज करून त्याशीं युद्ध करण्यास उभा राहिला. त्याच्या अग्रभागीं २०० सखड्ग रथ होते; ह्मणजे त्यांस तरवारा वगैरे शस्त्रें अशा रीतीनें बांधिलेलीं होतीं कीं, ते रथ जिकडे जिकडे जावे तिकडे तिकडे त्या शस्त्रांनीं सैन्यांचा संहार करावा; शिवाय त्या पहिल्या ओळीमध्यें १५ हत्ती होते; त्या ओळीच्या मध्यभागीं दारयस रथामध्यें बसला होता. त्याचे मागें जवळच त्याचें पायदळ आणि त्याचे घोडेस्वार हीं होतीं. त्याचा विचार पहिल्यापासून असा होता कीं, आपल्या मोठ्या सैन्यानें शिकंदराच्या अल्प सेनेस एकदम चोंहींकडून वेढून टाकून जेरीस आणावें. हा त्याचा बेत शिकंदरास समजला होता.

शिकंदरानें आपल्या सैन्याचा व्यूह कांहीं वेगळ्या प्रकारें रचिला होता. त्यानें आपले तिरंदाज, गोफणगुंडे नेमानें मारणारे, आणि बर्चीवाले असे लोक अग्रभागीं उभे केले होते; ह्याचा हेतु असा होता कीं, त्यांनीं आपल्या तिरांचा, दगडांचा आणि बर्चींचा वर्षाव त्या खड्गरथांच्या घोड्यांवर करून त्यांस मागें पिटाळून लावावें. त्याचे मागें त्यानें आपलें पायदळ आणि घोडेस्वार हीं, डाव्या आणि उजव्या अशा दोन रांगांनीं उभीं करून, नेहमींच्या परिपाठाप्रमाणें उजवीकडच्यांचें आधिपत्य आपणाकडे घेतलें, आणि डावी-कडच्यांचें स्वामित्व पार्मिनिओ ह्यास दिलें. थोडेसे लोक

छावणीच्या ठिकाणीं ठेविले होते. त्यांच्या ताब्यामध्यें दारयसाची आई आणि त्याचीं इतर मुलेंमाणसें ठेविलीं होतीं.

दोन्ही सैन्यें अगदीं सन्निध येतांच युद्धास आरंभ झाला. प्रथमतः दारयसानें आपल्या सैन्याच्या डावीकडच्या टोळींतल्या घोडेस्वारांकडून मासिदोनियन लोकांवर हल्ला करविला. त्यांशीं टक्कर देण्यास शिकंदरानें आपला मेनिदासनामा एक सरदार, बरोबर बरेच स्वार देऊन पाठविला. तो पुढें चालूं लागला इतक्यांत शिकंदरास असें वाटलें कीं, हे गेलेले स्वार फार थोडे आहेत, ह्यांच्यानें इराणी लोकांपुढें टिकाव धरवणार नाहीं, ह्मणून लगेच त्यानें आरिताज ह्या सरदाराबरोबर दुसरे पुष्कळ स्वार त्यांच्या साह्यास पाठविले. ते सगळे एकदम जाऊन जेव्हां दारयसाच्या स्वारांवर पडले, तेव्हां त्यांचें धैर्य अगदीं नाहींसें होऊन ते दशदिशा पळत सुटले. नंतर इराणी सैन्याचे खड्गरथ शिकंदराच्या सैन्यावर धांवले. तेव्हां मासिदोनियन लोकांनीं आपल्या बाणांनीं, दगडांनीं, आणि बर्च्यांनीं, त्यांच्या घोड्यांस अतिशयित घायाळ करून, मोठ्या आरडाओरडीनें आणि आपल्या ढालतरवारींच्या खडखडखड शब्दानें इतकें घाबरवून सोडिलें कीं, ते शिकंदराच्या सैन्यांत न घुसतां, उलटे दारयसाच्या लष्करामध्यें भरधांव पळत निघाले. त्यांच्या योगानें त्यांचा फार नाश झाला. जी युक्ति शत्रूच्या नाशार्थ काढिली होती, तिच्या पायीं आपली एवढी हानि झाली, असें पाहून दारयसास फार वाईट वाटलें. तरी तें त्यानें बाहेर दाखविलें नाहीं.

आपलें पाऊल पुढें पडलें आहे, आणि शत्रु मागें हटत आहे, असें पाहून मासिदोनियन लोकांस विशेष स्फुरण चढलें,

आणि ते एकदम मोठ्या आवेशानें पुढें सरसावले; आणि आतां ही संधी घालविली असतां आपणांस आपले शत्रु एका क्षणांत ग्रासून टाकितील, असें मनांत आणून, मोठ्या वेगानें तिकडून इराणी लोक पुढें आले. त्यांबरोबर उभयपक्षांचे राजेही तेथें प्राप्त झाले. दोहीं कडचे वीर हातघाईस येऊन मोठया आवेशानें लढूं लागले. शिकंदर बादशाहा घोड्यावर बसला होता, आणि दारयस रथारूढ झालेला होता. दोघे आपापल्या पक्षांच्या वीरांच्या पाठी थापटून त्यांस उत्तेजन देत होते; आणि ते, आपल्या प्रभूस संतुष्ट करण्याकरितां आणि स्वदेशाच्या यशोरक्षणाकरितां, जीवांकडे न पाहतां, मोठ्या आवेशानें झगडत होते. तो युद्धप्रसंग खरोखर फार वर्णनीय झाला. कांहीं वेळपर्यंत दोन्ही पक्ष समान होते. परंतु शिकंदरानें आपल्या हातांतल्या तरवारीनें, दारयसाच्या अगदीं जवळच्या स्वारास एक मोठा वार केला. तो घायाळ होऊन खालीं पडला तेव्हां, स्वतः दारयसच पतन पावला, असें दोहीं कडच्या सैन्यांस भासलें. मग काय पुसावें! शिकंदराच्या सैन्यामध्यें विजयध्वनि दुमदुमूं लागला, आणि इराणी सैन्य पळूं लागून त्यामध्यें एकच हाहाकार झाला! कोणीं ग्रंथकारांनीं असें लिहिलें आहे कीं, आपल्या सैन्याची अशी दुर्दशा दृष्टीस पडतांच दारयसानें आपली तरवार बाहेर काढून तेथच्या तेथें आत्महत्या करून घेण्याचा विचार मनांत आणिला होता; परंतु, कांहीं अंतरावर, इराणी लोक मोठ्या आवेशानें मासिदोनियन लोकांशीं लढत आहेत असें त्यानें पाहिलें, आणि तेथें त्यास जयप्राप्तीची थोडीशी आशा दिसली; म्हणून त्यानें आपली तरवार पुनः म्यानांत घातली! पहा. शूरास मरण पुरवतें, परंतु पराभव

पुरवत नाहीं, असें म्हणतात तें खरें आहे. वर सांगितलेल्या झटापटींत देखील दारयसाच्या लोकांस यश आलें नाहीं. परंतु, मग युद्ध बंद होऊन, इराणी लोक पुढें आणि मासिदोनियन लोक मागें, अशी धरपळ जिकडे तिकडे चालली. तींत दारयस हा आपल्या रथांत बसून कांहीं लोकांसहवर्तमान समरांगणांतून निघून गेला.

तिकडे पार्मिनिओ कांहीं इराणी सैन्याशीं लढतच होता. इकडे शिकंदरास असा जय प्राप्त झाला, हें त्याला कळलें नव्हतें. एके वेळीं तर मेझिअस ह्यानें त्याजवर इतकी गर्दी केली कीं, त्यानें तावडतोब मनुष्य पाठवून शिकंदराला बोलावून आणिलें म्हणून बरें झालें; नाहीं तर त्या प्रसंगीं तो खचीत प्राणास मुकता. शिकंदरबादशाहा त्या ठिकाणीं यायास आणि दारयसाचा पराभव झाल्याचें वर्तमान मेझिअस ह्यास कळायास एक गांठ पडली. तेणें करून, इराणी पक्षाचे लोक भयभीत होऊन दशदिशा पळून गेले.

ह्याप्रकारें करून, इ० स० पूर्वीं ३३० वे वर्षीं आक्तोबर महिन्यामध्यें, आरबेला येथील प्रचंड युद्धांत शिकंदरबादशाहास जय प्राप्त झाला. दारयस केवळ पराभव पावला. त्याच्या सैन्यापैकीं ३०००० लोक रणांगणीं पतन पावले; ह्यांखेरीज मासिदोनियन विजयी लोकांनीं पाडाव करून नेले ते वेगळेच. शिकंदराचे अवघे १२०० लोक मेले, असें कितीएक ग्रंथकारांनीं लिहिलें आहे. तथापि, ह्या दोहोंपैकीं कोणत्या तरी एका संख्येमध्यें अतिशयोक्ति असली पाहिजे, असें कांहीं विचारी पुरुषांचें मत आहे..

आरबेला येथील युद्धामध्यें पराभव पावल्यावर दारयस तेथून जो निघाला तो लैकस नामक नदीकडे आला. ती

नदी बरीच मोठी होती; परंतु तिजवर पूल बांधिलेला होता, तेणेंकरून त्यास कांहीं अडचण पडली नाहीं. तो कांहीं सैन्यानिशीं पुलावरून पार गेल्यावर, जवळच्या लोकांनीं त्यास असें सुचविलें कीं, तो पूल एकदम पाडून टाकावा, म्हणजे शत्रु मागोमाग येण्याचें भय राहणार नाहीं. त्यावर दारयसानें त्यांस असें उत्तर केलें कीं, "अहो, मजकरितां ज्यांनीं आपलीं शिरें-हातांवर धरिलीं होतीं, ते माझे साह्यकर्ते अद्याप मागें आहेत. ते मजप्रमाणेंच इकडे येण्याच्या मार्गास लागले असतील. अशा वेळीं जर तो पूल मीं पाडविला, तर ते सगळे आयतेच शत्रूच्या हातीं सांपडून प्राणांस मुकतील. मीं आपल्या एकट्याच्या जीवाच्या संरक्षणाकरितां, कृतघ्न होऊन, इतक्यांच्या जीवांवर उठावें, हें योग्य आहे काय? ह्या पुलावरून पार पडून येण्यास मला जितका हक्क होता, तितकाच त्या सर्वांस आहे. ते मजपेक्षां कांहीं कमी नाहींत." नंतर तो घोड्यावर बसून मोठ्या त्वरेनें आरबेला शहरीं आला. आणि तेथून लागलाच मीदिया देशाकडे चालता झाला. तेव्हां त्याबरोबर त्याचे थोडेसे सरदार होते.

पुढें कांहीं दिवसांनीं आरबेला शहर, कांहीं एक श्रम न पडतां, शिकंदराचे हस्तगत झालें. तेथें त्यास दारयसाचा खजीना सांपडला. त्यामध्यें ४०००० तालेंतस् (७७५०००० रुपये) मिळाले. ही रोकड; हिचेखेरीज, जें बहुमोल सामान-सुमान त्याचे हातीं लागलें, तें वेगळेंच. इराणी लोकांचा इतका पैसा त्यास पूर्वीं कोणत्याही ठिकाणीं सांपडला नव्हता. त्याचे मनांत त्या शहरीं कांहीं दिवस राहावयाचें होतें. परंतु, जवळच्या समरांगणामध्यें प्रेतांचे खच पडून, तीं

कुजून, त्यांच्या घाणीपासून तेथें एक भयंकर रोगाची सांत आली. म्हणून तो तेथून लवकर निघाला, आणि बाबुलोन शहराकडे चालला. तो चवथे दिवशीं मेमनिस येथें पोहों-चला. तेथें एका गुहेमध्यें एका झऱ्यांतून शिलाजित वाहात असे, तो चमत्कार त्यानें स्वतः जाऊन पाहिला. बाबुलो-नचें गांवकुसूं बांधितेवेळीं त्याच्या मातीमध्यें तेथलें पुष्कळ शिलाजित नेऊन घातलें होतें, असें सांगतात. तसेंच, तेथें एका झऱ्यांतून विपुल नखतेल वाहात असल्यामुळें त्यानें मोठें एक तळें भरलें होतें, तें पाहून त्याला फार आश्चर्य वाटलें; आणि त्यानें तत्संबंधीं बरीच माहिती तेथच्या लोकांस विचा-रून घेतली. जे खरोखर थोर मनाचे असतात, ते केवढ्या-ही महत्वाच्या कामांत गुंतले असले तरी, सृष्ट चमत्कार पाहण्याविषयीं त्यांची जिज्ञासा जागृत असते. आणि, जरा संधी सांपडली कीं ती ते तृप्त करून घेतात. त्यामध्यें कांहीं एक अलौकिक आनंद आहे. तो अरसिकांस कोठून प्राप्त होणार! असो.

मेझियस आरबेला येथील रणभूमीवरून जो पळत पळत निघाला, तो बाबुलोन येथें येऊन राहिला. तेथें त्याचें कुटुंबही होतें. हा पुरुष मोठा शाहणा आणि फार धूर्त होता. कोणत्या प्रसंगीं कसें वागावें हें त्याला फार चांगलें कळत असे. त्यानें, शिकंदराची स्वारी मोठ्या थाटानें शहराकडे येतांना जेव्हां पाहिली, तेव्हां वेशी उघडिल्या, एकाद्या मोठ्या सणाच्या दिव-साप्रमाणें सर्व रस्ते सुशोभित केले, उंची उंची पोषाक करवून सर्व लोक एकत्र जमविले, आणि तो शहरांत येतांच त्याचें मोठें आदरातिथ्य केलें. तेणेंकरून शिकंदरास फार संतोष झाला. तो आंत आला तेव्हां, तेथच्या किल्ल्याचा सुभेदार बागोफा-

नेस ह्यानें रस्तोरस्तीं फुलें उडविवलीं. त्याच्या होमहवनाकरितां रुप्याचीं होमकुंडें घालविलीं ! नंतर तेथें सर्व गोष्टी त्याच्या मनाप्रमाणें घडल्या. येथेंही त्यास दारयसाचा खजीना सांपडला, तो त्यानें आपल्या बरोबरच्या लोकांस त्यांच्या योग्यतेप्रमाणें वांटून टाकिला. बाबुलोन शहर ह्मणजे मागच्या सर्व शहरांपेक्षां फार मजबूद; तें हस्तगत होण्यास पराकाष्ठेचे श्रम पडावयाचे; असें शिकंदरास फार दिवसांपासून वाटत असून, तें, उगाच सहज मिळालें इतकेंच नव्हे, तर त्यांतील लोकांनीं आपले शक्त्यनुसार उत्साहपूर्वक त्याचा स्वीकार केला, तेव्हां त्यास परम आल्हाद झाला आणि आपण देवावतार आहों असें त्यास वाटूं लागलें, ह्यांत कांहीं नवल नाहीं.

शिकंदरास विद्याभ्यासाची आवड फार असे. तो जेव्हां बाबुलोन शहरांत राहिला होता, तेव्हां तो खालदी ज्योतिष्यांशीं खगोलविद्येसंबंधीं संवाद करीत बसे. त्या लोकांमध्यें मोठमोठे ज्योतिषी फार प्राचीन काळापासून होऊन गेले होते. त्यांनीं खस्थ पदार्थांविषयीं नानाप्रकारचे शोध करून ते लिहून ठेविले होते. ते सर्व शिकंदरानें त्यांस विचारून घेतले : आणि क्यालिस्थिनिस ह्मणून जो एक मनुष्य त्याजबरोबर होता, त्याजकडून ते लिहिवून, त्यांचें पातडें त्यानें आरिस्तातल गुरूकडे पाठवून दिलें. शिकंदर बादशाहा देश जिंकावयाकरितां बाहेर निघाला होता, हें खरें आहे; तथापि, लहानपणीं ज्ञानसंपादनाची जी संवय त्यास आरिस्तातलाच्या सहवासानें लागली होती, ती ह्या प्रौढवयांत देखील तशीचीतशी तरतरीत होती, असें जें ह्या वरील गोष्टीवरून दिसून येतें, तें खरोखर आश्चर्यकारक आहे. द्रव्य-

प्राप्ती हाच काय तो विद्याभ्यासाचा उत्तम परिणाम आहे, असें जे कोणी समजतात, त्यांनीं ह्या गोष्टींचा विचार करावा.

शिकंदर बादशाहा बाबुलोन शहरामध्यें सुमारें चवतीस दिवस राहिला होता. त्या मुदतीमध्यें तो स्वतः नित्याप्रमाणें नेमस्त होता; परंतु, त्याच्या लष्करांतल्या लोकांनीं चैनबाजीची अगदीं गर्दी उडवून दिली. ते मोठ मोठ्या मजला करून आणि एक मोठी लढाई मारून दमले होते; आणि शहरांत विश्रांति घ्यावयास आले तों त्यांस जें पाहिजे तें मिळूं लागलें, आणखी शिकंदरानेंही ह्यावेळीं आपली शिस्त अमळ ढिली सोडिली होती; तेणेंकरून त्या लोकांस यथेच्छ मजा मारावयास सांपडल्या. ते अहोरात्र नृत्यगायनांत आणि विषयांत जसे बुडालेले असत. आपण ज्या लढाया मारिल्या आहेत, त्यांपेक्षां मोठमोठ्या अशा अनेक लढाया आपणांस मारावयाच्या आहेत, ही गोष्ट त्यांच्या स्वप्नींही नसे. असेंच जर एकसारखें आणखी कांहीं दिवस चाललें असतें, तर ते लोक लढाईच्या कामास अगदीं निरुपयोगी झाले असते. परंतु, वर सांगितलेली मुदत संपण्याच्या सुमारास आंतिपातर ह्यानें आमिंताज ह्याजबरोबर तेरा साडेतेरा हजार पांयदळ आणि दीड हजार स्वार इतकें नवीन सैन्य मासिदोनिआ येथून पाठविलें. त्यांस युद्धास सिद्ध करण्याकरितां शिकंदरानें जी शिस्त धरिली, तिच्या योगानें हें पहिलें आळसावलेलें लष्कर, आपलें नृत्यगायन टाकून, पूर्व स्थितीस आलें.

बाबुलोनाहून निघाल्यावर शिकंदराची स्वारी सितासिना नामक प्रांतामध्यें आली. ह्या प्रांताची जमीन फार उत्तम असून तेथें पाहिजे तो जिन्नस पिकत असे. आणखी तेथची हवा त्यास फार सुखकारक वाटली, ह्मणून तेथें कांहीं

दिवस राहण्याचा त्यानें निश्चय केला. परंतु, बाबुलोनाप्रमाणें आपले लोक ऐषआरामांत मग्न होऊं नयेत आणि त्यांस कांहीं तरी चांगला उपयोगी उद्योग असावा, ह्मणून त्यानें कांहीं सरदार लोकांची एक मंडळी नेमून, मागच्या लढायांमध्यें कोणकोणीं कोणकोणते पराक्रम केले, आणि कोणकोणते लोक कोणकोणत्या प्रकारचें बक्षीस देण्यास पात्र आहेत, हें निवडून काढावें, असें तीस सांगितलें. ह्या कामांत प्रत्येक मनुष्यास आपल्या साहसांचा, संकटांचा, आणि पराक्रमांचा संपूर्ण इतिहास द्यावा लागला; आणि तो प्रमाणपूर्वक खरा करून दाखवावा लागला. ह्या उद्योगानें सर्व लष्करांत मोठी चळवळ होऊन राहिली. शूर शिपायांच्या पराक्रमाच्या कृत्यांस साक्षीदारांची कधीं वाण नसते. कारण, तीं कृत्यें ते सहस्रावधी मनुष्यांसमक्ष करितात. ह्या मंडळीसमोर पुष्कळ लोकांनीं आपल्या हकीकती आणिल्या आणि त्या पुरावा देऊन शाबीद केल्या. त्या सर्वांचा विचार करून पाहिल्यावर त्या मंडळीनें त्या सर्व लष्करांतले आठ असामी फार योग्य ह्मणून निवडून काढिले. त्यांस शिकंदरानें मोठाल्या पदव्या देऊन, त्यांस एकएक हजार लोकांच्या पलटणींवर मुख्य नेमिलें. हें काम पाहण्यास शिपायांच्या झुंडींच्याझुंडी तेथें धांवून येत असत. ज्यांनीं स्वशक्त्यनुसार रणांगणामध्यें थोडीबहुत तरवार मारिली होती त्यांस हा प्रसंग मोठ्या आनंदाचा वाटला असेल हें सांगावयास नको. परंतु, ज्या कुचर आंगचोर लोकांस त्या मंडळीस ऐकवायास पराक्रमाची एकही गोष्ट नव्हती, त्यांस तो प्रसंग केवळ दुष्टासारखा वाटला असेल, हें उघड आहे. जे कोणी लोक आपलीं कर्तव्य कर्मे वेळच्यावेळीं योग्य रीतीनें करीत नाहींत, त्यांस

मान खालीं घालण्याची वेळ केव्हांना केव्हां तरी प्राप्त होते, हें खचीत समजावें.

शिकंदर बाबुलोनाहून निघाल्यापासून चोवीसावे दिवशीं सुसानामक शहराजवळ प्राप्त झाला. त्या शहराचा सुभेदार आब्युतितीस ह्या नांवाचा होता. त्यानें प्रसंग जाणून, आपला मुलगा, बरोबर कांहीं बडे लोक देऊन शिकंदरास सामोरा पाठविला. त्यांनीं त्यास कोआस्पिकनाक नदीकडे नेलें. त्या नदीचें पाणी फार निर्मळ आणि रुचिकर होतें. त्या पाण्या-खेरीज दुसरें कोणतेंही पाणी इराणचे राजे पीत नसत. त्या राजांच्या स्वाऱ्या दूर प्रदेशीं जाण्यास बाहेर पडल्या ह्मणजे त्यांचे बरोबर त्या नदीच्या पाण्याचा पुष्कळ सांठा असे. आणि तें पुष्कळ दिवसपर्यंत जशाचें तसें टिके. त्या नदीवर ती सर्व मंडळी होती, इतक्यांत तेथें सुभेदार आब्युतितीस कांहीं लोकांसहवर्तमान येऊन शिकंदरास मोठ्या नम्रतेनें भे-टला. त्यानें राजास नजर करण्याकरितां अनेक चमत्कारिक चमत्कारिक वस्तु आणिल्या होत्या. त्यांमध्यें अति त्वरेनें चाल-णारे कांहीं उंट आणि बारा हत्ती होते. हे त्यास दारयसानें हिंदु-स्थानांतून आणवून पाठवून दिले होते. ते नजराणे घेतल्या-वर शिकंदराची स्वारी शहरामध्यें आली. तेथें दारयसाच्या पूर्वजांनीं जो मोठा खजीना बहुत वर्षांपासून नानाप्रकारच्या उद्योगांनीं जमवून ठेविला होता, तो आयताच त्यास मिळा-ला. आपल्या वंशजांस संकटसमयीं द्रव्याकरितां दुसऱ्याचे तोंडाकडे पाहण्याचें प्रयोजन पडूंनये म्हणून त्यांनीं तो पैसा तेथें सांठवून ठेविला होता. परंतु, ईश्वरी संकेत वेगळा अस-ल्यामुळें, त्यांचा हेतु एकीकडेस राहून असा प्रकार घडला. जे द्रव्यलोभी पुरुष स्वतः हाल सोसून, मुलांबाळांस उपयोगीं

पडावें ह्या आशेनें द्रव्याचा संग्रह करीत असतात, त्यांनीं ही गोष्ट वाचून शाहणे व्हावें. ह्यावरून, उधळेपणा करून द्रव्य उडवावें, आणि चैन भोगावी, असें आमचें मत आहे, असें कोणीं समजूनये. सत्कार्यीं पैसा खरचिणें, हाच द्रव्याचा योग्य उपयोग होय. स्वतः शिकंदराचें मत असेंच होतें. दारयसाचा एवढा थोरला खजीना त्याचे हातीं लागला, तरी त्याचा खर्च त्यानें आपल्या सुखाकडे किंवा असत्कर्मीं केला नाहीं. तो आपणास त्या पैशाचा संरक्षक समजत असे, आणि तो सद्गुण आणि धैर्य ह्यांच्या वृद्ध्यर्थ मात्र मोठ्या बेताबातानें खरचीत असे. भर तारूण्यामध्यें शिकंदराचे ठायीं एवढा पोक्त विचार होता, ही गोष्ट त्यास अत्यंत भूषणप्रद होय.

सुसाशहरामध्यें शिकंदरास ज्या अनेक मोलवान वस्तु मिळाल्या, त्यांमध्यें एक प्रकारचा असमानीरंगकरण्याचा पदार्थ होता. तो कितीएक खंडी असून, त्याची किंमत तोळ्यास अठरा किंवा वीस रुपये होती. आणखी तेथें हार्मोदियस* आणि अरस्तोजितन† ह्यांचे पितळेचे पुतळे होते. ते त्यानें तेथून काढून अथेन्सशहरीं पाठवून दिले. पुढें तेथून निघण्याचा वेळ आला, तेव्हां तेथील मुख्य अधिकार, पहिल्याप्रमाणें आब्युतितीस ह्याजकडेसच ठेवून, त्याचे हाताखालीं आचीलास आणि मेझारस हे दोघे आपले सरदार दिले; आणि त्यांचे जवळ सुमारें चार पांच हजार लोक आपल्या खातरीच्या सैन्यांतले राहूं दिले. ह्या व्यवस्थेवरून, शिकंदर किती धूर्त होता आणि दुसऱ्याची मर्जी संभाळून आपला हेतु सिद्धीस नेण्याविषयीं किती कुशल होता, हें स्पष्ट दिसून येतें.

---

* हा एक मोठा प्रसिद्ध आथेन्सकर होता.

† हाही एक त्याचाच सोबती मोठा शूर आथेन्सकर होता.

दारयसाची आई आणि मुलें ह्यांस मुसा येथें नीट बंदोबस्तानें ठेविलें. त्यांची खर्चावेंचाची आणि इतर सोईची तो तजवीत लावीत होता, तों मासिदोनिआदेशाहून नानाप्रकारचे उंची उंची पोषाक त्याजकडे आले. त्यांतले कांहीं भारी भारी किमतीचे पोषाक निवडून काढून त्यानें सिसिग्यांबिस इजकडे पाठविले; आणखी तिला असें कळविलें कीं, ज्या कारागिरांनीं हीं वस्त्रें विणून आणि शिवून तयार केलीं आहेत, त्यांस पाहिजे असल्यास आपण आपल्या तैनातीस ठेवून घेऊन, त्यांजकडून ती कला आपल्या घरांतल्या माणसांस शिकववावी. लोंकरीचें विणकाम करणें हें अत्यंत नीच कर्म आहे, असा इराणांतील बायकांचा समज असल्यामुळें, शिकंदराचा हा निरोप कानीं पडतांच, सिसिग्यांबिस हिच्या डोळ्यांतून खळखळां अश्रुधारा वाहूं लागल्या ; आणि आपला इतका अपमान कधीं कोणीं केला नव्हता, असें तिला वाटलें, असें तिच्या मुखचर्येवरून स्पष्ट दिसलें. तें सगळें वर्तमान शिकंदरास कळलें. तेव्हां त्याला फार वाईट वाटलें, आणि ज्या गोष्टीच्या योगानें सिसिग्यांबिस हिला एवढें दुःख झालें आहे, त्या गोष्टीचें आधीं निवारण करून तिचें सांत्वन करणें हें आपलें अवश्य कर्तव्य कर्म आहे, असें त्याचे मनांत आलें. तेव्हां लागलाच कचेरींतून उठून तो तिच्या खोलींत गेला, आणि तिला ह्मणाला, "मातुश्री, जो आंगरखा आतां माझ्या आंगांत आहे, तो माझ्या वहिणींकडून मला नजर आला आहे, इतकेंच नव्हे, तर तो त्यांनीं स्वतः आपल्या हातांनीं विणिलेला आहे. ह्यावरून आपण पाहा कीं जी ही चूक मजकडून झाली, ती, माझ्या देशांतल्या चालीवरून, अज्ञानानें झाली आहे. आपलें मन दुखविण्याचा माझा हेतु मुळींच नव्हता. आपल्या

रीतीभातीस जेणेंकरून विरोध येईल, तें माझे हातून कधींही व्हावयाचें नाहीं, हें आपण खचीत समजावें. आईनें बस झटल्याखेरीज तिच्या समक्ष मुलानें खालीं बसणें हा मोठा अपराध आहे, असें आपल्यामध्यें मानितात, हें मला फार दिवसांपासून माहीत झालें आहे; त्यासंबंधानें मीं आपणांशीं कसा वर्ततों, हें आपण पाहातच आहां. आपण बस झटल्याखेरीज आपणांसमक्ष मी अद्यापपर्यंत कधीं बसलों नाहीं. आपण जेव्हां जेव्हां माझ्या पायां पडूं लागलां, तेव्हां तेव्हां, मला वाईट वाटून, हें म्यां सहन करावेना, असें आपणांस झटलें आहे. आपणांविषयीं माझे ठायीं पूज्य बुद्धि आहे, झणूनच मी आपणांस मोठ्या प्रेमानें आई, आई, आई असें झणतों. वास्तविक झटलें असतां जिनें मला जन्म दिलें, त्या ओलिंपियेला मात्र मीं ह्या नांवानें हाक मारावी, हें योग्य आहे." ह्यावरून मुख्यत्वेंकरून दोन गोष्टी कळतात. ग्रीक लोकांमध्यें मुलें कितीही मोठीं असलीं तरी आपल्या मातापितरांचा मान फार ठेवीत असत, ही एक; आणि, राजकुलांतल्या मोठमोठ्या स्त्रिया, स्वहस्तेंकरून लोंकरीचें व सुताचें विणकाम करीत, आणि त्यांच्या हातचे आंगरखे वगैरे कपडे त्यांचे आप्त जन मोठ्या आवडीनें वापरीत, ही दुसरी. ह्या दोन्ही रीति फार उत्तम आहेत. ह्या आपणांत चालू करण्याविषयीं सर्व देशच्या लोकांनीं झटावें, हें योग्य आहे.

ह्या प्रमाणें सिसिग्यांबिस हिचें सांत्वन करून आणि इतर राजकीय कामें आटोपून शिकंदरबादशाहा, बारा हजार पायदळ आणि तीन हजार स्वार इतकें नवीन सैन्य बरोबर घेऊन, पासितैग्रिस ही नदी उतरून, युक्षीनामक प्रांतामध्यें शिरला. हा प्रांत निरुंद पट्टीसारखा असून सुसा आणि

इराणाची सरहद्द ह्यांच्यामध्यें होता. त्याचा सुभेदार मादितीस ह्मणून होता. तो वारा लागेल तशी पाठ करणारा, आणि केवळ स्वार्थसाधू नव्हता; तर तो दारयसाचा खरा एकनिष्ठ सेवक असून मोठा शूर होता. तो प्रथमतः आपल्या शहराच्या वेशी लावून घेऊन, शिकंदराशीं युद्ध करण्यास तयार होऊन बसला. परंतु, वेशी फोडून मासिदोनियन लोक आंत गेले, तेव्हां तो आपल्या लष्करासहवर्त्तमान तेथच्या किल्ल्यांत गेला. परंतु, तेथें आपला बचाव शेवटपर्यंत व्हावयाचा नाहीं, असें पाहून त्यानें आपले तीस वकील जीवदानाचें बोलणें करण्याकारितां शिकंदराकडे पाठविले. त्यांचें ह्मणणें सिसिग्यांबिस हिच्या मध्यस्थीनें त्यानें मान्य केलें, इतकेंच केवळ नव्हे; तर जे लोक तेथें पाडाव केले होते, ते सर्व त्यानें सोडून दिले; आणि, त्यांनीं साराबिरा कांहीं एक न देतां, आपापल्या जमिनींचें उत्पन्न खुशाल खाऊन राहावें, असें ठरविलें. इतकें होण्यास कारण मादितीस हा सिसिग्यांबिस हिचा आप्त होता, हें होय. स्वतः दारयस जर ह्या वेळीं विजयी झाला असता तर तो देखील एवढा मान सिसिग्यांबिस हिला देता किंवा न देता, ही शंका आहे.

युक्षी जिंकून घेतल्यावर, शिकंदरानें आपले सैन्याचा एक भाग पार्मिनिओ ह्याचे स्वाधीन करून त्यास सबळ मैदानमार्गानें इराणाकडे जाण्यास सांगितलें; आणि, आपणाबरोबर थोडेंसें सैन्य घेऊन, तो आडवेतिडवे डोंगर चढत तिकडे चालला. तो पांचवे दिवशीं सुसाघांटांत पोहोंचला. त्या प्रांताचा सुभेदार आरिओबार्झानीस हा होता. त्यानें, शिकंदराच्या सैन्यास वर आपल्या देशाकडे येतां येऊंनये म्हणून

मार्गामध्यें एक मोठी थोरली भिंत बांधिली होती, आणि त्या घांटमाथ्यावर पुष्कळ रानटी लोकांचा पाहारा ठेविला होता. तो अशा युक्तीनें ठेविला होता कीं, खालच्या लोकांचा एक-ही बाण त्यांस लागूं नये. शिकंदराचें सैन्य वर चढूं लागलें आहे असें दृष्टीस पडतांच, घांटमाथ्यावरच्या रानटी लोकांनीं त्यांजवर वरून एवढाले दगड लोटून दिले कीं, त्यांतल्या एकाएकाखालीं शिपायांची एकएक टोळी चेंगरून जाऊन प्राणांस मुकली! हें पाहून शिकंदर अतिशयित चिंताक्रांत झाला. पुढें काय करावें, हें त्याला सुचेना. शेवटीं वर जाण्याचा प्रसंग हा नव्हे, असें मनांत आणून त्यानें आपले लोकांस मागें फिरण्याविषयीं सूचना केली. ते सर्वजण एका कपारीच्या आश्रयास चिंताक्रांत होऊन बसले असतां, त्यांच्या बरोबरचा एक पाडावकेलेला मनुष्य शिकंदरापुढें येऊन म्हणाला कीं, मला आज्ञा होईल तर सुरक्षितपणें वर जाण्याचा मार्ग मी दाखवितों. तें त्याचें म्हणणें त्यानें मान्य केलें. नंतर त्यानें खरोखरच एक उत्तम गुप्त वाट त्यांस दाखविली. तिनें ते सर्वजण वर चढून गेले, आणि मोठ्या आवेशानें त्या रानटी लोकांवर पडले. मग काय विचारावें? त्यांस देमायधरणीठाय झालें. जे पळाले ते सुटले; परंतु जे हातीं लागले, त्यांचे मासिदोनियन लोकांनीं तुकडे तुकडे करून टाकिले. इतक्यांत फिलोतास आमिंतास इत्यादि त्याचे सरदार जे दुसऱ्या मार्गानें यावयास निघाले होते, ते-ही त्यास येऊन मिळाले. तेणेंकरून शिकंदराचें सैन्य चांगलें जमून त्या रानटी लोकांचा समूळ नाश झाला. त्या पळापळीमध्यें आरिओबार्झानीस हाही आपला जीव घेऊन पळाला.

इतकें झाल्यावर शिकंदरानें नीट इराणाची वाट धरिली. त्याच्या स्वारीचा रोख परसिपोलिस शहराकडे होता. तेथें तिरिदातिस म्हणून एक सुभेदार होता. त्यास, शिकंदर आपणावर येतो आहे असें कळतांच, त्यानें त्यास असें लिहून पाठविलें कीं "येथें दारयसाचा खजीना फार मोठा आहे. तो ज्या लोकांच्या स्वाधीन आहे, त्यांस आपण जवळ आल्याचें वर्तमान समजलें आहे; आणि ते तो लुटण्याचा विचार करीत आहेत. ह्यास्तव, आपण फार त्वरित यावें. आराक्सिस नदींतून पार याल तोंपावेतों आपणांस वाट जरा अडचणीची आहे; पुढें चांगली आहे. लवकर यावें. मार्गप्रतीक्षा करीत आहें." हें पत्र पोंचल्यावर शिकंदराची स्वारी मोठ्या झपाट्यानें चालली. तिला आक्सिस नदीवरही कांहीं अडचण पडली नाहीं. कारण त्यानें तिजवर नुकताच एक पूल बांधविला होता. तो जेव्हां पर्सिपोलिस शहरानजीक आला, तेव्हां तेथें सुमारें आठनऊशें अनाथ ग्रीक लोक त्याच्या दृष्टीस पडले. ते सगळे व्यंग होते. कोणाचे हात तोडलेले होते; कोणाचे पाय मोडलेले होते; कोणाचीं नाकें कापिलेलीं होतीं, कोणाचे डोळे फोडिलेले होते; कोणी तर अगदीं थोंटे, पांगे, बहिरे, मुके, आणि आंधळे होऊन लोळत पडले होते. त्यांस पाहून शिकंदरास अतिशयित वाईट वाटलें. इराणी लोकांनीं ग्रीक लोकांस जें दुःख दिलें होतें, तें सगळें त्याचे मनांत उभें राहून, मी ह्यांचा सूड केव्हां घेईन असें त्यास झालें. तथापि, त्या वेळीं तें एकीकडे ठेवून, त्यानें त्यांचें सांत्वन केलें, आणि सांगितलें कीं, "बाबानो, झाल्या गोष्टीस उपाय नाहीं. परंतु, आतां निराश होऊं नका. तुमचीं मुलें माणसें लवकरच तुमच्या दृष्टीस पडतील." हें तो बोलला

तेव्हां त्याच्या डोळ्यांतून खळखळां अश्रुधारा वाहात होत्या. आपल्या विपत्तीची समाप्ति आज झाली, असें वाटून त्या लोकांस परम आल्हाद झाला. परंतु, तितक्यांत त्यांचे ठायीं नानाप्रकारच्या कल्पना उत्पन्न होऊन त्यांच्या मुद्रा विलक्षण दिसूं लागल्या. त्यांतला एकजण उभा राहून शिकंदराचे पायां पडून ह्मणाला, "महाराज, इराणी लोकांनीं, आपल्या केवळ दुष्ट करमणुकेकरितां अह्मांस असें छिन्नविछिन्न केलें आहे. अशा स्वरूपानें स्वदेशबांधवांच्या आणि आप्तजनांच्या दृष्टीस पडणें, ह्मणजे केवळ मरण नव्हे काय? जें दुःख टाळतां येत नाहीं, तें निमूटपणें सोसावें हा उत्तम पक्ष होय. विपत्काल प्राप्त झालेल्या जनांस एकांतवास आणि पूर्व सुखावस्थेचें विस्मरण हीं फार इष्ट वाटतात. शिवाय इतका मोठा प्रवास आमच्या सारख्या व्यंग आणि द्रव्यहीन जनांस परम दुष्कर आहे. महाराज, ज्या प्रवासाच्या योगानें आपणांबरोबरचे नवे, तरणे ताठे आणि विजयश्रीयुक्त असे शिपायी अगदीं टेंकीस आले आहेत, तो प्रवास आह्मां लुळ्यांखुळ्यांस कसा करवेल बरें? आतां आमचें ह्या जगांत एवढेंच राहिलें आहे कीं, जे आयुष्याचे थोडेसे दिवस उरले आहेत, ते असेच निमूटपणें दुःख सोसून घालवावे, आणि एकादे दिवशीं मरून जावें. ह्याहून दुसरें आतां कांहीं नको." हें बोलणें शिकंदरानें शांतपणें ऐकून घेतलें, आणि त्यास दोन इकडच्या तिकडच्या गोष्टी सांगून त्याचें समाधान केलें. त्या लोकांपैकीं कितीएकांनीं आपली स्वदेशीं जाण्याची इच्छाही प्रदर्शित केली. परंतु, त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. कारण, तें एका पुरुषाचें भाषण शिकंदराच्या मनांत फार भरून, त्यानें त्यांस तेथेंच सर्व सोई करून देऊन स्वस्थ ठेव-

ण्याचा विचार ठरविला. त्याप्रमाणें प्रत्येकास २००० * द्राकमास रोख, पुरुषांचे पांच पोषाक, बायकांचे पांच पोषाक, एक नांगर, जमीन नांगरण्यास बैलांच्या दोन जोड्या, आणि पेरावयास कांहीं धान्य इतकें देवविलें. त्यानें तथील सुभेदारास असा सक्त हुकूम दिला कीं, ह्या लोकांस कोणत्याही प्रकारें कोणी दुखवूं नये, असा तुह्मीं बंदोबस्त ठेवावा, आणि ह्यांजपासून कोणताही कर घेऊं नये. हे ग्रीक लोक इराणी लोकांनीं धरून आणून, त्यांस गुलाम करून, कितीएक वर्षें गुरांपेक्षांही अति नीच रीतीनें वागवून, त्यांची अशी दुर्दशा केली होती. आपण असे स्वतंत्र होऊं, असें त्या बिचाऱ्यांस कधीं स्वप्न देखील पडलें नव्हतें. परंतु, परमेश्वराची लीला अगाध! तिचा संपूर्ण महिमा कोणास कळणार! आपणांस दास्यांतून मुक्त करून स्वातंत्र्य दिलें, हा आपणांवर मोठा उपकार झाला, असें मनांत आणून, त्या सर्वांनीं शिकंदरबादशाहाचे फार फार आभार मानिले. दीनदुःखनिवारणाच्या अलौकिक आनंदाची गोडी ज्यांच्या अंतःकरणांस लागते, ते खरोखर धन्य होत.

पार्सिपोलिस शहरामध्यें शिकंदराचा पहिला दिवस इकडतिकडे गेल्यावर, दुसरे दिवशीं त्यानें आपल्या हाताखालचे सर्व सरदार बोलावून आणिले, आणि त्यांस ह्मटलें, "अहो, हें शहर फार प्रयास न पडतां आपले हातीं लागलें, ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. हें शहर सायरस बादशाहानें बांधिलें; हेंच पूर्वीं इराणी राज्याची राजधानी होतें; येथें जुने बहुतेक सर्व राजे राहिलेले असल्यामुळें, इतर शहरांपेक्षां हें फार मजबूद आहे; ज्या सैन्यानें पूर्वीं अर्धें युरोपखंड उद्वस्त करून

* १ द्राकमास ह्मणजे सुमारें साडेसात रुपये.

टाकिलें होतें, तें येथून निघालेलें होतें; आपणां ग्रीक लोकांचेही येथल्या सैन्यानें फार हाल केले होते; ह्यास्तव जा आतां ह्यांचा पाहिजे तितका सूड उगवून घ्या. ही वेळ आहे!" मग काय पुसावें? आधींच शिपायी लोकांस त्या गोष्टीची आवड होती; त्यांत राजानें पडत्या फळाची आज्ञा दिली! त्यांनीं लागलाच कत्तलीस आरंभ केला. तेव्हां प्राणभयानें शहरांतले बरेच लोक पळून गेले होते. परंतु, कांहीं लोभास गुंतून जे थोडेसे तेथें राहिले होते, त्यांचे त्यांनीं तुकडे तुकडे केले. ही कत्तल शिकंदरानें दंवडी पिटून लवकरच बंद केली; आणि स्त्रियांच्या पातिव्रत्याचा जर कोणी बलात्कारानें भंग करील, तर त्यास मोठें शासन होईल, असा जाहीरनामा लाविला. ह्या पूर्वीं त्यानें जीं शहरें घेतलीं होतीं, त्यांत त्यास पुष्कळ द्रव्य सांपडलें होतें खरें; परंतु, ह्या शहरांत सांपडलेल्या द्रव्यापुढें तें कांहींच नव्हतें, असें वाटतें. पहा, नुसत्या खजीन्यामध्यें त्यास १२०००० तालेंत (१८००००००० रुपये) रोख मिळाले; शिवाय सोन्यारुप्यांच्या लगडींच्या तर खरोखर राशी पडल्या होत्या. अपरिमित किमतीचें उंचीउंची सामान हातीं लागलें तें वेगळेंच. आणखी ह्याखेरीज शहरची लूट! सारांश, ह्या प्रसंगीं शिकंदरावर आणि त्याच्या सैन्यावर पैशाचा पाऊस पडला, असें ह्मटलें तरी चालेल.

शहरांतली गडबड आटोपल्यावर, तेथून निघण्यापूर्वीं, शिकंदरानें आपल्या सर्व मित्र मंडळीस एक मोठी मेजवानी दिली. तेव्हां तेथें कांहीं स्त्रियाही आल्या होत्या. त्यांमध्यें थाइस ह्मणून एक वेश्या होती, ती स्वभाषणानें दुसऱ्याचें मन रंजविण्याच्या कलेमध्यें फार प्रवीण असे. मेजवानी

आटोपण्याच्या सुमारास तिनें शिकंदरास मोठ्या नम्रतेनें अशी विनंती केली कीं, "जर्कसिस बादशाहानें बांधिलेला येथला थोरला राजवाडा जाळून टाकण्याची परवानगी जर सरकार मला देईल, तर तें काम मी मोठ्या आनंदानें बजावीन. ह्मणजे, ह्या इराणी राजांनीं आपल्या ग्रीक लोकांस जीं अपरिमित दुःखें आजपावेतों दिलीं आहेत, त्यांचा सूड, सरकारस्वारीबरोबरच्या सरदारांपेक्षां साधारण बायकांनीं अधिक घेतला, असें सर्व दुनयेंत होईल." हें ऐकतांच शिकंदर स्वतः एक मोठी जळती मशाल हातांत घेऊन त्या राजवाड्याकडे गेला, आणि त्यानें त्यास आग लाविली. तेव्हां बरोबरच्या इतर मंडळींनेंही आपापल्या मशाला आणून तें राजमंदिर पेटविलें. तें धडाधड जळूं लागलें तेव्हां शिकंदरास कृतकर्माचा पश्चात्ताप झाला, आणि त्यानें लागलीच ती आग विझवायास हुकूम केला. त्याप्रमाणें लोकांनीं ती विझविली. शिकंदरासारख्यास अशा बालिश कर्मानें स्वशत्रूच्या सूड घेण्याविषयींची इच्छा उत्पन्न व्हावी, हें फार चमत्कारिक दिसतें. तथापि, ह्या गोष्टीच्या सत्यतेविषयीं तिळमात्रही संशय नाहीं. मनुष्याची वृत्ति ही फार चमत्कारिक वस्तु आहे. तिचा रंग कोणत्या प्रसंगीं कसा होईल, ह्याचा नेम नाहीं! जे शोधक प्रवासी ह्या शहरांत येतात, ते ह्या वाड्याची इतिहासप्रसिद्ध जागा पाहिल्या खेरीज येथून जात नाहींत.

शिकंदरबादशाहा हा जन्मतःच मोठा उदार होता. आणि त्याचें वैभव जसजसें वाढत गेलें, तसतसें त्याचें औदार्यही वाढत चाललें. पर्सिपोलिस शहरामध्यें आपल्या लोकांचें मोठें दरबार भरून, त्यानें त्यांस मोठमोठीं बक्षिसें वांटलीं.

असें तो वारंवार करी, तें त्याची मातुश्री ऑलिंपियास हिला आवडत नसे. ह्या वेळेच्या सुमारास तिजकडून त्यास एक पत्र आलें. त्यांत तिनें असें लिहिलें होतें कीं, "तूं आपल्या मित्रांस मोठमोठालीं बक्षिसें देतोस हें मी कांहीं वाईट म्हणत नाहीं. औदार्य राजाचे ठायीं असणें हें त्यास मोठें भूषण आहे. तथापि, इतर गोष्टींप्रमाणें, औदार्यासही कांहीं मर्यादा असली पाहिजे. तुझ्या औदार्यानें ते केवळ राजे झाले आहेत. त्वां त्यांजवर पैशाचा जसा पाऊस पाडिला आहे येणेंकरून त्यांनीं पुष्कळ लोक आपले जिवलग मित्र करून ठेविले आहेत. हेंच इतकें द्रव्य जर तूं त्यांस न देतास, आणि बेताबातानें राहातास, तर तितके सगळे लोक तुझे जिवलग स्नेही झाले असते, आणि वेळेस तुझ्या उपयोगीं पड-ते." अशा मतलबाचीं त्यास तिचीं अनेक पत्रें पूर्वीं आलीं होतीं. तीं त्यानें कोणास न दाखवितां, तशींच एका पेटींत घालून ठेविलीं होतीं. तीं काढून तो एके वेळीं वाचीत ब-सला असतां हीफीस्तियन त्याच्या जवळ जाऊन त्याच्या हातां-तलें पत्र वाचूं लागला. तें त्यानें पुरतें वाचिल्यावर शिकंद-रानें आपल्या हातांतल्या आंगठीवरचा शिक्का त्याच्या ओंठास लाविला; आणि तेणेंकरून असें दर्शविलें कीं, 'ही गोष्ट कधीं तोंडाबाहेर काढूं नको.' शिकंदर आपल्या मातुश्रीस संतोषविण्याकरितां तिला नाना प्रकारचे नजराणे पाठवीत असे. परंतु, राज्यकारभारांत तिनें अगदीं देखील हात घा-लूंनये, अशी त्याची इच्छा असे. आंतिपातर हा मासिदो-नियाचा कारभार चालवीत होता, त्यांत ती पडून कधीं कधीं फार घोंटाळा करी. इकडे राजाज्ञा आणि तिकडे राजमा-ता, असें त्यास झालें होतें. त्यानें एके वेळीं त्याविषयींची

सर्व हकीकत एका लांबचलांब पत्रांत लिहून शिकंदरास कळविली. ती वाचून पाहिल्यावर जरा हंसून तो म्हणाला, "माझ्या आईच्या अश्रूंचा एक बिंदु असलीं दाहा हजार पत्रें पुसून टाकण्यास बस आहे, हें आंतिपातरास ठाऊक नाहीं काय !" ह्या दोन गोष्टींवरून तो केवढा मातृभक्त होता, हें स्पष्ट दिसून येतें. जे पुरुष, संसार हातीं येतांच, आई-बापांचे हाल करूं लागतात, त्यांस ह्या गोष्टी खरोखर फार बोधप्रद आहेत.

जो राजवाडा जाळून टाकिला म्हणून वर वर्णिलें, त्याच्या बाहेरच्या दरवाजाशीं *जर्कसिज ह्याचा एक मोठा पुतळा एका उंच सिंहासनावर उभा केलेला होता. तो, थोरल्या गर्दीमध्यें कोणी ग्रीक शिपायांनीं खालीं लोटून दिल्यामुळें रस्त्यावर धुळींत उपडा पडला होता. तो, तिकडून जात असतां, शिकंदराच्या दृष्टीस पडला. तेव्हां तो तेथें क्षणभर स्तब्ध उभा राहून त्यास उद्देशून म्हणाला, "अरे, त्वां ग्रीस देशावर स्वाऱ्या करून त्यांतील लोकांस त्रासवून सोडिलें होतेंस, म्हणून तुला असाच मातींत पडूं देऊं किंवा, तूं मोठा उदार आणि सद्गुणी होतास ह्मणून तुझ्या आसनावर तुला पुनः उभा करूं !" पहा, ह्याप्रसंगीं जर्कसिजाच्या क्रूरपणाची जशी आठवण शिकंदरास झाली, तशी त्याच्या सद्गुणांचीही झाली. शत्रूचे किंवा इतर कोणाचे दुर्गुण बाहेर काढण्यास फारसें शाहाणपण लागत नाहीं; परंतु वैऱ्याचे आंगचे सद्गुणांची किंमत मनांत येण्यास अल्पबुद्धि पुरत नाहीं;

* हा इराणचा मोठा पराक्रमी राजा होता. त्यानें ८००००० लोकांनिशीं ग्रीसदेशावर स्वारी केली होती. ह्यास इ० स० पूर्वी ४६५ वे वर्षी ह्याच्याच एका सरदारानें ठार मारिलें.

त्यास खराखरा शोक विचार लागतो. तो शिकंदराचे ठायीं होता, हें आतां सांगावयास नको.

---

## भाग पांचवा.

शिकंदर बादशाहानें पर्सिपोलिस शहर घेतल्यावर पासागेंद ह्मणून दुसरें एक शहर काबीज केलें. आणि मग तो दारयसाचा पाठलाग करण्याच्या तयारीस लागला. तो त्या वेळीं, चक्कें घेतघेत एकबातन शहरीं प्राप्त झाला होता; ह्यासच आतां इस्पहान ह्मणतात. तें शहर तेव्हां मीदिआ देशाची राजधानी होतें. ह्या सुमारास दारयसास जरी विपत्तीनें घेरिलें होतें, तरी त्याचे बरोबर ३०००० पायदळ, ४००० गोफणगुंडे मारणारे लोक, आणि ३००० स्वार इतकें सैन्य होतें. ह्यामध्यें सुमारें ४०० असामी ग्रीक लोक होते, आणि बहुतेक स्वार बाक्त्रिया देशांतले असून, त्यांचें आधिपत्य, त्याच देशाचा सुभेदार बीसस ह्याजकडे होतें. आपला माग काढीत शिकंदर येत आहे, असें त्याला समजलें तेव्हां त्यानें आपलें सामानसुमान जरा आडमार्गानें पुढें लावून देऊन, एके दिवशीं आपल्या सरदारांस बोलावून आणिलें, आणि ह्मटलें, "मित्रहो, युद्धास आरंभ केला तेव्हां माझ्या सैन्यांत लक्षावधि लोक होते; ते सगळे माझ्या जीवास जीव देतील असें मला वाटत होतें. परंतु, चमत्कार पहा, माझा काळ जरा फिरलासा दिसल्याबरोबर ते बहुतेक मला सोडून गेले. तुह्मी आपल्या स्वराजनिष्ठेस आणि इमानास जागून मजबरोबर राहिलां अहां, हें तुह्मांस अत्यंत भूषणप्रद आणि मला फार संतोषप्रद आहे. तुह्मी मजपाशीं अहां,

ह्मणूनच मी राजा असें मला वाटत आहे. जे विश्वासघातकी निमकहराम लोक आपलें इमान खांचेंत घालून मला सोडून गेले आहेत, त्यांस शत्रूनें मोठमोठीं कामें दिलीं आहेत. कितीएक असामी तर माझ्या शहरांचे सुभेदार होऊन बसले आहेत! शिकंदरानें त्यांस जें एवढें मोठेपण दिलें आहे, तें त्यांच्या पराक्रमांवरून किंवा त्यांच्या सद्गुणांवरून दिलें आहे, असें अगदीं समजूं नका. त्याचा हेतु अगदीं वेगळा आहे. तो हाच कीं, त्यांचें वैभव पाहून तुह्मीं त्यांच्या प्रमाणेंच खाल्ल्याघरचे वांसे मोजून त्यास जाऊन मिळावें. तथापि, तुह्मी माझा पक्ष धरून राहिलां अहां, हें परमेश्वराकडे रुजू आहे. आणि ह्याचें योग्य फल तो तुह्मांस देईल हें खचीत समजा. तुह्मी शूर वीर अहां; आणि तुह्मी जर असेच दंड ठोकून निरंतर माझ्या साह्यास सिद्ध असलां, तर, शत्रू केवढाकां बलवान असेना, त्याचीं हाडें खिळखिळीं करून टाकीन! 'तुला योग्य वाटेल तेवढ्या मुलखाचें राज्य मजकडे राहूं दे, पण माझा समूळ नाश करूं नको,' असें ह्मणून, दांतीं तृण धरून मी शत्रूस शरण जाईन, असें कोणास वाटतें काय? वाटत असेल, तर तें केवळ भ्रांतिमूलक आहे, असें खचीत समजावें. जो मुकुट आतां माझ्या मस्तकीं आहे, तो तसाच राहूंदेणें किंवा काढून घेणें, हें केवळ परमेश्वराच्या हातीं आहे. तें मनुष्याच्या हातीं नाहीं. माझें राजत्व आणि माझें जीवित ह्यांची समाप्ति एका समयावच्छेदेंकरून होईल. आधीं मागें व्हावयाची नाहीं. तुमचें धैर्य आणि तुमचा दृढनिश्चय हीं जर अशींच अचल राहिलीं, तर तुम्हांस त्या उद्दाम मासिदोनियन लोकांच्या पायांखालीं जाण्याचा प्रसंग यावयाचा नाहीं, हें खचीत समजा." हें भाषण ऐकून त्या

सरदार लोकांस मोठें स्फुरण चढलें; आणि 'समरांगणीं मरून जाऊं, पण राजाचा पक्ष सोडणार नाहीं' अशा आणाशपथा वाहून त्यांनीं एकदम मोठा जयशब्द केला.

हें बाह्यात्कारीं सर्व ठीक झालें. परंतु, त्याच्या लष्कराची अंतर्गत स्थिति चांगली नव्हती. इराणच्या मुख्य सरदारांमध्यें नावर्झानीस म्हणून एक गृहस्थ होता. तो आणि बीसस हे एकचित्त होऊन दारयसाच्या नाशाविषयीं प्रयत्न फार गुप्तपणें करीत होते. त्यांनीं लष्करांतले आणखी कितीएक लोक अनुकूल करून घेऊन असा बेत ठरविला कीं, सर्व तयारी झाल्या बरोबर दारयसास कैद करून त्याच्या पायांत बिड्या घालाव्या; आणि तितक्यांत जर शिकंदर आपले मागोमाग आला, तर तो कैदी राजा त्याचे हवालीं करून त्याची मर्जी संपादावी, आणि आपलें हित करून घ्यावें; आणि जर तशी चांगली सवड सांपडली, तर राजास ठार मारून, त्याचें राजत्व आपण घेऊन शिकंदराशीं युद्ध करायास उभें राहावें. हें सर्व फार गुप्तपणें चाललें होतें. तरी तें कर्णोपकर्णीं दारयसास समजलें. परंतु, तें त्यास खरें वाटलें नाहीं. पेत्रन म्हणून त्याच्या सैन्यामध्यें ग्रीक लोकांवर मुख्य अमलदार होता. त्यालाही ही गुणगूण कळली होती. ह्मणून त्यानें राजास असें सांगितलें कीं, आपला खासा तंबू जो आहे, तो आपल्या ग्रीक लोकांच्या छावणींत ठोकावा, म्हणजे आपले जीवास सहसा भीति नाहीं. परंतु, हें बोलणें दारयसास रुचलें नाहीं. इराणी लोक हे आपले, असें मनांत आणून त्यानें पेत्रन ह्यास उत्तर दिलें, "माझ्या देशच्या लोकांनीं मला फसविलें, तर त्याचें मला इतकें दुःख वाटणार नाहीं; परंतु, ते माझा विश्वासघात करि-

तील, हें नुसतें मनांत आणण्यासच मला महत्संकट वाटतें; मग तसें प्रदर्शित करण्यापासून मला किती वाईट वाटेल, ह्याचा तुम्ही विचार करा. परके लोक कितीही विश्वासू आणि प्रामाणिक असले, तरी त्यांच्या आश्रयानें आपला जीव वांचविण्यापेक्षां मी आपल्या लोकांत राहीन, मग ते मला भजोत कीं भाजोत ! माझेच लोक जर मला कंटाळले असले, तर मी जपून किती जपणार ! बरें, तितकेंही करून जीव बचाविला, तर मग त्या जिण्यांत काय अर्थ आहे ?" हें बोलणें झाल्यावर थोडक्याच दिवसांनीं दारयस ह्यास पेत्रन ह्याच्या सूचनेची किंमत कळली. म्हणजे, वर सांगितलेल्या दोघां सरदारांनीं त्यास एकाएकीं धरून कैद केलें; त्याच्या पायांत सोन्याच्या बिड्या घातल्या; आणि त्यास एका मेन्याच्या गाडींत बसवून, मेन्यास कुलूप लावून, बरोबर चांगला भक्कम पाहारा देऊन, ते बाक्त्रियानाकडे चालते झाले! ज्याचा शब्द झेलण्यास लक्षावधि सेना एका पायावर उभी असे, त्या दारयसाची अवस्था अशी व्हावी काय ! होणारापुढें उपाय नाहीं, ही गोष्ट खरी आहे. असो.

ह्याप्रमाणें एकबातन येथून दारयस आणि इराणी सैन्य हीं निघून गेल्यावर सुमारें पांच दिवसांनीं शिकंदराची स्वारी तेथें आली. तेव्हां त्यानें तेथील खजीना आपल्या ताब्यांत घेण्याविषयीं पार्मिनिओ ह्यास हुकूम केला. तो त्यानें घेतला. त्यांत त्यास १८०००० तालेन्तस सांपडले. त्या खजीन्यावर त्यानें चांगला मजबूद पाहरा ठेविला. नंतर त्यानें त्यास हिरकानिया येथें जाण्यास सांगितलें. आणि क्लितस सुसा येथें होता, त्यास असें लिहून पाठविलें कीं, तुम्हीं एकबातन येथें आल्याबरोबर तेथील सैन्य बरोबर घेऊन आह्मांस पार्थिआ देशांत येऊन मिळावें.

मागची अशी तजवींज लावून देऊन, शिकंदर बादशाहा थोडेसें निवडक सैन्य बरोबर घेऊन दारयसाचा पाठलाग करण्यास निघाला. तो अकरावे दिवशीं न्हाजीस ह्या शहरीं आला. तेथून कास्पियन समुद्र एका दिवसाच्या मजलेवर होता. त्याजमधून दारयस हा पार निघून गेला होता, असें वर्तमान त्यास तेथें कळलें. तेव्हां, दारयस आपल्या हातीं लागणें फार कठीण आहे, असें त्यास वाटून तो फार दिलगीर झाला. आणि त्यानें असा निश्चय केला कीं, दमलेल्या सर्व सैन्यास तेथें चार दिवस पर्यंत चांगला विसांवा द्यावा, आणि मग तो सांपडतो कीं नाहीं तें पाहावें. त्याप्रमाणें चार मुक्काम झाल्यावर शिकंदर बादशाहा पार्थियन लोकांवर स्वारी करण्याच्या इराद्यानें, एक मजल करून कास्पियन सामुद्रधुनीशीं प्राप्त झाला, आणि दुसरे दिवशीं ती उतरून तो पार गेला. तेथें त्याला असें कळलें कीं दारयस ह्यास विश्वासघातकी राजद्रोही लोकांनीं कैद करून बेड्या घातल्या आहेत; आणि त्याच्या सैन्यांतील ग्रीक लोक खेरीज करून बाकी सर्व लोक त्या दुष्ट पुरुषांच्या आज्ञेंत वागूं लागले आहेत. तें सर्व खरें होतें. हा वर सांगितलेला निमकहरामपणाचा प्रकार घडला तेव्हां ग्रीक लोक एका तिसऱ्याच आडवाटेनें निघून गेले होते. ह्या लोकांच्या इमानीपणाविषयीं पेत्रनानें दारयसास पुष्कळ सांगितलें होतें; परंतु, त्यावर त्यानें काय उत्तर दिलें, आणि काय केलें, हें वर सांगितलेंच आहे. मनुष्यास पुढें होणारासारखी बुद्धि होते, असें म्हणतात. तें खोटें नव्हे.

दारयसाच्या दुर्दशेचें हें वर्तमान कानीं येतांच त्याचा पाठलाग करण्याविषयीं शिकंदरास नवी उमेद आली.

त्याची स्वारी बाक्त्रियानामध्यें प्राप्त झाली, तेव्हां तेथील लोक अत्यंत भयभीत होऊन, जीवांच्या बचावाकरितां सैरावैरा धावूं लागले. आणि त्यांचा सगळा घोंटाळा होऊन गेला. वास्तविक म्हटलें असतां त्या वेळीं बीसस ह्याचें सैन्य शिकंदराबरोबरच्या सैन्यापेक्षां पुष्कळ अधिक आणि प्रबल होतें; त्या दोघांचें युद्ध झालें असतें, तर शिकंदरास यश खचीत आलें नसतें. परंतु, ह्या ठिकाणीं शिकंदराच्या केवळ दराऱ्यानें त्याचें कार्य झालें. म्हणजे, शिकंदराची स्वारी जवळ आली इतकें ऐकिल्या बरोबरच बीससाच्या लोकांची पांचांवर धारण बसली. ती इतकी कीं त्याला स्वतःला देखील कोठें थारा नाहींसा झाला. तो आपल्या सोबत्यांसहवर्तमान पळत पळत दारयसापाशीं आला, आणि, शत्रु जवळ आला आहे ह्यास्तव आपण ह्या घोड्यावर बसून लांब निघून जावें, असें त्यास सांगूं लागला. तेव्हां त्यास त्यानें म्हटलें, "बरें, कांहीं चिंता नाहीं. येऊं द्या तो जवळ. ज्यांनीं माझे हाल मांडिले आहेत, त्यांस देव पाहून घेईल. इतकें दूरतरी कशास पाहिजे ! स्वतः शिकंदर देखील माझा न्याय करील. मी निमकहराम लोकांचें कधीं ऐकणार नाहीं." हें ऐकतांच बीसस व त्याचे सोबती ह्यांच्या पायांची आग मस्तकास चढली. त्यांनीं आपल्या हातांतले भाले भसा भसा भसा त्या राजाच्या आंगांत भोंसकिले, त्याला नखशिखांत जखमांनीं भरून टाकिलें, आणि प्राणभयानें पलायन केलें ! नाबर्झानीस हा हिर्कानिआकडे गेला, आणि बीसस ह्यानें बाक्त्रियानाची वाट धरिली.

शिकंदराचें सैन्य दारयसाचा शोध करीत चाललें होतें. त्यापैकीं कांहीं लोक हिंडत हिंडत अकस्मात् त्याच्या रथाशीं

आले. तेव्हां तो आंत अत्यंत व्याकुल होत्साता मरणाची मार्गप्रतीक्षा करीत पडला होता. त्या वेळीं त्याला फार तृषा लागली, आणि त्यानें 'अरे मला थोडें पाणी किंवा कांहींतरी पाजा' असें मोठ्या कष्टानें म्हटलें. हें ऐकून पालिस्त्रेतस नामक एका मासिदोनियन शिपायानें मद्याचा पेला भरून त्याजपुढें केला. तें मद्य प्याल्यावर दारयसास किंचित् बरें वाटलें. त्यास मासिदोनियन भाषा येत नव्हती. परंतु, पालिस्त्रेतस ह्याजबरोबर एक इराणी कैदी मासिदोनियन भाषा जाणणारा होता. तो त्या वेळीं दुभाष्याप्रमाणें उपयोगीं पडला. त्याजकडे वळून दारयस म्हणाला, "अशी दुर्दशा होऊन मी मरत तर आहें खराच; परंतु, अशा प्रसंगीं मी बोलतों तें समजायास तुम्हीं जवळ आहां, हें एक दुःखांत सुख आहे. माझे अंतकाळचे शब्द आतां फुकट जावयाचे नाहींत. अहो, शिकंदरास माझा एवढाच निरोप कळवा कीं, 'तुमचे उपकार मजवर फार झाले आहेत, हें एक मला मोठें ऋण आहे असें मी समजतों; आणि तें ऋण फेडण्यापूर्वींच मला मरण येत आहे, ह्याचें मला फार वाईट वाटतें; परंतु, मी आतां काय करूं; माझे उपाय हरले; तुम्हीं माझ्या कुटुंबाच्या माणसांचे प्राण वांचविले इतकेंच नव्हे, तर त्यांस अगदीं पहिल्याप्रमाणें सुखवैभवांत ठेविलें, ह्याबद्दल मी तुमचा फार फार आभारी आहें; तुमच्या शस्त्रास्त्रांस निरंतर यश यावें आणि तुम्हीं सर्व पृथ्वीचें राजत्व चिरकाल भोगावें, म्हणून मी जगदीश्वराची प्रार्थना करितों; ज्यांनीं मला विश्वासघात करून मारिलें आहे, त्यांचा सूड उगविण्याविषयीं मी तुम्हांस आग्रह करीत नाहीं; कां कीं तें आपलें कर्तव्यकर्म तुम्ही कराल, अशी मला खचीत खातरी आहे."

इतकें बोलून, पालिस्त्रेतस ह्याच्या हातांत हात घालून दारयसानें प्राण सोडिला. ह्याप्रकारें करून इ० स० पूर्वी ३३० व्या वर्षाच्या जुलैमहिन्यामध्यें इराण देशचा प्रबल आणि महत्वाकांक्षी राजा दारयस ह्याचा शेवट झाला.

हें वर्तमान शिकंदरास कळलें नव्हतें. तो त्याच्या शोधार्थ हिंडत हिंडत अकस्मात् तेथें प्राप्त झाला, तेव्हां दारयसाचा प्राण जाऊन दोनच्यार पळें झालीं होतीं. एवढा थोरला पराक्रमी राजा, सर्व आंगभर जखमी होऊन, रक्तानें न्हाऊन प्रेत होऊन दीनवाणी एकटा पडला आहे, असें पाहून त्यास जें रडें कोसळलें तें त्याच्यानें आंवरवेना. जसा एकादा जवळचा मोठा आप्त मेल्याच्या योगानें कोमलांतःकरणाच्या मनुष्यांची अवस्था होते, तशी अवस्था त्या प्रसंगीं शिकंदराची झाली. त्यानें आधीं आपले आंगांतला लढाईच्या वेळीं घालावयाचा मोठा आंगरखा काढून त्याजवर घातला आणि अतिशयित दुःख केलें. तो मोठा उष्ण श्वास टाकून म्हणाला, “ राजा दारयसा, तुला अशा प्रकारचें दुःखकारक आणि लज्जास्पद मरण यावें काय ! असो. ईश्वरइच्छेपुढें उपाय नाहीं ! ” मनुष्याच्या अंतःकरणवृत्तींचा काय चमत्कार आहे पाहा. दारयस हा शिकंदराचा शत्रु; त्याच्या मरणानें शिकंदरास, इतर कोणत्याही गोष्टीपेक्षां विशेष आनंद व्हावा, हें साहाजिक दिसतें ; परंतु, तसें न होतां, त्यास उलटें अतिशयित दुःख वाटलें ! अशीं आणखीही किती एक उदाहरणें इतिहासांतरीं आढळतात. ह्याचें मूळ बीज असें आहे का, जो खरा वीर आहे, त्यास शत्रु जिंकल्यानें जसा संतोष होतो, तसा, तो कोणत्या तरी पर्यायानें नाहींसा झाल्यानें होत नाहीं, इतकेंच केवळ नव्हे ;

तर, प्रबल शत्रु नाहींसा झाला असतां आपलें वीर्य आणि शौर्य हीं दाखविण्यास आणि आपणांस गाजी ह्मणून घेण्यास जी योग्य जागा होती ती नष्ट झाली, असें त्याच्या मनांत येऊन त्यास फार वाईट वाटतें. ठीकच आहे. रावण एवढा बलवान् राजा होता, ह्मणूनच रामलक्ष्मणांचें शौर्य दृष्टीस पडलें ; अथवा कौरव एवढे प्रबल योद्धे होते, ह्मणूनच भारतामध्यें भीमार्जुनांच्या युद्धविद्याप्रवीणतेचा एवढा माहेमा वर्णिला आहे; तेच रावण आणि कौरव हे जर मुळांच प्रतिस्पर्धी झाले नसते, अथवा अगदीं बलहीन असते, तर रामलक्ष्मण आणि भीमार्जुन हे मोठे योद्धे होते असें कोणालाही कधीं कळलें नसतें. असो.

शिकंदरानें दारयसाच्या प्रेतांत, त्या काळच्या रितीप्रमाणें चांगला मसाला भरवून तें एका बहुमोल पेटीमध्यें घालून आणि तिजवर ढालतलवार वगैरे सगळीं राजप्रेताचीं चिन्हें ठेऊन, तें सिसिग्यांबीस हिजकडे पाठविलें. तें दृष्टीस पडतांच तिनें जो आकांत मांडिला, त्याचें वर्णन सुद्धां करवत नाहीं. मुलगा एवढा बलिष्ठ राजा असून त्यास असें एकाद्या यःकश्चित् चोराप्रमाणें जवळ कोणी आप्तजन नाहींत अशा स्थितींत मरण यावें, आणि त्याचें प्रेत, आपण प्रतिबंधांत असतां परकीय लोकांनीं वाहून आणून आपणांपुढें ठेवावें हें किती अपमानास्पद आणि दुःखप्रद झालें होतें, हें एक सिसिग्यांबीस हिलाच ठाऊक; त्याविषयींची कल्पनासुद्धां इतरांस करितां यावयाची नाहीं. दारयस ह्याच्या स्वभावाचें वर्णन आरियननामक एका उत्तम ग्रंथकारानें फार यथार्थ केलें आहे. त्याचें तात्पर्य असें:– दारयस हा लढाईच्या कामांत फार ढिला आणि अविचारी असल्यामुळें त्याचा असा विलक्षण शेवट झाला. इतर

गोष्टींच्या संबंधानें त्याचा स्वभाव निर्दोष होता, असें म्हणण्यास चिंता नाहीं. कारण तो आधीं मुळचाच चांगला नीतिमान होता. त्यानें आपल्या प्रजेस कधीं पीडा दिली नाहीं; अथवा त्यास सिंहासनारूढ होण्यास आणि मासिदोनियन लोकांचे हल्ले त्याच्या देशावर चालू होण्यास एक गांठ पडली, ह्यामुळें तो तिकडे गुंतून त्यास भलभलतीं कामें करण्यास अवसर सांपडला नाहीं, ह्मणून त्याचे दुर्गुण बाहेर पडले नाहींत असें कोणी ह्मणतात. त्याची कारकीर्द आरंभापासून अखेरी पर्यंत नानाप्रकारच्या संकटांत गेली. प्रथम कांहीं खटपटी होऊन ग्रानिकसचें युद्ध झालें; नंतर ईओनिआ, ऐओनिआ, फ्रीजिआ, लीदिआ, कारिआ, आणि सिसिलिआचा सगळा समुद्रकिनारा इतकीं स्थलें गमावलीं. त्यानंतर इससचा संग्राम झाला; तेथें तो केवळ पराभव पावून, त्याच्या कुटुंबाचीं सगळीं माणसें शिकंदराच्या हातीं लागलीं; आणि फिनिशिआ व ईजिप्त हींही त्यानें घेतलीं. आरबेला येथील युद्धाच्या वेळीं त्याचें सर्व सैन्य अनेक प्रकारच्या रानटी लोकांनीं भरलें होतें, त्यांतले सहस्त्रावधि लोक प्राणांस मुकले. आणि केवळ पराभव पावल्यावर त्यानें स्वतः प्रथम लज्जास्पद पलायनास आरंभ केला. नंतर तो आपल्याच राज्यामध्यें भटक्या मारीत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं आणि दुसऱ्या ठिकाणाहून तिसऱ्या ठिकाणीं, असा हिंडत असतां, आणि प्राणभयानें जागोजाग लपत छपत असतां त्याच्याच लष्करांतील दोघां निमकहराम मनुष्यांनीं, त्यास राजाधिराज ह्मणून ह्मणून बिड्या घातल्या! आणि शेवटीं त्यांनीं त्याला भाल्यांनीं भोंसकून ठार मारिलें. ह्याप्रमाणें दारयसाचें सर्व आयुष्य गेलें. तो मरण पावल्यावर त्याचें प्रेत, मोठ्या राजाच्या प्रेताप्रमाणें,

मोठ्या प्रतिष्ठित रीतीनें आणि डामडौलानें पुरलें. तो मृत्यु पावला तेव्हां सुमारें पन्नास वर्षांचा होता." हें वर्णन यथार्थ आहे. दारयसास, गादी प्राप्त झाल्यापासून, स्वस्थपण असें एकपळभर देखील मिळालें नाहीं. त्यानें अवघें साहा वर्षे राज्य केलें. हें राज्य मुळीं थोरल्या सायरसानें स्थापिलें; तें सुमारें २०६ वर्षें सतत एकसारखें मोठ्या भरभराटीनें नांदून, शेवटीं, दारयसाबरोबर लयास गेलें.

ह्याप्रमाणें आशिआखंडामध्यें घडामोड चालली असतां, ग्रीस आणि मासिदोनिआ ह्या देशांमध्यें बंडें उद्भवलीं. मेमनन ह्यास शिकंदर बादशाहानें थ्रेस येथें पाठविल्याविषयीं पूर्वीं लिहिलेंच आहे. तेथें त्यानें कांहीं लोक जमवून दंगा माजविला. तेव्हां तो मोडण्यास आंतिपातर ह्याचें सैन्य गुंतलें. ही संधी पाहून, लासिदिमोनियन लोकांनीं बहुतेक पिलोपोनिसस लोकांस अनुकूल करून घेऊन, मासिदोनियन लोकांच्या अमलांतून आपली सुटका करून घेण्याची खटपट चालविली. तेव्हां, थ्रेस येथील गडबड मोडून, आंतिपातर जलदीनें आपल्या ठिकाणीं आला, आणि, इकडचें सर्व वर्तमान सांगण्याकरितां त्यानें कांहीं जासूद तावडतोब शिकंदरबादशाहाकडे पाठविले; आणि लासिदिमोनियन लोकांशीं युद्ध करण्यास लागलीच कंबर बांधिली. त्या लोकांचा मुख्य सरदार आजिस ह्मणून होता; आणि त्याचें एकंदर सैन्य वीस हजार पायदळ आणि दोन हजार स्वार इतकें होतें. उभय पक्षांचें युद्ध जुंपलें तेव्हां लासिदिमोनियन लोकांस जागा फार सोईची सांपडली होती; तेणेंकरून मासिदोनियन लोकांवर शस्त्रास्त्रांचा मार आणि आपला बचाव हे दोनही त्यांस उत्तम प्रकारें साधत. तेव्हां आंतिपातर ह्यास मोठें संकट पडलें. तरी तो घाबरला

नाहीं. थोडासा विचार करून त्यानें एक युक्ति योजिली. ती लागलीच सफळ झाली. तिचा प्रकार असाः— लासिदिमोनियन लोकांस त्या सोईच्या जागेवरून हालविल्या खेरीज आपलें कांहीं चालावयाचें नाहीं असें समजून, त्यानें आपण पराभव पावलों असें दाखवून, सैन्यासहवर्तमान पलायनास आरंभ केला. तें पाहून लासिदिमोनियन लोकांस विशेष वीरश्री चढून, ते त्यांच्या पाठीस लागले. ह्या प्रकारेंकरून ते आपल्या सोईच्या ठिकाणावरून ढळले, असें दृष्टीस पडतांच, मागें फिरून, मासिदोनियन लोकांनीं त्यांजवर जी गर्दी केली, तिच्या योगानें ते अगदीं हतवीर्य होऊन केवळ पराभव पावले. त्यांचा राजा आजिस हा कितीएक वार आंगावर घेऊन, मासिदोनियन लोकांशीं लढत असतां असतां पतन पावला. ह्या युद्धामध्यें बंडवाल्यांकडील ३००० व आंतिपातर ह्याजकडील १००० लोक रणांगणीं पडले. ह्या प्रकरणीं सर्व हकीकत आंतिपातर ह्यानें फार जपून लिहून, शिकंदराकडे पाठविली. फार जपून असें ह्मणण्याचें कारण एवढेंच कीं, शिकंदराचा स्वभाव फार मत्सरी आणि अतिशयित महत्वाकांक्षी असे; त्यास कोणाची फार वाहवा झालेली अगदीं खपत नसे; हें आंतिपातर ह्यास माहीत होतें; ह्मणून त्यानें ह्या लढाईची हकीकत त्यास लिहून कळविली. तिजमध्यें आपली स्वतःची बाहदरी एक तिळभर देखील दाखविली नव्हती. आणखी त्यानें लासिदिमोनियन लोकांच्या तहाच्या बोलण्यावरही असा एकच जवाब दिला कीं, तुह्मी शिकंदर बादशाहाकडे जाऊन आपला निकाल करून घ्यावा; माझे हातीं कांहीं नाहीं. त्याप्रमाणें ते त्याच्या स्वारींत गेले. त्यांची हकीकत ऐकून घेऊन त्यानें निरपराध्यांस

क्षमा केली, आणि ज्यांनीं बंड उभारलें होतें, त्यांस सक्त शिक्षा दिल्या. ह्याप्रकारेंकरून लासिदिमोनियन लोकांचें बंड आटोपलें.

दारयस मरण पावला, तरी इराणच्या लष्करासंबंधीं शिकंदराचें काम संपलें नव्हतें. बीसस हा बाक्त्रियानामध्यें पळून गेला होता, व तिकडे आत्राझर्केसिज असें नामधारण करून, राजा ह्मणून मिरवत होता; त्याचे मागें लागून त्यास धरावें, असा शिकंदराचा बेत होता. परंतु, तो कोणत्या दिशेस होता, हें बरोबर कळलें नव्हतें, आणि मासिदोनियन लोक प्रवासानें अगदीं थकून गेले होते, ह्मणून तो पार्थिआ देशामध्यें परत गेला, आणि, त्यानें आपलें सैन्य हिकातोंपिलस येथें कांहीं दिवस विश्रांति घेण्यास ठेविलें. तेथें अन्नसामग्री पुरेशी नव्हती; ती आसपासच्या प्रांतांतून आणावी, असा त्यानें हुकूम दिला.

तेथें लष्कराचा तळ पडला असतां, त्यामध्यें कोणी अशी गप्प उठविली कीं, देश जिंकण्याचा क्रम आतां बंद करून शिकंदर बादशाहा ताबडतोब स्वदेशीं जाण्याचा विचार करीत आहे. तेव्हां पुष्कळ लोकांस मोठा संतोष झाला, आणि ते भराभर आपल्या ओझ्यापाझ्यांची बांधाबांध करूं लागले. हें पाहून शिकंदरास फार वाईट वाटलें. त्यानें आपले मुख्य मुख्य सरदार बोलावून आणून पुढें तजवीज काय करावी असें त्यांस विचारिलें. तेव्हां त्यांनीं त्यास अशी मसलत दिली कीं, सर्व लोकांस एकत्र जमवून, त्यांचे मनांत ईर्षा उत्पन्न होईल असें भाषण करावें, ह्मणजे ते पुनः कंबरा बांधून आपला विजयध्वज असाच पुढें नेण्यास सिद्ध होतील. हें ह्मणणें शिकंदरास पसंत पडलें. त्याप्रमाणें त्यानें आपलें

सर्व सैन्य एके ठिकाणीं उभें करून, त्यास लक्षून फार उत्तम भाषण केलें. त्याचें तात्पर्य असें :—"माझ्या शूर शिपायांनो, आपण मोठमोठ्या लढाया मारून, पुष्कळ प्रबळ शत्रु जिंकून, महद्यश संपादिलें आहे, आणि आपणांस श्रमही बहुत झाले आहेत, तेव्हां विश्रांति घेण्याविषयीं आपले ठायीं इच्छा उत्पन्न व्हावी, हें साहजिक आहे. आपण कोणकोणतीं राष्ट्रें जिंकिलीं आहेत, ह्यांची याद मी आतां सांगत बसत नाहीं. इतर कोणीं कधीं जीं कांहीं शहरें जिंकिलीं असतील, त्यांपेक्षां आपण राष्ट्रें अधिक जिंकिलीं आहेत. जीं राष्ट्रें आपण जिंकिलीं आहेत, तीं तशींच अढळ आपणांकडे राहातील, त्यांत कोणी कांहीं गडबड करणार नाहीं, अशी जर मला खचीत खातरी असती, तर, तुह्मांप्रमाणेंच, माझी मातुश्री आणि माझ्या बहिणी ह्यांस भेटण्यास स्वदेशीं जाण्याची तयारी मीं मोठ्या उल्हासानें आणि त्वरेनें केली असती. आपली प्रजा तिकडे काय करीत आहे, तिचा समाचार घ्यावा, आणि आपल्या देवांच्या पायां पडावें, असें माझ्या मनांत फार आलें आहे. परंतु, हें हातीं धरलेलें काम जर असें अर्धवट टाकिलें, तर मिळविलेलें सगळें यश फुकट जाईल, ह्याचें मला वाईट वाटतें. अहो, आपण जीं इतकीं राष्ट्रें भराभर जिंकीत आलों आहों, त्यांच्या रीतिभाती, भाषा, धर्म, राज्यरीति, इत्यादि अमच्या रीतिभाती, भाषा, धर्म इत्यादिकांपासून अगदीं भिन्न आहेत. त्यांचें आपलें कांहींच जमत नाहीं. तीं जीं आपणांस पादाक्रांत झालीं आहेत, तीं केवळ आपल्या बाहुबळाच्या योगानें, ह्मणजे निरुपायास्तव, आपण ह्मणतों तशीं वागत आहेत, हें तुह्मांस ठाऊक नाहीं काय! आणि, अशा स्थितीमध्यें एकाएकीं आपण जर परत

जायास निघालों, तर तीं लागलींच एक होऊन आपणांवर उठतील आणि आपणांस त्रास देतील, ह्याविषयीं तुह्मांस कांहीं शंका आहे काय? बरें, जीं राष्ट्रें आपण अद्यापि जिंकिलीं नाहींत, तीं, आपण असे तांतडीनें निघाल्यावर स्वस्थ राहतील काय? अहो, आपणांस धैर्य राहिलें नाहीं, ह्यामुळें आपण हा विजयक्रम अर्धाचसोडिला, असें जनांत होईल, ह्याचें तुह्मांस कांहींच वाटत नाहीं काय? तें सगळें तूर्त एकीकडे असो; पण बीसस ह्यानें जें एवढें भयंकर पापकर्म केलें आहे, त्याबद्दल त्यास शासन करणें हें आपलें कर्तव्य कर्म नव्हे काय? अहो, ज्या अधमाधमानें आपल्या धन्याशीं निमकहरामपणा करून त्यास प्रथम कैद केलें, मग बिड्या घातल्या, आणि शेवटीं भाल्यांनीं भोंसभोंसकून ठार मारिलें, त्यानें आपणांस इराणचा बादशाहा ह्मणवावें, हें तुह्मांस सोसवतें काय? आपल्याच स्वतःच्या विश्वासघातकी सरदारांच्या कचाट्यांत दारयस सांपडला होता. तेव्हां जर आपण त्यास सोडविलें असतें, तर आपला लौकिक केवढा झाला असता बरें! पण काय करावें? हा चांडाळ आड आल्यामुळें सगळें व्यर्थ गेलें. ही गोष्ट माझ्या मनाला फार लागली आहे! त्या अधमाधमानें ह्या पृथ्वींतल्या सर्व राष्ट्रांचा आणि सर्व राजांचा हा महदपराध केला आहे; ह्याबदल ह्यास फांसावर लोंबतांना जेव्हां मी पाहीन, तेव्हां मला चैन पडेल, एरव्हीं चैन पडावयाचें नाहीं. मी ह्मणतों ह्यांत कांहीं भ्रांति आहे, असें मला वाटत नाहीं; कारण, त्या लबाड मनुष्यास ठार मारण्याचा निश्चय आतां ह्या घटकेस तुमच्या देखील सर्वांच्या मुखचर्येवर स्पष्ट दिसत आहे. ह्या भयंकर अपराधाची हकीकत ऐकून तुमचे सर्वांचे नेत्र इतके आरक्त झाले आहेत

कीं, त्या निमकहरामाच्या मानेचें रक्त जमिनीवर पाडल्या-खेरीज तुह्मी स्वस्थ बसणार नाहीं, अशी तुमची मुद्राच मला सांगते."

हें भाषण कानीं पडतांच शिकंदराच्या सर्व सैन्यास नवी उमेद आली; त्या लोकांनीं मोठ्या हर्षानें टाळ्या वाजवून जयशब्द केला, आणि तुह्मी न्याल तेथें आह्मी येतों आणि जें सांगाल तें करितों, असें त्यास शपथपूर्वक सांगितलें. तेव्हां लागलाच तो त्यांस बरोबर घेऊन, पार्थिआ देशांतून पार निघून गेला, आणि तीन दिवस मोठमोठ्या तीन मजला करून हिरकानिआ देशाच्या सरहद्दीवर येऊन पोहोंचला. नंतर त्यानें मार्दी, आराय, द्रांगी, आराकोसाय इत्यादि लोकांचीं अनेक राष्ट्रें जिंकिलीं. हीं जिंकण्यास त्यास अगदीं श्रम पडले नाहींत. कारण, शिकंदर बादशाहा फार दूर आहे, तो इतके लवकर आपणांवर यावयाचा नाहीं, अशा समजुतीनें तीं अगदीं असावध होतीं. आणि खरोखर, ह्या वेळेच्या सुमारास शिकंदरानें, त्या नवीन उत्तेजनाच्या भरांत, आपल्या सैन्याकडून एवढ्या मोठाल्या मजला करविल्या कीं त्यांच्या योगानें सर्व राष्ट्रें त्यास थरथरां कांपूं लागलीं. कां कीं, आकाशाच्या विजेप्रमाणें, त्याची धाड आपणांवर केव्हां पडेल, आणि आपली अवस्था काय होईल, ह्याविषयीं त्यांस अनुमान देखील करतां येईना. ह्यावरूनच बैबलामध्यें दानियलानें ह्याजविषयीं भविष्य सांगतांना ह्यास बिबळ्या वाघ, चिता वाघ, इत्यादिकांचीं दिलेलीं सादृश्यें इतिहासकारांस आतां योग्य वाटतात. हें भविष्य शिकंदराच्या जन्मापूर्वीं पुष्कळ वर्षें बाहेर पडलें होतें, असा पुष्कळ शोधक ग्रंथकारांचा लेख आहे.

बीससचा दुसरा सार्थी नाबर्झानिस हा भटक्या मारीत फिरत होता, तो शिकंदरास आपण होऊन शरण आला. त्या वेळीं त्याची स्वारी, हिरकानिआची राजधानी झाद्राकार्ता येथें होती. त्यास संतुष्ट करण्याकरितां त्यानें अनेक पदार्थ बरोबर आणिले होते. त्यांमध्यें बागोआस ह्या नांवाचा एक खोजा होता. तो पूर्वीं दारयसापाशीं होता. त्याचा त्याजवर फार लोभ असे. त्यास शिकंदरानें आपल्या घरच्या मंडळींत ठेविलें. कांहीं दिवस लोटल्यावर शिकंदराचा त्याजवर फार लोभ बसला. प्राचीन काळच्या राजांस खोजे इतके कां आवडत असत, हा प्रश्न फार चमत्कारिक आणि जरासा अवघड आहे. सांप्रत काळींही राजांच्या जनानखान्यांत अशा लोकांची फार आवश्यकता असते, असें सांगतात. परंतु, पहिल्या इतकें आतां ह्या गोष्टीकडे राजांचें लक्ष्य नाहीं. असें दिसतें.

शिकंदराची स्वारी झाद्राकार्ता येथें असतां, आमाझोनची राणी थालेस्त्रिस ही त्यास भेटावयास आली. हे लोक अगदीं रानटी होते; आणि त्यांचा देश तेथून फार दूर होता. परंतु केवळ शिकंदरबादशहाचा लौकिक ऐकून, एवढा कीर्तिमान पुरुष तो आहे तरी कसा, हें पाहण्यास ती तेथें प्राप्त झाली होती. मी भेटावयास येत आहें, असें तिनें त्यास सांगून पाठविलें; आणि त्यानें तिचें बोलणें मोठ्या संतोषानें मान्य केलें. त्याप्रमाणें, इतर सर्व सैन्य मागें ठेवून, २०० स्त्रिया मात्र बरोबर घेऊन, ती एका मोठ्या उमद्या घोड्यावर बसून, आणि हातांत दोन भाले घेऊन, त्याजला भेटली. तिच्या छातीचा डावा भाग अगदीं उघडा होता; आणि बाकी सर्व शरीर आच्छादिलेलें होतें. त्यांच्यामध्यें अशी

चाल होती कीं, स्त्रियांनीं, मुलास पाजण्याकरितां डावें थान राखून ठेवावें, आणि धनुष्यास बाण लावण्यास सोईचें पडावें ह्याकरितां उजवें जाळून टाकावें!* काय विचित्र चाल!

थालेस्त्रिस राणी शिकंदरापाशीं गेल्यावर कांहीं वेळ पावेतों त्याजकडे टक लावून पहात होती. तेव्हां तिला त्याच्या मुखचर्येवर कांहींएक विशेष चिन्ह दिसलें नाहीं. तेणेंकरून तिला मोठें आश्चर्य वाटलें. कारण, जे कोणी मोठे पराक्रमी अथवा असाधारण बुद्धीचे पुरुष असतात, त्यांच्या शरीरांचें तेज आणि बांधा हींही कांहीं लोकोत्तर असावीं, असें रानटी लोकांस वाटत असतें. त्याप्रमाणेंच थालेस्त्रिस राणीचें मत होतें. तिनें शिकंदरास स्पष्ट सांगितलें कीं, आपणापासून माझे ठायीं गर्भधारणा व्हावी, एतदर्थ मी इतकी लांब आलें आहें; आणि मजपासून जर आपणास संतति झाली, तर ती आपले पश्चात् आपलें राज्य चालविण्यास योग्य अशी होईल, अशी मला खचीत खातरी आहे. त्याप्रमाणें शिकंदरानें, तेथें कांहीं दिवस राहून, तिची इच्छा पुरविली. नंतर ती आपल्या राज्यांत निघून गेली; आणि हा राजाही पार्थियन लोकांनीं वसाहत केलेल्या प्रांतांत जाऊन राहिला. ही सगळी गोष्ट कल्पित आहे, हींत कांहीं एक खरें नाहीं, असा कितीएक सुज्ञ ग्रंथकारांचा अभिप्राय आहे; आणि आम्हांसही तसेंच वाटतें. परंतु, आजपावेतों

---

* आफ्रिकामध्यें जी स्त्रीराज्याविषयीं दंतकथा आहे, ती आमाझोन राज्यास बरोबर लागते. ग्रंथांतरीं असें लिहिलें आहे कीं त्या राज्यांत पुरुष मुळींच नसे. तेथील स्त्रिया गर्भधारणाखुर्ना संदेश जवळच्या राष्ट्रांतील पुरुषांशीं ठेवीत; मुलगी झाली तर राखून ठेवीत, आणि मुलगा झाला तर लागलाच ठार मारून टाकीत !

शिकंदरबादशाहाचीं चरित्रें जितक्यांनीं ह्मणून लिहिलीं आहेत, तितक्यांतल्या एकानेंही ही गाळिली नाहीं, ह्याचें आश्चर्य वाटतें. खोटें बोलण्यास किंवा लिहिण्यास कांहीं तरी एक हेतु लागत असतो. ही जर गोष्ट खरी आहे, तर पूर्वोक्त गोष्टीच्या योगानें शिकंदर आणि थालेस्त्रिस ह्या दोघांच्या किंवा ह्यांपैकीं कोणाएकाच्या कीर्तीस किंवा अपकीर्तीस न्यूनाधिक्य होतें. हें जर उघड उघड दिसत आहे, तर इतिहासकार असत्य कथनाच्या दोषांत विनाकारण कां पडले असावे, हा एक मोठा प्रश्न आहे. ह्याचा उलगडा होणें हें बहुधा अशक्य आहे. असो.

ह्या वेळाच्या सुमारास शिकंदरबादशाहा ऐषआरामांत आणि इष्कांत अगदीं मग्न झाला होता. कोणा शत्रूचें भय नाहीं, संपत्ति अपार, आणि तारुण्याचा भर, अशी त्याची स्थिति असल्यामुळें नृत्यगायन आणि इतर विषयविलास ह्यांखेरीज त्याला कांहीं सुचेनासें झालें. एका विचारी ग्रंथकारानें असें ह्मटलें आहे कीं, इराणी लोकांस शिकंदरानें जिंकिलें खरें; परंतु इराणी लोकांच्या ऐषआरामाच्या व विषयविलासांच्या अतिशयानें शिकंदरास जिंकून अगदीं आपलेंसें करून टाकिलें, हें फार वाईट झालें. होय. ही गोष्ट फार दुःखाची होय. परंतु, कारंजाच्या नळीवर हात ठेवून त्याचें पाणी कांहीं वेळ तुंबवून धरिलें असतां, मग जसें मोठ्या जोरानें उडूं लागतें, तसें सुखोपभोग आणि विषयसुख ह्यांच्या संबंधानें मनुष्याचें आहे. ह्या वेळापर्यंत शिकंदरबादशाहा मोठ्या नेमस्तपणानें वागत होता. त्याचा सगळा काळ स्वाऱ्या, वेढे, लढाया, तह, देशव्यवस्था इत्यादि राजकीय कामांत गेला होता. आणि त्यामुळें त्याचें विषयसुख तसेंच

एके बाजूस पडलें होतें. तें, ह्या विसाव्यामध्यें पुढें सरकलें, ह्यांत कांहीं नवल नाहीं. ह्या वेळच्या त्याच्या करमणूक करणाऱ्या बायकांमध्यें कांहीं इराणी व अन्यजातीय स्त्रिया होत्या. त्या आपापल्या देशरीतींप्रमाणें गाऊन नाचून त्यास रिझवीत असत. त्यांत एक इराणी तरुण स्त्री फार सुंदर आणि फार संकोचवृत्तीची होती. ती शिकंदरास संतुष्ट करण्याकरितां, आपल्या बरोबरीच्या इतर बायकांप्रमाणें नृत्यगायनादि सर्व गोष्टी करी; तरी, ती कोणा थोरा मोठया अब्रूदानाची बायको असावी, असें केवळ तिच्या चर्येवरून स्पष्ट दिसे. तें शिकंदराच्या दृष्टोत्पत्तीस येतांच, ती कोणाची कोण ह्या विषयीं त्यानें चौकशी केली. तेव्हां तिनें डोळ्यांत पाणी आणून उत्तर दिलें, "महाराज, ओकस ह्या नांवाच्या ज्या पराक्रमी बादशाहानें इराणाचें राज्य कितीएक वर्षें हांकिलें, त्याची मी कन्या आहें; दारयस बादशाहाचा सरदार मोठा शूर जो हिस्तास्पिस त्याची मी पत्नी आहें; परंतु, ईश्वराच्या इच्छेनुरूप जें वांट्यास आलें आहे, तें भोगीत आहें. तो ठेवील तसें राहणें भाग आहे." हें बोलणें ऐकून शिकंदराचें मन द्रवलें. त्यानें लागलीच तिची सुटका केली, तिच्या योग्यतेप्रमाणें सर्व वैभव तिला दिलें, आणि तिच्या नवऱ्याच्या शोधास कांहीं लोक पाठविले! ऐषआराम आणि विषय ह्यांमध्यें मग्न झालेल्या पुरुषाच्या अंतःकरणांत अशा प्रकारच्या सद्भावना उत्पन्न होणें हें अगदीं विसंगत वाटतें. परंतु, शिकंदरासारखे जे मोठे कीर्तिमान पुरुष आजपावेतों ह्या जगामध्यें होऊन गेले, त्यांच्या मनांचा अलौकिक थोरपणा अशा चमत्कारिक वृत्तीवरूनच प्रकट होतो.

ह्याच स्वारीमध्यें एके दिवशीं एक मासिदोनियन, शिकं-

दर बादशाहाचा सुवर्णाच्या नाण्यांचा खजीना एका खेंचरावर लादून घेऊन चालला होता. तें ओझें फार जड होतें आणि खेंचर अशक्त होतें; तेणेंकरून तें त्यास वाहून नेववेना. तें अगदीं थकून बसायाच्या बेतास आलें, तेव्हां त्या मासिदोनियन मनुष्यानें तें ओझें मोठ्या कष्टानें आपल्या खांद्यावर घेतलें; आणि तो एक एक पाऊल टाकीत हळू हळू त्या खेंचराच्या मागून चालला. तें त्यालाही फार जड होऊन तो अगदीं वांकला होता, आणि थोडा दम खाण्याकरितां तें जमिनीवर टाकणार होता, इतक्यांत, झालेली सर्व हकीकत मनांत आणून, त्या एकनिष्ठ चाकरास शिकंदर बादशाहा ह्मणाला, "मित्रा, ने, तें सगळें तूं आपल्या घरीं ने; तें मीं तुला दिलें आहे." हें ऐकून तो मनुष्य, राजाचा अत्यंत आभारी होऊन, तें द्रव्य घेऊन आपल्या तंबूंत गेला. तेव्हां त्यास आणि त्याच्या कुटुंबाच्या माणसांस किती आनंद झाला असेल बरें! पतकरलेलें काम एकनिष्ठपणें इमानें इतबारें करणें हें मनुष्यास फार भूषणप्रद आणि लाभप्रद होतें, हें खरें आहे. परंतु, ही गोष्ट नेहमीं लक्षांत धरून तदनुसार वागणारे असे लोक फारच थोडे आढळतात.

तशीच दुसरी एक शिकंदराच्या थोरपणाची गोष्ट ग्रंथांतून लिहिली आहे; ती अशी.— तो दारयसाचा पाठलाग करीत असतां कांहीं सैन्यासहवर्तमान, एके दिवशीं उभ्या दोन प्रहरीं, ऊन प्रखरतर पडलें होतें, अशा वेळीं एका मोठ्या अफाट ओसाड, आणि निर्जल प्रदेशांत प्राप्त झाला. तेव्हां सर्व लोक अगदीं थकून जाऊन अत्यंत तृषित झाले होते; ह्मणून जरा विसांवा घेण्यास रस्त्यावर मध्येंच उभे राहिले. इतक्यांत लहानशा पखालींत थोडेंसें पाणी राहिलें

होतें, तें आपल्या मुलांस पाजण्याकरितां कांहीं मासिदोनियन शिपायी घेऊन चालले होते, तें शिकंदरानें पाहिलें. तोही तृषेनें अतिशयित व्याकुल झाला होता. त्या लोकांचीं आणि त्याची दृष्टादृष्ट होतांच, त्या लोकांनीं तें पाणी त्याजकडे आणून, तें एका पेल्यांत भरून त्याजपुढें केलें, आणि ह्मटलें, "हें पाणीं महाराजांनीं निःशंकपणें प्यावें; मनांत कांहीं संकोच धरूं नये; कारण, शीर सलामत तर पगड्या पंचायशीं ! हें आह्मां सेवकांस ठाऊक आहे. आमचीं पोरें तान्हेलीं आहेत खरीं; परंतु, महाराजांच्या जीवापेक्षां अधिक योग्यतेचें असें ह्या जगांत दुसरें आह्मांस कांहीं एक वाटत नाहीं." हें बोलणें ऐकून, त्या बादशाहानें तें पाण्याचें भांडें आपल्या तोंडाशीं नेलें. इतक्यांत त्याची दृष्टि भोंवतालच्या स्वारांकडे गेली. ते अतिशयित तृषाक्रांत होऊन, माना खालीं घालून, आपल्या राजाच्या तोंडाकडे पाहात आपल्या घोड्यांवर बसले होते; आणि तो पीत आहे तें केवळ अमृत आहे, असें त्यांच्या मनांत येऊन ते त्याविषयीं अत्यंत लोभाविष्ट झाले आहेत, असें त्यांच्या चर्येवरून स्पष्ट दिसत होतें. तें पाहून, आणि ज्यानें तें पात्र पुढें केलें होतें त्याचे आभार मानून, शिकंदरानें ह्मटलें, "सर्व लष्करास पुरण्यासारखें पाणी येथें नाहीं; आणि जर एवढें पाणी मी एकटा प्यालों, तर बाकीच्या लोकांस तृषेची पीडा अतिशयित होऊन ते पटापट मरून जातील, हें चांगलें नव्हे." हें जवळच्या स्वारांच्या कानीं पडतांच, त्यांची तान आपोआप भागून, त्यांस नवें स्फुरण चढलें, आणि ते पुढें सरून एकदम ह्मणाले, "महाराजांचा निरंतर जयजयकार असो ! महाराजांनीं आह्मांस कामगिरी सांगावी, आणि आह्मीं ती बजा-

वावी, एवढें आह्मी जाणतों; दुसरें कांहीं जाणत नाहीं! महाराज जवळ असले म्हणजे आम्ही अमर आहों असें आह्मांस वाटतें!" आपल्या हाताखालच्या लोकांचीं मनें आपणाविषयीं एकनिष्ठ असावीं, असें करणें हें फार कठीण आहे. तें इतर साधारण माणसांस न साधलें, तर त्याचा परिणाम फारसा मोठा होत नाहीं; पण जर तें राजास न साधलें, तर तो कदाचित् लागलाच रंक होऊन जातो. ही कला शिकंदराचे ठायीं चांगली वसत होती, असें दिसतें.

केवळ सद्गुणसंपन्न, म्हणजे ज्याचे ठायीं दुर्गुण एकही असूंनये, असा पुरुष ह्याजगामध्यें अद्याप पावेतों झाला नाहीं, आणि पुढें होईल अशी आशाही नाहीं. शिकंदर बादशाहा हा दारयसास जिंकीपर्यंत मोठा नेमस्त, आणि कोणतें काम आपण केलें असतां लोक आपणास काय ह्मणतील हें पाहून वागणारा असा होता. परंतु, तेव्हांपासून पुढें त्याच्या वृत्तींत अगदीं विलक्षण फेरफार झाला. तो ऐषआराम आणि विषय ह्यांच्या संबंधानें अगदीं इराणी बनून गेला. त्यानें दारयसाच्या इतक्या ह्मणजे तीनशें साठ वेश्या ठेविल्या; आणखी ह्यांखेराज शेंकडों खोजे ठेविले होते ते वेगळेच! तो अहोरात्र त्यांच्या मंडळीनें वेढलेला असे; आणि त्यांच्या तंत्रानें वागे. हें पाहून, फिलिप राजाच्या वेळेपासून मोठमोठीं कामें बजावीत आलेले जे कितीएक जुने शिपायी आणि सरदार बरोबर होते, त्यांस फार वाईट वाटलें. सूर्या पोटीं शनीश्वर निपजला, असें ते उघड बोलूं लागले. आणखी त्यांनीं असा बोभाट केला कीं, इतक्या लढाया मारून आपण इतकीं राष्ट्रें जिंकिलीं, त्यांपासून आपल्या देशाचा फायदा तर कांहीं झाला नाहीं, पण उलटा

मोठा तोटा झाला आहे. आपण राष्ट्रें जिंकिलीं, परंतु, ह्या राष्ट्रांच्या दुर्गुणांनीं आपणांस जिंकिलें, असें ज्याच्या त्याच्या तोंडीं झालें. तेव्हां आपल्या लोकांचीं मनें अशीं भिन्न भिन्न विचारांनीं भरलीं आहेत, आणि जर त्यांस असेंच स्वस्थ राहूं दिलें, तर ते काय करतील कोणजाणे, असें शिकंदराच्या लक्षांत येऊन, त्यानें, बीससचा पाठलाग करण्याकरितां लागलींच स्वारीची तयारी केली. ते लोक त्याच्या आज्ञे-प्रमाणें निघाले ; परंतु, त्यांजपाशीं लुटीच्या मोलवान सामा-नाचे बोजे एवढाले जमले होते कीं, ते त्यांच्यानें बरोबर घे-ववेनात, आणि ते टाकून देण्यास त्यांचे हात वाहीनात. हा घोंटाळा शिकंदरास कळतांच, त्यानें आधीं आपलें लुटीचें सर्व सामान एका मोठ्या मैदानांत नेऊन ठेवविलें, आणि तेथें सर्व शिपायांनीं आपापले लुटीचे बोजे आणून टाकावे असा हुकूम केला. त्याप्रमाणें त्या मैदानांत लुटीची मोठी थोर-लीं रास पडल्यावर, त्यानें कांहीं मासिदोनियन शिपायांकडू-न तीस आग लावविली! मग काय विचारावें, इतक्या रक्त-पातानें आणि इतक्या परिश्रमानें मिळविलेली लाखों रुपयां-ची संपत्ति एक दोन घटकांत नाहींशी झाली! तेव्हां त्या शिपायांस किती वाईट वाटलें असेल, हें सांगावयास नको. परंतु, राजानें स्वतः आपली लुटीची मिळकत त्या ढिगांत ठेविली होती, तेणेंकरून त्यांस तोंडाबाहेर चकार शब्द काढवेना. ह्या प्रकारेंकरून लुटीचा बोजा नाहींसा केल्या वर, शिकंदरानें सर्व शिपायांस एकत्र जमवून, पूर्वींच्या प्रमाणें चित्तवेधक, आणि शौर्योत्तेजक असें भाषण केलें. तेव्हां पुनः ते त्याचे जीवास जीव देण्यास तयार होऊन, आपला विजयक्रम पुढें चालविण्यास मोठ्या उत्सुकतेनें त्याबरोबर निघाले. ते

नीट बाक्त्रियांत शिरले. तेव्हां मार्गामध्यें त्यांस एवढालीं संकटें आणि दुःखें भोगावीं लागलीं कीं, शिकंदराखेरीज दुसरा कोणताही पुरुष त्या प्रसंगीं गडबडल्या खेरीज राहिला नसता, असें अनेक ग्रंथकारांनीं ह्मटलें आहे. आपण दैवशाली आहों, आणि आपणांस केवढेंही संकट प्राप्त झालें तरी आपण पार पडूं, असा शिकंदराचा पूर्ण भरंवसा होता. तेणेंकरून, कोणत्याही कामास हात घालण्यास त्यास भय वाटत नसे. असा भरंवसा असणें हें चांगलें आहे किंवा वाईट आहे, ह्याविषयीं पुष्कळ मतभेद आहे. तथापि, जगामध्यें आजपावेतों ज्यांचे हातून मोठमोठीं पराक्रमाचीं कृत्यें घडलीं आहेत, त्यांचे ठायीं अशा प्रकारच्या वृत्तीचा थोडा बहुत अंश वसत होता, असें त्यांच्या चरित्रांवरून दिसून येतें. ह्या वृत्तीच्या उलट वृत्ति ज्यांची असते, ह्मणजे, ज्यांचा स्वभाव संशयी, किंचित्सखोर, आणि कितीही अल्प कृत्य असलें तरी तें करण्याविषयीं, व्यर्थ कांक्षांमुळें, धरसोडीचा असा असतो, त्यांचे हातून परदेशावर स्वारी, प्रबलशत्रूशीं युद्ध, इत्यादि महत्कार्यें कधींही व्हावयाचीं नाहींत. असो.

बीसस ह्याचा शोध करीत करीत आणि देश जिंकीत जिंकीत शिकंदर बादशाहाची स्वारी द्रांगी लोकांच्या मुलुखांत आली. तेथें एकाएकीं त्यास फार वाईट वाटण्यास व त्याचें चित्त उदास होण्यास एक कारण घडलें. त्याचा प्रकार असा.– त्याच्या स्वारीबरोबर दैम्नस ह्मणून कोणी एक अगदीं साधारण मनुष्य होता. त्याचे मनांत, कांहीं खासगी कामावरून शिकंदराविषयीं एवढें वैमनस्य वाढलें कीं, त्यानें त्यास ठारमारण्याचा विचार केला. तो त्यानें निकोमाकस ह्या नांवाच्या एका मनुष्यास कळविला. आणि

त्यानें तो सिबालिनस नामक आपल्या भावाच्या कानावर घातला. सिबालिनस हा, पार्मेनिओचा पुत्र जो फिलोतस ह्याचा फार जिवलग स्नेही होता; आणि तो शिकंदराच्या फार प्रीतींतला मनुष्य होता; ह्मणून ती सर्व हकीकत त्यानें त्यास ऐकविली, आणि अशी विनंती केली कीं, हें प्रकरण आजचे आज अगत्यपूर्वक राजास कळवावें. फिलोतस ह्यानें सिबालिनस ह्याची स्वराजनिष्ठा वाखाणून त्यास शाबासकी दिली, आणि, ती गोष्ट शिकंदरास त्या दिवशींच्या त्या दिवशींच सांगण्याचें कबूल केलें. हें सगळें तिसरे प्रहरीं झालें. नंतर, फिलोतस हा नित्याच्या पाठाप्रमाणें संध्याकाळीं राजाकडे गेला. तेथें त्या उभयतांचें पुष्कळ बोलणें झालें. परंतु फिलोतस ह्यानें ती कटाची हकीकत त्यास सांगितली नाहीं. तो परत आपल्या बिऱ्हाडीं आल्यावर सिबालिनस ह्यानें त्यास त्याविषयीं विचारिलें. तेव्हां, मी आज तें अगदीं विसरलों, पण उद्या खचीत खचीत तें राजास सांगेन, असें त्यानें त्यास वचन दिलें. परंतु, दुसरे दिवशींही फिलोतस ह्यानें तें प्रकरण राजास कळविलें नाहीं. तेव्हां, सिबालिनस ह्यास त्याविषयीं संशय उत्पन्न झाला; आणि त्यास असें भय पडलें कीं ही गोष्ट आपणास इतके दिवसांपूर्वीं कळलेली असतां, ती आपण शिकंदरास कळविली नाहीं, असें होऊन आपणावर कांहीं लचांड येईल कीं काय कोण जाणे. ह्मणून त्यानें ती दुसऱ्या एका मनुष्याच्या द्वारें राजाचे कानावर घातली. ती त्यानें पुनः सिबालिनस ह्याचे तोंडून ऐकून घेतली, आणि लागलाच दैम्नस ह्यास मुसक्या बांधून आणण्याचा हुकूम केला. त्यास धरायास शिपायी त्याजकडे गेले तेव्हां तो त्याचें कारण तात्काळ समजला, आणि आपली गति पुढें

बरी नाहीं, असें खचीत जाणून, जवळ एक तरवार होती तिनें त्यानें आपली मान कापून घेतली. तरी त्यास तसेंच उचलून राजासमोर आणिलें. तेव्हां त्याला जीव होता. त्याजकडे पाहून शिकंदरानें त्यास ह्मटलें, "कारे, मासिदोनियन लोकांचा राजा मी नसावा, आणि फिलोतस असावा, असें तुझ्या मनांत होतें काय?" तें ऐकिल्यावर दैम्नस ह्यानें एक मोठा उष्ण श्वास टाकून प्राण सोडिला.

नंतर शिकंदरानें फिलोतस ह्यास बोलावून आणून दैम्नसाची व त्याच्या दुष्ट काव्याची हकीकत त्यास विचारिली. तेव्हां त्यानें, न घाबरतां त्यास असें सांगितलें कीं, "सिबालिनस ह्यानें कटाचा मजकूर मला कळवून तो आपणांस ऐकविण्याविषयीं सुचविलें होतें. परंतु, त्यांत कांहीं खरें नाहीं, असें मला वाटल्यावरून तें मीं आपल्या कानावर घातलें नाहीं. ह्याखेरीज माझा दुसरा कांहीं हेतु नाहीं, हें मी आपणांस शपथ वाहून सांगतों." हें ऐकून घेऊन, तिळ मात्रही क्रोधाविष्ट न होतां, शिकंदरानें फिलोतस ह्याचे हातांत हात घातला, आणि त्यास अभयवचन दिलें. तरी, त्याजविषयींचा संशय त्याचे मनांतून गेला नव्हता. आणखी दुसरें असें झालें होतें कीं, आपणावर राजाचा पूर्ण लोभ आहे, तो कधीं कांहीं झालें तरी कमी व्हावयाचा नाहीं, अशी फिलोतस ह्यास मोठी घमंडी असल्यामुळें, तो, दरबारच्या इतर सर्व लोकांस तुच्छ मानून त्यांजवर आपली छाप ठेवीत असे. इतकेंच नव्हे; तर तो स्वतः राजाशींही मोठ्या उर्मटपणानें वर्तत असे. तेणेंकरून त्याला पुष्कळ शत्रु उत्पन्न झाले होते; आणि ते त्याची तळी भरण्याच्या प्रसंगाची वाटच पाहात होते. त्याच सुमारास फिलोतस हा

अंतिगोना ह्या नांवाच्या स्त्रीशीं एकांतीं असें ह्मणाला होता कीं, "माझा बाप पार्मिनिओ हा जर सहाय नसता, तर फिलिप राजाच्यानें काय व्हावयाचें होतें ? तसेंच, शिकंदरास जें एवढें मोठेपण प्राप्त झालें आहे, त्यास मुख्य साधन हा फिलोतस आहे बरें !. हा पराक्रमी गडी जर त्यास सहाय नसता, तर त्याला नुसतें कोणीं पुसलें देखील नसतें ! आम्ही जर एक क्षणभर फुटूं, तर त्याचें देवावताराचें भेंडोळें काय आहे तें तेव्हांच बाहेर पडेल." हें सगळें सप्रमाण शिकंदरास कळलें होतें. इतक्या सर्व गोष्टींच्या योगानें, त्याची चौकशी करण्या विषयीं राजाचा निश्चय झाला. त्याप्रमाणें त्यानें लागलेच आपले मंत्री बोलावून आणिले, आणि अमुक अमुक कारणावरून फिलोतस ह्यास उदईक न्यायसभेपुढें आणावयाचें आहे, त्याचा योग्य विचार झाला पाहिजे, असें सांगून निरोप दिला. हें सर्व फार गुप्तपणें झालें.

नंतर रात्र झाली. तेव्हां चोहींकडे शिपायांचे पाहारे उभे करून, कांहीं लोक शिकंदराच्या आज्ञेवरून फिलोतस ह्याच्या तंबूमध्यें गेले. तेव्हां तो आंत स्वस्थ निजला होता. त्यास जागें करून ते हातबेडी घालूं लागले, तेव्हां तो म्हणाला, "राजा, माझ्या शत्रूंनीं तुझें मन वळवून माझा दावा साधिला !" नंतर, त्यांनीं त्यास रात्रभर प्रतिबंधांत ठेविलें. प्रातःकाळीं राजाची कचेरी भरली. तेथें देम्नस ह्याचें प्रेत आणविलें. तें पाहून लोकांस सखेदाश्चर्य वाटलें; कारण कीं, त्याजवर कांहीं तोहोमत असल्याची गुणगूण देखील कधीं त्यांच्या कानीं आली नव्हती. ते त्या प्रेताकडे टकटकां पाहात होते, आणि आपले ठिकाणीं विस्मय करीत होते. इतक्यांत शिकंदराची स्वारी तेथें प्राप्त झाली. त्याची

ही मुद्रा फार दुःखग्रस्त होती. आतां पुढें येथें व्हावयाचें काय, हें कोणास कळेना. राजा आला तो खालीं मान घालून जमिनीकडे पाहात कांहीं पळें अगदीं स्तब्ध उभा राहिला. परंतु लागलाच सावध होऊन, वर मान करून, भोंवतालच्या मंडळीस उद्देशून म्हणाला, "सरदारहो, काय सांगावें, थोडें चुकलें, नाहीं तर मी आज आपल्या प्राणांस मुकलों असतों ! परमेश्वराची कृपा होती, म्हणून मी आज हा तुम्हांपुढें जीवंत उभा राहिलों आहें. अहो, माझ्याच लष्करांतल्या कांहीं दुष्ट लोकांनीं मला ठार मारण्याचा कट केला होता, तो उघाडीस आला आहे. आज जें यश मला प्राप्त झालें आहे, तें केवळ तुमच्या सर्वांच्या श्रमांचें फळ आहे, हें मी पूर्णपणें जाणतों, आणि ह्या तुमच्या परिश्रमां-बद्दल तुम्हांस योग्य बक्षिसें देऊन तुमचें उतराई व्हावें, ह्यांत जितकें मला सुख आणि भूषण वाटतें तितकें दुसरें कशांत-ही वाटत नाहीं. आणि हें जर माझे हातून घडेल, तरच माझ्या जिण्याचें सार्थक्य ! असें मी मनःपूर्वक समजत असतां आज हा प्रसंग कसा आला आहे तो पाहा! हा मला मारण्याचा दुष्ट बेत कोणीं केला होता हें सांगण्यास माझें अंतःकरण थरथरां कांपतें ! आणि त्यांचीं नांवें ऐकून तुम्हास काय वाटेल, ह्याचा माझ्यानें अजमास देखील करवत नाहीं! काय सांगावें! पहा, ज्यांवर मीं आजपावेतों पराकाष्ठेचा लोभ केला; जे मला जीव का प्राण वाटत होते; ज्यांस मी आपल्या सगळ्या गुप्त गोष्टी मोकळ्या मनानें सांगत आलों; ज्यांशीं प्रतारणा अशी म्यां कधींही केली नाहीं; आणि ज्यांस मीं कधीं कांहीं कमी पडूं दिलें नाहीं; अशा पुरुषांनीं कि हो मला ठार मारण्याचा कट केला होता! हे

पुरुष कोण समजलां काय? पार्मिनिओ आणि फिलोतस! हर हर!!" हे शेवटचे शब्द कानीं पडतांच सर्व मंडळीच्या आंगावर थरारून रोमांच उभे राहिले!

नंतर, फिलोतस ह्यास तेथें आणिलें. तेव्हां तो घाबरून अगदीं बेशुद्ध झाला होता. तरी कांहीं वेळानें जरा सावध होऊन, तें कटाचें वर्त्तमान राजास न कळविण्याचीं जीं त्याचीं कारणें होतीं, तीं त्यानें तपशीलवार सांगून दिलीं. तितक्यांत शिकंदर तेथून निघून गेला होता. तथापि, तो तेथें आहे, असें फिलोतस ह्यास वाटलें, आणि त्याजकडे वळल्या सारखें करून त्यास उद्देशून त्यानें ह्मटलें, "हे राजा, जें मला समजलें होतें, तें मीं तुला कळविलें नाहीं, हा जर माझा अपराध असला, तर त्वां त्याची मला क्षमा केली आहे. ती इतकी कीं त्या वेळीं त्वां माझ्या हातांत हात घातला, आणि मला पंक्तीस घेऊन तूं जेवलास, हें तुला स्मरतच असेल. मीं तुजपाशीं जें सांगितलें आहे, तें जर त्वां खरें मानिलें आहे, तर मी निरपराधी आहें; आणि जरी तें खोटें असें तुझ्या मनांत आलें असलें, तरी त्याची त्वां मला क्षमा केली आहे. ह्मणजे, माझें बोलणें त्वां कसेंही मानिलें, तरी मी शिक्षेस पात्र होत नाहीं. ह्याचा तूं, राजा, चांगला विचार कर. राजा, मला एकाएकीं झोंपेंतून उठवून बिड्या घालाव्या, असा मीं अपराध तरी कोणता केला आहे! मीं कांहीं अपराध केला नाहीं, असें माझें मन मला सांगतें; आणि जर कांहीं अपराध झाला असला, तर त्वां त्याची क्षमा केली आहे, हें मला चांगलें आठवत आहे; तेणेंकरून मला भय वाटत नाहीं. मी कांहीं गंडबडलों नाहीं. पहा, राजा, माझ्या शत्रूंच्या भलभलत्या बोलण्यांकडे लक्ष न देतां, जें

न्याय्य असें तुला दिसेल तें तूं कर, एवढेंच तुजपाशीं मागणें आहे !" ह्या बोलण्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. फिलोतस अपराधी ठरून, त्यास देहान्त शासन झालें. त्याप्रमाणेंच, त्याचा पिता पार्मिनिओ हा त्या वेळीं मीदिआमध्यें होता; त्यावर कांहीं लोक पाठवून, शिकंदरानें त्यास मारविलें. ह्या प्रकारेंकरून, शिकंदराच्या फार प्रीतींतल्या पितापुत्रांचा शेवट झाला! त्या वेळीं पार्मिनिओ ह्याचें वय सुमारें सत्तर वर्षांचें होतें. हा पुरुष स्वभावानें फार चांगला, इमानी, आणि मोठा विचारी होता. तो, शिकंदरास ठार मारण्याच्या कटामध्यें असल्याची चांगली शाबिदी झाली नव्हती; आणि, शाबिदीच्या संबंधानें फिलोतस ह्याचाही प्रकार तसाच होता. परंतु, केवळ संशयावरून, आणि कांहीं दुसऱ्या गोष्टींच्या आकसावरून ते बिचारे प्राणांस मुकले, असें कितीएक सुज्ञ ग्रंथकारांचें मत आहे. ह्या जगामध्यें साधारण मनुष्यांस राजकृपेसारखी सुखदायक दुसरी कोणतीही वस्तु नाहीं, हें खरें आहे; परंतु, तिच्या योगानें धुंद न होण्याविषयीं फार जपलें पाहिजे. आणि तेवढें जर का-चुकलें तर त्या राजकृपेचा राजक्रोध होऊन प्राण जावयाचे; दुसरें बोलणें नाहीं! असो.

पार्मिनीओ आणि फिलोतस ह्यांच्या वधाचें वर्तमान सर्व सैन्यांत पसरलें तेव्हां कितीएक लोकांस फार वाईट वाटलें. आणि त्याविषयींचीं त्यांचीं पत्रें मासिदोनिआ देशास गेलीं, तर तेथल्या लोकांचीं मनें खवळतील कीं काय कोण जाणे, असें शिकंदरास भय पडलें. ह्मणून, ह्मणजे, त्या गोष्टीचा विचार करण्यास व तिजविषयीं पत्रें लिहिण्यास त्या लोकांस अवकाश सांपडूं नये ह्या हेतूनें, त्यानें लागलीच पुढच्या मोहिमेची

तयारी कराविली, आणि त्याप्रमाणें तो एकदम निघाला. तो आपल्या नित्याच्या थाटासहवर्तमान, सूं सूं सूं करीत, द्रांगिआना, आर्कोशिआ, आणि आरिमास्पि ह्यांचा प्रदेश, ह्यांतून गेला. तेथें त्यास कोणी आड आला नाहीं. आणि त्या ठिकाणीं सर्व गोष्टी त्याच्या इच्छेप्रमाणें घडल्या. नंतर त्याची स्वारी पारोपामिसस* ह्या नांवाच्या डोंगराच्या घांटांत आली. तेथें त्याच्या सैन्यास अन्नपाणी न मिळाल्यामुळें, व थंडीचा मोठा कडाखा पडल्यामुळें त्याचे बहुत लोक प्राणांस मुकले. ह्याच मार्गानें थोड्या दिवसांपूर्वी बीसस बाक्त्रिआनामध्यें गेला होता; तेव्हां त्यानें बुद्ध्या, शिकंदराच्या सैन्याची दुर्दशा व्हावी एतदर्थ, ह्या प्रदेशांतील दाणाचारा आणि पाणी ह्यांचा अगदीं विध्वंस करून टाकिला होता. त्यामुळें ह्या लोकांस ह्या वेळीं फार हाल काढावे लागले. तरी, शिकंदरानें त्यांचें धैर्य खचूं दिलें नाहीं. त्यांचा हिय्या खचलासा दिसला ह्मणजे त्यांस त्याहून कठीण प्रसंगांच्या चार गोष्टी सांगून त्यांचें सांत्वन करावें, आणि ते स्वस्थ असले ह्मणजे त्यांस हिमतीच्या गोष्टी सांगून उत्तेजन आणावें, असें करीत करीत त्यानें आपलें सैन्य द्राप्साका येथें आणिलें. तेथें त्यांस बराच विसांवा मिळाला. नंतर त्याच्या स्वारीचा रोंख बाक्त्रिआ देशांतील आर्नोज आणि बाक्त्रिआ ह्या शहरांकडे वळला. तीं शहरें प्रयास न पडतां त्याचे हस्तगत झालीं. हें वर्तमान समजतांच, बीसस ह्याच्या सैन्यामध्यें जे सात आठ हजार बाक्त्रियन लोक होते, ते, पुढें गति बरी नाहीं असें पाहून, त्यास सोडून आपापल्या घरीं जाऊन राहिले. तेव्हां बीसस हा, जे

* हा काकेशस पर्वताचा एक भाग आहे.

थोडेसे लोक अद्यापि त्याजपाशीं राहिले होते, त्यांसहवर्तमान, होड्यांत बसून आक्सस नदी उतरून पार गेला; आणि आलीकडे येण्यास त्या होड्या शिकंदराच्या उपयोगीं पडूं नयेत, ह्मणून त्या त्यानें लागल्याच जाळून टाकिल्या. नंतर तो सागदियाना प्रांतामध्यें नातका ह्या शहरीं जाऊन, नवीन सैन्य उभारण्याच्या उद्योगास लागला. परंतु, शिकंदरबादशाहा त्याचे मागोमाग आक्सस नदीवर आला, आणि, होड्यांची परवा न बाळगितां, फळ्या, झाडांच्या फांद्या, आणि कातडीं ह्यांच्या ताफ्यांवर आपले सर्व सैन्यासहवर्तमान ती नदी मोठ्या धैर्यानें उतरला. हें वर्तमान कानीं पडतांच बीससचे हातपाय गळाले, आणि त्याचे सगळे बेत जागचेजागीं राहिले. तो पळत सुटला. त्यास पुढें काय करावें हें कळेना. इतक्यांत, त्याचाच मोठ्या भरंवशाचा सरदार स्पितामिनीस ह्यानें, आणखी दोन सरदार आपले साथीस घेऊन, बीसस ह्यास पकडिलें, त्यानें दारयसाचा मुकुट मस्तकीं घातला होता तो छिनावून घेतला, दारयसाचा मोठा झगा त्याचे आंगांत होता तो काढून घेऊन फाडून टाकिला, त्यास भल्या मोठ्या बिड्या घातल्या, आणि त्याला एका घोड्यावर बांधून, त्यास शिकंदरबादशाहाकडे पाठविण्याची तयारी केली! पहा. परमेश्वर दूर नाहीं! बीसस ह्यानें, निमकहराम होऊन, जो भयंकर आणि अति दुःखप्रद प्रसंग आपला धनी दारयस ह्यावर आणिला होता, तोच त्यास, फार दिवस लोटले नाहींत तोंच प्राप्त झाला! इहलोकच्या पापकर्मांचा दंड, मरणोत्तर, परलोकीं भोगावा लागेल, असें सर्व शास्त्रें मोठ्या आग्रहानें सांगत असतां देखील लोक सावध होत नाहींत, असें पाहून, परमेश्वर अशीं

उदाहरणें येथच्या येथें दाखवितो. ह्यांचा विचार करून तरी लोकांनीं सावध व्हावें.

स्पितामिनीस ह्यानें पुढें लवकरच बीसस ह्यास शिकंदराकडे आणिलें. तेव्हां त्याचे गळ्यांत सांखळदंड ठोकून त्यास् एकाद्या कुत्र्याप्रमाणें धरिलें होतें; आणि त्या वेळीं त्याचे अंगावर वस्त्र असें मुळींच ठेविलें नव्हतें. शिकंदर बादशाहाचे सन्निध गेल्यावर, बीसस ह्याजकडे बोट करून तो ह्मणाला, "महाराज, हा निमकहराम मनुष्य मीं पकडून आणिला आहे, पहावा. ह्यानें आपल्या अन्नदात्यास जिवें मारिलें. आणि जसें ह्यानें त्याला वागविलें होतें, तसें मी ह्यास आतां वागवीत आहें. ह्मणजे, मी ह्याचा सेवक आहें, ह्यास्तव मी ह्याचाच कित्ता वळवीत आहें. ह्यांत कांहीं विशेष नाहीं. काय करावें! हा तमाशा पाहण्यास आतां येथें दारयस असता तर फार चांगलें झालें असतें!" हें सर्व बोलणें ऐकून घेऊन शिकंदरानें स्पितामिनीस ह्याची मोठी वाहवा केली; आणि बीसस ह्याजकडे वळून ह्मटलें, "अरे, ज्या दारयसानें तुला एवढ्या पदवीस चढविलें होतें, त्याला जेव्हां तूं बिड्या घातल्यास आणि भाल्यांनीं भोंसकिलेंस, तेव्हां तूं शुद्धीवर नव्हतास, तुझे अंगांत कांहीं वाघाच्या संतापासारखें वारें शिरलें होतें, असें मला वाटतें. एरव्हीं तुझे हातून असें कर्म झालें नसतें. क्रूर विश्वासघातकी राक्षसा, जा, जा येथून, मला हें असलें लाजिरवाणें तोंड दाखवूं नको!" तेव्हां त्याला लोकांनीं तेथून काढून एकीकडे नेलें. नंतर शिकंदरानें दारयसाच्या भाऊ ओक्सात्रिस ह्यास बोलावून आणून, बीसस ह्यास त्याचे हवालीं केलें; आणि त्यानें दारयसाशीं कसें आचरण केलें ह्याची चौकशी आणि

त्यास योग्य शासन कोणतें ह्याचा विचार, हीं इराणी सरदारांनींच करावीं, असें ठरवून त्यास तसेंच प्रतिबंधांत ठेविलें. नंतर कांहीं दिवसांनीं त्याची चौकशी झाली. तो अपराधी ठरला. आणि शेवटीं त्याच्या नानाप्रकारच्या भयंकर विटंबना होऊन तो प्राणास मुकला. कर्मासारखीं फळें.

---

## भाग साहावा.

नवनवे देश काबीज करण्याची शिकंदरबादशाहाची इच्छा अमर्याद होती. धनलोभी कृपण मनुष्यास द्रव्य जसजसें अधिकाधिक मिळत जातें, तसतसा त्याचा धनलोभ आणि कार्पण्य हीं वृद्धि पावत असतात, त्याप्रमाणें परदेश जिंकण्याच्या संबंधानें शिकंदराची अवस्था होती. वर सांगितलेलें सगळें काम आटोपल्यावर, त्याची स्वारी, सर्व सैन्यासहवर्तमान, ऐक्सार्तिस नामक नदीच्या कांठीं प्राप्त झाली. तेथें तो छावणी करून राहिला असतां, जवळच्या प्रदेशांतले सुमारें २००० रानटी दांडगे लोकांनीं त्यांजवर तिरांचा आणि गोफणगुंड्यांचा मोठा वर्षाव केला. तेव्हां शिकंदरानें त्यांजवर हल्ला करून त्यांस पळायास लाविलें, आणि मागोमाग पाठलाग करून त्यांच्या राहण्याच्या ठिकाणास वेढा घातला. तेथें जी झटापट झाली, तीमध्यें स्वतः शिकंदर पुढें होता. त्याच्या पायास एक तीर लागून, तो इतका आंत घुसला कीं, त्याच्या योगानें त्याचें हाड पिंजलें. तेव्हां तो व्याकुळ होऊन पडला. हें दृष्टीस पडतांच मासिदोनियन लोक अगदीं गडबडून

गेले, आणि ह्या संकटांतून आपला राजा वांचतो कसा हा त्यांस मोठा विचार पडला. त्यांनीं त्याला लागेलच एका डोळींत घातलें, आणि तेथून एकीकडे नेलें. नंतर थोडक्याच वेळानें तेथील गडबड आटपली, आणि ते पुनः आपल्या छावणीकडे चालले. त्या वेळीं शिकंदर अमळ सावध झाला होता, आणि त्याच्या पायाच्या जखमेस पट्टी बांधिली होती. इतक्यांत त्या पराभव पावलेल्या रानटी लोकांचे वकील तहाचें बोलणें लावण्यास त्याजकडे आले. ते समोर बसले असतां त्यानें आपल्या हातानें पायावरची पट्टी काढून ती जखम त्यांस दाखविली. परंतु तिजपासून त्यास जें दुःख होत होतें, तें त्यानें तिळ मात्रही बाहेर दाखविलें नाहीं. हें पाहून त्या वकिलांस मोठें आश्चर्य वाटलें. आणि त्यांनीं त्यास असें सांगितलें कीं, "आमच्या पक्षाच्या लोकांकडून आपणांस एवढी मोठी जखम झाली, ह्याचें आह्मांस फार वाईट वाटतें. हा बाण ज्यानें मारिला, तो जर सांपडला तर त्यास आह्मी आपले स्वाधीन करूं." ह्यावर शिकंदरानें उत्तर दिलें नाहीं; परंतु, ते लोक खरोखर हतवीर्य होऊन दांतीं तृण धरून शरण आलेले पाहून, त्यांचें बोलणें त्यानें कबूल केलें. नंतर लागलीच स्वारी पुढें चालली. तेव्हां, शिकंदराची डोळी वाहून नेण्याच्या मानाविषयीं पायदळ आणि स्वार ह्यांचा तंटा लागला. त्याचा निकाल शिकंदरानेंच स्वतः असा केला कीं, त्या दोन्ही पक्षांनीं ती डोळी पाळीपाळीनें वाहावी. पहा, निष्ठेच्या योगानें ओझें वाहणें हें देखील मनुष्यास फार भूषणप्रद वाटतें !

ह्याच वेळेच्या सुमारास आबियन सीथियन ह्या नांवाच्या लोकांकडचे वकील शिकंदराकडे आले. हे लोक पहिल्या

पासून मोठे शूर आणि तुसडे होते; आणि ते आपण होऊन कोणाच्या वाटेस जात नसत; तेणेंकरून ते सायरसाच्या वेळेपासून अगदीं स्वतंत्र होते. परंतु, शिकंदराच्या स्वारी-कडे पाहून त्यांचें धैर्य खचलें, आणि त्यांनीं त्या वकीलांच्या मार्फत त्याशीं मोठ्या नम्रतेनें तहाचें बोलणें लाविलें. तें त्यानें मान्य केलें. त्या लोकांस सत्यशीलता आणि दारिद्र्य हीं फार प्रिय असत, असें त्यास तेथें कोणीं सांगितलें. त्या-चा त्यास चमत्कार वाटला. आणि असे चमत्कारिक वृत्तीचे लोक कोणत्या रीतीनें राहतात हें पाहण्याकरितां त्यानें बुद्ध्या आपल्या कचेरींतला एक हुशार मनुष्य त्या वकीलांबरोबर त्यांचे देशास पाठविला. तेव्हां, त्या लोकांमध्यें राजा आणि कायदे हे दोन्ही नसून ते सर्व निरंतर सुखानें आणि आनं-दानें कालक्रमणा करीत असत, असें त्याच्या दृष्टीस पडलें. खरोखर, सर्व लोकांचे ठायीं जर सत्यशीलता आणि निरुप-द्रवता हे गुण असले, तर राजा आणि कायदे ह्यांचें कधीं-हीं प्रयोजन लागावयाचें नाहीं. परंतु, हे गुण अगदीं पूर्ण असे एका मनुष्यामध्यें सुद्धां सांपडावयाचे कठीण. मग एका राष्ट्राची गोष्ट कशास पाहिजे. तथापि, इतक्या प्राचीन काळीं, ज्ञानाचा प्रसार अगदीं कमी होता तेव्हां देखील, आबियन सीथियन लोक ह्या अमोलिक सद्गुणांनीं संपन्न होते, असें इतिहासा वरून समजतें.

शिकंदरबादशाहा ऐक्सार्तिस नदीच्या कांठीं एक चां-गली जागा पाहून तेथें एक नवीन शहर बांधण्याचा विचार करीत होता, इतक्यांत साग्दियाना आणि बाक्त्रिया ह्या देशांती-ल लोकांनीं बंड केल्याचें वर्तमान त्यास समजलें. तेव्हां, ज्यानें बीसस ह्यास धरून देऊन आपला विश्वासूपणा दाखविला

होता, त्या स्पितामिनीस ह्या नांवाच्या मनुष्यास शिकंदरानें कांहीं सैन्य बरोबर देऊन त्यांजवर पाठविलें. तो निमकहराम मनुष्य त्या बंडवाल्यांस जाऊन मिळाला. ही खबर बादशाहास कळली, तेव्हां त्यास अतिशयित संताप आला; आणि, बंडें मोडण्यास व स्पितामिनीस ह्याचा सूड उगविण्यास स्वतः स्वारी करण्याचा त्यानें निश्चय केला. त्याप्रमाणें तो निघाला. त्यानें प्रथमतः सैरोपोलिस ह्या शहरास वेढा घातला. हें शहर सैरसानें बांधिलें होतें, त्यामुळें त्याचे नांवावरूनच त्यास हें नांव पडलें होतें. आपण स्वतः ह्याप्रमाणें गुंतल्या कारणानें, त्यानें क्रेतिरस नामक सरदाराचे हाताखालीं कांहीं फौज देऊन त्यास मेमासी लोकांचे शहरांस वेढा घालण्यास रवाना केलें. त्या लोकांस दोन विचाराच्या गोष्टी सांगण्यास शिकंदराकडचे पांचपन्नास स्वार आधीं गेले होते; त्यांचा प्रथम चांगला आदरसत्कार करून त्या लोकांनीं रात्रीं त्या सर्वांस ठार मारून टाकिलें होतें; ह्यामुळें त्या शहरावर त्याचा मोठा राग होता. सैरसाविषयीं शिकंदराचे मनांत पूज्य बुद्धि होती; ह्मणून, त्यानें बांधिलेलें शहर जें सैरोपोलिस त्याचा विध्वंस करणें हें त्याच्या जीवावर आलें होतें. ह्यास्तव आंतील लोकांस पुष्कळ सवडी देऊन, आपणास शरण येण्याविषयीं त्यानें पुष्कळ सांगितलें. परंतु, ते गर्वानें इतके फुगले होते कीं, ते बादशाहाच्या बोलण्याकडे मुळींच लक्ष देईनात. तेव्हां त्यास अतिशयित संताप आला, आणि त्यानें एकदम हल्ला करून तें शहर एका तडाक्यासरसें धुळीस मिळविलें. सैरसाविषयींची बिचारी पूज्यबुद्धि त्या लोकांवरच्या क्रोधाच्या आवेशापुढें पळभर देखील टिकली नाहीं!

सैरोपोलिस शहराचा विध्वंस केल्यावर शिकंदराची स्वारी

केतिरस होता तिकडे ह्मणजे मेमासी लोकांच्या शहराकडे वळली. ह्या शहरांतले लोक हट्टी आणि शूर असे होते. त्यामुळें त्याच्या वेढ्यामध्यें शिकंदरबादशाहाचे जितके लोक पडले तितके पूर्वी कोणत्याही वेढ्यांत पडले नव्हते. स्वतः बादशाहाच्या डोक्यास आंतून आलेला एक गोफणगुंडा इतक्या जोरानें लागला कीं, त्याच्या योगानें त्यास लागलीच मूर्छा आली. आणि, तो खचीत मेला असें समजून त्याचे लोक आक्रोश करूं लागले. इतक्यांत तो अमळ सावध झाला. तो आपलें डोकें धरून आयाय ओयाय करीत बसला नाहीं. तर, झालेली सर्व गोष्ट ऐकून त्यास इतका आवेश चढला कीं, त्या लोकांचें पारिपत्य केल्याखेरीज विसांवा घ्यावयाचा नाहीं, असा निश्चय करून त्यानें त्यांजवर एकदम हल्ला केला. तेव्हां प्रथम कांहीं उपाय चालेना; परंतु, थोड्या वेळानें त्याच्या लोकांनीं गांवकुसास एक मोठें भोंक पाडिलें; आणि त्यांतून सर्व सैन्य आंत शिरलें. मग काय विचारावें! त्यांनीं प्रथमतः सगळीं घरें पेटवून दिलीं; आणि नंतर, शहरांतलीं सर्व मनुष्यें, पुरुष बायका आणि मुलें, ह्यांची सरसकट कत्तल उडविली! त्याप्रमाणें आणखी कित्येक शहरें काबीज केल्यावर, ३,००० पायदळ आणि ८०० स्वार इतकें सैन्य बरोबर देऊन, शिकंदरबादशाहानें मिनिडिमस ह्यास मरकंदा ह्या शहरावर हल्ला करण्यास पाठविलें. कारण, स्पिताभिनीस हा तेथें जाऊन मोठ्या बंदोबस्तानें राहिला आहे, असें त्यास कळलें होतें.

इतकी व्यवस्था केल्यावर शिकंदरबादशाहा ऐक्सार्तिस नदीच्या कांठीं पुनः आपल्या लश्कराच्या छावणींत येऊन राहिला. त्या छावणीच्या जागेभोंवती फार मजबूत अशी

एक मोठी थोरली भिंत होती. तेथून थोड्याच अंतरावर शिकंदरबादशाहानें मोठ्या त्वरेनें, ह्मणजे सुमारें वीस दिवसांचे आंत, एक मोठें शहर बांधिलें, आणि त्यास आपले नांवावरून अलेक्झांद्रिया असें नांव ठेविलें. ह्या शहराचा घेर सुमारें साडेचार कोसांचा होता. त्यांतलीं घरें देखील फार सोईचीं बांधिलीं होतीं. तेथें स्थायीक होण्यास लोक पाहिजे होते. ह्याकरितां कितीएक बंदीवानांचा खंड त्यानें स्वतः भरून त्यांस सोडवून, त्यांस तेथें स्वस्थ राहावयास सांगितलें. आणि, जे कितीएक मासिदोनियन लोक युद्धांमध्यें जखमा लागून किंवा वृद्धापकाळामुळें किंवा अतिशयित उष्णतेमुळें अगदीं निकामी झाले होते, त्यांस तेथें ठेविलें. अशा प्रकारेंकरून तें शहर त्यानें बांधिलें आणि वसविलें.

हें अलेक्झांद्रिआ शहर सीथियन लोकांच्यां राज्याच्या अगदीं सर हद्दीवर आलें; कारण, ऐक्सार्तिस नदीच्या आलीकडे शिकंदर येऊन ठेपला होता, आणि तेथेंच जवळ त्यानें तें वसविलें होतें; आणि तिच्या पलीकडच्या कांठापर्यंत त्या लोकांचा अमल होता. त्यांस असें वाटलें कीं हें शहर इतकें जवळ बांधिलें आहे, ह्यापासून आपणांस एकादे वेळीं कदाचित् मोठा अपाय होईल. ह्मणून त्यांच्या राजानें लागलेंच थोडेंसें सैन्य तें शहर घेऊन मोडून टाकण्यास पाठविलें. हें शिकंदरास समजलें; आणखी मरकंदा शहराकडे जे स्वार आपण पाठविले होते, त्यांस कपटेंकरून त्या लोकांनीं ठार मारिलें असेंही कळलें. तेव्हां त्यास त्यांचा फार राग आला; आणि त्यांचें पारिपत्य करण्याचा त्यानें निश्चय केला. पहा, ह्या प्रसंगीं शिकंदरावर साग्दियन, बाक्त्रियन, आणि सीथियन असे तीन राष्ट्रांचे लोक उठलेले असून, तो

स्वतः इतका आजारी झाला होता कीं, त्यास दुसऱ्याचे साह्या-खेरीज बसवेना किंवा उभें राहवेना; तरी त्याचें धैर्य तिळ-मात्रही ढळलें नाहीं. तो पुढें जाण्याचे तयारीचे दुसरे दिवशीं प्रातःकाळीं आपला लष्करी भव्य आंगरखा घालून मोठ्या कष्टानें आपल्या सैन्यापुढें उभा राहिला. त्याच्यानें फार बोलवलें नाहीं. परंतु, जे चार शब्द त्याचे तोंडांतून निघाले, त्यांच्या योगानें त्याच्या लोकांस युद्ध करण्याचें नवें फुरण आलें, आणि तें प्रदर्शित करण्याकरितां त्यांनीं एकदम मोठा जयशब्द केला. ती नदी उतरून पलीकडे जाण्यास तेथें होड्या किंवा नावा नव्हत्या. ह्याकरितां, तीन दिवस खपून, त्या लोकांनीं सर्व सैन्यास पुरण्यासारखे ताफे तयार केले.

ह्याप्रमाणें पलीकडे जाण्याची तयारी होत होती, इतक्यांत सीथियन लोकांकडचे वीस वकील शिकंदराच्या मुलाखती-करितां लष्करांत आले. ते राजाच्या तंबूमध्यें जाऊन ब-सल्यावर, कांहीं वेळ पर्यंत एकही शब्द न बोलतां एकसा-रखी टक लावून त्याजकडे पाहत होते. ह्यांतला आशय एवढाच होता कीं, जो मनुष्य मोठा पराक्रमी आणि कीर्तिमान असतो, तो शरीरानेंही तसाच भव्य आणि तेजस्वी असतो, असा त्यांचा समज असे; आणि त्याप्रमाणें शिकंदर बादशाहा आहे कीं नाहीं, हें त्यांस पाहावयाचें होतें. तो त्यांस त्यांच्या अजमासा प्रमाणें दिसला नाहीं. अशा प्रकारें पहिली घट-का अर्धी घटका गेल्यावर, त्या वकीलांमध्यें, जो फार वृद्ध होता, तो शिकंदर बादशाहाकडे वळून पुढें सरसावून मोठ्या धिमेपणानें बोलूं लागला. त्याच्या भाषणामध्यें निस्पृहता हा गुण फार स्पष्टपणें दिसत होता. त्या भाषणाचें तात्पर्य येणें

प्रमाणें :- "हे राजा, तुझी देशजिंकण्याची इच्छा जशी फार मोठी आहे, तसें मोठें शरीर जर तुला परमेश्वरानें दिलें असतें, तर हें जग तुला अगदीं थोडें झालें असतें. तूं आपल्या उजव्या हातानें पूर्वदिशा आणि डाव्या हातानें पश्चिम दिशा कंवटाळून, कदाचित् सूर्याच्या पाठीस लागला असतास. तुला परमेश्वरानें इतर माणसांप्रमाणेंच घडिलें आहे, ह्मणजे त्यांचेहून अधिक असें तुला कांहीं दिलें नाहीं, तरी देखील, तुला कधीं करितां यावयाच्या नाहींत, अशा गोष्टी करण्याची हांव तुला उद्भवली आहे. तूं युरोपांतून आशिआखंडामध्यें राष्ट्रांचीं राष्ट्रें जिंकीत जिंकीत आला आहेस. असें करितां करितां सर्व मनुष्यें जिंकिल्यावर मग तूं नद्या, अरण्यें आणि पशु ह्यांशीं लढूं लागशील, असें वाटतें. मोठे वृक्ष वाढायास वर्षांचीं वर्षें लागतात, परंतु ते मोडून त्यांचे तुकडे तुकडे उडविण्यास एक घटकाही लागत नाहीं; सिंह जरी सर्व पशूंचा राजा ह्मटला आहे, तरी कधीं कधीं अगदीं क्षुद्र पशुपक्षी त्याच्या मांसावर आपली उपजीविका करितात; आणि लोखंड जरी इतकें कठीण आहे, तरी गरीब विचारा जंग खाऊन टाकितो; ह्या गोष्टी तुला ठाऊक नाहींत काय? ह्मणजे वस्तु कितीही मोठी असली, तरी तिचा नाश, कधीं कधीं, अति लहान वस्तूच्या योगानें होतो, हें तुझ्या कधीं लक्षांत आलें नाहीं काय?—आह्मांला तुजशीं काय करावयाचें आहे? आह्मी तुझ्या देशांत कधीं पाऊल देखील घालीत नाहीं. अरे, जे बिचारे गरीब लोक अरण्यामध्यें स्वस्थ राहून कालक्रमणा करितात, त्यांस तूं उगाच कां त्रास देतोस? तूं कोण आणि कोठून आलास, ह्या माहितीवांचून त्यांचें कांहीं अडलें आहे काय? आम्ही कोणा पर-

कीय मनुष्यावर हुकूम चालविणार नाहीं, आणि कोणा परकीय मनुष्याच्या हुकुमांत राहणार नाहीं. राजा, आह्मी सीथियन लोक कोणत्या प्रकारचे आहोंत, हें तूं नीट समजून घे. परमेश्वरानें आह्मांस बैल, नांगर, बाण, बरची आणि पेला असे पांच पदार्थ दिले आहेत. ह्या पांचांनीं आम्ही आपल्या मित्रांशीं आणि शत्रूंशीं व्यवहार करितों: ते असें.— बैल आणि नांगर ह्यांजपासून उत्पन्न केलेलें धान्य आम्ही मित्रांस देतों; तसेंच पेल्यामध्यें द्राक्षरस घालून तो देवास अर्पितों; शत्रु दूर असले तर त्यांवर बाणांची वृष्टि करितों; आणि ते जवळ भिडले ह्मणजे त्यांस बरच्यांनीं भोंसकतों. ह्याच रीतीनें प्राचीन काळीं आम्हीं मोठमोठीं लढाऊ राष्ट्रें पादाक्रांत करून टाकिलीं, पराक्रमी प्रबल राजे जिंकिले, सगळें आशिआखंड उद्ध्वस्त करून सोडिलें, आणि ईजिप्त देशांत प्रवेश केला.— राजा, तस्करांचा समूळ नाश करण्याकरितां मी देशांवर स्वाऱ्या करितों असें ढोंग तूं लोकांस दाखवितोस; परंतु, वास्तविक पाहिलें असतां तूंच स्वतः मोठा तस्कर आहेस. तुझे एवढा दुसरा तस्कर ह्या भूमंडळावर कोणी नाहीं. जीं राष्ट्रें त्वां जिंकिलीं आहेत, तीं सर्व त्वां लुटून आणि जाळून पोळून फस्त करून टाकिलीं आहेत. लीदिया, सीरिया, इराण आणि बाक्त्रिआ हे देश त्वां जिंकून घेतले आहेत, तर्न तूं आम्हां लोकांच्या गुरांढोरांच्या कळपांचा नाश करण्यास उभा राहिला आहेस, आणि पुढें हिंदुस्थानावर चाल करण्याचा विचार करीत आहेस. तुला जसजसे देश मिळत जातात, तसतशी, राहिलेले देश जिंकण्याची तुझी हांव वाढत जाते. राजा, बाक्त्रियन लोकांनीं तुला बरेंच थबकविलें होतें, हें तुझ्या ध्यानांत नाहीं काय?

साग्दियन लोकांनीं तरी प्रथम तुला दाद दिली काय? आतां ऐक्सार्तिस नदी उतरून पलीकडे चल, म्हणजे आमचें अफाट राष्ट्र तुझ्या दृष्टीस पडेल. आह्मां सीथियन लोकांच्या मागें लागून तुला कांहीं एक लाभ व्हावयाचा नाहीं, हें मी तुला खातरीनें सांगतों, आणि तुझ्यानें आह्मांस कधींही जिंकवणार नाहीं, ही फत्तरची रेघ तूं लक्षांत ठेव. अनेक राष्ट्रांच्या माना मुरगळून गोळा केलेली संपत्ति तुझ्या सैन्यापाशीं कितीही कां असेना; आमच्या दारिद्र्याच्या आवेशापुढें त्याचें एक पळभर देखील चालावयाचें नाहीं. आह्मी दूर आहों असें समजून तूं स्वस्थ असतां, आह्मी तुजवर केव्हां येऊन पडूं, ह्याचा नेम तुला लागणार नाहीं. आह्मी शत्रूचा पाठलाग जितक्या त्वरेनें करितों, तितक्याच त्वरेनें आह्मी त्यास टाळा देऊन आपासून पळतों. ग्रीक लोक आह्मां सीथियन लोकांच्या धैर्याची थट्टा करितात, असें मला समजलें आहे. कांहीं चिंता नाहीं. आमचें धैर्य आह्मांला! त्यापासून जी लाभहानि व्हावयाची, ती आमची! तिचा संबंध इतर लोकांकडे नाहीं! तुमचीं मोठमोठीं भव्य शहरें आणि अफाट मैदानें तुह्मां ग्रीक लोकांकडे निरंतर असोत; त्यांची अपेक्षा आह्मांस नाहीं. आह्मी आपल्या रानमळ्यांत तृप्त आहों. आह्मांला कांहीं कमी वाटत नाहीं. राजा शिकंदरा, मी सांगतों हें लक्षांत ठेव, कीं धनवैभव ही केवळ दुपारची सावली आहे. त्याला फार जपून राहा; हें धनवैभव आपले घरीं पुष्कळ वेळ पर्यंत राहावें, अशी जर तुझी इच्छा असली, तर आपल्या ऐष आरामास किंचित् आंवर घाल.—तूं जर आपणास देवावतार ह्मणवीत असलास, तर हजारों माणसांच्या मुंड्या मुरगळून त्यांस सर्वस्वीं नागविणें

हें तुला अगदीं शोभत नाहीं; इतकेंच केवळ नव्हे, तर त्यांचें निरंतर बरें करणें हें तुझें कर्तव्य कर्म आहे. आणि तूं आपणाला जर मनुष्य समजत असलास, तर इहलोक आणि परलोक ह्यांच्या संबंधानें आपल्या स्थितीचा आणि कर्माचा विचार करून वागत जा. पायांपुरतें पाहून भलतेंच करीत जाऊं नको. ज्यांस तूं जिंकून त्रास देशील, ते तुझे मित्र होऊन तुझें कल्याण चिंतितील, ही गोष्ट तूं कधीं मनांत सुद्धां आणूं नको. कारण, ज्यांस तूं जिंकितोस ते तुझे दास आणि तूं त्यांचा स्वामी, असें होतें. ह्मणजे, तुह्मां उभयतांमध्यें योग्यतेचें साम्य राहात नाहीं; आणि ज्यांच्या योग्यतेंत साम्य नाहीं, त्यांची मैत्री कधींही व्हावयाची नाहीं, असें तूं खचीत समज. ह्यास्तव, राजा, तुला जर मित्र जोडावयाचे असतील, तर आपल्या बरोबरीच्यांशीं प्रेमानें वाग ह्मणजे झालें. आमचें राज्य थ्रेसापर्यंत पसरलें आहे; आणि थ्रेस हा देश तुझ्या मासिदोनिआ देशास लागलेला आहे. आतां शेवटीं माझें सांगणें एवढेंच आहे कीं, आह्मां सीथियन लोकांस मित्र करावें किंवा शत्रु करावें, ह्याचा अधीं चांगला विचार करून मग कोणत्या त्या एका उद्योगास लाग." हें सगळें भाषण शिकंदरानें शांतपणें लक्षपूर्वक ऐकून घेतलें; आणि त्या वकीलास थोड्यांत असें उत्तर दिलें कीं, "माझें दैव मला अनुकूल आहे, त्याचा आणि तुह्मी जें आतां बोललां त्याचा एकंदर विचार करूनच मला जें योग्य वाटेल तें मी करीन." हीं भाषणें आटोपल्यावर त्यानें लागलेच आपले सरदारलोक तंबूंत बोलावून आणिले, आणि दुसरे दिवशीं नदीपार जावयाचें असें ठरविलें. पूर्वोक्त भाषणप्रकारावरून त्या वकीलाची निस्पृहता आणि शिकंदरबादशाहाची

सहनशीलता ह्या स्पष्ट दिसून येतात. वास्तविक ह्मटलें असतां शिकंदर हा सहनशील नव्हता; त्याला उणें उत्तर कधींही सोसत नसे. परंतु निस्पृहाशीं गांठ पडली, ह्मणजे मनुष्य कसाही अभिमानी असला तरी त्यास पड घ्यावी लागते, असें वारंवार अनुभवास येतें. अन्यायाचा केवढाही डौल अस्ला, तरी तो नीतीच्या नम्रतेपुढें दिपतो, असें जें कितीएक कवींनीं ह्मटलें आहे, तें खरें आहे. असो.

वर सांगितलेली सर्व सिद्धता झाल्यावर, शिकंदरबादशाहाचें सैन्य ऐकसार्तिस नदी मोठ्या कष्टानें उतरलें. ही नदी उतरते वेळेस इतका गोंधळ आणि गोंगाट झाला होता कीं, आतांच येथें आपला पराभव शत्रु करितो कीं काय, असें शिकंदरास वाटलें. त्याप्रमाणेंच, जे सीथियन लोक पलीकडच्या किनाऱ्यावर युद्ध करण्यास उभे होते, त्यांनीं हें मासिदोनियन लोकांचें साहस पाहिलें, तेव्हां ते अगदीं थक्क झाले, आणि अशा पराक्रमी लोकांसमोर आपला टिकाव लागावयाचा नाहीं असें त्यांस वाटून त्यांचें धैर्य खचलें. इतक्यांत मासिदोनियन लोक त्यांजवळ येऊन थडकले. मग काय विचारावें! युद्धास आरंभ होतांच सीथियन लोक पळत सुटले, आणि मासिदोनियन लोक त्यांच्या मागें लागले. ह्या प्रसंगीं सीथियन लोकांचा फार नाश झाला. त्यांचे किती लोक मेले आणि किती जखमी झाले, हें कोठें बरोबर सांगितलेलें नाहीं; तथापि त्यांचे हजारों शिपायी पाडाव करून शिकंदरानें आपल्या सैन्यांत आणिले, आणि सुमारें दोन हजार घोडे शत्रूपासून छिनावून घेतले, असें एके ठिकाणीं लिहिलें आहे. ह्या समरामध्यें शिकंदराचे अवघे साठ लोक पतन पावले, आणि १०० पायदळाचे लोक व १०००

स्वार इतके जखमी झाले. ह्या प्रसंगीं जे सीथियन लोक पाडाव करून शिकंदरानें आपल्या छावणींत नेले होते, ते त्यानें खंडणी न घेतां परत सीथियन लोकांच्या छावणींत पाठवून दिले. ह्यांतला आशय येवढाच कीं, मीं जी तुह्मां-शीं लढाई केली, ती, तुह्मी माझे शत्रु ह्मणून केली असें नव्हे; तर तुह्मी आपणांस अजिक्य असें ह्मणवीत होतां, त्या तुह्मांस जिंकून गाजीपणा मिळवावा ह्मणून केली, असें त्याचे मनांत त्यांस दर्शवावयाचें होतें.

प्राचीन काळीं सीथियन लोकांच्या शौर्याची मोठी आख्या असे. ते कोणासही हार जावयाचे नाहींत, असें सर्व राष्ट्रें समजत. अशा लोकांस शिकंदरबादशाहानें जिंकिल्याचें वर्तमान जेव्हां चोहींकडे पसरलें, तेव्हां सर्वांस त्याचा मोठा दरारा बसला. सीथियन लोकांच्या राष्ट्राजवळच सासी ह्या नांवाच्या लोकांचें एक मोठें प्रबल राष्ट्र होतें. त्या लोकांनीं लागलेच आपले वकील शिकंदराकडे तहाचें बोलणें लाव-ण्यास पाठविले. त्यांचें ह्मणणें त्यानें शांतपणें ऐकून घेऊन मान्य केलें. त्याप्रमाणें सीथियन लोकांकडचेही वकील तहाचें बोलणें लावावयास आले. आणि त्यांनीं शिकंदरास असें कळविलें कीं, "आपणाशीं जो विरोध केला, तो आम-च्या सर्व लोकांनीं केला नाहीं; तर कांहीं अज्ञान आणि मूर्ख अशा लोकांनीं केला, आणि हातीं शस्त्र धरिलें. ही त्यांची मोठी चूक झाली. बाकी, इतर सर्व लोक आपली आज्ञा शिर-सावंद्य करण्यास सिद्ध आहेत. काय ती आज्ञा व्हावी, एवढें च मागणें आहे." त्यांसही त्यानें बरें ह्मणून सांगितलें.

इकडे असें चाललें होतें, तरी, स्पिताामिनीस जो मरकं-दा येथें जाऊन बसला होता, त्याचा सूड घेण्याची इच्छा

शिकंदरास वारंवार होत असे. ह्मणून त्यानें आपले स्वारी-चा कल तिकडे वळविला. हें स्पितामिनीस ह्यास कळतांच तो तेथून जो निघाला, तो बाक्त्रिआ देशामध्यें शिरून पळत सुटला. त्याच्या मागें शिकंदर लागला. परंतु, तो लवकर सांपडावयाचा नाहीं, असें त्यास वाटल्यावरून त्यानें आपले स्वारीचा रोख साग्दियाना प्रांताकडे धरिला. त्यानें आपल्या निद्याच्या परिपाठाप्रमाणें गांवांचीं गांवें लुटून उद्ध्वस्त करून, कित्तीएक साग्दिन लोक पाडाव केले. त्यां-मध्यें तीनजण स्वरूपानें फार चांगले आणि बरेच समज-दार होते. ते त्या देशांतले मुख्य जमीनदार होते, असें पुढें समजलें. त्या सर्व पाडाव केलेल्या लोकांस, शिकंदराच्या आज्ञेवरून फांशीं द्यावयास चालविलें, तेव्हां ते तीन असामी ना-चून उडून मोठा आनंद करूं लागले. हें चमत्कारिक वर्तमान शिकंदरास कळलें, तेव्हां त्यानें त्यांस आपणासमोर आणविलें, आणि, मरायास चालले असतां हर्ष करण्याचें कारण विचारिलें. त्यावर त्यांनीं असें उत्तर दिलें कीं, "आमचा वध करण्याविषयीं दुसरा एकादा साधारण राजा जर आज्ञा करिता, तर आह्मांला अतिशयित दुःख झालें असतें. परंतु, आपण आज सर्व राष्ट्रें जिंकून सगळ्या पृथ्वीचे राजे झालां आहां, असे जे महान पराक्रमी प्रभु आपण, त्या आपल्या आज्ञेनें आह्मांस मरण प्राप्त होत आहे, आणि असें मरण मोठमोठ्या शूरांस देखील परम दुर्भिळ आहे असें आह्मांस ठाऊक आहे, ह्मणून आह्मांस हा प्रसंग परम उल्हा-साचा वाटतो." त्यांस शिकंदरानें विचारिलें, "तुह्मांला जर ह्या प्रसंगीं क्षमा केली, तर मजशीं शत्रुत्वानें न वाग-ण्याविषयीं कबुलायत करितां काय?" त्यावर त्यांनीं उत्तर

दिलें कीं, "ह्या वेळेपर्यंत तरी आह्मी आपणाशीं शत्रुत्वानें वागलों नाहीं. आह्मीं आपल्या घरांमध्यें स्वस्थ होतों, इतक्यांत आपल्या लोकांनीं आह्मांवर विनाकारण हल्ला केला, तेव्हां आह्मांस आपला बचाव करण्याकरितां शस्त्र धरावें लागलें, त्यास आमचा उपाय नाहीं. हेंच जर त्यांनीं आह्मांला सोईनें आणि ममतेनें वागविलें असतें, तर आपले जे कोणी जीवास जीव देणारे एकनिष्ठ सेवक आहेत, त्यांहून कांकणभर अधिक असे आह्मी आपणांस वाटलों असतों. परंतु, आतां बोलून काय उपयोग? जें व्हावयाचें तें होऊन चुकलें!" इतकें बोलणें झाल्यावर शिकंदरानें त्यांस जीवदान दिलें. आणि पुढें ते खरोखर इतके इमानी निपजले कीं, त्यांतल्या कितीएकांस शिकंदरानें आपणाबरोबर नेहमीं असणाऱ्या परम विश्वासू लोकांत ठेविलें. ह्मणजे, जे शत्रु ह्मणून फांशीं द्यावयास चालविले होते ते थोडक्याच वेळांत राजाचे अगदीं प्यार बनून गेले!

इतकें कृत्य आटपल्यावर शिकंदर बादशाहाची स्वारी सैन्यासहवर्तमान बाक्त्रिया देशांत जाऊन राहिली. तेथें त्यास सोळा हजार नवी फौज मासिदोनिआ देशाहून आलेली मिळाली. त्या वेळीं त्याच्या लष्करांत फारशी गडबड नव्हती. कारण, त्या प्रसंगीं कोणी शत्रु आसपास राहिला नव्हता; आणि भोंवतालचे बहुतेक सर्व देश पादाक्रांत झाले होते. तथापि, आक्सस नदीच्या खडकावर पेत्राआक्सिआना ह्मणून एक फार मजबूद आणि फार कठीण चढणीचा असा किल्ला होता; त्यावर आरिमेझिज ह्या नांवाचा एक साग्दियन सरदार, ३००० सैन्य आणि दोन वर्षें पुरण्यासारखी अन्नसामग्री घेऊन मोठ्या बंदोबस्तानें राहिला होता;

आणि तो हस्तगत व्हावयाचा नाहीं, असा लोकांचा ग्रह झाला होता. ह्यास्तव तो काबीज करून आपलें सामर्थ्य लोकांस दाखवावें, असें शिकंदराचे मनांत येऊन, तो आपल्या सैन्यासहवर्तमान त्याच्या पायथ्याशीं आला, आणि प्रथम त्याची पाहाणी करूं लागला. तेव्हां, त्या किल्ल्यावर जाण्यास मार्ग काय तो एक आहे, आणि तोही फार संकटाचा आहे, असें त्यास दिसून आलें. तेणेंकरून त्यास मोठा विचार पडला. तरी त्यानें हिय्या सोडिला नाहीं. त्यास वेढा घालण्यापूर्वी त्यानें आरिमेझिज ह्यास असें सांगून पाठविलें कीं तुह्मी सोईनें जर शरण याल तर तुह्मांस कांहीं एक इजा व्हावयाची नाहीं. ह्या निरोपावर पुष्कळ वाचाळपणा करून त्या सरदारानें शेवटीं असें म्हटलें कीं, "शिकंदर बादशाहा झाला म्हणून काय झालें? त्याला जशा इतर सर्व गोष्टी करितां येतात, तसें तो पलायनही करील! वर प्रवेश करण्याची त्याची काय प्राज्ञा आहे? त्याला जर आतां एकाएकीं पंख फुटले, तर मात्र बुवा कांहीं सांगवत नाहीं!" हें सगळें वर्तमान कानीं पडतांच शिकंदर बादशाहा फार क्रोधायमान झाला; आणि, कांहीं होवो पण हा किल्ला हल्ला करून खचीत लवकर घ्यावयाचा, असा त्यानें निश्चय केला. ह्या कामाकरितां त्यानें आपल्या लष्करांतले सुमारें तीनशें डोंगरी लोक आपणापाशीं बोलावून आणून त्यांस म्हटलें, "अहो माझ्या शूर शिपायांनो, जीं ठिकाणें कधीं कोणास घेतां यावयाचीं नाहींत. असें लोक समजत असत, तीं मीं तुमच्या सहाय्यानें सहज घेतलीं; तुमच्याच हिम्मतीवर मीं मोठमोठे पर्वत ओलांडिले, नद्या वलांडिल्या, आणि सिलिसिआ प्रदेशांत मार्ग नव्हते तेथें नवे मार्ग पाडून येथपावेतों आलों आहें. पहा,

शूरहो, ह्या किल्ल्यावर जाण्यास काय तो एक मार्ग आहे; तो आपणांस समोर दिसत आहे. ह्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं, असें समजून वरचे लोकांनीं ह्या बाजूस मात्र पाहारे वगैरे ठेविले आहेत, आणि इतर बाजू अगदीं निर्भय ह्मणून तशाच मोकळ्या ठेविल्या आहेत, असें दिसतें. तुम्ही जर फार बारकाईनें शोध कराल, तर दुसरा एक तरी वर जाण्याचा मार्ग तुम्हांला सांपडेल, ह्यांत कांहीं संशय नाहीं. शौर्यसाध्य नाहीं, अशी एकही वस्तु ह्या जगामध्यें सांपडावयाची नाहीं. फार दूरची गोष्ट नको. पहा, आशिआ खंडांतला हा इतका मुलूख आपणांस पादाक्रांत झाला आहे, असा पूर्वीं कोणास झाला होता काय? अथवा, इतके दूर येऊन आपण इतकीं राष्ट्रें जिंकूं, असें तुमच्या कधीं स्वप्नांत तरी आलें होतें काय? परंतु शूरहो, हें एवढें महत्कृत्य आपले हातून होण्यास मुख्य कारण आपलें धैर्य होय. उठा तर मग आतां! कंबरा बांधा! देवाचें नांव घ्या! आणि दुसरा एकादा मार्ग शोधून काढून त्यानें वर जा, आणि लागलेंच तेथें पांढरें निशाण उभारा. तें माझ्या दृष्टीस पडलें म्हणजे मी हरतऱ्हा करून वरच्या शत्रूंस खालीं आपले आंगावर घेऊन तुम्हांस धोक्यांतून सोडवितों, ही खातरी ठेवा!" असें भाषण करून त्यानें त्यांस मोठमोठीं बक्षिसेंही देऊं केलीं. त्याप्रमाणें, त्या लोकांच्या आंगांत आवेश उत्पन्न होऊन ते मार्ग शोधायास निघाले. त्यांबरोबर शिकंदर बादशाहाही त्या किल्ल्याभोंवतीं एकदा फिरला. त्या लोकांनीं आपणांबरोबर दोन दिवसांची अन्नसामग्री आणि तरवारा व बरच्या अशीं हत्यारें घेतलीं होतीं. त्यांनीं वर चढण्याचें काम रात्रीं आरंभिलें. तो वर जाण्याचा नवा मार्ग फार

कठीण होता. तो इतका कीं, त्या लोकांस केव्हां केव्हां हातपाय टेंकून वानराचेगत वर चढावें लागे; आणि कधीं कधीं तर, उपाय चालेना तेव्हां, हात पुरे तेथें लोखंडाच्या खुंट्या माराव्या, तेथपावेतों चढावें, आणि तेथें पाय लागल्यावर पुनः आणखी तसेंच करावें, असें करणें त्यांस भाग पडे. आणखी, तो कडा बर्फानें आच्छादिलेला होता; तेणेंकरून, त्यांचे हातपाय थंडीनें अगदीं कांकडले होते. ह्यांतले कितीएक लोक, महाप्रयत्नानें, बरेच उंच चढत आल्यावर तेथून पाय सरून अथवा एकाएकीं खुंट्या उपटून जे घसरले, ते ताड् ताड् ताड् आदळत आदळत त्या किल्ल्याच्या पायथ्याशीं येऊन पडले, आणि अतिशयित छिन्न विच्छिन्न होऊन प्राणांस मुकले! हें वर चढणाऱ्या जीवंत मनुष्यांच्या जेव्हां दृष्टीस पडलें असेल, तेव्हां त्यांस काय वाटलें असेल बरें! तथापि, त्यांनीं धैर्य सोडिलें नाहीं. ते, मोठ्या कष्टानें दिवस उगवण्याच्या सुमारास वर पोहोंचले, आणि त्यांनीं पूर्व संकेतानुरूप तेथें पांढरें निशाण उभारलें.

किल्ल्यावरचे रानटी लोक केवळ त्याच्या शिखरावर उघड मैदानांत राहत नव्हते; तर, तेथें एक लहानसें खोरें होतें त्यांत नेहमीं असत, आणि कारणपरत्वें बाहेर येत. आणखी हें खोरें, शिकंदराच्या लोकांनीं निशाण लावलेल्या बाजूच्या पलीकडच्या आंगास होतें; ह्यामुळें, शत्रूचे लोक वर आले आहेत, असें त्यांस मुळींच समजलें नव्हतें, आणि ते, स्वस्थल निर्भय मानून, मनांत मांडे खात स्वस्थ राहिले होते. इकडे, रात्र सरेपर्यंत निशाण कोठें दृष्टीस पडलें नाहीं, ह्मणून, आपल्या लोकांच्या शोधाकरितां व त्या रानटी लोकांस चार सामोपचाराच्या गोष्टी सांगून वळविण्याकरितां,

शिकंदरानें, कोफीस ह्या नांवाचा एक गृहस्थ मोठ्या खरेनें वर पाठविला. हाच पुरुष थोड्या वेळापूर्वीं वर आला होता, व ह्यापाशींच आरिमेझिज ह्यानें, ह्मणजे त्या किल्ल्यावरच्या लोकांच्या सरदारानें शिकंदराविषयीं हवींतशीं अद्वातद्वा भाषणें केलीं होतीं. तो कोफीस किल्ल्याच्या शिखरावर आला तेव्हां निशाण उभारलेलें त्याच्या दृष्टीस पडलें. ते- णेंकरून त्यास फार संतोष झाला, आणि आरिमेझिज ह्याशीं दोन गोष्टी चापून बोलण्यास त्यास उमेद आली. तो प्रथम आपल्या लोकांचा समाचार घेऊन व त्यांस शाबासकी देऊन, बरोबर फारशीं मनुष्यें न घेतां, खोऱ्यामध्यें जाऊन आरिमे- झिज ह्यास भेटला. उभयतांच्या इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर, कोफीस ह्यानें शिकंदराशीं सामोपचारानें वागण्याविषयीं त्या सरदारास सुचविलें. तेव्हां त्यानें पहिल्या पेक्षां पुष्कळ अधिक वाचालता करून त्यास मोठ्या दांडगा- ईचें उत्तर दिलें. नंतर त्यावर एकही शब्द न बोलतां, कोफीस ह्यानें त्यास हातांत धरून बाहेर आणून शिकंदराचे जे लोक वर येऊन निशाण लावून आणि हत्यारबंद होऊन बसले होते, ते दाखविले. आणि त्यानें अमळ त्याचेजवळ होऊन हळूच ह्मटलें, "पाहिलेंना! शिकंदर बादशाहाच्या लोकांस खरोखरच पंख फुटले!" हा टोला आरिमेझिज ह्यास फार मर्मीं लागला. हें बोलणें चाललें असतां, कि- ल्ल्याच्या पायथ्याच्या वेढा घालणाऱ्या मासिदोनियन लो- कांनीं वरचें निशाण पाहून एकच मोठा जयजयकार केला, आणि नानाप्रकारचीं वाद्यें वाजविली. मग काय पुसावें? आरिमेझिज आणि त्याचें लोक हे दांतीं तृण भरून मासि- दोनियन लोकांच्या हातीं लागले. त्यांनीं आपणांस क्षमा

करण्याविषयीं शिकंदराची अनेक प्रकारें विनवणी केली. आणि जीवदानाकरितां त्याजपुढें त्यांनीं शतशः लोटांगणें घातलीं. परंतु, त्याचा क्रोध शांत झाला नाहीं. त्यानें त्या सर्वांचे पराकाष्ठेचे हाल करून त्यांस अत्यंत क्रूर रीतीनें त्या किल्ल्याच्या पायथ्याशींच ठार मारविलें! आरिमेझिज हा प्रथमच नम्रतेनें वागता, तर असा भयंकर परिणाम झाला नसता. हें वर्त्तमान इसवी सनापूर्वी ३२८ वे वर्षी घडलें.

ह्यानंतर एकदोन लहानलहान राष्ट्रें अल्प श्रमानें जिंकिल्यावर, शिकंदरबादशाहा बाझारिआ ह्या नांवाच्या प्रांतांत प्राप्त झाला. तेथें अरण्यें फार मोठालीं होतीं, आणि त्यांमध्यें सिंहव्याघ्रमृगादि पशु अपरिमित होते. त्यांमध्यें एके समयीं शिकंदर बादशाहा शिकारीस गेला. तेथें एक मोठा अक्राळ विक्राळ सिंह त्याचे आंगावर चवताळून धांवून आला. तेव्हां त्या शूर राजानें आपल्या बरचीनें भोंसकून तेथच्या तेथें त्यास ठार मारिलें. हें वर्तमान त्याचे लोकांस समजलें; तेव्हां त्यांनीं त्याच्या धैर्याची मोठी वाहवा केली, आणि एवढ्या संकटाचे वेळीं त्याचें रक्षण झालें ह्मणून परमेश्वराचे आभार मानिले. परंतु, असे अवघड प्रसंग वारंवार येऊं नयेत ह्मणून त्यांनीं मोठ्या आग्रहानें असा नियम ठरविला कीं, राजानें, बरोबर बरेच हत्यारबंद लोक घेतल्याखेरीज शिकारीस जाऊं नये. ह्यावरून, राजाच्या जीवावर केवळ त्याची एकट्याचीच सत्ता असते असें नाहीं, तर त्यावर प्रजेचीही सत्ता असते, हें त्यांस कळत होतें, असें दिसतें. आणि मोठमोठे पशु मारल्याच्या लौकिकानें शिकंदरासारख्या पराक्रमी राजाच्या कीर्तीस भर पडावयाची नाहीं, हीही गोष्ट त्यांचे मनांत आली असावी, असें वाटतें.

काहीं दिवस विसांवा घेतल्यावर शिकंदर बादशाहाची स्वारी बाझारिआ येथून निघून मरकंदा येथें आली. तेव्हां तेथें कांहीं फंदफितूर झाला होता, तो त्यानें आधीं मोडून टाकिला. हें ठिकाण हस्तगत झाल्यापासून येथें आर्ताबाझस ह्या नांवाच्या एका गृहस्थास सुभेदार नेमिलें होतें. तो फार वृद्ध असल्यामुळें त्याला तें काम उरकेना, ह्मणून त्यानें शिकंदरास आपले कामाचा राजीनामा दिला. तेव्हां त्या जागेवर क्लितस ह्या गृहस्थाची नेमणूक राजानें केली. हा गृहस्थ मासिदोनच्या संस्थानाचा फार जुना चाकर होता. हा फिलिपराजाच्या फार उपयोगीं पडला होता; तेणेंकरून त्याजवर त्याचा फार लोभ असे. स्वतः शिकंदर बादशाहा ग्रानिकस येथील युद्धामध्यें, डोकें उघडें टाकून शत्रूशीं झगडत होता, आणि तितक्यांत कोणी इराणी सरदार त्याच्या मस्तकावर शस्त्रप्रहार करण्याकरितां हात उगारून मोठ्या आवेशानें आला होता, तेव्हां क्लितस ह्यानें मोठ्या शौर्यानें त्याचा हात आपल्या बरचीनें वरचेवर उतरून आपल्या प्रभूचा प्राण वांचविला होता. आणखी, क्लितसाची बहीण हिलानिस ही शिकंदराची लहानपणची बाळगती होती; आणि त्याला प्रत्यक्ष आईसारखा तिचा लळा लागला होता. इत्यादि अनेक कारणांवरून शिकंदर बादशाहा हा क्लितसास मोठ्या योग्यतेचा पुरुष समजून मान देत असे. हा क्लितस, नवीन नेमणूक झाल्या प्रमाणें मरकंदा येथील सुभेदारीचें काम पाहूं लागला.

मरकंदा येथें शिकंदराचा मुक्काम बरेच दिवस पडला होता. तेव्हां तो कधीं कधीं आपल्या पंक्तीस आपले विशेष प्रीतींतले सरदार भोजनास बोलावीत असे. त्यास व

त्याच्या मंडळीस मद्यपानाचें फार व्यसन लागलें होतें. तेणें-करून अशा जेवणावळीमध्यें फार गोंधळ होत असे. आणि त्यापासून केव्हां केव्हां वाईट परिणाम घडत. एके दिवशीं सायंकाळीं अशी मोठमोठी मंडळी त्यानें भोजनास बोलाविली होती. ती वेळच्या वेळीं आली; आणि आपापल्या जागीं बसून जेवूं लागली. त्या प्रसंगीं शिकंदर अतिशयित मद्यपानाच्या योगानें बेफाम होऊन अद्वातद्वा बडबडूं लागला. त्यांत त्यानें आपला पिता फिलिप राजा ह्याची निंदा आणि आपली स्वतःची स्तुति इतकी चालविली कीं, तिच्या योगानें जवळच्या सद्गृहस्थांस फार वाईट वाटलें. ते आंतले आंत कुचकुचूं लागले; परंतु, उघडपणें त्याविषयीं बोलण्यास कोणाची छाती होईना. त्या मंडळींत क्लितस-ही होता. त्यास फिलिप राजाची निंदा ऐकून अतिशयित संताप आला, आणि त्यांत त्यानें दारू प्याल्यामुळें त्याला तिचा अमल चढला होता. अशा अवस्थेमध्यें, काय बोलावें आणि काय न बोलावें ह्याचें भान त्यास राहिलें नाहीं. तो आधीं थोडें कांहीं आपल्या शेजारच्या गृहस्थाच्या कानांत हळूच फुटफुटून, नंतर युरिपिदीज ह्या नांमांकित कवीच्या काव्यांतला एक श्लोक सर्वांस ऐकायास येण्यासारखा मोठ्यांनीं गाऊं लागला. त्याचा आशय असा होता कीं, ग्रीक लोक आपल्या शूर राजांचीं मात्र नांवें चिरायु होण्याविषयीं तीं पाषाणादिकांवर खोदून प्रयत्न करितात; परंतु, ज्या इतर शूर पुरुषांनीं त्या राजांस यश प्राप्त करून देण्याचे कामीं आपले प्राण दिलेले असतात, त्यांचीं नांवें मागें राहण्याविषयीं ते कांहींच उद्योग करीत नाहींत. ही चाल फार वाईट आहे. हा श्लोक शिकंदराच्या अंतःकरणास केवळ वज्रासारखा

झोंबला. तो अतिशयित संतप्त होऊन उभा राहिला. इकडे क्लितसहाही अत्यंत क्रोधाविष्ट झाला. शिकंदर बादशाहा त्याची, फिलिप राजाची, आणि फिलिप राजाच्या वेळच्या सरदार लोकांची अमर्याद निंदा करूं लागला, तेव्हां त्याजकडे हात करून डोळे वटारून आणि भोंवया वर चढवून क्लितस मोठ्या आवेशानें ओरडून ह्मणाला, "अरे तूं माझी निंदा करितोस काय ? कांहीं चिंता नाहीं. तरी, ग्रानिकसच्या लढाईचे वेळीं ह्याच हातानें तुझा जीव वांचविला आहे बरें! अरे राजा, ज्या जुन्या सरदारांस तूं भितरे आणि बुळके ह्मणतोस, ते तुझ्या बापाच्या वेळीं रणांगणीं जर न पडते, तर हें आतांचें वैभव तुला खचीत खचीत प्राप्त झालें नसतें बरें! अरे, आह्मी तुजकरितां आपलीं शिरें हातांवर घेतलीं आहेत, तरी त्याबद्दल तुझे हातून आह्मांला पुढें काय प्राप्त होईल, हें पार्मिनिओ ह्याच्या भयंकर वधावरून आह्मांस कधींच कळून आलें आहे." हें शेवटचें बोलणें शिकंदरास फार वर्मी लागलें, आणि तो त्याचे अंगावर धांवून चालला. तेव्हां क्लितस आणखी असें बोलला कीं, "ठीकच आहे! तुला निस्पृह आणि स्वतंत्र मनुष्याचें खरें बोलणें रुचावयाचें नाहीं! जा, गुलामांच्या मंडळींत जाऊन बैस; ह्मणजे ते खोटेंनाटें बोलून देखाप्रमाणें तुझी स्तुति करितील." हे शब्द ऐकतांच शिकंदर, आपल्या मागच्या शिपायाच्या हातांतली बरची घेऊन क्लितस ह्याचे अंगावर धांवला. तेव्हां जवळच्या मंडळीनें जलदी करून त्यास तेथून काढून दिलें, ह्मणून तें तितकेंच राहिलें, आणि मंडळीमध्यें इकडच्या तिकडच्या दुसऱ्या गोष्टी चालल्या. इतक्यांत, मंडळीची नजर चुकवून, क्लितस दुसऱ्या दारानें आंत आला, आणि पूर्वोक्त

उपहासपर श्लोक उंच स्वरानें गाऊं लागला. त्या वेळीं शिकंदरानें त्याचे उरांत बरची खुपसून तेथच्या तेथें त्याचा प्राण घेतला!

हें पापकर्म रागाच्या आवेशांत झालें, तेव्हां शिकंदरास त्याविषयीं कांहीं वाटलें नाहीं. परंतु, क्लितस ह्याचे उरांतून भळभळां रक्त वाहात आहे, आणि तो प्रेत होऊन जमिनीवर पडला आहे, असें त्याच्या दृष्टीस पडतांच त्याची दारूची झिंगी आणि क्रोधाचा आवेश हीं दोन्हीं चटकर उतरलीं, आणि आपण केवढें घोर कर्म केलें आहे असें त्यास वाटून, तो बेशुद्ध होऊन धाडकर जमिनीवर पडला! सेवक जनांनीं त्याला सांवरून धरिलें, आणि कांहीं सीतोपचार केले तेव्हां तो किंचित् शुद्धीवर आला, आणि जवळची बरची उचलून आपल्या उरांत खुपसून घेऊं लागला. ती त्याचे हातून जवळच्या लोकांनीं मोठ्या प्रयासानें घेतली ह्मणून बरें झालें; नाहीं तर त्यानें त्या वेळीं खचीत आत्महत्या करून घेतली असती. "इतर सर्व असो, पण हिलानिस हिला मी आतां कसें तोंड दाखवूं!" असें ह्मणून उष्णश्वास टाकून तो वारंवार अतिशयित दुःख करूं लागला. पश्चात्तापानें तो अगदीं भ्रमला असें दिसूं लागलें. तेव्हां त्याच्या सेवकांनीं त्यास तेथून उचलून त्याच्या दिवाणखान्यांत नेऊन ठेविलें. तो तेव्हांपासून दोन दिवस एकसारखा रडत होता. पुष्कळ रडून रडून आणि एकसारखा आक्रोश करून करून त्याचीं गात्रें अगदीं विकल झालीं. तेणेंकरून तो प्रेतासारखा जमिनीवर पडला. त्याला बोलायाचें देखील सामर्थ्य राहिलें नाहीं. त्याचें सांत्वन करण्यास तेथें पुष्कळ मोठमोठे लोक येऊन गेले, पण त्यांजकडे त्यानें डोळे उघडून नुसतें पाहिलें सुद्धां नाहीं. तेव्हां, राजा सावध

होतो कसा, हा सर्वांस मोठा विचार पडला. आरिस्तांदर ह्मणून कोणीएक गृहस्थ तेथें होता. त्यानें शिकंदरास असें सांगितलें कीं, "ह्मितस उत्तम शुभ्र पोशाक करून माझ्या स्वप्नांत आला होता; तो स्वतः असें बोलला कीं, जें झालें तें सर्व ईश्वरी योजनेप्रमाणें झालें, त्याचा दोष शिकंदराकडे मुळींच नाहीं." हें ऐकून राजास किंचित् बरें वाटलें. आणखी, आनाक्शारकस ह्मणून एक त्यावेळचा मोठा तत्त्वज्ञानी होता, त्यानें राजापाशीं जाऊन असें ह्मटलें कीं, "अरे, ज्या शिकंदराकडे आज सगळी दुनया पाहत राहिली आहे, तोच का शिकंदर हा! पहा, एवढ्या मोठ्या पराक्रमी जगविख्यात पुरुषानें असें एकाद्या दुबळ्याप्रमाणें भुईवर ढसढसा रडत पडावें, हें शोभतें काय? राजा, तुझी जी इच्छा तोच शुद्ध न्याय, असें सर्व राष्ट्रें मानितात, हें तुला ठाऊक नाहीं काय? अरे, ज्या त्वां एवढालीं मोठीं राष्ट्रांचीं राष्ट्रें पादाक्रांत करून आपणास सर्व जगाकडून सार्वभौम राजा म्हणविलें आहे, त्या त्वां, यःकश्चित् लोकापवादास भिऊन असें तळमळत पडावें हें योग्य आहे काय? हें ऐकून शिकंदर आणखी थोडा अधिक सावध झाला. तरी, उपास करकरून प्राणत्याग करण्याचा हेका तो सोडीना, आणि अन्नस्पर्श करीना. असे कांहीं दिवस लोटल्यावर, जवळच्या लोकांच्या आग्रहानें तो थोडें थोडें अन्न खाऊं लागला, आणि पूर्वस्थितीस आला. ज्या शिकंदरानें पृथ्वींतलीं बहुतेक सर्व राष्ट्रें जिंकिलीं होतीं, त्यास आपल्या क्रोधास जिंकितां आलें नाहीं, इतकेंच केवळ नव्हे, तर उलटें क्रोधानें त्यास जिंकून आपलेंसें करून टाकिलें होतें. हें पाहून चित्तास मोठा विस्मय होतो. असो.

ह्यानंतर दाही लोकांवर स्वारी करावी, असा शिकंदरानें

बेत केला; कारण, स्पितामिनीज हा त्यांमध्यें जाऊन आश्रय धरून राहिला आहे, असें त्यास समजलें होतें. परंतु, तो मोठा दैववान् होता. त्यास स्पितामिनीज ह्यास धरण्यास ही स्वारी करण्याचें प्रयोजन पडलें नाहीं. कारण, तो इकडून तिकडे आणि तिकडून दुसरीकडे तोंड चुकवीत फिरत असतां त्याची बायको त्याजबरोबर होती, ती ह्या पळापळीस अगदीं त्रासून गेली होती, आणि त्यामुळें ती आपल्या नवऱ्यास शिकंदराचे स्वाधीन होण्याविषयीं वारंवार आग्रह करीत असे. पण तो अभिमानी पुरुष तिचें ऐकेना; तेव्हां, एके रात्रीं त्यास निद्रिस्त पाहून, तिनें आपल्या हातांनीं तरवार घेऊन त्याची मान कापिली! त्या वेळीं तिला असें वाटलें कीं आपण आज जें हें कृत्य केलें आहे, त्याच्या योगानें शिकंदर बादशाहा आपणावर फार खूष होऊन आपणास एकादें मोठें बक्षीस देईल. ह्मणून ती जशीची तशीच, रक्तानें माखलेल्या हातांनीं तें प्रेत बरोबर घेऊन राजाकडे आली, आणि तें शिर त्यापुढें ठेवून सर्व वृत्तांत सांगती झाली. तें तिचें राक्षसी कृत्य पाहून शिकंदरास फार वाईट वाटलें; आणि, तिला तेव्हांच्या तेव्हां आपल्या लष्करांतून हांकून लावण्याविषयीं त्यानें हुकूम केला.

शिकंदराचे लोकांस मार्गामध्यें इतकीं संकटें आलीं, आणि त्यांचे इतके हाल झाले, तरी ते एकएक दिवस आपलें पाऊल आशिआखंडामध्यें पुढें पुढें टाकीत चालले होते. ह्यास कारण राजाचें विलक्षण धैर्य होय. मरकंदा येथील कामकाज आटोपल्यावर शिकंदराची स्वारी गाबाझा ह्या नांवाच्या देशाकडे जावयास निघाली. त्यांस वाटेमध्यें पर्जन्यवृष्टि आणि विद्युत्पात ह्यांनीं इतकें घाबरवून सोडिलें

कीं, सर्व लोक जागचे जागीं स्तब्ध बसले, आणि आकाशची कुऱ्हाड आपणांवर केव्हां पडेल कोण जाणे असें मनांत आणून अत्यंत भयभीत झाले. राजा खेरीज करून बाकी सर्वांची अक्कल गंगून गेली. ह्या भयंकर वृष्टीमध्यें त्याचे सुमारें एक सहस्र लोक प्राणास मुकले. ही हानि लहान नव्हे, तरी त्या पुरुषानें आपलें धैर्य खचूं दिलें नाहीं. सर्व लोक चिंताक्रांत आणि अव्यवस्थित पडलेले असतां तो स्वतः घोड्यावर बसून त्यांजकडे जाई, कोणास काय पाहिजे होतें हें पाही, जें कोणी कांहीं मागे तें त्यास लागलेंच देई, आणि हा प्रतिकूल काल निघून जाऊन चांगली सुखाची वेळ लवकरच येईल, असें त्यांस सांगून त्यांचें सांत्वन करी. अशा प्रकारें पांच चार दिवसांत ते लोक बरेच सावध झाले. तेव्हां त्यांस बरोबर घेऊन शिकंदरबादशाहा सासी ह्या नांवाच्या राष्ट्रांत प्राप्त झाला. तेथल्या राजाचें नांव आक्स्यार्तिस असें होतें. त्यानें, शिकंदराचें सामर्थ्य जाणून अत्यंत नम्रपणानें त्याचें आदरातिथ्य केलें; आणि त्यास आपले घरीं एकदा मेजवानीस बोलाविलें. त्याप्रमाणें तो तेथें आला आणि भोजनास बसला. इतक्यांत आक्स्यार्तिस ह्याच्या तरूण आणि अत्यंत सुस्वरूप मुलीकडे त्याची दृष्टि गेली; तेव्हां तिला तो इतका भुलला कीं, ती त्यानें त्या राजापाशीं लागलीच मागून घेऊन, तिशीं, आपल्या देशरीतीप्रमाणें लग्न लाविलें. ही गोष्ट मासिदोनियन लोकांस फार अप्रशस्त वाटली; कारण जिंकलेला राजा तो आपला गुलाम असें ते समजत. परंतु अप्रिय भाषणाच्या योगानें क्लितसाची अवस्था कशी झाली ती त्यांनीं नुकतीच पाहिली होती; ह्मणून ह्या लग्नाविषयीं त्यांच्या तोंडांतून एक शब्द देखील बाहेर पडला नाहीं.

हिंदुस्थानाच्या संपत्तीविषयींची माहिती शिकंदरास फार दिवसां पूर्वी कळली होती, व तेव्हांपासून तो ह्या देशावर स्वारी करण्याचा विचार करीत होता. ती वेळ आतां जवळ आली आहे, असें त्यास वाटून त्यास मोठा आनंद झाला, आणि त्यावर जाण्याची तयारी तो मोठ्या उल्हासानें करूं लागला. स्वारीस बाहेर पडल्यापासून त्यानें ज्या ज्या कृत्यास हात घातला, त्यांत त्यांत त्यास यशच येत गेलें, अपयश असें कधींच आलें नाहीं; तेणेंकरून त्यास अतिशयित गर्व झाला होता; व आपणास लोकांनीं देवावतार तर मानिलेंच आहे, पण साक्षात् देव मानून अगदीं त्याप्रमाणें भजावें अशी फार इच्छा झाली. राजास अशा वेड्या इच्छा उत्पन्न होण्याचा उशीर; त्या तृप्त करणारे सहस्रावधि तोंडपुजे लोक जवळ हात जोडून उभे असतात. त्याप्रमाणें शिकंदरबादशाहाचें देव्हारें माजलें. त्याचे लोक त्याला देव देव ह्मणूं लागले, व तसे भजूं ही लागले. हें आपलें नवें वैभव स्पष्ट प्रदर्शित करण्याकरितां त्यानें आपल्या सर्व लोकांस एक मोठी टोलेजंग मेजवानी दिली. त्या वेळीं क्लिअन ह्या नांवाच्या एका स्तुतिपाठकानें, पूर्व संकेतानुरूप शिकंदरास तेथून आंतल्या बाजूस जाऊं देऊन, सभेमध्यें त्याची अतिशयित प्रशंसा केली. आणि त्या बोलण्यांत असें दर्शविलें कीं, शिकंदर बादशाहाचें देवत्व तत्वज्ञानी ह्मणविणाऱ्या पुरुषांनीं आधीं कबूल केलें, ह्मणजे बाकीचे साधारण लोक सहज कबूल करितील. ह्या बोलण्याचा रोख, कालिस्थिनीस ह्मणून जो तत्त्ववेत्ता तेथें मंडळींत बसला होता, त्याकडे होता. हा पुरुष आरिस्तातलाचा आप्त होता. आणि त्यानें हा बुद्धया शिकंदराबरोबर दिला होता. आपला प्रिय शिष्य तरुण

आहे; त्यास एकादें दुर्व्यसन लागूं नये, त्यानें भलत्याची संगति धरूं नये, आणि इंद्रियसुखोपभोगांत मग्न होऊन आपला नाश करून घेऊं नये, ह्याकरितां ती योजना त्यानें केली होती. आणि तो त्याप्रमाणें आपलें कर्तव्यकर्म उत्तम रीतीनें करीत असे. आणि तेणेंकरून शिकंदर त्याशीं मोठ्या मर्यादेनें वागत असे. तो होमरकवीच्या काव्यांतील-एक वाक्य त्या तरुण राजास वारंवार ह्मणून दाखवी; त्याचा आशय असा होता कीं, "बाबा, तूं जर स्वेच्छाचार करूं लागलास, तर तुझें आयुष्य कमी होईल." आणि शेवटीं तेंच खरें झालें.

क्लिअन ह्याचें बोलणें बराच वेळ चाललें होतें. त्यानें दोन तीनदा कालिस्थिनीस ह्यास टोमणा मारिला. तरी, त्याचें आटोपेपर्यंत तो सहनशील पुरुष एक अक्षरसुद्धां बोलला नाहीं. परंतु, शिकंदराची ती अमर्याद स्तुति त्यास अगदीं सोसेनाशी होऊन तो क्लिअन ह्याजकडे वळून ह्मणाला, "अरे इतकी ही अमर्याद प्रशंसा स्वतः शिकंदर बादशाहाला देखील आवडावयाची नाहीं, असें मला ठाऊक आहे. तो जर आतां येथें असता, तर तोच तुला उत्तर देता; परंतु, तो येथें नाहीं ह्मणून त्याचे वतीनें मी तुला सांगतों कीं, बाबा, देव तो देव, मनुष्य तो मनुष्य. देवाची योग्यता मनुष्यास कधींही यावयाची नाहीं. शिकंदर बादशाहा हा आज ह्या भूमंडळावर सर्वांत थोर आहे, त्याचे एवढा थोर पराक्रमी पुरुष ह्या जगामध्यें दुसरा कोणी नाहीं, ही गोष्ट निर्विवाद सत्य आहे. तथापि, तो देव नव्हे, मनुष्य आहे, हें खचीत समजलें पाहिजे. अरे बाबा, देव होण्यास त्याला प्रथम आपली मर्त्य काया टाकिली पाहिजे.

उगाच भलभलत्या गप्पा मारण्यांत काय अर्थ आहे?" असें तो बोलत होता तेव्हां सर्व मंडळी थक्क होऊन एकमेकांच्या तोंडाकडे पाहात स्तब्ध बसली होती. आणि शिकंदर बादशाहा हें सगळें वर्तमान जवळच पडद्यापलीकडे बसून पाहात होता. तो इतका सन्निध होता, हें बाहेरच्या मंडळीस-माहित नव्हतें. कालिस्थिनीस ह्याचें बोलणें आटपतांच, त्यानें आंतून गुप्तपणें क्लिअन ह्यास असा निरोप पाठविला कीं, "कोणी कांहीं ह्मणो, परंतु, इराणी लोकांनीं मला परमेश्वर मानून माझ्यापुढें लोटांगणें घातलीं पाहिजेत, अशी तूं तजवीज कर." त्याप्रमाणें त्यानें त्या लोकांस चांगली खरमरीत ताकीद दिल्यावर, ते त्या गोष्टीस कबूल झाले. इतक्यांत, जसें एकादें मोठें काम करून दमून यावें, तसा जलदीजलदीनें शिकंदर बाहेर येऊन आपल्या आसनावर बसला. तेव्हां त्याजपुढें इराणी लोकांनीं लोटांगणें घातलीं! काय करतील बिचारे! प्रसंग गुदरला ह्मणजे गाजीचे पाजी होतात ते असे! असो.

कालिस्थिनीस हा फार विद्वान पुरुष होता, आणि तो शिकंदराविषयीं जें बोलला तें शब्दशः खरें होतें. परंतु, महत्वाकांक्षेनें अगदीं धुंद झालेला जो शिकंदर त्यास तें एकाद्या तीव्र बाणाप्रमाणें झोंबलें. तेणेंकरून त्याचे मनांतली त्याजविषयींची सगळी पूज्य बुद्धि नाहींशी होऊन, तो त्यास ठार मारण्यास कांहीं तरीं कारण शोधूं लागला. इतक्यांत हमोलास ह्या नांवाच्या मनुष्यानें, कांहीं खासगी कामाच्या चुरशीवरून, शिकंदरास ठार मारण्याचा बेत केला होता तो फुटला, आणि त्याची चौकशी चालली. त्या प्रकरणामध्यें पुष्कळ लोक सांपडले. त्यांस पुष्कळ हाणमार केली

तेव्हां ते सर्व गोष्टींस कबूल झाले. त्यांनीं कितीएक मोठमोठया लोकांचीं नांवें घेतलीं; परंतु, कालिस्थिनीस ह्याचें नांव खरोखर कोणीं घेतलें नव्हतें. परंतु, शिकंदरानें, वाऱ्याची मोट बांधून, त्या प्रकरणामध्यें त्या थोर पुरुषाचें नांव उत्पन्न करून, अपराधास कबूल होण्या करितां त्याचे नाना प्रकारीं हाल केले. ते त्यास इतके दुःसह झाले कीं, तो त्यांच्या योगानें लागलाच मरण पावला. अशा थोर पुरुषास असें मरण यावें काय? रालिन ह्मणून एका नामांकित फ्रेंच ग्रंथकारानें ह्याविषयीं असें लिहिलें आहे कीं, "कालिस्थिनीस हा खरा तत्त्ववेत्ता होता. राजापाशीं राहणारे जे लोक असतात, ते बहुतकरून तोंडपुजे, लुडबुडे आणि चोंमडे असे नीच असतात; आणि अशाच प्रकारचे लोक तेथें पसंत पडतात. कालिस्थिनीस ह्याचा स्वभाव तसा नव्हता; ह्मणजे तो स्पष्टवक्ता, आपल्या तत्त्वविचारामध्यें मग्न, आणि कोणाची परवा न बाळगणारा असा होता; तो राजाच्या कचेरीस आपोआप तर कधींच येतनसे, परंतु, त्याचें बोलावणें जाई तेव्हां देखील तो त्याजकडे येण्यास मोठा संकोच करी; असा पुरुष राजास कोठून पसंत पडणार? शिकंदराबरोबर त्या वेळीं इतर सहस्रावधि लोक होते. त्यांमध्यें पुढें होऊन खरें बोलण्यास एकाची सुद्धां छाती झाली नाहीं. आणि तें बोधप्रद सत्य कालिस्थिनीस ह्यानें उघड करून सांगितलें; तेणेंकरून तो प्राणांस मुकला!" सद्गुणाचा परिणाम असा भयंकर व्हावा, ही गोष्ट फार दुःखाची आहे. परंतु, जनाच्या दुष्ट वृत्तीपुढें कोणाचा उपाय चालत नाहीं. कालिस्थिनीस ह्याची अशी अवस्था झाल्यापासून त्याला खरोखर चांगली अशी मसलत कधीं

मिळाली नाहीं. कारण, जो तो आपले जीवाच्या रक्षणार्थ त्याच्या मर्जीचा कल पाहून बोले. त्यामुळें खरा पोक्त विचार एकीकडेसच राही. जवळच्या लोकांस राजाशीं असें वागण्याचा प्रसंग प्राप्त झाला, ह्मणजे त्या राज्यास खचीन उतरती कळा लागली असें समजावें. सेनिका नामक एका विचारी ग्रंथकारानें असें लिहिलें आहे कीं, "कालिस्थिनीसाचा वध हा शिकंदराच्या नांवास एवढा मोठा कलंक लागला आहे कीं, त्याच्या सद्गुणांवरून अथवा पराक्रमावरून जरी ह्याची कितीही कीर्ति पसरली, तरी हा डाग सर्व लोकांस निरंतर ढळढळीत दिसेल." हें ह्मणणें खरें आहे. शिकंदरानें अमुक इराणी लोकांस मारिलें, अमुक मोठमोठे राजे पदच्युत केले, अमुक राष्ट्रें जिंकिलीं, आणि अमक्या अमक्या दुर्गम प्रदेशामध्यें मोठ्या धैर्यानें प्रवेश केला, असें त्याचे स्तुतिपर भाषण कोणीं केलें ह्मणजे त्याजवर सेनिका त्यास ह्मणे कीं, "होय, तुह्मी ह्मणतां हें खरें आहे; पण त्यानें कालिस्थिनीस ह्यास विनाकारण ठार मारिलें, हें अत्यंत निंद्य कर्म केलें. ह्या कर्माच्या योगानें त्याच्या सगळ्या कीर्तीची अगदीं मृत्तिका झाली."

छावणीच्या मुक्कामामध्यें आणि अशा नानाप्रकारच्या भानगडींमध्यें बराच वेळ गेल्यावर, त्यानें हिंदुस्थानावर स्वारी करण्याची तयारी करण्याविषयीं आपल्या प्रचंड सैन्यास आज्ञा केली. त्याला नेहमीं कांहीं तरी उद्योग पाहिजे असे; आणि त्याला असें वाटे कीं, युद्धें किंवा स्वाऱ्या हीं बंद ठेवून जितका वेळपर्यंत आपण असे स्वस्थ बसूं, तितक्या वेळांत आपल्या तलवारबहादरपणाच्या कीर्तीचा लोकांच्या मनांवरचा ठसा कमी कमी होत जातो, हें ठीक नाहीं; ह्या दोन

कारणांवरून तो लढाया आणि स्वाऱ्या ह्यांचे बेतांवर बेत करी, आणि ते सिद्धीस नेण्यास झटे. वास्तविक ह्मटलें असतां हिंदुस्थानावर स्वारी करण्यामध्यें त्याला विशेष लाभ साधावयाचा नव्हता; परंतु, धामधुमीची आवड आणि महत्वाकांक्षा ह्यांच्या भरीस भरून त्यानें ह्या स्वारीची तयारी करविली. तिची हकीकत बरीच लांब आहे, आणि ह्या भागाची मर्यादा सरत आली आहे. ह्मणून तिचें निरूपण आतां पुढच्या भागीं करूं.

---

## भाग सातवा.

सिंहास नुसतें पाहिल्या बरोबरच जशीं इतर जनावरें भयभीत होतात, त्याप्रमाणें शिकंदर बादशाहाचें अक्रटोविकट सैन्य दृष्टीस पडतांच इतर राष्ट्रांची अवस्था होत असे. आपण कोणास दुखविलें नाहीं ह्मणजे आपले वाटेस कोणी जावयाचा नाहीं, असा जो साधारण समज सर्वत्र असतो, तो नाहींसा होऊन, शिकंदरास शरण न जातां स्वस्थ बसणें हा महदपराध आहे, असें लोकांस वाटूं लागलें होतें; कारण, अशा राष्ट्रांशीं, आधीं कांहींएक बोलणें न लावितां, तो त्यांजवर हल्ला करून त्यांची धूळधाणी करून टाकीत असे. त्याच्या स्वारीचा रोंख हिंदुस्थानाकडे वळतांच, त्याच्या मार्गांतले कितीएक राजेरजवाडे आपल्या सेनांसहवर्त्तमान त्यास जाऊन मिळाले, आणि आपणांस त्याचे सेवक ह्मणवूं लागले. तरी कांहीं राष्ट्रांचे राजे, आपल्या बचावाचा चांगला बंदोबस्त करून, आपापल्या राजधान्यांतून

बसले होते, असें त्यास समजलें. ह्मणून त्यानें हेफीस्तियन आणि परदिकास हे दोन सरदार बरोबर बरेंच सैन्य देऊन, अशा अभिमानी राजांचें पारिपत्य करण्यास पाठविले. आणि त्यानें त्यांस दुसरी एक अशी कामगिरी सांगितली कीं, सिंधुनदाच्या कांठीं जाऊन, सर्व सैन्यास पार जाण्यास पुरत अशा नौका तेथें बांधून तयार करून ठेवाव्या. सिंधुनदाशीं येऊन तो पोहोंचे तोंपर्यंत त्यास कितीएक लहान मोठ्या नद्या उतराव्या लागल्या. त्या उतरण्याकरितां त्यानें ज्या नावा बांधविल्या होत्या, त्या अशा होत्या कीं, त्या पाहिजेत तेव्हां निखळून गाड्यांवर घालून पाहिजेत तिकडे नेतां याव्या, आणि, अल्पायासें पाहिजेत तेथें पुनः जशाच्या तशा जोडून तयार करितां याव्या. ही युक्ति खरोखर फार उपयुक्त आहे. ही सांप्रतकाळीं कोठें प्रचारांत नाहीं. परंतु, इतक्या प्राचीन काळीं लोकांस अशा चमत्कारिक कला माहीत होत्या, ह्याचें मोठें नवल वाटतें. शिकंदर बादशाहा पायदळ आणि कांहीं घोडेस्वार आपणाबरोबर घेऊन पुढें निघाला, आणि बाकी राहिलेलें सैन्य मागाहून आणण्याविषयीं त्यानें क्रेतिरस ह्या सरदारास सांगितलें. तो पुढें त्यास लवकरच येऊन मिळाला. आपला प्रतापमहिमा राजे लोकांस बरोबर कळावा आणि त्यांनीं योग्य नम्र रीतीनें वागावें, ह्मणून, जे कोणी आपणाशीं दांडगाई करितील त्यांचीं राष्ट्रें अगदीं धुळीस मिळवावयाचीं, असा त्यानें निश्चय केला; आणि त्याप्रमाणें त्यानें कांहीं उदाहरणें करून दाखविलीं. एका शहरास वेढा घातलेला होता, आणि तें कोणीकडून हल्ला केला असतां हस्तगत होईल, हें पाहण्यास शिकंदर बादशाहा घोड्यावर बसून त्या भोंवतीं फिरत होता, इतक्यांत

आंतल्या लोकांकडून जो एक बाण सुटला, तो एकाएकीं येऊन त्याच्या आंगांत घुसला, आणि रक्त वाहूं लागलें. त्या जखमेकडे फारसें लक्ष न देतां तो शूर राजा त्या शहराभों- वतीं फिरला, आणि जो शोध करावयाचा होता तो त्यानें सिद्धीस नेला. हें धैर्य आणि ही सहनशीलता पाहून त्याच्या लोकांस मोठें आश्चर्य वाटलें; आणि आपापलीं कामें त्याप्रमाणें एकनि- ष्ठपणें करण्याविषयीं स्फुरण चढलें. तेव्हां तें शहर त्यांनीं अति त्वरेनें घेतलें, ह्यांत काय नवल आहे! असें स्फुरण, शि- कंदरबादशाहा कितीही वाचाळपणा करिता तरी त्या लोकां- मध्यें आलें नसतें.

ह्यानंतर त्याची स्वारी नैसा ह्या नांवाच्या शहराजवळ आली, आणि त्याच्या जवळच्या जंगलांत उतरली. ह्या सु- मारास फार थंडी पडली, आणि तिच्या योगानें सैन्यांतील लोकांचे फार हाल होऊं लागले. तेव्हां शिकंदरानें तेथचीं वाळलेलीं सगळीं झाडें तोडवून जागोजाग मोठमोठ्या आग- ट्या करविल्या; त्यांच्या योगानें लोकांस कांहींसें बरें वाटलें. नित्याच्या परिपाठाप्रमाणें त्याशहरास त्यानें वेढा घातला. त्या वेळीं आंतल्या कांहीं लोकांनीं मोठया निकरानें बाहेरच्या लोकांस पिटाळून लावण्याचा प्रयत्न केला, परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. शेवटीं, आंतल्या लोकांत दुफळी झाली; ह्मणजे, कांहीं लोक ह्मणत हल्ला करून आपलें नशीब कसें काय आहे तें पाहावें. आणि बाकीच्यांचें मत असें होतें कीं, ए- वढ्या प्रबल सैन्यापुढें आपलें कांहीं चालावयाचें नाहीं, त्यापेक्षां त्यास शरण जाऊन आपलें रक्षण करावें हें बरें. हें दुफळीचें वर्तमान शिकंदरास समजलें; तेव्हां ह्या शहरच्या लोकांच्यानें फार वेळ टिकाव धरवत नाहीं, असें खचीत जाणून, हल्या-

च्या भरीस न पडतां, त्या लोकांस बाहेरच्या प्रदेशाशीं दळणवळण ठेवण्याचा जो एक मार्ग होता, तो मात्र त्यानें बंद केला. तेव्हां त्या लोकांस नानाप्रकारच्या अडचणींनीं ग्रासिलें; तरी तसेच कांहीं दिवस त्यांनीं त्या स्थितीमध्यें काढिले. परंतु, शेवटीं निरुपाय होऊन, त्यांस शिकंदरास शरण यावें लागलें. त्यांस बादशाहानें, कांहीं एक इजा न देतां, मोठ्या ममताळूपणानें वागविलें. ह्या ठिकाणीं मासिदोनियन लोकांनीं साहा दिवस मोठा उत्सव केला.

येथून शिकंदराची स्वारी निघाली ती दीदाला ह्या नांवाच्या देशांत प्राप्त झाली. ह्या देशामध्यें मासिदोनियन लोकांच्या पराक्रमाची कीर्ति फार झाली होती; तेणेंकरून, तो देश घेण्यास त्यांस अगदीं देखील प्रयास पडले नाहींत. लहानसहान शहरें तालमीनें घेतलीं; आणि मोठमोठीं होतीं तीं शिकंदरानें काबीज केलीं. हें काम इतकें सहज होण्याचें कारण असें कीं, मासिदोनियन लोक जवळ आले, असें नुसतें ऐकूनच तेथील बहुतेक लोक अरण्यांत पळून गेले होते. हीं शहरें घेण्याचें काम आटोपल्यावर, बहुतेक सैन्य एकत्र करून, त्या सहवर्तमान, शिकंदरबादशाहा चोआस्पिस नदी उतरला. नंतर त्यास मासागा हें शहर लागलें. तेथला राजा आसाकानस हा नुकताच निवर्तला होता, आणि त्याच्या राज्याचा कारभार त्याची आई क्लिओफीस ही पाहूं लागली होती. तिजपाशीं ३०००० सैन्य होतें; आणि शहराभोंवतीं कोट, खंदक आणि पर्वत ह्यांचा एवढा जबर बंदोबस्त होता कीं, आपण वाट दिल्या खेरीज बाहेरच्या शत्रूस कधींही आंत प्रवेश करितां यावयाचा नाहीं, असा आंतल्या लोकांस पूर्ण भरंवसा होता. ह्या शहराच्या कोटबंदीचें काम

पाहण्याकरितां शिकंदर बादशाहा ह्याच्या सभोंवतीं फिरत असतां आंतून एक बाण येऊन त्याच्या पायाच्या पोटरींत घुसला. त्यानें तो आपल्या हातानें बाहेर काढिला, तरी रक्त तसेंच वाहात होतें. त्याजकडे फारसें लक्ष न देतां तो घोड्यावर बसून तसाच पुढें तें काम पाहात चालता झाला. तरी ती जखम जसजशी आंबत चालली तसतसें त्याला तें दुःख अधिकाधिक दुःसह होऊं लागलें. तें त्यानें कांहीं वेळ निमूटपणें सोशिलें. परंतु, शेवटीं अगदीं निरुपाय होऊन तो ह्मणाला, "मी जुपितराचा पुत्र आहें, असें पुष्कळ लोक शपथपूर्वक सांगतात. परंतु, मी कोणी देवावतार नाहीं, इतरांप्रमाणें मनुष्य आहें असें ह्या जखमेवरून मला पूर्णपणें समजून आलें!" इतकें झालें तरी त्यानें आपलें काम सोडिलें नाहीं. त्यानें प्रत्येक स्थल लक्ष लावून पाहिलें, आणि कोठें खंदकांत भर घालून कसा मार्ग करावयाचा, आणि बाहेरच्या बाजूस बुरूज कोठें बांधावयाचे हें बरोबर ठरवून, त्याप्रमाणें सर्व कामें मोठ्या झपाट्यानें चालू केलीं. ह्या खंदकाची भर करण्यास व बुरूज बांधण्यास त्याच्या भोंवतालचीं केवळ झाडेंच तोडिलीं नाहींत, तर लोकांचीं चांगलीं मोठालीं घरेंही मोडिलीं. आंतले लोक बरेच धैर्याचे होते. तरी, बाहेरच्या बाजूस एवढ्याशा अल्प काळांत, ह्मणजे नऊ दिवसांत, एवढे अकटोविकट बुरूज ज्यांनीं बांधिले ते ईश्वरांशी असावे, असें त्यांस वाटून ते भ्याले, आणि शस्त्रास्त्रें टाकून किल्ल्यांत जाऊन दडले. हें राणीच्या दृष्टीस पडतांच तिनें, कांहीं बायका बरोबर घेऊन, शिकंदराची भेट घेतली, आणि मोठ्या नम्रतेनें त्याशीं तहाचें बोलणें लाविलें. तें त्यानें मान्य केलें, आणि तिचें राज्य तिजकडे राहूं दिलें.

दिदाला येथून शिकंदराची स्वारी निघाली ती नीट ओरा शहराकडे चालली. तिकडे त्यानें आधींच आपला सरदार पालिसपर्कन ह्यास पाठविलें होतें. हें शहर त्या सरदारानें अगदीं सहज घेतलें. परंतु, त्यांतले लोक, औरनास ह्मणून जो एक मोठा उंचवटा जवळच होता, त्याजवर जाऊन राहिल्यामुळें, तेथें त्याच्या मनाप्रमाणें त्यास जय मिळाला नाहीं. ह्मणून त्यानें त्यावर हल्ला केला. इतक्यांत तेथें शिकंदराची स्वारी येऊन दाखल झाली. त्या प्रसंगीं उंचवट्यावरचे रानटी लोक विलक्षण धैर्यानें लढले. ते इतके कीं, येथें आपणास जयप्राप्ती खचीत होत नाहीं, असें शिकंदरास वाटलें. तरी त्यानें तें बाहेर दाखविलें नाहीं. परंतु, दोन दिवस हल्ल्याचें काम तहकूब करून, त्यानें आपल्या सर्व सैन्यास दोन मोठाल्यां मेजवान्या दिल्या, तेणेंकरून त्यांस नवें धैर्य येऊन त्यांनीं पुनः अशा आवेशानें त्यांजवर पुनः चाल केली कीं, तिच्या योगानें वरचे लोक अगदीं घाबरून गेले, आणि त्यांतल्या कितीएकांनीं तर त्या सुळक्यावरून खालीं उड्या टाकून आत्महत्या करून घेतल्या. अशा-प्रकारें तो * सुळकाही शिकंदराच्या हस्तगत झाला.

औरनास हा खडक स्वाधीन झाल्यानंतर, मधलें एक लहानसें ठिकाण घेऊन, सोळा दिवसांची मजल करून शिकंदर बादशाहा सिंधुनदाचे कांठीं प्राप्त झाला. तेथें त्याचा सरदार हेफीस्तियन हा त्याच्या आज्ञेवरून पूर्वींच येऊन, नद उतरण्याची सगळी तयारी करून राहिला होता. त्या सुमारास त्या प्रदेशाचा राजा मरण पावून, त्याचा पुत्र ऑफिस हा त्याच्या गादीवर बसण्याच्या विचारांत होता.

* हा उंचवटा सिंधुनदाच्या फार जवळ आहे.

त्याला शिकंदराचा पराक्रम कळला होता, आणि तो आपलें स्वतःचें बल जाणून होता; ह्मणून त्यानें आपण होऊन शिकंदरास असें सांगून पाठविलें कीं, "मी आपला आज्ञांकित सेवक आहें. मला सिंहासनारूढ होण्याची परवानगी मिळावी." त्याप्रमाणें त्यानें त्यास परवानगी दिली; परंतु, ऑंफिस ह्यास पुनः असें वाटलें कीं, शिकंदर स्वतः आपले राजधानीस येई तोंपर्यंत गादीवर बसूंनये हें बरें; ह्मणून त्यानें तो विचार तसाच ठेवून, शिकंदरास जाऊन भेटण्याची सिद्धता करविली. तो शिकंदराच्या लष्करांत जाऊन उतरला, आणि एकटा घोड्यावर बसून पुढें जाऊन त्यास भेटला. त्या दोघांसही एकमेकांच्या भाषा येत नव्हता; त्यामुळें प्रथम कांहीं बोलणें झालें नाहीं; तथापि, केवळ चर्यांवरून त्यांचीं अंतःकरणें एकमेकांस समजलीं, आणि ते मोठ्या स्नेहभावानें जवळ जवळ उभे राहिले. नंतर दुभाष्याच्या द्वारें ऑंफिस ह्यानें शिकंदरास असें ऐकविलें कीं, "मी आपलें सगळें सैन्य बरोबर घेऊन आलों आहें. हें सैन्य मी आपले स्वाधीन करण्यास सिद्ध आहें. आपण जे देश जिंकितां, ते केवळ कीर्त्यर्थ जिंकितां, हें मला ठाऊक आहे. मीं आपलें राज्य, सैन्य आणि हा आपला देह आपले पायांस अर्पिला आहे. आपण ह्यांचें पाहिजे तें करावें. आपणांस कीर्तिप्रमाणें दुसरें कांहीं प्रिय नाहीं, आणि विश्वासघातासारखें दुसरें कांहीं अप्रिय नाहीं, हें मी पूर्णपणें जाणतों." हें श्रवण करून शिकंदर परम संतोष पावला. त्यानें ऑंफिस ह्यास हातीं धरून जवळ बसविलें, आणि त्याशीं, दुभाष्याच्या द्वारें, फार प्रीतीनें भाषण केलें. त्यानें शिकंदरास छपन्न हत्ती नजर दिले, आणखी त्यांशिवाय नाना प्रकारचीं मोठमोठीं

चमत्कारिक जनावरें दिलीं तीं वेगळींच. तुह्मी आपलें राज्य चालवीत स्वस्थ राहावें असें शिकंदरानें ऑफिस ह्यास सांगितलें. इकडच्या तिकडच्या गोष्टी चालल्या असतां, शिकंदरानें ऑफिस ह्यास विचारिलें कीं, "विशेष उपयोगी लोक कोणते, शेतकरी कीं शिपायी?" त्यावर ऑफिस ह्यानें उत्तर दिलें कीं, "नेहमींची गोष्ट कशीही असो. परंतु, सांप्रत काळीं आह्मी शेजारच्या दोघां राजांशीं युद्ध करीत आहों, त्याअर्थी शिपायी अधिक उपयोगी आहेत, असें आह्मांस वाटतें." ठीकच आहे. वस्तुमाहात्म्य हें कालमहात्म्यावर अवलंबून असतें. ऑफिस हा ज्या दोन राजांशीं त्या वेळीं लढत होता, त्यांतील एकाचें नांव पौरस आणि दुसऱ्याचें आबिसेर्स असें होतें. ह्यांत पौरस हा फार बलिष्ठ होता. ह्या दोघांही राजांचीं राज्यें सिंधुनदाच्या पलीकडच्या बाजूस ह्मणजे हिंदुस्थानाकडच्या बाजूस होतीं.

ह्याप्रमाणें ऑफिस आणि शिकंदर ह्यांचें बोलणें झाल्यावर दुसरे दिवशीं आबिसेर्स राजाकडून तहाचें बोलणें लावण्याकरितां कांहीं वकील शिकंदराकडे आले. त्यांचें बोलणें अगदीं नम्रतेचें होतें, व त्यांचा यजमान शिकंदराच्या आज्ञेंत वागण्यास कबूल होता, तेणेंकरून, तें बोलणें मान्य झालें; आणि त्यांस त्यानें अभयवचन दिलें. हा जसा तह झाला, तसाच पौरस राजानेंही तह करून आपणापासून अभयवचन मिळवावें, असें शिकंदराच्या मनांत होतें; व त्याप्रमाणें त्यानें त्यास सूचनाही पाठविली होती; परंतु, मी हातांत तरवार घेऊन तुम्हांस आपल्या राज्याच्या सरहद्दीवर भेटेन, असें त्यानें त्यास उत्तर दिलें. हें उत्तर मोठ्या अभिमानाचें आणि दांडगाईचें होतें, हें शिकंदराच्या

लक्षांत येऊन त्यानें त्याजवर स्वारी करण्याची सिद्धता केली. त्याचें सर्व सैन्य हैदास्पिस नदीच्या कांठीं येऊन उतरलें. तिच्या पलीकडच्या बाजूस पौरस आपल्या सैन्यासह येऊन राहिला. ही नदी फार मोठी आहे; हिची रुंदी सुमारें ४०० वांवें असून, हिची खोली फार आहे. हिच्या पाण्यावर समुद्राच्या लाटांप्रमाणें मोठमोठ्या लाटा उसळतात; आणि हिजमध्यें लहान लहान बेटेंही पुष्कळ आहेत. ह्याखेरीज, हिचा पलीकडचा किनारा इतका उभा तुटलेला आहे कीं, त्याजकडे नुसतें पाहूनच भय वाटतें. हिला खळाळी फार आहे. अशी ही प्रचंड नदी आपणास कशी उतरतां येईल, अशी शिकंदराच्या सैन्यास मोठी भीति पडली. तें इकडे थबकून राहिलें, तसाच पौरसही तिकडे आपले ठिकाणीं तयारी करून स्वस्थ बसला. कोणीच पाऊल पुढें टाकीना. एजिसमाचस आणि निकानोर असे दोन शिकंदराकडचे लहानसे सरदार, एके दिवशीं, कांहीं लोक बरोबर घेऊन पोंहत पोंहत एका बेटावर गेले, आणि तेथें पौरसाचे जे लोक त्यांस सांपडले, त्यांस त्यांनीं ठार मारिलें. इतक्यांत पौरसाकडचे कांहीं लोक पोंहत पोंहत मोठ्या आवेशानें तेथें आले, आणि त्यांनीं शिकंदराकडच्या लोकांची कत्तल उडविली. ही सर्व गोष्ट पौरसास फार उत्तेजन येण्यासारखी झाली. आणि त्यास पहिल्यापेक्षां पुष्कळ अधिक आवेश चढला. रालिन ग्रंथकारानें असें ह्मटलें आहे कीं, "पौरसाचे लोकांस मारल्याबरोबर शिकंदराचे लोक जर तेथून निघून परत आपल्या छावणींत जाते, तर असा लागलाच उलट प्रकार घडताना; परंतु, पहिल्या तडाक्यासरसें जें सहज यश प्राप्त झालें, तेवढ्यानें ते तृप्त न होतां, अधिक

पराक्रम करण्याच्या आशेच्या भरीं भरल्या मुळें असा परिणाम झाला." ही गोष्ट खरी आहे. परंतु, आशेपुढें कोणाचें कांहीं चालत नाहीं.

"बेटावरचा वर सांगितलेला प्रकार पाहून शिकंदरबादशाहा किंचित् गोंधळून गेला; आणि, आपल्या नित्याच्या धोपट मार्गानें आपणांस या नदीपार जातां यावयाचें नाहीं, ह्यास्तव हें कृत्य कांहीं युक्तिप्रयुक्तीनें साधिलें पाहिजे, असें त्याच्या मनांत आलें. आणि त्याप्रमाणें त्यानें तें साधिलें; त्याचा प्रकार असाः— त्याच्या लष्कराच्या छावणीपासून बऱ्याच अंतरावर नदीमध्यें एक मोठें बेट होतें. त्यावर झाडी पुष्कळ होती. त्यावर आपण आपल्या सैन्यासहवर्तमान गुप्तपणें आधीं जाऊन राहावें; आणि त्या गोष्टीकडे पौरसास लक्ष द्यावयास अवसर सांपडूंनये ह्मणून, इकडे मुख्य लष्करामध्यें केतिरस ह्यानें स्वारीच्या तयारीची अशी मोठी गडबड करावी कीं ती पाहून पौरस ह्यानें आपल्या सैन्याच्या सिद्धतेस लागावें; असा त्यानें बेत योजिला. शिवाय, आपला स्वतःचा तंबू पौरसाच्या सैन्याच्या चांगला दृष्टीस पडे आणि आपण त्यांत आहों, असें वैभव त्यांस खचीत दिसे, अशी तजवीज केली. आणखी संशयनिवृत्तीकरितां, आणि शत्रूस भ्रांतीमध्यें पूर्णपणें घालण्याकरितां, स्वरूपानें आणि उठण्या बसण्याच्या ढबीनें हुबेहूब त्याचेसारखा आतालस ह्मणून जो एक पुरुष त्याच्या लष्करांत होता, त्यानें राजाचा दरबारचा पोषाक करून त्या तंबूच्या आसपास कधीं कधीं फिरावें, आणि जवळच्या लोकांनीं त्यास स्वतः राजाप्रमाणें पुढें पुढें करावें, अशी सक्त ताकीद देऊन ठेविली. ह्मणजे, पौरसाचें लक्ष पलीकडच्या मुख्य सैन्याच्या स्थितीकडे आणि आपल्या स्वतःच्या लष्क-

राच्या तयारीकडे गुंतावें, आणि आपण इकडे गुप्तमार्गेकरून त्याजवर एकदम हल्ला करून त्यास जिकावें, अशी युक्ति त्यानें योजिली. ती त्याच्या मनाप्रमाणें सफल झाली. सैन्य त्या मधल्या बेटावर आणण्याचे वेळीं वावटळ, विजांचा चकच-काट, मेघगर्जनेचा गडगडाट, आणि पावसाची लहान धार मुसळा एवढी, असा एकत्र योग येऊन, कांहीं वेळ दिशा अगदीं धुंद झाल्या होत्या, आणि आतां काय अनर्थ होतो कोण जाणे असा शिकंदराच्या लोकांस मोठा धाक पडला होता; परंतु, त्या भयंकर स्थितीच्या योगानें त्यांस कांहीं एक उपद्रव न होतां, उलटें बरेंच सहाय्य झालें; तें असें कीं त्यांच्या होड्यांच्या झुंडींच्या झुंडी जरी त्या बेटावर येत होत्या, तरी त्या शत्रूच्या ह्मणजे पौरसाच्या सैन्यास दिसल्या नाहींत. मनुष्याला एक दैव अनुकूल असलें, ह्मणजे, इतरांस ज्या गोष्टींपासून महत्संकटें भोगावीं लागावयाचीं, त्या गोष्टीं-पासून उलटी त्याची सोय होते, असें कोणी कोणी म्हणतात, तें खरें आहे.

क्रेतिरस हा पलीकडच्या किनाऱ्यावर मोठी गडबड करून राहिला होता; त्यास आलीकडे येऊं देऊं नये अशा विचारांत आणि तद्विषयींच्या प्रयत्नांत पौरस गुंतला असतां, शिकंदर बादशाहा, वर सांगितलेल्या त्या बेटाच्या मार्गानें, ६००० पायदळ आणि ५००० स्वार इतक्या सैन्यासहवर्तमान आ-लीकडच्या किनाऱ्यावर उतरला. हें वर्तमान समजतांच पौरसास मोठें नवल वाटलें, आणि भयही पडलें. त्यानें, एका क्षणाचाही विलंब न करितां, आपला मुलगा, २००० स्वार आणि १२० रथ इतकें सैन्य बरोबर देऊन त्याजवर पाठविला. ह्यांतील प्रत्येक रथावर दोन ढालतरवारवाले

शिपायी, दोन तिरंदाज, आणि दोन हत्यारबंद गाडीवान, असे साहा असामी होते. ह्या सैन्याची आणि शिकंदराची बरीच मोठी लढाई झाली. तींत पौरसाचा पुत्र पडला, आणि त्याच्या सर्व लोकांची दाणादाण झाली. त्या दिवशी नुकताच भारी पाऊस पडला होता, आणि तेणेंकरून त्या युद्धांगणामध्यें इतका चिखल झाला होता कीं, त्यामध्यें गाड्यांचीं चाकें जीं एकदा खचलीं, तीं मुळींच हालेनात, आणि घोड्यांचे पाय उचलेनात, हें त्याच्या पराभवास मुख्य कारण झालें. पुत्राच्या पराभवाच्या वर्तमानानें पौरस ह्यास फार दुःख झालें. परंतु, त्या गोष्टीचा खेद करीत बसण्याचा तो प्रसंग नव्हे, असें मनांत आणून, क्रेतिरस ह्याच्या दृष्टीस भ्रम पाडण्याकरितां कांहीं सैन्य छावणीच्या जागीं ठेवून, तो बाकीची सर्व सेना आपणाबरोबर घेऊन, शिकंदराशीं युद्ध करण्यास मोठ्या आवेशानें निघाला. तेव्हां त्याचे बरोबर ३०००० पायदळ, ४००० स्वार, आणि ३०० रथ इतकी लढाऊ फौज होती; आणि ह्यांशिवाय २०० हत्ती होते. तो हें आपलें लष्कर घेऊन एका कोरड्या रेताड मैदानामध्यें तें युद्धास सज्ज करून उभा राहिला. त्याचा प्रकार असाः—पुढच्या ओळीस पन्नास पन्नास हातांच्या अंतरानें एकएक हत्ती; त्यांच्या मागें आणि कांहीं दोहों बाजूंकडे असें पायदळ; आणि त्यांच्या मागें रथ; असा त्याचा व्यूह होता. हत्ती सर्वांच्या पुढें ठेवण्याचें कारण असें होतें कीं, ह्या विशाल प्राण्यांस पाहूनच शत्रूचे लोक आणि घोडे हे गर्भगलित होऊन पळायास लागतील, आणि ते पळायास लागले ह्मणजे ते भयंकर प्राणी बुजून त्यांजवर चवताळून जाऊन त्यांस तुडवून धुळीस मिळवितील, असें पौरसास खचीत वाटत होतें; ही

व्यवस्था पुरी होत होती; इतक्यांत शिकंदराचें नदीपलीकडचें सर्व सैन्य आपणाबरोबर घेऊन, क्रेतिरस आलीकडे येऊन त्यास मिळाला. एकएक पाऊल पुढें सरतां सरतां, दोन्हीं सैन्यें एकामेकांपासून गोळीच्या टप्प्यावर येऊन थडकलीं. ह्या ठिकाणीं त्यांचें तुमल युद्ध झालें. शिकंदराच्या सैन्यावर हत्ती घालून त्याची दाणादाण करण्याचा प्रयत्न पौरसाच्या सैन्यानें केला. परंतु, मासिदोनियन लोकांनीं मोठ्या निकरानें, एक जूट करून, त्या भयंकर प्राण्यांस वेढून, त्यांस बाणांनीं, भाल्यांनीं, बरच्यांनीं आणि तरवारींनीं इतकें घायाळ केलें कीं, ते अनावर होऊन पिसाळल्या जनावरांसारखे सैरावैरा धांवूं लागले! आधींच पशु आणि त्यांत खिजलेले, असे असल्यामुळें त्यांस स्वपरपक्षाचें भान राहिलें नाहीं; आणि त्यांनीं पौरसाच्या सैन्याची अगदीं दुर्दशा करून टाकिली! हें शिकंदराचें आयतेंच काम झालें. त्यानें आपल्या घोडेस्वारांस आणि पायदळास शत्रूवर हल्ला करण्यास स्वतः पुढें नेऊन त्याचा पुरता मोड करून टाकिला. ह्या युद्धांमध्यें पौरसाकडचे २०००० पायदळ आणि ३००० स्वार इतके लोक पडले; सर्व रथांचे तुकडे तुकडे होऊन गेले; बहुतेक हत्ती मेले व बाकीचे मासिदोनियन लोकांचे हातीं लागले; स्पिताकस ह्या नांवाचा एक सरदार मरण पावला; आणि दोन राजपुत्र पतन पावले. ह्याच्या मानानें शिकंदराकडचे अगदींच थोडे लोक पडले; ह्मणजे, सुमारें ८० पायदळाचे शिपायी, १० घोड्यावर बसणारे तिरंदाज, वीस स्वार, आणि एकदोनशें इतर शिपायी, इतकेच लोकें ह्या प्रसंगीं मेले, असें लिहिलें आहे. ही अल्प संख्या विश्वसनीय वाटत नाहीं; परंतु प्राचीन इतिहासकारांनीं हिजविषयीं शंका घेतल्याचें कोठें आढळत नाहीं.

ह्या युद्धांमध्यें पौरस केवळ पराभवला खरा, तरी त्यानें धैर्य सोडिलें नाहीं. त्याच्या बहुतेक सैन्याचा विध्वंस झाला, आणि स्वतः त्याच्या बाहूस एक जबर जखम लागली; तरी, जवळचे सगळे शिपायी नाहींतसे होत तोंपर्यंत तो रणांगणांतून आपले जागेवरून हालला नाहीं. हें त्याचें धैर्याचें कृत्य शिकंदर बादशाहा दुरून पाहात होता, त्यास त्याचें मोठें नवल वाटलें; आणि, अशा शूर पुरुषास साधारण शिपायांचे हातून मारविण्यापेक्षां त्याचें रक्षण करावें, आणि त्याचा बहुमान करावा, हें आपल्या थोरपणास विशेष शोभण्यासारखें आहे, असें त्याचे मनांत आलें. ह्मणून त्यानें ऑंफिस ह्यास त्यास दोन सामोपचाराच्या गोष्टी सांगून आपणाकडे परत बोलावून आणण्यास पाठविलें. तो आपल्या घोड्यावर बसून मोठ्या लगबगीनें, ज्या हत्तीवर पौरस बसून रणांगणांतून निघून जात होता त्याकडे चालला. हा आपला जुना शत्रु आपणाकडे येत आहे असें पाहून, पौरसानें आपला हत्ती त्याजवर घालण्यास मागें वळविला. त्याबरोबर ऑंफिस त्वरा करून निसटून गेला ह्मणून बरें झालें; नाहींतर तो त्या वेळीं खचीत प्राणास मुकला असता. ऑंफिस विन्मुख परत आला असें पाहून पौरस ह्यास समजावून आपणाकडे आणण्याकरितां शिकंदरानें मिरोएस ह्या नांवाचा दुसरा एक चांगला पोक्त विचारी पुरुष पाठविला. त्याची आणि पौरसाची पहिली कांहीं ओळख होती; व तो मनुष्य भलतेंच कांहीं सांगावयाचा नाहीं, अशी त्याची पक्की खातरी होती. तेणेंकरून त्याचें बोलणें त्यानें शांतपणें ऐकून घेऊन, शिकंदराकडे येण्याविषयीं त्याजपाशीं कबूल केलें. आणि मग लागलाच तो त्याजकडे गेला. तो शरीरानें मोठा धिप्पाड

असून फार तेजःपुंज दिसे. त्यास पाहून शिकंदरबादशाहा चकित झाला. आणि, अशा पुरुषास हलक्यासारखें वागविणें हें अगदीं अप्रशस्त आहे, असें त्यास वाटलें. इकड-च्या तिकडच्या कांहीं गोष्टी झाल्यावर शिकंदरानें पौरसास विचारिलें कीं, "आपणांस मीं कोणत्या रीतीनें वागवावें अशी आपली इच्छा आहे?" त्यावर पौरसानें उत्तर केलें, "मी राजा आहें असें समजून मला आपण वागवावें, अशी माझी इच्छा आहे." त्यावर शिकंदर बोलला, "तें तर मी आपण होऊन म्हणजे तुमच्या सांगण्याशिवाय करणार आहें; त्यांत कांहीं विशेष नाहीं; पण त्याखेरीज आपणांस आणखी काय पाहिजे?" तें ऐकून पौरसानें ह्मटलें, "मला दुसरें कांहीं नको; मीं जें प्रथम मागितलें आहे, तें मला आपण दिलें ह्मणजे त्यांत सर्व कांहीं येईल." ह्या उत्तराचें आणि पौर-साच्या सरल स्वभावाचें शिकंदरबादशाहास मोठें आश्चर्य वाटलें. त्यानें पौरसास पुनः त्याच्या सिंहासनावर बसवून, त्याचें राज्य त्यास दिलें, आणि भोंवतालचा आणखी कांहीं मुलूख त्याचे राज्यांत सामील केला. ह्या प्रकारेंकरून पौरसराजा पूर्वस्थितीप्रत पावून, शिकंदरबादशाहाच्या अर्ध्या वचनांत वागूं लागला. ह्या प्रकरणांत विशेष स्तुतिपात्र कोण, शिकंदर किंवा पौरस, हें बरोबर सांगवत नाहीं, असें रालिन नामक ग्रंथकारानें ह्मटलें आहे. आह्मांला असें वाटतें कीं, शिकं-दरबादशाहा हा विशेष स्तुतिपात्र आहे. कारण, त्यानें पौर-सास पुनः सिंहासनावर बसवून त्याचें राज्य त्यास दिलें, ह्या-वरून त्याचें औदार्य आणि परगुणाभिज्ञता हीं स्पष्टपणें दि-सून येतात.

मागें फिलिपराजाच्या कथेमध्यें ज्या घोड्याच्या परीक्षे-

विषयीं शिकंदराच्या बुद्धिचातुर्याचें वर्णन केलें आहे, तो घोडा शिकंदरबादशाहास युद्धादिप्रसंगीं फार उपयोगीं पडला होता, तेणेंकरून त्याची त्याजवर फार ममता असे. तो त्याला कधींही दूर ठेवीत नसे. तो घोडा, लष्कराची छावणी हैदास्पिस नदीच्या कांठीं असतां, तेथें मरण पावला.- कोणी म्हणतात तो युद्धामध्यें जखमी झाला होता तेणेंकरून मेला ; आणि कोणी असें म्हणतात कीं तो फार म्हातारा होऊन हातपाय पसरून मेला. ह्या घोड्यानें जेथें प्राण सोडिला, तेथें त्याच्या नांवाचें बुसिफालिया हें शहर बसविलें. त्याप्रमाणेंच त्याचा एक आवडता कुत्रा त्या लष्कराच्या छावणींत मेला. त्याच्या स्मरणार्थही त्याच्या नांवाचें एक गांव त्यानें बांधिलें, असें ह्मणतात. थोरांच्या कुत्र्यामांजरांच्या स्मरणार्थ जीं कृत्यें होतात, तीं साधारण लोकांच्या मातापितरांच्या स्मरणार्थ देखील होत नाहींत! हा ऐहिक वैभवाचा एक चमत्कार होय.

पौरस हा हिंदुस्थानचा एवढा पराक्रमी राजा असतां त्याचा आपण पराभव केला, असें मनांत आणून आपले पराक्रमाविषयीं शिकंदर बादशाहा मोठा गर्व वाहूं लागला. त्याला आपला विजयक्रम पुढें चालविण्याची नवी उमेद आली. आणि तो आपलें सैन्य बरोबर घेऊन एका मागून एक असे प्रांत घेत चालला. तो चिनाबनदी उतरला. तेव्हां त्याला दुसऱ्या पौरसाचें राज्य लागलें. हा पौरस, भेकड पौरस ह्या नांवानें प्रसिद्ध असे. तो प्रथमतः शिकंदराविषयीं पूज्य बुद्धि धरून तो येण्याची अगदीं वाट पाहात होता. परंतु, त्याचा शत्रु जो तिकडचा पहिला पौरस तो शिकंदराचा नाकचाब्रूल होऊन बसला आहे, असें त्यास समजतांच त्यानें

आपल्या वर्तणुकीचें धोरण फिरविलें; आणि तो शिकंदरास पाण्यांत पाहूं लागला. तो फार दुर्बल होता. आणि त्याचें राज्यही लहानसरच होतें. ह्यास्तव त्यावर स्वारी करण्याकरितां त्यानें हेफीस्तियन ह्यास पाठविलें. त्यानें तें राज्य सहज काबीज केलें, आणि पहिल्या पोरसास दिलें. नंतर शिकंदर बादशाहाची स्वारी सैन्यासहवर्तमान राबीनदी उतरली. तिच्या कांठचीं कांहीं राष्ट्रें एक कट करून त्याशीं लढण्यास सिद्ध झालीं आहेत, असें त्याला समजलें. त्या राष्ट्रांतील लोकांमध्यें क्याथेइयन हे लोक शरीरानें सुदृढ, संख्येनें पुष्कळ, आणि युद्धविद्येमध्यें बरेच प्रवीण असे होते. ते संगाला ह्या शहरामध्यें मोठ्या बंदोबस्तानें राहिले होते. त्यांच्या छावणीभोंवतीं मोठमोठ्या गाड्यांच्या तीन रांगा होत्या. त्यांवर शिकंदरानें हल्ला करून त्यांचा पराभव केला. ह्या प्रसंगीं त्या लोकांतले सत्राहजार लोक मासिदोनियन लोकांनीं ठार मारिले, आणि सत्तर हजार लोक पाडाव करून आपल्या छावणींत नेले! ह्या समरांगणामध्यें शिकंदराकडचे अवघे शंभर लोक पडले आणि सुमारें बाराशें जखमी झाले, असें इतिहासांतरीं लिहिलें आहे. उभयपक्षांच्या नाशांमध्यें एवढें महदंतर पाहून खरोखर नवल वाटतें.

क्याथेइयन लोकांच्या आणखी एक दोन टोळ्या आसपास होत्या, त्याही शिकंदरानें जिंकिल्या. आणि, गंगेच्या कांठच्या ज्या पिकाऊ आणि धनाढ्य प्रदेशांविषयीं त्यास नाना प्रकारचीं वर्तमानें समजून त्याचें मन उतावीळ झालें होतें, ते प्रदेश लवकर एकदा काबीज करून घेण्याच्या स्वारीकरितां तो पुनः सपाट्यानें तयारी करूं लागला. हा उत्साह काय तो स्वतः त्याचे ठायीं मात्र होता; आणि बाकी-

चे सगळे लोक, घरें सोडून फार दिवस झाल्यामुळें, व बरोबर आलेलें सोयरे धायरे नाना प्रकारच्या कारणांनीं मरण पावल्यामुळें अगदीं त्रस्त आणि निराश झाले होते, आणि आपलीं मुलेंमाणसें पुनः आपल्या दृष्टीस केव्हां एकदा पडतील, असें त्यांस झालें होतें. अशा लोकांस, पुढें जाण्याचा शिकंदराचा विचार जेव्हां समजला, तेव्हां ते अतिशयित संतापले, आणि कोणी कांहीं केलें तरी आतां आह्मी पुढें यावयाचे नाहींत, असें उघड बोलूं लागले. तें शिकंदर बादशाहास समजलें. तेव्हां दुसरे दिवशीं त्यानें आपल्या बरोबरच्या सर्व लोकांची एक मोठी सभा भरविली. आणि त्यांस लक्षून मोठ्या गंभीर मुद्रेनें भाषण केलें. त्याचें तात्पर्य असें:—"लोकहो, तुह्मी मज बरोबर पुढें येण्यास कबूल नाहीं, असें समजल्यावरून हें तुह्मांस पाचारण करून बोलावून आणिलें आहे. आतां मजबरोबर पुढें चलण्याविषयीं मीं तुमचीं मनें वळवावीं एक, अथवा, परत स्वदेशीं जाण्याविषयीं तुह्मीं माझें मन वळवावें एक, तिसरी तोड नाहीं. बाहेर पडल्यापासून आपले हातून जीं कृत्यें झालीं आहेत, तीं सर्व वाईट आणि अपमानास्पद अशीं जर तुह्मांस वाटत असलीं, अथवा स्वतः मजकडून जर तुह्मांला कांहीं इजा झाली असली, तरमग माझें कांहीं एक बोलणें नाहीं. परंतु, पाहा, आपण एवढाल्या नद्या आणि एवढाले समुद्र भगीरथ प्रयत्नांनीं ओलांडून इराणासारिखीं अनेक महाराष्ट्रें जिंकिलीं आहेत, आणि मिशांवर ताव देणारे मोठमोठे पराक्रमी पुरुष पादाकांत करून सोडिले आहेत, ह्याहून वेगळा यशस्कर पुरुषार्थ तो दुसरा कोणता आहे? बरें येथपर्यंत जर आपण आपला एवढा पुरुषार्थ गाजविला आहे, तर आणखी थोडें पुढें जाऊन

हिंदुस्थानामध्यें आपला विजयध्वज उभारण्यास आपण अनमान करावें काय? मासिदोनियन लोकहो, पुढें गेलें असतां आपणांस कोणी फार भयंकर शत्रु भेटेल, असें तुह्मांस वाटतें काय? जर असें वाटत असेल, तर तें केवळ भ्रांतिमूलक आहे. स्वतः माझें मत असें आहे कीं, उद्योगशील आणि तेजस्वी पुरुषांच्या उद्योगास मर्यादा नसावी; जो हेतु त्यांनीं मनांत आणिला असेल, तो शतशः प्रयत्न करूनही जर न साधेल, तरमात्र त्यांचें मन उदास होण्यास प्रसंग प्राप्त व्हावा; इतर दुसऱ्या कोणत्याही कारणानें त्यांची हिंमत खचूंनये. बरें, असें जर ह्मटलें, तर तुमचें धैर्य खचण्यास आजपावेतों एकतरी कारण उत्पन्न झालें आहे काय? आणखी, माझेतरी मनांत आतां पुढें फार दूर जावयाचें नाहीं; फक्त गंगा नदीपर्यंत जावयाचें आहे; आणि ती ह्मणजे फार दूर आहे असेंही नाहीं; जवळ आहे. हिंदुस्थानचें अखात इराणी अखातास मिळालेलें आहे. आपण हिंदुस्थानच्या अखातांतून इराणी अखातांत जाऊं; आणि मग सहज आफ्रिकेंत पोहोंचूं; तेथें आपलें राज्य आहेच. पण आपण जर येथूनच परतलों, तर हैफासिस नदी आणि पूर्वसमुद्र ह्यांच्या मधलीं राष्ट्रें जिंकावयाचीं तशींच रहातील. हीं अशींच स्वतंत्र राहिलीं, ह्मणजे ह्यांचे भोंवतालचीं जीं राष्ट्रें आपण जिंकून आपलींशीं करून ठेविलीं आहेत, त्यांस शेजाऱ्यांचें स्वातंत्र्यसुख पाहून कदाचित् आपणांवर उठण्याचा नवा आवेश येईल, आणि तीं सगळीं ह्मणजे, जिंकलेलीं आणि तशींच न जिंकलेलीं, हीं एकमत होऊन आपणांवर चालून येतील. असें जर घडलें, तर आजपावेतों केलेले आपले श्रम अगदीं व्यर्थ गेले, असें होणार नाहीं काय? परंतु, मा-

सिदोनियन लोकहो, विचार करा, आणि मजबरोबर पुढें येण्याचा दृढ निश्चय करा. पहा, बापहो, श्रम केल्याशिवाय आणि संकटें भोगिल्याशिवाय कीर्ति आणि वैभव हीं प्राप्त होत नाहींत. मोठाले पराक्रम करून जगामध्यें कीर्ति गाजवावी, हेंच जन्मसार्थक्य होय; ह्यांत जो आनंद आहे, तो दुसऱ्या कशांतही नाहीं; आणि असें नांव मागें ठेवून मरणें हेंही अत्यंत संतोषप्रद होय. मासिदोनियन लोकहो, आपल्या पूर्वजांस एके वेळीं अशीच मोठी कीर्ति प्राप्त झाली होती, ती अशींच महत्संकटें भोगून त्यांस मिळवावी लागली होती, हें तुह्मांस ठाऊक नाहीं काय? मी तुमचा राजा, ह्मणून मी खुशाल ऐषआराम भोगीत बसतों, आणि तुह्मांला मात्र तेवढे संकटांत घालितों, असें ह्मणून कुरकुरण्यास तुह्मांस जागा आहे काय? मी तुह्मांबरोबर एकसारखे परिश्रम करून सुखदुःखांस एकसारखा वांटेली होतों, हें तुह्मांस मीं सांगितलें पाहिजे असें नाहीं. मी तुह्मांस शपथपूर्वक असें सांगतों कीं, हें आशिआखंड सगळें माझ्या हस्तगत झालें, ह्मणजे माझें काम आटपलें. मग मी पुढें जावयाचा नाहीं. आणि तुम्हांस मजबरोबर चला, असें म्हणावयाचा नाहीं. एवढें हातीं धरिलेलें काम आटोपल्यावर, तुम्हांपैकीं ज्यांची इच्छा आशिआखंडांत राहावयाची असेल, त्यांस राहण्यासवरण्याच्या सगळ्या सोई मी करून देईन; आणि जे कोणी स्वदेशीं जाऊं इच्छितील, त्यांस मी मोकळें करीन. परंतु, जे कोणी आशिआखंडांत राहतील, त्यांजकडे पाहून स्वदेशीं गेलेले लोक मग वळवळतील, हें मात्र लक्षांत ठेवा."

हें भाषण ऐकून सर्व लोंक जागचे जागीं थक्क होऊन स्तब्ध बसले. तें त्यांस मानवलें नव्हतें, हें त्यांच्या मुखच-

यांवरून स्पष्ट दिसत होतें; परंतु, राजाचा दरारा एवढा होता कीं, त्याच्या पुढें त्याच्या इच्छेच्या विरुद्ध एक शब्द देखील बोलण्यास तेथें कोणाची छाती होईना. सुमारें अर्धी घटका सर्व लोकांचीं तोंडें अतिशयित उदास दिसत होतीं. कारण, आपलें मनोगत राजास कळवावें कसें आणि त्याप्रमाणें स्वदेशीं परत जाणें घडवावें कसें, ह्याची मोठी चिंता त्यांचे ठायीं उत्पन्न झाली होती. इतक्यांत, पालिमोक्रेतीस नांवाच्या शूर सरदाराचा पुत्र सीनस हा उभा राहून राजाकडे वळून अति नम्रपणानें ह्मणाला, "महाराज, आपण आम्हां सर्वांचे यजमान अहां. आपली आज्ञा आम्हांस शिरसावंद्य आहे. आपण आज्ञा कराल तीस आड येण्याची गोष्ट तर दूर असो; परंतु तिजविषयीं कुरकुरीचा एक शब्द बोलण्याची सुद्धां आमची सेवकांची प्रांज्ञा नाहीं. परंतु, ह्या प्रसंगीं आपण आह्मांस आज्ञेच्या बळानें नेऊं इच्छीत नाहीं, तर, आमचीं मनें वळवून सामोपचारानें न्यावयास यत्न करीत अहां असें दिसतें; आणि कोणास कांहीं बोलावयाचें असल्यास बिनदिकत बोलावें, असें आपण ह्मटलें आहे; ह्यास्तव मी चार शब्द बोलतों, इकडे अवधान असावें, आणि न्यूनाधिक्याविषयीं क्षमा असावी, अशी विज्ञापना आहे. आतां मी जें कांहीं बोलणार आहें, तें येथें जमलेल्या ह्या थोड्याशा सरदारांच्या वतीनें बोलणार नाहीं; तर, आपल्या स्वारी बरोबर जे लक्षावधि दुसरे लोक आहेत, त्यांच्या तर्फे आहे, हें मला आधीं कळविलें पाहिजे. आणखी, केवळ त्यांचा पक्ष धरूनच बोलणें योग्य नाहीं; तर, महाराज, जेणेंकरून त्यांचें आणि आपलें बरें होईल; असें मला बोललें पाहिजे. आह्मी शिपायी लोक मासिदोनियाहून आपणांबरोबर निघाल्या पासून

आज एकसारखे लढाया करून जय मिळवीत आलों आहों, आणि आतां अगदीं दमलों आहों, एवढेंच कारण स्वदेशीं परत जाण्याची आज्ञा मागण्यास बस आहे, असें मला वाटतें. महाराज, आपण मासिदोनियाहून जे इतके ग्रीकलोक आणिले होते, त्यांतले आतां आपल्या लष्करांत किती जीवंत राहिले आहेत, हें आपल्या लक्षांत असेलच. थिसेलियन लोक लढाईच्या कामास कंटाळले असें पाहून आपण त्यांस बाक्त्रा येथून परत जाण्यास परवानगी दिली, हें फार उत्तम काम केलें. कांहीं ग्रीक लोक आपण बांधिलेल्या नव्या शहरांत सुखवस्तू होऊन राहिले आहेत; तरी त्यांस तेथें चैन पडत नाहीं. त्यांतले कितीएक व मासिदोनियन लोकांतले कितीएक रणांगणीं पडून मरण पावले आहेत; तेव्हां त्यांजविषयीं कांहीं बोलावयास नको. परंतु, जे थोडेसे अद्यापपर्यंत आपणांबरोबर कष्टत आहेत, आणि अतिशयित कंटाळले आहेत, त्यांविषयीं विचार अवश्य केला पाहिजे. सांप्रत आपल्या स्वारीमध्यें जे मासिदोनियन आणि ग्रीक लोक आहेत, त्यांचे कितीएक सगेसोयरे समरांगणीं पडून मरण पावले आहेत; कितीएक जखमांच्या योगानें लोळे गोळे होऊन पडले आहेत; कितीएक नानाप्रकारच्या रोगांनीं मेले आहेत; आणि कितीएक आशिआखंडामध्यें आपापल्या सवडीप्रमाणें वस्ती करून मागें राहिले आहेत; तेणेंकरून ह्या बरोबरच्या लोकांचीं मनें अगदीं उद्विग्न होऊन गेलीं आहेत. आणि त्यांचे ठायीं आतां शरीरबलही राहिलें नाहीं. त्यांतील ज्या कोणांचीं आईबापें जीवंत आहेत, त्यांस त्यांस भेटण्याविषयीं अतिशयित उत्कंठा प्राप्त झाली आहे. आपलीं घरें, सोयरीं धायरीं, आणि बायकामुलें हीं केव्हां एकदा आपल्या दृष्टीस पडतील, असें

सर्वांस झालें आहे. हे लोक स्वदेशाहून प्रथम निघाले तेव्हां अगदीं दरिद्री होते; परंतु, आपल्या औदार्यानें आतां ह्यांस धनवान केलें आहे, तेव्हां अशा संधीस स्वकुटुंबांत जाऊन सुखानें कांहीं दिवस घालवावे, अशी जी त्यांस इच्छा झाली आहे, ती साहजिक आहे; ह्मणजे, तिजबद्दल त्यांस दोष लावितां कामास नये. ह्मणून, महाराज, आपण आणखी आह्मांस जुलूम करून, पुढें नेऊं नये. ज्या लोकांचीं मनें चाकरी वरून उडालीं आहेत, त्यांचे हातून, संकटसमयीं, कामगिरी कधींही चांगली व्हावयाची नाहीं. महाराज, आपणांसहीं इकडे दूरदेशीं येऊन बहुत दिवस झाले आहेत; आपणहीं घरीं चलावें, आपल्या पूज्य मातुश्रीचें दर्शन घ्यावें, ग्रीसच्या राज्याची पुनः नीट चांगली व्यवस्था लावावी, इष्टमित्रांस भेटावें, जे अमोलिक पदार्थ आपण मोठ्या पराक्रमानें मिळविले आहेत ते वडिलांच्या हातच्या राजमंदिरांत नेऊन ठवावें, आणि थोडासा विसांवा घ्यावा, अशी माझी विनंती आहे. थोडीशी विश्रांति घेतल्यावर, आपली मर्जी असल्यास पुनः दुसऱ्या स्वारीची तयारी करावी. ती तयारी ह्या स्वारीच्या तयारी पेक्षां फार चांगली होईल. कारण, आपणांबरोबर इकडे आलें असतां कसे जय प्राप्त होतात आणि कशी विपुल संपत्ति मिळते, हें तेथच्या तरुण आणि नव्या उमेदीच्या लोकांस आह्मांकडे पाहून सहज कळण्यासारखें आहे. आह्मी सगळे वृद्ध आणि अशक्त झालों आहों; आह्मांमध्यें कांहीं जीव राहिला नाहीं. आपणांस युद्धादिकांच्या कामांमध्यें आह्मांपेक्षां नवे तरुण आणि सशक्त लोक अधिक उपयोगीं पडतील, हें मीं सांगावें असें नाहीं. आणखी, महाराज, दुसरें, असें आहे कीं, कोणत्याही गोष्टींत नेमस्तपणा अवश्य

आहे ; 'अति सर्वत्र वर्जयेत्, ' असें जें ह्मटलें आहे, तें लक्षांत ठेविलें पाहिजे. आपणांस ह्या भूमंडळावर कोणाही मानव जातीय शत्रूचें भय नाहीं, ही गोष्ट सत्य आहे ; हिजविषयीं आह्मांस तिळभर देखील संशय नाहीं ; परंतु, परमेश्वरी सूत्र काय आहे, हें कोणास कळत नाहीं, आणि ह्मणून त्याविषयीं आधीं कांहीं योजना करून ठेवितां येत नाहीं."

सीनस ह्याच्या ह्या भाषणानें शिकंदर बादशाहास फार वाईट वाटलें ; परंतु तें इतर सर्व लोकांस फार पसंत वाटलें. त्यांच्यानें तोंडांतून अक्षर काढवलें नाहीं ; परंतु, त्यांच्या मुखचर्यांवरून त्यांचे अभिप्राय तेव्हांच दिसून आले. आपल्या सर्व लोकांचीं मनें परत जाण्याविषयीं उद्युक्त झालीं आहेत, आणि तेणेंकरून आपले इतके सगळे श्रम फुकट जाऊं पाहात आहेत, असें मनांत येऊन शिकंदर बादशाहा एक शब्दही न बोलतां, रागाच्या झटक्यासरसा, तेथून उठून जाऊन आपल्या तंबूंत बसला. तो दोन तीन दिवस पर्यंत तसा एकटा आंत होता. तितक्या मुदतींत तो आपल्या अगदीं जिवलग मित्रांपाशीं देखील कांहीं बोलला नाहीं. तो तंबूच्या बाहेर येईना, आणि कोणाशीं कांहीं बोलेना असें पाहून त्याचें सगळें सैन्य घाबरून गेलें ; आणि राजाची प्रकृति पूर्ववत् होण्याविषयीं मनोभावेंकरून परमेश्वराची प्रार्थना करूं लागलें. हें सगळें वृत्त शिकंदर हा आंतून पाहात होता ; आणि त्यास असें वाटत होतें कीं ह्या युक्तीनें तरी आपल्या लोकांचा स्वदेशीं जाण्याचा दुराग्रह दूर होऊन, आपले आज्ञेप्रमाणें, पुढें भागीरथीनदीपर्यंत जाण्याची इच्छा त्यास उत्पन्न होईल. परंतु, ही त्याची आशा निष्फळ झाली. तो कांहीं वेळानें बाहेर येऊन लोकांत मिस-

रून त्यांचीं मनें पाहूं लागला तों, तीं पूर्वीप्रमाणेंच स्वदेशा-कडे ओढ घेत होतीं. तरी, पहिला उतावीळपणा कांहीं कमी झाला होता. तेवढीच सवड साधून तो आपल्या सैन्यासहवर्त्तमान रावीनदी उतरला, आणि त्यानें सतलज नदीपर्यंत सगळा मुलूख काबीज केला. नंतर तो तेथून निघून चिनाब ह्या नदीच्या कांठीं आपला तळ देऊन कांहीं दिवस राहिला. इतक्यांत त्या प्रदेशामध्यें अतिशयित पर्जन्य पडून त्या नदीला मोठा थोरला पूर आला, आणि आसपासचा सर्व प्रदेश जलमय झाला, तेव्हां शिकंदरानें आपली छावणी तेथल्याच जवळच्या एका उंच ठिकाणावर दिली. येथें सीनस हा एकाएकीं आजारी पडून मरण पावला. तेणेंकरून राजास आणि सर्व सैन्यास फार दुःख झालें. हा पुरुष मोठा शूर होता. ह्यानें स्वदेशाच्या हितार्थ पुष्कळ परिश्रम केले होते. आणि शिकंदरापाशीं खरें बोलणें हें जरी कधीं कधीं फार भयं-कर असे, तरी योग्य प्रसंग आला असतां, हा खरी मसलत देण्यास मागेंपुढें पाहात नसे. तो स्वदेशहित हें आपल्या स्वतःच्या हितापेक्षां अधिक योग्यतेचें आहे असें मानी; आ-णि त्याप्रमाणें निरंतर वर्ते. असा गुणसंपन्न पुरुष सर्वप्रिय व्हावा, ह्यांत कांहीं नवल नाहीं. इतकें वर्तमान इ० स० पूर्वी ३२६ पर्यंत घडलें.

नंतर जलमार्गानें शिकंदरबादशाहाची स्वारी सैन्यासह-वर्तमान वायव्येकडे माली लोकांच्या देशांत आली. ते मोठे धैर्यशाली आणि शूर होते. त्यांच्याच शेजारच्या प्र-देशामध्यें आक्सैद्रेसी ह्या नांवाचे मोठे कडवे लोक राहात होते. हे दोन राष्ट्रांतले लोक निरंतर एकमेकांशीं भांडत

असत. त्यांचें सख्य असें कधींही नसे. असें होतें तरी, शिकंदरबादशाहा उभयतांसही शत्रु असा दिसूं लागला, तेव्हां ते एक झाले, आणि त्यांनीं १०००० स्वार, ८०००० पायदळ, आणि ९०० रथ इतकें सैन्य युद्धास सज्ज केलें. त्याच्या आणि शिकंदराच्या सैन्याच्या अनेक लढाया झाल्या. त्यांमध्यें शिकंदरास जय प्राप्त होऊन त्याचे शत्रु केवळ पराभव पावले, आणि ते दशदिशा पळून गेले. आक्सेद्रेसी लोक आपल्या मजबूद राजधानीमध्यें जाऊन मोठ्या बंदोबस्तानें वेशी लावून राहिले. त्या शहराभोंवतालची भिंत फार मोठी होती, तेणेंकरून, वेशी उघड्या नसल्या ह्मणजे, बाहेरच्या लोकांचा आंत प्रवेश होण्यास मुळींच मार्ग नसे. त्या शहराला शिकंदरानें वेढा घातला, आणि आंत जाण्यास प्रयत्न चालविला. परंतु, कांहीं सुलक्षण दिसेना. तेव्हां त्यानें बाहेरून मोठमोठ्या शिड्या लावविल्या; आणि त्यांवरून चढून आंत शिरण्यास आपले लोकांस धैर्य यावें ह्मणून, नित्याचा पाठाप्रमाणें, त्या जोखिमाच्या कामास तो आपण आधीं पुढें सरसावला. तो शिडीवर चढूं लागला असें दृष्टीस पडतांच, त्याचे शिपायी लोक त्याचे मागोमाग वर जाऊं लागले. त्या वेळीं, शिकंदर सर्वांच्या पुढें होता, तो कसाबसा भिंतीच्या शिखरावर पोहोंचला इतक्यांत त्या शिड्या, भारानें मोडून, धडधडां खालीं पडल्या. त्यांबरोबर त्यांवरचे शिपायीही खालीं कोसळले, हें सांगावयास नको. शिकंदरास आपल्या शहराच्या गांवकुसाच्या शिखरावर पाहतांच आक्सेद्रेसी लोकांस अतिशयित आवेश चढला, आणि त्यांनीं त्याजवर बाणांची एकसारखी वृष्टि चालविली. तिचें निवारण तो आपल्या जवळच्या ढालेनें करूं लागला. परंतु

अशी वृष्टि चारी दिशांनीं होऊं लागली, तेव्हां त्याचा उपाय हरला असा दिसला, आणि तो आतां काय करतो, ह्याजकडे त्याच्या सगळ्या सैन्याचे डोळे लागले. हात पावेना आणि जीव राहीना, अशी त्यांची अवस्था झाली. खरें ह्मटलें तर, अशा बाणवृष्टीच्या गर्दींत, दुसरा एकादा पुरुष नुसत्या प्रसंगभयानेंच प्राण सोडावयाचा. परंतु, शिकंदरानें ह्या वेळीं काय विचित्र करणी केली ती पहा. त्यानें आपला जामानिमा नीट आंवरून, आणि जवळचीं हत्यारें जागचे जागीं खोंवून, वरून एकदम अलाद उडी मारिली, तिचे सरसा तो, उभाचाउभा, आंतील लोकांच्या मंडळीच्या मध्यभागीं येऊन पडला. मग काय विचारावें! ते लोक सिंहबालकावर जसे सहस्रशः व्याघ्र चवताळून जावे, त्यांप्रमाणें त्यावर पडले. परंतु, त्या वेळीं असा कांहीं चमत्कार झाला कीं, त्यांचें एकही शस्त्र त्यास न लागतां, त्याच्या तरवारीच्या पल्ल्यांत जितकीं माणसें सांपडलीं, तितकीं, पटापट गतप्राण होऊन तेथच्या तेथें पतन पावलीं. हें जेव्हां बाकीच्यांच्या दृष्टीस पडलें तेव्हां त्यांच्या काळजांनीं ठाव सोडिला. ते घाबरले असें पाहून त्यांवर शिकंदरानें शस्त्रप्रहार चालविला त्यांजकडचे बाण त्याजवर पडतच होते; आणि ते सर्व तो. आपल्या ढालीवर झेलून धरीत होता. असें चाललें असतां, तिकडच्या एका मनुष्यानें जो एक बाण फेंकिला, तो सूंसूं करीत येऊन शिकंदराच्या बरगडींत घुसला. तेव्हां त्या जखमेंतून अतिशयित रक्त वाहून त्याचे सगळे कपडे चिंब भिजून गेले, आणि तो, एका क्षणांत मेल्यासारखा जमिनीवर पडला. हें पाहून तो बाणमारणारा रानटी मनुष्य, आनंदानें नाचत आणि उड्या मारीत त्याजपाशीं आला

आणि मोठ्या डौलानें त्याचे आंगावरचे कपडे काढूं लागला. त्याचा हात आंगास लागतांच, शिकंदर शुद्धीवर आला, आणि, आपला शत्रु आपले कपडे उतरीत आहे, असें पाहून त्यास अतिशयित आवेश चढला. त्यासरसा तो उभा राहिला, आणि त्यानें त्यास एक गचांडी देऊन अंगापासून दूर करून, लागलीच आपली बरची त्याच्या उरांत खुपसली, आणि तेथच्या तेथें त्याचा प्राण घेतला! हें होत होतें इतक्यांत बाहेरचे मासिदोनियन लोक आंत येऊन त्याजपाशीं उभे राहिले, आणि मग उभय पक्षांचें तुमुल युद्ध माजलें. त्यामध्यें शहरचे लोक केवळ पराभव पावले, आणि तें शहर शिकंदराच्या हस्तगत झालें. खरोखर, ह्या वेळच्या शिकंदराच्या कृतींनें कोणालाही चमत्कार वाटल्यावांचून राहणार नाहीं.

ह्या प्रसंगीं शिकंदर बादशाहास मोठ्या धैर्याच्या योगानें जय प्राप्त झाला खरा; तरी, त्याला जो बाण लागला ह्मणून वर सांगितलें, त्याच्या योगानें तो अत्यंत व्याकुळ झाला होता. त्यास त्याच्या सेवकांनीं उचलून लागलेंच त्याच्या तंबूमध्यें नेलें, आणि वैद्य लोक बोलाविले. त्या वेळेपर्यंत त्या बाणाचें पातें तसेंच त्याच्या आंगांत अडकलेलें होतें. तें बाहेर काढण्याविषयीं शस्त्रवैद्य प्रयत्न करूं लागले, तेव्हां असें समजलें कीं, त्याचें पुढचें टोंक बुद्धया वांकडें केलेलें आहे, ह्मास्तव त्या जखमेचा बराच मोठा फाड केल्यावांचून तें बाहेर निघावयाचें नाहीं. त्याप्रमाणें तिचा पाहिजे होता तेवढा फाड करून वैद्यांनीं मोठ्या कुशलतेनें तें पातें बाहेर काढिलें; आणि जखम शिवून टाकिली. हें सगळें कृत्य आटोपेपर्यंत शिकंदरानें हूंचुं

सुद्धां केलें नाहीं. तें दुःख त्यानें निमूटपणें सोशिलें खरें; परंतु, त्या प्रसंगीं त्याची अशी अवस्था झाली कीं, हा आतां घटका दोनघटकांनीं खचीत मरतो, असें जवळच्या लोकांस वाटलें, आणि बाहेर तर, तो मेला अशी बातमी उठली. ही वार्ता आपल्यास फार बाधक आहे, असें मनांत आणून, सुमारें सात दिवसांत, शिकंदरबादशाहा, हळू हळू टेंकत टेंकत, आपल्या सैन्यापुढें आपला दरबारचा पोषाक करून आला. त्या सात दिवसांत त्याच्या सैन्यास काळजीनें ग्रासिलें होतें; आणि सर्व लोक त्याच्या तंबूकडे डोळे लावून बसले होते; अशी त्यांची अवस्था असल्यामुळें, एकाएकीं त्यास पाहून त्यांस जो हर्ष झाला, तो त्यांच्या पोटांत मावेना! ते मोठ्या उल्हासानें धांवत धांवत त्याजपाशीं आले, आणि त्याच्या पायांपडून, त्याच्या बरेपणाविषयीं परमेश्वराचे आभार मानूं लागले. सर्वांस मोठा संतोष झाला. आणि शिकंदरबादशाहास त्या वेळीं जरी इतक्या वेदना होत होत्या, तरी आपले ठायीं आपल्या लोकांची निष्ठा पुष्कळ आहे, असें पाहून तो समाधान पावला.

शिकंदरबादशाहा अमळ बरा होत चालला, त्या सुमारास आक्सैद्रेसी आणि माली ह्या लोकांकडील सुमारें १५० वकील त्याच्या दरबारांत येऊन त्यांनीं तहाचें बोलणें लाविलें. त्यांनीं त्यास मोठमोठे नजराणे देऊन अशी विनंती केली कीं, आह्मांकडून जो उन्माद झाला आहे त्याची क्षमा करावी, आणि आपणांस जो कोणी योग्य वाटेल तो मनुष्य आमच्या प्रांतांवर सुभेदारीं नेमावा, आह्मी त्याच्या आज्ञेंत वागण्यास सिद्ध आहों. हें बोलणें ऐकून शिकंदरास फार बरें वाटलें, आणि तो आपलें शरीरदुःख देखील क्षणभर विसरला.

त्यानें त्यांस असें उत्तर दिलें कीं, "तुमच्यांतले चांगले १००० लोक तुह्मी आमच्या लष्करांत चाकरीस राहण्यास जर पाठवाल तर तुह्मांशीं आह्मी तहाचा विचार करूं, एरव्हीं करणार नाहीं." तें त्याचें ह्मणणें त्यांनीं लागलेंच मान्य करून १००० लोक त्याजकडे पाठविले. शिकंदरानें त्यांच्या प्रांतांवर फिलिप नांवाच्या एका गृहस्थास सुभेदार नेमिलें. ह्या प्रकारेंकरून आक्सैड्रेसी आणि माली हे लोक त्याचे सेवक झाले.

आक्सैड्रेसी लोकांचें शहर घेण्याकरितां शिकंदरानें आपला स्वतःचा जीव धोक्यांत घातला होता, हें त्याच्या लोकांस अगदीं नीट वाटलें नव्हतें; व असल्या यःकश्चित् कामाकरितां आपण एवढें साहस कधीं करूनये असें त्यास विनयपूर्वक सुचवावें, असें त्यांच्या मनांत फार आलें होतें परंतु, त्याला असें सांगायाला गेलें असतां तो काय ह्मणेल कोण जाणे, अशा भयानें कोणी तोंड उघडीना. शेवटीं, एके दिवशीं, तो आपल्या बिछान्यावर, अगदीं अशक्त होऊन पडून, जवळच्या माणसांशीं हळू हळू बोलत असतां, आपली विनंती करण्यास ही संधी बरी आहे असें पाहून, क्रेतिरस पुढें सरून, अतिनम्रपणानें ह्मणाला, "महाराज, आपणांस अमळसें बरें वाटूं लागलें, तेव्हांपासून आमचे जिवांत जीव आला आहे. पण, महाराज, आह्मीं आपणांस प्रथम जेव्हां अत्यावस्थ पाहिलें, तेव्हां आमच्या काळजानें अगदीं ठाव सोडिला होता. महाराज, आपण आमचे प्रभु आणि मायबाप. असें असतां, त्या महासंकटामध्यें आह्मीं आपणांस पुढें जाऊं दिलें, आणि आह्मी मागें राहिलों, हें आह्मीं मोठेंच मूर्खपण केलें, ह्याबद्दल आतां आह्मां सर्वांस

अतिशयित लज्जा उत्पन्न झाली आहे. आह्मी महदपराधी आहों, असें आमचें मनच आह्मांस सांगतें. परंतु, महाराज, आतां एवढीच विज्ञापना आहे कीं, अशा दुःसह दुःखसमुद्रांत आह्मांस पुनः कधीं ढकलूं नये! त्या एवढ्याशा शहराकरितां आपण आपला जीव संकटांत घालावा, हें अगदीं प्रशस्त नाहीं. महाराज, अशीं लहान सहान कामें आमच्या सारख्या आपल्या हाताखालच्या सरदारांस आपण फरमावावीं, आणि आपल्या थोरवीस शोभण्यासारखें जें मोठें कृत्य असेल त्यास मात्र आपण हात घालावा. नुकतेंच जें हें महत्संकट आपल्या जीवावर आलें होतें, तें नुसतें मनांत आलें ह्मणजे आमच्या आंगावर रोमांच उभे राहातात. एक दीड दमडीचा मनुष्य आपणां पृथ्वीपतीच्या-आंगावर धांवून येऊन आपले अंगावरचीं वस्त्रें काढण्यास प्रयत्न करीत होता, हें अद्याप आमचे डोळ्यांपुढें दिसत आहे. महाराज, आपल्या जीवांचे आणि आपल्या शरीराचे मालक आपण एकटे आहांत, असें आपण समजूं नये; त्या दोहोंवर आह्मां सेवक जनांचीही कांहीं सत्ता आहे. आमचे सर्वांचे जीव आपल्या जीवावर अवलंबून आहेत; ह्यास्तव, आह्मी आपले जीवांस जपणें ह्मणजे, महाराज, आपले जीवास जपणें, हें अगदीं उघड आहे. राजाधिराज, सेवकाचे तोंडांतून अधिकोत्तर निघालें असल्यास त्याची क्षमा करावी, आणि अह्मां सर्वां परिजनांस एवढेंच देणें द्यावें कीं, आपण, आपल्या जीवाकरितां नाहींतर नाहीं, परंतु, आमच्या जीवांकरितां आणि सर्व दुनयेच्या सुखाकरितां ह्यापुढें आपणांस विशेष जपत जावें. पुनः एक वेळ विनंती करितों कीं अधिकोत्तराविषयीं क्षमा करावी."

हें खऱ्या आस्थेचें भाषण ऐकून शिकंदरबादशाहास मोठां

गाडीवर आला, आणि त्यानें प्रीतिपूर्वक क्रेतिरसास आणि जवळच्या दुसऱ्या मंडळीस आलिंगन दिलें. तो प्रेमाचा उमाळा किंचित् कमी झाल्यावर, तो ह्मणाला, " मित्रहो, आतां तुमचें सर्वांचें उतराई कसें व्हावें, हें मला कळत नाहीं. तुह्मी आपल्या स्वतःच्या जीवांपेक्षां माझा जीव अधिक मानितां, ह्मणूनच केवळ मी असें बोलतों असें नव्हे; तर ह्या युद्धास आरंभ झाल्यापासून तुह्मी हातांवर शिरें घेऊन माझें साह्य करीत आहां, हें मी जाणत आहें, आणि ह्याबद्दल तुह्मां सर्वांस मोठी शाबासकी दिली पाहिजे. जगावें तर अशा तुह्मांसारख्या मंडळीच्या सहवाससुखांत आयुष्याचीं कांहीं वर्षें घालविण्यास जगावें; नाहीं तर जिणें व्यर्थ होय, असें मला वाटतें. परंतु, मित्रहो, कांहीं कांहीं गोष्टींविषयीं माझें मत तुमच्या मताहून अगदीं भिन्न आहे, त्याविषयीं मला दोन शब्द बोलावयाचे आहेत. माझा सहवास चिरकाल असावा, अशी तुमची फार इच्छा आहे, ती चांगली आहे. परंतु, बाबानो, मी आपलें जिणें वर्षांनीं मोजीत नाहीं, तर विजयांनीं मोजितों. मला ह्मातारपणापर्यंत सगळें आयुष्य ऐषआरामांत घालवावयाचें असतें, तर, माझ्या वाडवडिलांनीं जें राज्य मला मिळवून ठेविलें होतें तें बस होतें; त्याचे बाहेर पडून जीव संकटांत घालण्याचें कारण नव्हतें. परंतु, मित्रहो, मी ऐषआरामांचा मनुष्य नाहीं; मी पराक्रमांचा आहें. केवळ माझ्या वयाच्या वर्षांकडे तुह्मीं पाहाल, तर मी अगदीं अल्पवयस्क आहें, असें तुम्हांस दिसेल; पण माझ्या पराक्रमांकडे पाहा, ह्मणजे मी फार वयाचा आहें, असें तुमच्या मनांत आल्यावांचून राहणार नाहीं. अरे, एवढे भगीरथ प्रयत्न करून मीं इतके देश जिंकिले आहेत. युरोप आणि आशिआ ह्यांस हालवून

सोडिलें आहे, आणि ज्ञात भूभागावर एवढा मोठा कीर्तिध्वज उभारिला आहे, अशा स्थितीमध्यें, हें महत्कृत्य अर्धेंच टाकून परतावें, हें मला चांगलें दिसेल काय ! आज जी ह्या आपल्या सैन्यास एवढी शोभा आली आहे, ती केवळ आपल्या पराक्रमांनीं आली आहे. आपण आजपावेतों जें संपादिलें आहे, तें पुष्कळ आहे, हें खरें आहे; ह्याविषयीं माझें कांहीं बोलणें नाहीं. परंतु, ज्या देशामध्यें सध्यां आपण आहों, तो देश मला लाजवितो; तो कसा ह्मणाल, तर जितके पराक्रम एका बायकोनें केले होते, तितके तुझ्या हातून अद्याप झाले नाहींत, असें तो मला जाणवितो. ती बायको कोण ह्मणून पुसाल, तर सेमिरामिस ! त्या बायकोच्या इतके पराक्रम मला मर्दाला करितां येऊंनयेत काय ! तिची बिशाद काय ! तुम्ही मला साह्य करण्यास कंबरा बांधून पुढें व्हा मात्र, म्हणजे तिला मी हं हं म्हणतां मागें टाकीन. राजे लोकांच्या जीवास घरांतल्या आणि दरबारांतल्या मित्र म्हणविणाऱ्या गुप्त शत्रूंपासून फार भय असतें. त्यांपासून माझें तुम्ही रक्षण करा ह्मणजे पुरे. बाकीचें सगळें मी संभाळितों. युद्धव्यवस्थेचा भार मी तुम्हांवर घालीत नाहीं; तिजविषयींची सर्व जबाबदारी मी पतकरितों."

ह्या भाषणावरून शिकंदरबादशाहाचें मन कसें होतें, हें स्पष्टपणें दिसून येतें. रालिननामक ग्रंथकारानें असें म्हटलें आहे कीं, "खरें वैभव कशास म्हणावें हें शिकंदरबादशाहास मुळींच ठाऊक नव्हतें. खऱ्या थोरपणाचें मूलतत्व काय, तें संपादावें कसें, आणि त्याच्या संपादनाचा हेतु काय असावा, ह्याविषयींही त्याला कांहीं कळत नव्हतें. न्यायान्याय न पाहतां, दया एकीकडे ठेवून, जिंकवतील

तितके देश जिंकीत जावें, आणि तेणेंकरून आपल्या नांवाचा दरारा जगभर पसरावा, हेंच कायतें वैभव आणि हाच कायतो पुरुषार्थ, असें त्याला वाटत होतें. परंतु, खरें वैभव आणि खरें थोरपण हें नव्हे." हें त्या सुज्ञ ग्रंथकाराचें म्हणणें अगदीं खरें आहे.

शिकंदरास अमळसें बरें वाटल्याबरोबर तो आपल्या सैन्यासहवर्तमान साब्रेरी नामक रानटी लोकांच्या प्रदेशांत गेला. त्यांजपाशीं ६०००० पायदळ, ६००० स्वार, आणि ५०० रथ इतकें सैन्य युद्धास सिद्ध होतें; परंतु, शिकंदराची अवाढव्य सेना पाहून आणि त्याच्या विलक्षण शौर्याची कीर्ति ऐकून, ते भयभीत झाले; आणि त्यांनीं लागलेच आपले वकील त्याजकडे तहाचें बोलणें लावण्यास पाठविले. तो तह झाल्यावर, म्युसिकानस ह्या नांवाच्या एका राजाच्या प्रांतांत शिकंदराची स्वारी प्राप्त झाली. ह्या राजाच्या एका शहरास शिकंदराच्या सैन्यानें वेढा घातला असतां, तालमी ह्मणून जो एक शूर सरदार त्याजबरोबर होता, त्यास एका बाणाची जबर जखम लागली. शहरांतल्या लोकांनीं आपल्या बाणांच्या पात्यांस कांहीं विषारी पाणी दिलें होतें, तेणेंकरून, त्यांच्या जखमा बऱ्या होत नसत, आणि त्यांच्या योगानें जखमी झालेले लोक लवकर मरत असत. त्यामुळें तालमीविषयीं शिकंदरास मोठी काळजी लागली; आणि त्याच्या जखमेच्या बरेपणाविषयीं आपण स्वतः झटावयाचें मनांत आणून, त्यानें त्याचा बिच्छाना अगदीं आपल्या बसायाचे जागेजवळ आणवून घालविला. ती जखम दिवसेंदिवस वाढत चालली, आणि शिकंदर हा तिजविषयीं अधिकाधिक काळजी वाहूं लागला. अशा स्थितीमध्यें तो

एके रात्रीं निजला असतां, स्वप्नामध्यें एका पक्ष्यानें एक वनस्पती आपल्या तोंडांत धरून आणून त्यास असें सांगितलें कीं, ही तालमीच्या जखमेस लावा, ह्मणजे ती बरी होईल. जागा झाल्या बरोबर त्यानें ती वनस्पती आणवून त्याच्या जखमेस लाविली. तेव्हां ती जखम अगदीं थोड्या दिवसांत भरून आली ! ही गोष्ट रालिन ह्यानें आपले ग्रंथांत लिहिली आहे. तिजमध्यें खरें किती आहे, हें कोण जाणे; परंतु शिकंदरास तालमीचें अगत्य फार होतें, एवढें तिजवरून उघड दिसून येतें. आणि तो पुरुष खरोखर तसाच थोर होता. आधीं, तो फिलिप राजाच्या पोटचा दासीपुत्र होता, असें कोणी ह्मणतात ;आणि तो मोठा निस्पृह, स्पष्टवक्ता, शूर, सत्यवादी, आणि उत्तम मसलत देणारा असा होता; शिवाय, त्याला गर्व कसा तो मुळींच माहीत नव्हता. असा पुरुष शिकंदरासच काय, पण कोणाही गुणज्ञ जनास प्रिय व्हावा हें साहजिक आहे.

आतां ह्या भागाची इयत्ता सरली आहे. परंतु, ह्या स्वारीमधली एक चमत्कारिक गोष्ट सांगावयाची राहिली आहे, ती सांगितल्याशिवाय हा पुरा करवत नाहीं. ती गोष्ट हीच कीं, ह्या स्वारीमध्यें ब्राकमेनी (हे ब्राह्मण असावे असें कोणी ह्मणतात) ह्या नांवाचे लोक शिकंदरास आढळले. ते तपस्व्याच्या वृत्तीनें राहात असत. तरी, त्यांनीं दुसऱ्या कितीएक लोकांस चिथवून देऊन शिकंदराच्या सैन्यावर नाना प्रकारचीं विघ्नें आणिलीं होतीं. ह्या लोकांस इंग्रजींत जिमनो सोफिस्त असें ह्मटलें आहे. हे बहुतकरून नग्न असत, फलमूल खाऊन उपजीवन करीत, आत्मा अमर असून त्याला जन्ममरणाच्या फेऱ्यांत फिरावें लागतें असें समजत,:

आणि ऐहिक सुख हें पारलौकिक सुखापुढें तुच्छ आहे, असें मानीत. त्यांतले मुख्य दाहा असामी शिकंदरानें धरून आपणा बरोबर स्वारींत ठेविले होते. त्यांस एके दिवशीं त्यानें आपल्या कचेरीस बोलावून आणून, त्यांतील वडील मनुष्यास असें सांगितलें कीं, "तुमच्या ह्या नऊ गृहस्थांस आह्मी एक एक प्रश्न विचारितों, त्यांचीं त्यांनीं बरोबर उत्तरें द्यावीं; त्यांत जो प्रथम चुकेल, त्यास प्रथम जिवें मारूं, आणि मग बाकीच्यांचा समाचार घेऊं; आणि उत्तर बरोबर आहे किंवा चुकलें आहे, ह्याचा निर्णय तुह्मीं केला पाहिजे." तें त्यानें मान्य केलें. नंतर प्रश्नोत्तरांस आरंभ झाला.

पहिल्यास विचारिलें कीं, "जीं माणसें हल्लीं जींवत आहेत तीं अधिक भरतील किंवा आजपावेतों जीं मरून गेलीं आहेत, तीं अधिक भरतील?" त्यानें उत्तर दिलें कीं "जीं जीवंत आहेत तीं अधिक भरतील; कारण, मेलीं तीं आतां नाहींतच."

दुसऱ्यास असा प्रश्न केला कीं, "अधिक प्राणी कोठें उत्पन्न होतात, पृथ्वीवर कीं समुद्रांत?" त्यानें उत्तर दिलें कीं, "पृथ्वीवर; कारण समुद्र हा पृथ्वीचा एक भाग आहे."

तिसऱ्याला विचारिलें, "सर्वांत अत्यंत कपटी प्राणी कोणता?" त्यानें उत्तर दिलें, "जो अद्यापपर्यंत मनुष्यास सांपडला नाहीं तो."

चवथ्याला विचारिलें, "साबास लोकांस आमचे विरुद्ध बंड करण्यास त्वां भर दिली ह्याचें कारण काय?" त्यानें उत्तर केलें, "त्यांच्या राजानें जगावें तर शूरासारखें जगावें, नाहींतर एकाद्या अजागळासारखें मरून जावें, हें मला योग्य वाटलें ह्मणून."

पांचव्याला विचारिलें, "वडील कोण, दिवस कीं रात्र?"

त्यानें उत्तर दिलें, "दिवस. हा रात्रीपेक्षां एका दिवसानें वडील आहे." हें उत्तर ऐकून शिकंदरास चमत्कार वाटला, असें त्या पांचव्यास वाटून त्यानें त्याजकडे आणखी वळून ह्मटलें, "चमत्कार नको वाटायाला. जसा प्रश्न तसें उत्तर!"

साहाव्याला विचारिलें, "आपणावर सर्वांनीं प्रीति करावी, अशी ज्याची इच्छा असेल, त्यानें कसें वागावें, ह्मणजे त्याचा हेतु सिद्धीस जाईल?" त्यानें उत्तर दिलें, "अशा मनुष्याचे हातीं जर मोठा अधिकार असला तर, त्यानें कोणास भय न वाटे अशा रीतीनें वागावें, ह्मणजे झालें."

सातव्याला विचारिलें, "मनुष्य देव कसा होईल?" त्यानें उत्तर दिलें, "जें कांहीं माणसांस करितां येत नाहीं, तें केल्यानें मनुष्य देव होईल."

आठव्याला विचारिलें, "प्रबल कोण, जीव कीं मृत्यु?" त्यानें उत्तर दिलें, "मृत्यूपेक्षां जीव अधिक प्रबल आहे; कारण तो पुष्कळ दुःखें सोशितो; मृत्यूच्यानें कांहीं एक सोसवत नाहीं."

नवव्याला विचारिलें, "मनुष्यानें कोठपर्यंत जगावें? त्यानें उत्तर दिलें, "जगण्यापेक्षां मरणें बरें वाटेपर्यंत."

नंतर, उत्तरांच्या निर्णयाकरितां, त्या नेमिलेल्या दाहाव्या माणसाकडे तोंड करून शिकंदर बादशाहा ह्मणाला, "सांगा आतां तुमचें काय ह्मणणें आहे तें." त्यावर त्या वृद्ध मनुष्यानें त्यास सांगितलें कीं, "ह्या नवांचीं हीं उत्तरें, पहिल्यापेक्षां दुसरें वाईट, अशीं आहेत. ह्मणजे, त्यांत बरोबर असें एकही उत्तर नाहीं" त्यावर शिकंदर ह्मणाला, "असें जर तुमचें मत आहे तर, आधीं तुमचें डोकें मारिलें पाहिजे." त्यास तो वृद्ध तपस्वी ह्मणाला, "असें कां बरें? जो सर्वांत वाईट उत्तर देईल

त्यास आधीं मारावयाचें, असें आपण बोललां होतां, तें वचन जर आपण मोडीत असलां तर खुशाल मोडावें." इतकें भाषण झाल्यावर, त्या दाहाही जणांस त्यानें मोठमोठालीं बक्षिसें दिलीं, आणि त्यांस स्वस्थानीं सुखरूप जाऊं दिलें. असे आणखी कितीएक लोक पाठवून त्यानें हिंदुस्थानच्या साधूंपाशीं वादविवाद करविले, असें सांगतात.

---

## भाग आठवा.

मागचे भागांत सांगितल्याप्रमाणें शिकंदरबादशाहा, आपल्या सैन्यासहवर्तमान, सिंधुनदामध्यें गलबतांत बसून, आस्ते आस्ते पताला ह्या गांवाजवळ येऊन पोहोंचला. तेथें त्या नदाचे दोन फांटे होऊन, एक उजवीकडे जातो आणि दुसरा डावीकडे जातो; त्यांपैकीं उजव्या फांट्यांत आपलीं गलबतें हांकारून, तो खालीं समुद्राकडे आला. तो अफाट सागर पाहून त्याला परम आल्हाद झाला, आणि आपणासारख्या अतुल पराक्रमी पुरुषाच्या अवलोकनास हा अतुल भव्य पदार्थ योग्य आहे, असें त्याला वाटलें. समुद्रास ओहोटी लागते, हें त्यास व त्याच्या लोकांस ठाऊक नव्हतें. त्यामुळें, ओहोटीचें पाणी आंत ओढ घेत चाललें आहे, असें पाहून त्यांस असें वाटलें कीं, आपल्या हातून ईश्वराच्या आज्ञेचा भंग झाल्यामुळें त्यास राग येऊन, हें संकट आपणांवर ओढवलें आहे. ह्मणून, त्यांनीं देवाच्या संतोषार्थ, आपल्या देशरीतीप्रमाणें नानाप्रकारचीं होमहवनें केलीं !

समुद्रकांठीं कांहीं महिने घालविल्यावर, शिकंदरानें आप-

त्या सैन्याचे दोन भाग केले; त्यांतला एक आपणाबरोबर पायमार्गें जावयास घ्यावयाचा; आणि दुसरा, निआर्कस ह्या सरदाराचे हाताखालीं देऊन, इराणी आखातांतून जाऊन, पुढें आपले स्वारीस मिळे, असा पाठवावयाचा, असा त्यानें निश्चय केला. तो समुद्र त्यास अगदीं अज्ञात होता; तरीं, निआर्कस ह्यानें, नानू न करितां, शिकंदराची आज्ञा शिरसा- मान्य केली. तेणेंकरून बादशाहास मोठा संतोष झाला; आणि त्यानें त्यास मोठमोठीं बक्षिसें दिलीं. निआर्कस हा जातीचा क्रेतन होता; मासिदोनियन नव्हता; तरी तो शि- कंदराचा बालमित्र असल्यामुळें ते एकमेकांवर फार प्रीति करीत असत. निआर्कस ह्यास गलबतांत बसण्यास ऋतुमा- नानें, थोडा अवकाश होता; ह्मणून त्यास तेथें सोडून शिकं- दरबादशाहा, आपलें सैन्य घेऊन पायमार्गें इराणाकडे निघा- ला. तेव्हां त्याला प्रथम ओरिती लोकांचा मुलूख लागला. त्यांची राजधानी हामबासिस ह्या नांवाची होती. त्या लोकांनीं शिकंदरास आड येण्याचा प्रथमतः कांहीं डौल घातला होता; परंतु, त्याचें सैन्य पाहून व त्याची कीर्ति ऐ- कून ते लवकरच उमजले, आणि त्याशीं त्याच्या ह्मणण्याप्र- माणें वागण्यास कबूल झाले. पुढें जेद्रोसिआमधून त्याची स्वारी चालली, तेव्हां त्याच्या सैन्याचे अतिशयित हाल झाले; ते इतके कीं, त्यांचें वर्णन केलें असतां तें एकाद्यास खरें दे- खील वाटावयाचें नाहीं. त्यास एक अफाट अरण्य लागलें. तें ते साठ दिवस एकसारखे तुडवीत होते; तरी त्यांस पाणी असें कोठें लागलें नाहीं. जवळची अन्नसामग्री सरली होती; दिवसा ऊन इतकें पडे कीं, तें टाळण्याकरितां रात्रीं मजला कराव्या लागत; लोक चालतांचालतां थकले; तृषेनें अत्यंत

व्याकुल झाले; पोटाच्या भरीकरितां, बरोबरचीं ओझ्याचीं जनावरें मारून खाऊं लागले; अन्नरे पाणीरे, असें ह्मणून तडफडून शेंकडों लोक पटापट मरूं लागले; जीव जगतील कसे अशी सर्वांस मोठी काळजी पडली; आणि त्यांत महामारी उठली! मग काय विचारावें! त्या लोकांच्या विपत्तीची अगदीं सीमा झाली! आपणापुढें मृत्यु प्रत्यक्ष येऊन उभा राहिला आहे, असें प्रत्येकास वाटूं लागलें. वरिष्ठ आणि कनिष्ठ हा भेद नाहींसा झाला. स्वतः शिकंदरास देखील कोणी पुसेना. जो तो आपल्या जीवाच्या फिकीरींत. आणखी, अशा मजला चालल्या असतां ते एके रात्रीं एका नदीच्या पात्रावर तळ देऊन राहिले होते. प्रथम तेथें पाण्याचा एक बिंदुही नव्हता, परंतु, वर कोठें डोंगरांमध्यें पाऊस पडून तिला मध्यरात्रीच्या सुमारास असा जबरा लोंढा आला कीं, त्यानें, त्या सैन्यांतील गरीब बिचारीं बायकामुलें आणि पुष्कळ सामानसुमान हीं तडाक्यासरशीं वाहून नेलीं! त्यांबरोबर शिकंदराचा दरबारचा उंची पोषाकही गेला. स्त्राबो ह्मणून एक नामांकित इतिहासकार होऊन गेला, त्यानें ह्या भयंकर संकटाचें वर्णन केलें आहे. त्याचें तात्पर्य असें:—" शेंकडों लोक श्रम, तान्ह, आणि उष्णता ह्यांच्या योगानें अतिशयित व्याकुल होऊन रस्त्यावरच्या रस्त्यावर पडून मेले. हे प्राणोत्क्रमणाचे वेळेस जे आळेपिळे देऊन हातपाय झाडीत, त्यांजकडे पाहवेना सुद्धां! त्या अरण्यामध्यें एक प्रकारचें विषारी झाड जिकडे तिकडे उगवलें होतें; तें खाल्यामुळें ओझ्याचीं जनावरें पटापट मरण पावलीं. तें झाड खाल्याबरोबर आधीं त्या जनावरांचे पाय जात, आणि मग लागलाच तोंडांतून फसाफसा फेंस येऊन,

जीव निघून जाई. तेथें आणखी दुसरा एक वेल पसरला होता. त्याला कांकडीसारखीं लांब आणि वाटोळीं फळें येत असत. तीं पायांखालीं चेंगरलीं ह्मणजे त्यांतून दुधा-सारखा कांहीं पांढरा पदार्थ बाहेर पडे. आणि त्याचा शिं-तोडा जनावरांच्या किंवा माणसांच्या डोळ्यांवर उडाला ह्म-णजे तीं तत्काळ आंधळीं होत. तेथें झाडाझुडुपांखालीं सर्प-ही पुष्कळ निघत. त्यांचा दंश हा साक्षात् मृत्यु असे; ह्मणजे ज्यांना दंश झाले, त्यांतलें एकदेखील माणूस वांचलें नाहीं." अशा प्रकारें त्या अरण्यामध्यें शिकंदर बादशाहाचे सहस्रावधि लोक प्राणांस मुकले. रालिन ग्रंथकारानें असें ह्मटलें आहे की, "शिकंदर बादशहानें हिंदुस्थानांत एकंदर १२०००० पायदळ आणि १५००० स्वार इतकें सैन्य मुळीं आणिलें होतें. त्याचा चतुर्थांश सैन्य देखील त्याजपाशीं परत जातांना राहिलें नाहीं!"

ह्याप्रमाणें, साठ पांसष्ट दिवस प्रवास करून, शिकंदर बादशाहाचें सैन्य जेड्रोशिआच्या सरहद्दीवर पोहोंचलें. तेथें त्यांस चांगला प्रदेश लागून, पाणी आणि धान्य हीं वि-पुल मिळून, त्यांस स्वस्थता प्राप्त झाली. नंतर तो कार्मा-निआ प्रांतामध्यें गेला. त्या प्रांतास सांप्रत काळीं कर्मान असें ह्मणतात. त्या प्रांतांत त्यानें युद्धें, वेढे, तह इत्यादिकांकडे लक्ष न पुरवितां, आपल्या सैन्यासहवर्तमान पुष्कळ दिवस य-थेच्छ खाण्यापिण्यांत आणि ऐषआरामांत घालविले. तो स्वतः आठ घोड्यांच्या रथामध्यें बसून फिरत असे; आणि त्याच्या मागें पुढें त्याच्या हाताखालच्या लोकांच्या शेंकडों गाड्या असत. रस्तोरस्तीं द्राक्षरसाचे मोठमोठे हांडे भरून ठेविले होते; आणि त्यांजवळ पेले पंचपात्र्या अशीं अनेक

लहान भांडीं ठेविलेलीं असत; त्यांनीं शिकंदराचे लोक पाहिजे तितका द्राक्षरस पीत. नाचरंगामध्यें लोक अगदीं बुडून गेले होते. अशा आनंदामध्यें त्यांनीं सात आठ दिवस घालविले. क्विंतस कर्तियस ह्या ग्रंथकारानें असें ह्मटलें आहे कीं, "त्या दिवाळीच्या दिवसांत शिकंदराच्या सैन्यावर जर एक हजार लोक निश्चयानें तुटून पडते, तर त्यांनीं, जो पुरुष आपणास जगाचा जिंकणारा असें ह्मणवीत होता, त्याचा आणि त्याच्या अफाट सैन्याचा पळ न लागतां पराभव केला असता." ही गोष्ट खरी आहे. त्याप्रमाणें, असें जर कांहीं भयचिन्ह दृष्टीस पडतें, तर शिकंदरबादशाहासारखा पुरुष इतका ढिला राहाता ना, हेंही खरें आहे.

तिकडे गलबतें हांकारण्याचे दिवस प्राप्त होतांच निआर्कस हा आपल्या सर्व लोकांसहवर्तमान सिंधुनदाच्या मुखापासून जो निघाला, तो किनाऱ्या किनाऱ्यानें, इराणी अखातांत हरम्युसिआनांवाच्या बेटाशीं येऊन तेथें उतरला. ह्याच बेटाला हल्लीं ओर्मस असें ह्मणतात. तेथून शिकंदर बादशाहाची स्वारी चार पांच दिवसांच्या मजलीवर छावणी देऊन राहिली आहे, असें त्यास समजलें. तेव्हां तो आपणाबरोबर, चारपांच असामी सोबतीस घेऊन, त्यास भेटावयास गेला. त्या वेळेपर्यंत शिकंदरास, आपल्या आरमाराचीं अवस्था काय झाली होती हें समजलें नव्हतें; तेणेंकरून त्या अज्ञात समुद्रामध्यें तें बुडून त्यांची वाताहात झाली असेल, असें वारंवार त्याचे मनांत येऊन तो त्याविषयीं फार काळजी वाहत होता. इतक्यांत निआर्कस आपणाकडे नुसते चार लोक बरोबर घेऊन येत आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें. आणि ते पांच साहा असामी अगदी पिकुटलेले आणि

अशक्त झालेले असे त्याला दिसले. तेव्हां, आपणास जें भय वाटलें होतें तें खरें होऊन, त्या अनर्थांतून, सुदैवेंकरून, एवढे हे पार पडून आपणाकडे आले आहेत, असें त्यास पक्कें वाटलें. निआर्कस हा जवळ येऊन बसतांच त्यास शिकंदर बादशाहानें हात धरून एकीकडे नेलें, आणि हळूच ह्मटलें, "परमेश्वरकृपेनें, संकटांतून पार पडून तुह्मी येथवर येऊन मला भेटलां, येणेंकरून मला मोठा संतोष वाटतो. परंतु, आपलें एवढें मोठें आरमार बुडून नाहींसें झालें, ही गोष्ट अत्यंत दुःखप्रद होय." त्यावर निआर्कसानें त्यास लागलेंच उत्तर दिलें, "महाराज, आपण असली शंका आपल्या मनामध्यें किमपिही आणूं नये. आपलें सर्व आरमार सुरक्षित आहे." हें ऐकून शिकंदरास जो आनंद झाला, तो त्याच्या पोटांत मावेना. त्याच्या नेत्रांतून आनंदाश्रुधारा चालल्या; आणि त्यानें तेव्हां उघड बोलून दाखविलें कीं, "ह्या सुवार्तेनें जो मला संतोष झाला आहे, तो सगळें आशिआखंड जिंकून झाला नाहीं!" निआर्कसानें आपल्या जलपर्यटनाचें वृत्त त्यास सविस्तर सांगितलें. तें त्यानें लक्षपूर्वक ऐकून घेतलें. आणि शेवटीं, पुनः उतरलेल्या ठिकाणीं परत जाऊन युफ्रेतीस नदीच्या मार्गानें आपले स्वारीस अमुक ठिकाणीं येऊन मिळावें, असें त्यास सांगून त्यास त्यानें निरोप दिला.

निआर्कस ह्याचें जलपर्यटनाचें वृत्त ऐकून, आपण एकवेळ जलपर्यटन करावें, अशी शिकंदर बादशाहास फार इच्छा उत्पन्न झाली. त्यानें असा विचार केला होता कीं इराणी अखातांत गलबतें हांकारून, अरबस्थान आणि आफ्रिका ह्यांस वेढा घालून, जिब्रालतरच्या सामुद्रधुनींतून भूमध्यसमुद्रांत यावें; नंतर कार्थेजच्या लोकांचा समाचार घ्यावा;

मग आल्प्स पर्वताकडे जावें; आणि मग तेथून इपिरस मधून मासिदोनियामध्यें उतरावें. ह्याकरितां मेसोपोतेमिया येथील सुभेदार आणि सीऱ्याचा सुभेदार ह्यांस लिबानन पर्वतावरचे मोठमोठे वृक्ष तोडण्यास आणि गलबतें बांधण्याची दुसरी तयारी करण्यास हुकूम देखील दिले होते. परंतु, त्यास मध्येंच-एकाएकीं अकालिक मृत्यूनें गांठिलें; ह्यामुळें हे सगळे विचार मनचे मनांत राहिले. मनुष्यानें कितीही श्रेष्ठत्व संपादिलें, तरी मृत्यूपुढें त्याचें कांहीं चालत नाहीं!

शिकंदराची स्वारी, मजलांवर मजला करीत, सर्व सैन्या-सहवर्त्तमान, इराणामध्यें पासारगदा ह्या शहरीं पोहोंचली. तो हिंदुस्थानाकडे प्रथम गेला, तेव्हां येथें जो सुभेदार होता, तो ह्याच सुमारास निवर्तला होता; आणि त्याच्या प्रांतांत, शिकंदरबादशाहा येऊन एकादी नीट व्यवस्था लावी पर्यंत कांहीं बखेडा होऊंनये ह्मणून तेथचा सगळा कारभार आरसिनीज ह्या नांवाचा तेथला एक मोठा सरदार पाहूं लागला होता. हा सरदार फारमोठ्या कुळांतला असून, ह्याचे हातून राजाचीं मोठमोठीं कामें झालीं होतीं, तेणेंकरून त्यावर त्याची कृपा असे, आणि त्यामुळें त्यास सारे लोक मान देत असत. शिकंदरबादशाहाची स्वारी जवळ आली असें कळतांच तो मोठ्या तयारीनें त्यास सामोरा गेला, आणि त्यानें त्यास उंची सामानाचे केलेले कितीएक रथ, पुष्कळ जवाहीर, आणि ४००० तालेन्त इतका नजराणा दिला. त्याप्रमाणें शिकंदराच्या बरोबर जे कोणी मानकरी लोक होते, त्यांसही त्यानें, त्यांच्या योग्यतांनुरूप, कांय पोंचवीवयाचें तें पोहोंचविलें. ह्यामुळें तो पुष्कळ खर्चाखालीं आला. परंतु, ह्या एवढ्या मेहनतीनें आणि खर्चानें त्याचा फायदा होण्याचें

एकीकडेसच राहून, उलटी मोठी हानि झाली; ह्मणजे त्या पायीं तो प्राणांस मुकला! त्याचा प्रकार असा:—शिकंदरबादशाहापाशीं बागोस ह्मणून कोणी एक खोजा होता. तो महाकपटी, चुगल, आणि महत्वाकांक्षी असा होता. त्याजवर बादशाहाची फार मर्जी असे. ती इतकी कीं, त्यास एकांतांतही जाण्यास आडकाठी नव्हती. त्याचें जरी एवढें माहात्म्य होतें, तरी तो खोजा, नीच मनुष्य, त्याचा संतोष करण्यास आपण झटणें हें मोठें नीचत्व आहे, असें आरसिनीज ह्यास वाटून, त्यानें त्यास कांहीं दिलें नाहीं. इतकेंच केवळ नव्हे; तर, त्याची गोष्ट त्यापाशीं कोणीं काढिली तेव्हां तो उघड असें बोलला कीं, "मी बादशाहाच्या मित्राचा बहुमान करीन, त्याच्या खोजाचा कधीं करणार नाहीं." हें त्याचें बोलणें बागोस ह्याचे कानावर गेलें. तेव्हां त्याच्या पायांची आग मस्तकास चढली, आणि तेव्हांपासून तो आरसिनीज ह्याच्या नाशाचा उद्योग करूं लागला. आरसिनीज हा थोरमनाचा आणि निर्मळ अंतःकरणाचा मनुष्य होता. त्यामुळें त्याचे विषयीं बादशाहाच्या मनांत वाईट भरविण्यास त्यास फारशी संधी सांपडेना. परंतु, तसा कांहीं ओघ आला ह्मणजे तो तेथें पराचा कावळा करून बादशाहाच्या मनांत त्याविषयीं पाप भरविण्यास चुकत नसे. असे कितीएक दिवस लोटले. बादशाहाच्या मनांत आरसिनीज ह्याविषयीं संशय उत्पन्न झाला. तरी तो त्यानें उघड करून दाखविला नाहीं. पुढें, द्रव्यसंपादनाच्या इतर खटपटींत असें कोणीं सांगितलें कीं सायरसाचें प्रेत ज्या कबरेंत पुरिलें आहे, तिजमध्यें अपरिमित द्रव्य सांठविलेलें आहे. तेव्हां शिकंदर बादशाहानें ती कबर लागलीच उकरविली. तेव्हां

तींत त्यास कांहीं सांपडलें नाहीं. इराणी लोकांत प्रेताबरोबर, आपापल्या सामर्थ्याप्रमाणें पैसा पुरण्याची चाल पूर्वी असे. त्यावरून ह्या कबरींत आपणांस विपुल द्रव्य सांपडावें, असें त्याला वाटलें होतें; परंतु त्याची अगदीं निराशा झाली. तेव्हां हें द्रव्य कोणीं नेलें असावें, अशी चौकशी चालली; त्या वेळीं, हें कृत्य सुभेदारांखेरीज इतरांस करितां यावयाचें नाहीं, असें त्यांत निष्पन्न झालें. मग काय विचारावें? आंतून सगळी तयारी होतीच. लागलाच आरसिनीज ह्याजवर खटला होऊन, त्यास बिड्या घातल्या; आणि थोडीशी चौकशी केल्यासारखें करून त्यास जिवें मारिलें. ह्या प्रकारेंकरून तो विचारा निरपराधी आरसिनीज हा अगदीं विनाकारण, केवळ त्या नीच खोजाच्या कपटयुक्तीनें प्राणांस मुकला! राजाच्या मर्जीतला नीच तो जगांतल्या थोरांपेक्षां थोर, असा मानिला पाहिजे, असें जें ह्मणतात तें खरें आहे. असो.

इराण देशामध्यें पूर्वीं अशी एक चाल होती कीं, राजा परदेश जिंकून आणि मोठा जय मिळवून स्वदेशीं परत आला, ह्मणजे देशांतल्या प्रत्येक घरच्या मुख्य कारभारिणीस, तिच्या योग्यतेप्रमाणें, एक सोन्याचा तुकडा द्यावा. त्या चालीप्रमाणें शिकंदरानें इराणांतील बायकांस पुष्कळ द्रव्य वांटिलें. तेणेंकरून लोकांमध्यें त्याच्या औदार्याची मोठी वाहवा झाली. राजा बाहेरून स्वारी करून आला ह्मणजे त्यास इराणामध्यें हा मनस्वी खर्च असे. कितीएक धनलोभी राजे तर, जे एकदा स्वारीस बाहेर पडले ते, ह्या खर्चाच्या भयानें, परत स्वदेशीं मुळींच आले नाहींत. सायरसाच्या ज्या समाधीची गोष्ट वर सांगितली आहे, तिजवर, इराणी भाषेमध्यें एक लेख खोदला होता; त्याचें भाषांतर

शिकंदरानें आपल्या भाषेंत करविलें. त्याचें तात्पर्य असें होतें:—"अरे मनुष्या, तूं केव्हांना केव्हां तरी माझ्या ह्या राज्यावर यावयाचा, हें मला ठाऊक आहे; मला तुला एवढेंच ऐकवावयाचें आहे कीं, तूं कोणही अस, आणि तूं कोठूनही ये, मी सायरस इराणचें राज्य स्थापणारा आहें. मी राज्याविषयीं कांहीं बोलत नाहीं; परंतु, जी ही सडेतीन हात जागा माझें शरीर झांकिते, तिचा तेवढा तूं हेवा करूं नको." हे शब्द वाचतांच शिकंदर बादशाहाचे अंतःकरणांत इहलोकची क्षणभंगुर वसती आणि मृत्यु हीं एकदम उभीं राहिलीं. आणि तो थक्क होऊन क्षणभर स्तब्ध विचार करीत बसला. मोठ्याचें मन मोठयाशिवाय इतराच्यानें वळत नाहीं.

शिकंदराच्या स्वारीबरोबर हिंदुस्थानांतून जे कांहीं लोक आले होते, त्यांमध्यें कालानस ह्मणून त्या काळचा एक मोठा तत्त्ववेत्ता होता. तो नेहमीं नग्न असे. तो निरंतर परलोकविचारामध्यें अगदीं मग्न असे. त्याचें वय ह्या वेळीं सुमारें पांसष्ट सत्तर वर्षांचें होतें. इतक्या कालामध्यें त्याला दुखणें कसें तें माहीत नव्हतें. परंतु, इराणांत आल्यापासून त्याची प्रकृति बिघडली. ती लवकर ताळ्यावर येईना, म्हणून त्यानें अग्निकाष्ठें भक्षून देह ठेविण्याचा निश्चय केला. तें साहस न करण्याविषयीं शिकंदरानें त्यास नानाप्रकारीं सांगितलें. परंतु, त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. कालानस हा आपला आग्रह सोडीना. तेव्हां शिकंदरानें, त्याच्या इच्छेप्रमाणें एक मोठी चिता तयार करविली. तिजवर कालानस हा मोठ्या उत्साहानें जावयास निघाला, तेव्हां मासिदोनियन लोकांचा निरोप घेऊन त्यांस म्हणाला,

"मित्रहो, आतां मी जातों; मजवर लोभ असूं द्या; तुह्मी हा आजचा दिवस, एकाद्या मोठ्या सणाप्रमाणें, आपल्या प्रभूच्या समागमें, खाणें पिणें नृत्य गायन करून आनंदांत घालवा. मी तुमच्या राजास थोडक्या दिवसांनीं बाबुलोन येथें भेटेन. असें बोलून तो त्या चितेवर जाऊन स्वस्थ निजला. नंतर, त्याच्या आज्ञेप्रमाणें, तीस आग लाविली. ती खालून पेटत पेटत वर जाऊन त्याचे आंगास लागली; तरी त्यानें इकडचा हात तिजकडे ठेविला नाहीं, किंवा तोंडांतून चकार शब्द काढिला नाहीं! हें भयंकर कृत्य पाहण्यास शिकंदर बुद्ध्या तेथें आला नाहीं. बाकीचे सर्व मासिदोनियन लोक तेथें जमले होते. त्यांस ह्या गोष्टीचें मोठें नवल वाटलें. ह्यानंतर पुढें पुष्कळ वर्षांनीं, आगस्तस सीझर बादशाहापुढें, अथेन्स येथें, हिंदुस्थानच्या दुसऱ्या एका मनुष्यानें आपणास असेंच जाळून घेतलें होतें असें सांगतात; त्याचें थडगें 'हिंदुस्थानच्या माणसाचें' म्हणून अद्यापपर्यंत प्रसिद्ध आहे, असें एका ग्रंथकारानें लिहिलें आहे.

कालानस दग्ध झाल्यावर, त्याच्या सांगण्याप्रमाणें, शिकंदर बादशाहानें, संध्याकाळच्या वेळीं, पुष्कळ मंडळी भोजनास बोलाविली. ती येऊन आपापले जागीं बसल्यावर, "जो कोणी ह्या प्रसंगीं सर्वांत अधिक द्राक्षरस पिईल, त्यास पांचशें रुपयांचा एक उत्तम मुकुट मी बक्षीस देईन" असें शिकंदर बादशाहा बोलला. त्याप्रमाणें, प्रोमाकस म्हणून कोणी गृहस्थ तेथें होता, त्यानें, द्रव्यलोभानें सुमारें वीस पंचवीस पंचपात्र्या मद्य प्यालें, आणि तें बक्षीस मिळविलें. त्या वेळीं तथच्या तेथें जो तो आजारी झाला, तो लागलाच

दोन तीन दिवसांत मरण पावला! आणखी, मद्यपानातिशयानें त्या मंडळींतले एकेचाळीस जण प्राणांस मुकले, असें सांगतात! शिकंदर बादशाहाच्या राज्याच्या आणि कीर्त्तीच्या हांवड्यामुळें लक्षावधि लोक प्राणांस मुकले, त्यांविषयीं फारसें बोलावयाचें नाहीं; कारण बहुतकरून सर्व राजांची रीति तशीच असते. परंतु, त्याच्या अशा मेजवान्यांच्या योगानें मनुष्यें मरावीं, हें मोठें लांछनास्पद होय.

पासारगदा येथून शिकंदराची स्वारी निघाली ती नीट पर्सिपोलिस येथें प्राप्त झाली. तें शहर, हिंदुस्थानाकडे जाते वेळीं, त्यानें घेऊन अगदीं दग्ध करून टाकिलें होतें; त्याची ती दुर्दशा पाहून त्यास ह्या वेळीं फार वाईट वाटलें, आणि एवढें शहर आपण विनाकारण अविचारानें जाळून टाकिलें, असें त्याच्या मनास खाऊं लागलें. तेथून शिकंदर हा सुसा येथें गेला. त्या ठिकाणीं, पासिदिग्रिज नदींतून येऊन, निआर्कस हा आपल्या सैन्यासहवर्तमान त्यास मिळाला. येथें, इराणच्या लढाईंत पाडाव केलेले सगळे लोक ठेविले होते, ते त्यानें पाहिले. त्यानें ह्या ठिकाणीं दारयसाची परमरूपवती सर्वांत वडील कन्या स्तातिरा हिशीं आपलें लग्न लाविलें; आणि तिची एक दुसरी बहीण होती, तिचें लग्न आपला प्रियमित्र हेफीस्तियन ह्याशीं लावून दिलें. ह्या लग्नांच्या प्रसंगीं बादशाहानें असें बोलून दाखविलें कीं, "मासिदोनिआ आणि इराण ह्या दोन राष्ट्रांतील लोकांचें आप्तपणानें ऐक्य असावें, ह्या हेतूनें आह्मीं हे संबंध जोडिले आहेत; आणि आणखी जितके असे संबंध जोडतील, तितके जोडावे, अशी आमची फार इच्छा आहे." ह्या भाषणावरून त्याच्या हाताखालच्या लोकांस तशीं लग्नें करण्याचें उत्तेजन

आलें; आणि त्यांनीं साठसत्तर इराणी मुली निवडून काढून त्यांशीं लग्में लाविलीं. तेणेंकरून बादशाहास फार संतोष झाला. ह्या ठिकाणीं त्यानें आपल्या सर्व सरदार लोकांस एक मोठी मेजवानी दिली. तीस ९००० लोक आले होते; त्या सर्वांस मद्यप्राशनास त्यानें एक एक सोन्याचा पेला दिला, असें ग्रंथांतरीं लिहिलें आहे. एवढेंच करून तो राहिला नाहीं. त्याच्या लष्करामध्यें पुष्कळ लोकांस कर्ज झालें होतें; तें त्यांस विचारून घेऊन फेडावें, असा विचार त्यानें मनांत आणिला. परंतु, आपण आपला पगार खर्चून आणखी इतकें कर्ज केलें, असें बादशाहास समजलें असतां तो काय करील कोण जाणे, ह्या भयानें कोणी खरें सांगेना. तेव्हां शिकंदरानें आपल्या एका कामदारापाशीं पुष्कळ पैसा देऊन त्यास रिणकोधनको कोण ह्याविषयीं फारशी चौकशी न करितां, सर्व कर्ज ज्यांचें त्यांस रोख देऊन टाकण्यास हुकूम केला. त्याप्रमाणें त्या कामदारानें केलें. तेव्हां शिकंदराच्या एवढ्या मोठ्या लष्करामध्यें देणेंदार असा कोणी राहिला नाहीं. ही कर्जाची फेड करण्यास सुमारें १५०००००० रुपये लागले! एवढें औदार्य राजांच्या ठायीं फार क्वचित् आढळतें. कर्ज फिटल्याच्या संतोषापेक्षां, नांवें सांगण्याचें टळलें ह्याचा संतोष शिपाई लोकांस फार झाला. ते लोक, बादशाहाच्या हेतूविषयीं भलताच संशय मनांत आणून जेव्हां रकमा सांगेनात, तेव्हां, मोठ्या प्रीतीनें तो त्यांस ह्मणाला, "अरे बाबा, राजानें आपल्या प्रजेशीं आपल्या वचनास कधींही ढळतां कामास नये; आणि आपला राजा आपणांशीं अशी धरसोड करील, असें प्रजेनें कधीं मनांत आणूं नये." हें बोलणें खरोखर फार लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

शिकंदर बादशाहा आपल्या देशांतून निघून वाटेंतले सगळे प्रदेश घेत घेत हिंदुस्थानापर्यंत आला,आणि त्या प्रदेशांवर आपले सुभेदार नेमीत गेला. ते सुभेदार चांगले हुशार होते; आणि राज्यव्यवस्थेच्या कामांत फार दक्ष होते; परंतु त्या सर्वांस असें खचीत वाटत होतें कीं, हा बादशाहा, थंडीवारा न जुमानितां अज्ञात प्रदेशांकडे एकसारखा धूम करीत चालला आहे, हा तिकडेच एकादा अपघात होऊन मरेल. असा त्यांचा समज असल्यामुळें, शिकंदराची स्वारी त्यांच्या ठाण्यांच्या बाहेर निघून जातांच ते स्वेच्छ वर्तूं लागले. त्यांनीं न्याय अन्याय कांहीं पाहिलें नाहीं. अशा गृहस्थांपैकींच बाबुलोनचा सुभेदार हारपालस हा होता. ह्यानें आपल्या ताब्यांतील मुलुखांतल्या लोकांस अगदीं पिळून काढून अपार धन जमविलें होतें, आणि विलक्षण बंडाळी मांडिली होती. शिकंदर तिकडे मेला, असें समजून तो मनास आलें तसा वर्तत होता. इतक्यांत, शिकंदरबादशाहा नजीक प्राप्त झाल्याची खबर त्यास समजली. तेव्हां त्याची पांचांवर धारण बसली, आणि तो आपली अन्यायानें मिळविलेली संपत्ति घेऊन, जीव बचावण्याकरितां पळत सुटला. त्यानें लागलेच ६००० लोक जमविले आणि त्यांसहवर्तमान अथेन्स शहरामध्यें प्रवेश केला. त्या वेळीं तेथें फोसियन आणि दिमास्थनिस हे दोघे मोठे वक्ते आणि शूर पुरुष होते. त्यांत फोसियन हा तर मोठा तत्त्वज्ञानी होता, आणि लोक त्याला फार पूज्य मानीत असत. त्याजकडे जाऊन हारपालस ह्यानें प्रथम त्याचें साह्य मागितलें; आणि त्यास पुष्कळ द्रव्य देऊं केलें. परंतु; त्याचें बोलणें त्यानें कबूल केलें नाहीं. कारण, त्याची विनंती मान्य करणें हें त्यास अगदीं अप्रशस्त

दिसलें हें एक ; आणि ज्या द्रव्यलोभाच्या आशेनें तो त्यास वळवायास पाहात होता, त्या द्रव्यलोभास त्याचे अंतःकरणांत मुळींच थारा नव्हता, हें दुसरें. ह्या त्याच्या निर्लोभतेविषयीं फिलिप राजाचे वेळींही अशाच कांहीं प्रसंगावरून शिकंदरबादशाहाची आणि लोकांची चांगली खातरी झाली होती; तरी, मनुष्याच्या वृत्तिस्थिति कोणत्या वेळीं कशा होतील कोण जाणे, असें मनांत आणून, शिकंदरानें, हारपालस ह्याच्या दिढीनें द्रव्य देण्याची आशा दाखवून, त्यास आपले पक्षाकडे वळवून घेण्याकरितां प्रयत्न चालविले. तें द्रव्य ज्यांनीं त्याजकडे आणिलें, त्यांस फोसियन ह्यानें असें विचारिलें कीं, "इतक्या अथेनियन लोकांमध्यें शिकंदरबादशानें हें इतकें द्रव्य मजकडेस कां पाठविलें बरें ?" त्यावर त्यांनीं उत्तर दिलें कीं, "आपणांसारखा न्यायी आणि सद्गुणी असा पुरुष ग्रीसदेशामध्यें दुसरा कोणी नाहीं, असें शिकंदरबादशाहा जाणतो, ह्मणून त्यानें हें द्रव्य आपणांस अर्पिलें आहे ; दुसरें कांहीं नाहीं." त्यांस फोसियन ह्यानें ह्मटलें, "बरें तर ; मी न्यायी आणि सद्गुणी आहें, असें तुम्ही समजतां, तें खरें करण्याकरितांच हें द्रव्य माझ्यानें घेववत नाहीं, असें तुम्ही आपल्या बादशाहास सांगा; आणि जसा मी आहें, तसाच सदोदित मला राहूं द्या, त्यास व्यत्यय आणूं नका, अशी माझी विनंती त्यास कळवा, आणि हें त्याचें द्रव्य त्याला परत द्या." इतकेंच बोलून तो राहिला नाहीं. त्यानें लोकांचे मनांत हारपालस ह्याविषयीं चांगला द्वेष उत्पन्न करून, त्यास तेथून घालवून देण्याविषयीं उत्तेजन दिलें. तेव्हां, येथें आपला लाग साधत नाहीं, असें पाहून हारपालिस तेथून निघून गेला.

नंतर हारपालस ह्याची स्वारी दिमास्थनीस ह्याजकडेस गेली. तोही मोठा विद्वान आणि जगविख्यात वक्ता होता. तो बोलूं लागला ह्मणजे ऐकणारांच्या अंतःकरणांत जो पाहिजे असे तो रसाविर्भाव मूर्तिमंत उभा राही. आणि निलोभतेविषयींही त्याची बरीच आख्या असे. परंतु, ह्या प्रसंगीं त्याची वृत्ति बदलली. हारपालस ह्यानें जें द्रव्य त्यास दिलें आणि देऊं केलें, त्याच्या योगानें तो त्यास वश झाला, आणि त्याच्या पक्षाकडे लोकांचीं मनें वळविण्याविषयीं तो प्रयत्न करूं लागला. अशी एकादी मोठी गोष्ट लोकांच्या मनांत भरवून द्यावयाची असली, ह्मणजे त्यांस एकत्र जमवावें आणि चित्तवेधक कोटिक्रम करून, आपल्या वक्तृत्वशक्तीच्या साह्यानें त्यांस आपलेंसें करून सोडावें, असा त्याचा पाठ असे. त्याप्रमाणें भाषण करण्याचा ह्या प्रसंगीं त्यानें विचार केला. तो लोकांमध्यें प्रगट होतांच, त्यांनीं उघड असें बोलून दाखविलें कीं, दिमास्थनीज हा, न्यायान्याय न पाहतां, केवळ पैशाच्या लालुचीनें हारपालस ह्याचा पक्ष आश्रयपात्र आहे असें सिद्ध करून दाखविण्याकरितां हें भाषण करणार आहे, ह्यास्तव तें ऐकावयास आह्मी कोणी यावयाचे नाहींत. तेव्हां दिमास्थनीसाचा तो बेत तसाच राहिला. एवढ्यानेंच हें प्रकरण आटोपलें नाहीं. त्या अथेन्सकरांनीं हारपालस ह्यास आपल्या शहराबाहेर हांकून लाविलें, आणि दिमास्थनीस ह्यानें जो त्याचा पक्ष उचलिला होता, तो केवळ द्रव्यलोभास वश होऊन उचलिला होता, ह्या त्याच्या पापकर्माबद्दल त्याची चौकशी करावी, असा त्यांनीं ठराव केला. त्याप्रमाणें न्यायाधीशांनीं त्याची चौकशी केली. तेव्हां तो अपराधी ठरला, आणि त्यास पांच लक्ष रुपये दंड झाला!

तो द्यावयास त्यास मिळेना, ह्यास्तव त्यास कारागृहांत ठेविलें. तेथून तो, पळून जाऊन ईजिना येथें लपून राहिला. तेथून तो, आपली जन्मभूमि आतिका इजकडे पाहून खळखळां अश्रु गाळीत असे, आणि कधीं कधीं एकाद्या अगदीं अल्पधीर बायकोप्रमाणें धाय मोकलून रडत बसे. त्याचे हातीं जेव्हां देशाचा राज्यकारभार होता, तेव्हां तो महान् धैर्यशाली, ह्मणजे आकाश कोसळलें तरी न डगमगणारा असा पुरुष ह्मणून प्रसिद्ध असे. परंतु, त्याचा तो गुण ह्या वेळीं मुळींच दृष्टीस पडला नाहीं. ह्याचे सारखा नामांकित वक्ता सिसरो, ह्याला जेव्हां देशपार केलें होतें, तेव्हां त्याचीही स्थिति अशीच झाली होती, असें ग्रंथांतरीं लिहिलें आहे. ह्यावरून, ज्यांस लोक धैर्यशाली आणि थोर असें समजतात, ते कशीही अवस्था प्राप्त झाली असतां, ह्मणजे धैर्यशाली आणि थोर राहतीलच, असें ह्मणतां येत नाहीं. ह्या गोष्टीस कांहीं सन्मान्य अपवाद निघतील; नाहीं असें नाहीं. परंतु, सामान्यत्वेंकरून, वर सांगितलेली गोष्ट सर्वत्र खरी आहे, असें कबूल करणें भाग पडतें. औदार्याची खरी परीक्षा दारिद्र्यांत होत नाहीं; श्रीमंतींत होते; त्याप्रमाणें, धैर्यशीलतेची खरी परीक्षा, उगाच पाहिजे त्या वेळीं होत नाहीं; तर तिला संकटसमयच अवश्य पाहिजे.

पासानिआस ह्या नांवाचा दुसरा कोणी एक वक्ता दिमास्थनीसाचा प्रतिपक्षी होता. त्यानें एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, "अथेन्स येथून पळून गेल्यावर हारपालस ह्यास फिलोक्सेनस ह्या नांवाच्या एका मासिदोनियन मनुष्यानें धरिलें, आणि त्याजपासून कोणकोणत्या अथेन्सकरांनीं किती किती लांच घेतला होता हें त्याचे तोंडून वदविण्याकरितां

त्याचे पराकाष्ठेचे हाल केले. तेव्हां त्यानें कितीएक लोकांचीं नांवें घेतलीं; परंतु, त्यानें दिमास्थनीस ह्याचें नांव मुळींच घेतलें नाहीं." दिमास्थनीस ह्याच्या मित्रांनीं किंवा स्तुतिपाठकांनीं असें लिहिलें असतें, तर त्याच्या सत्यतेविषयीं शंका घ्यावयास जागा राहिली असती. परंतु, ही साक्ष साक्षात् प्रतिपक्ष्यानें दिली आहे. तेव्हां तिच्या सत्यतेविषयीं शंका घ्यावयास नको.

हारपालस हा अथेन्स येथें पळून गेल्याचें वर्तमान शिकंदर बादशाहास समजलें तेव्हां, त्यास व जे अथेन्सकर त्यास सहाय झाले असतील त्यांस शासन करण्याकरितां तावडतोब तिकडे जावें, असा त्यानें निश्चय केला, आणि त्याप्रमाणें तयारी करण्यास सैन्यांत हुकूम सुद्धां फिरला. इतक्यांत, त्या लोकांनीं त्यास आपल्या शहरांतून घालवून दिल्याची खबर त्यास पोहोंचली. तेव्हां त्यानें तिकडे जाण्याचा विचार सोडून दिला. नंतर त्यास पुनः एकदा समुद्र पाहण्याची इच्छा उत्पन्न झाली; ह्मणून तो सुसा येथून तैग्रीस नदीच्या द्वारें खालीं तिच्या मुखाशीं आला. आणि मग, तेथून, ओपिस शहरानजीक हेफीस्तियन हा त्याचा सरदार सर्व सैन्याचा तळ देऊन राहिला होता, त्यास जाऊन मिळाला.

शिकंदर बादशाहाच्या स्वारीचा मुक्काम सुसा येथें असतां, त्याच्या पूर्वींच्या योजनेप्रमाणें, ३०००० तरुण आणि शूर इराणी लोक, शस्त्रास्त्रविद्येंत निपुण होऊन युद्धकर्मास सिद्ध झालेले, असे त्याच्या लष्करांत येऊन दाखल झाले. त्यांस पाहून बादशाहास मोठा आनंद झाला. हे सर्व लोक ओपिस नदीच्या जवळच्या छावणींत प्राप्त होतांच, शिकंदर बादशाहानें मासिदोनियन शिपायांस व अमलदारांस आपलें

मनोगत कळविण्याकरितां एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यांत असें होतें कीं, "जे मासिदोनियन लोक जखमी होऊन, प्रवासास त्रासून, अशक्त होऊन, अथवा स्वदेशवियोग-दुःखामुळें अतिशयित उदास होऊन ग्रीस देशास परत जाऊं इच्छीत असतील, त्यांस रजा देण्यास आह्मी सिद्ध आहों. अशा लोकांस त्यांच्या योग्यतांनुसार बक्षिसें द्यावीं, आणि मोठ्या प्रतिष्ठित रीतीनें त्यांच्या घरीं पोंचवून द्यावें अशी आमची इच्छा आहे. स्वदेशीं जाण्याची ज्या कोणांची इच्छा असेल, त्यांनीं आपली निघण्याची तयारी करावी." मासिदोनियन लोक इतर कारणांनीं आधींच फार त्रासले होते; आणि त्यांत हा असा जाहीरनामा पाहून त्यांस अतिशयित वाईट वाटलें. कारण, इराणी सैन्य बादशाहास मिळाल्यामुळें आपली त्यास गरज नाहींशी झाली, असें त्यांच्या मनांत आलें; आणखी, त्या परकीय लोकांवर त्याची इतकी मेहरबानी पाहून, हा बादशाहा मासिदोनिआ अजीं सोडून देऊन इराणांतच राहातो कीं काय, असें त्यांस भय पडलें. तेव्हां त्यांस काय करावें हें सुचेना. ते अत्यंत दुःखित होऊन, आणि कांहींसे संतापून, एकदम सगळे त्याच्या तंबूपाशीं जमा झाले; आणि उद्धटपणानें त्यांनीं बादशाहास असें सांगितलें कीं, "आपले मनांत रजा द्यावयाचीच आहे, तर आम्हां सर्वांस, म्हणजे सगळ्या मासिदोनियन लोकांस एकदम रजा द्यावी; आम्ही जाण्यास सिद्ध आहों; आम्ही आज पावेतों इतके कष्ट सोसून आपणांस इतके जय मिळवून दिले, ते सगळे आज व्यर्थ गेलेसे झाले. कांहीं चिंता नाहीं. आपण देवावतार आहां! आपणांस काय कमी आहे? आपणांस नव्या देशाचे नवे लोक मिळाले आहेत. त्यांस बरोबर घेऊन

आपण पाहिजे त्याशीं पाहिजे त्या रीतीनें युद्ध करावें. आमचें त्याविषयीं कांहीं एक म्हणणें नाहीं. आतां ह्यापुढें आपली चाकरी करावयाची नाहीं, असा आमचा निश्चय झाला आहे; कृपा करून आम्हां सर्वांस लवकर निरोप द्यावा एवढीच विज्ञापना आहे." हें बोलणें ऐकून शिकंदर बादशाहास राग आला, आणि त्यानें लागलीच तेथच्या त्या लोकांच्या पुढाऱ्यांस धरवून कैद करविलें, आणि तेरा असामींस कडक शिक्षा केल्या. हें कृत्य पाहतांच बाकीच्या लोकांची धुंदी उतरली, आणि आपण मोठी चूक करीत आहों, असें त्यांस वाटून, ते सगळे खालीं माना घालून खळखळां अश्रू गाळूं लागले. त्यांच्या चर्यांवर पश्चात्ताप मूर्तिमंत दिसूं लागला; आणि ते अगदीं दीन झाले आहेत असें बादशाहास दिसलें. तेव्हां त्यास त्यांची फार दया आली. तरी, त्यांजविषयींचा त्याचा राग गेला नव्हता. तो त्यांस लक्षून बोलला, "अरे, तुह्मांवर माझा पिता फिलिप राजा ह्यानें आणि मीं किती उपकार केले आहेत, हें तुह्मी विसरलां काय ! तुह्मी सगळे एकदम रजा मागतां, एवढेंच कीं नाहीं कायतें ! ठीक आहे. जा ! मी तुम्हां सर्वांस निघून जाण्यास मोकळीक देतों ! जा, जा, जा तुह्मी सगळे मजपासून निघून जा, आणि सर्व दुनयेस असें कळवा कीं, आमच्या राजानें जे नवीन लोक जिंकिले आहेत, त्यांच्या विश्वासावर आह्मी त्यास टाकून घरीं आलों आहों; आणि ते नवे लोक, आम्हांपेक्षां आमच्या राजावर अधिक प्रीति करितात !" इतके शब्द बोलून तो सिंहासनावरून सटकर उठून आपल्या तंबूत जाऊन बसला. आणि कांहीं दिवसपर्यंत बिलकुल कोणासही भेटला नाहीं. हें पाहून सर्व मासि-

दोनियन लोकांस फार वाईट वाटलें. त्यांनीं त्या तंबूपुढें मोठ्या नम्रतेनें आपले दोष पदरांत घेतले, आणि त्यांची क्षमा करण्याविषयीं शिकंदर बादशाहास विनंती केली. तेणेंकरून त्याचें मन किंचित् शांत झालें. त्यानें बाहेर येऊन, त्या लोकांचें सांत्वन केलें. त्यांपैकीं जे कोणी राहण्यास खूष होते त्यांस ठेवून घेतलें, आणि ज्यांचे मनांत जावयाचें होतें, त्यांस, योग्यतांनुसार बक्षिसें देऊन, वाटेस लाविलें. अशा प्रकारेंकरून लष्करांतली गडबड मोडली.

शिकंदर बादशाहा ह्या स्वारीस बाहेर पडला तेव्हां त्यानें मासिदोनिआ देशाचा सगळा कारभार आंतिपातर ह्याजकडे सोंपिला होता, तो तो उत्तम प्रकारें चालवीत होता, आणि त्याचें व ओलिंपिआस हिचें ह्मणजे शिकंदराच्या मातुश्रीचें जमत नसे, ह्याविषयीं पूर्वीं सांगितलेंच आहे. त्याविषयीं उभय पक्षांकडून त्यास वारंवार पत्रें येत असत. त्यांत, आंतिपातर ह्यांचें ह्मणणें विशेष वाजवी वाटे, आणि ओलिंपिआस हिच्या लेखांत त्याला पुष्कळ दुराग्रह दिसे. तरी, तिच्या इच्छे विरुद्ध एक शब्द काढवेना, आणि तिची मर्जी राखून आंतिपातर ह्याची समजूत त्याच्यानें घालवेना. तेव्हां, त्यानें मासिदोनिआच्या राज्यकारभारावर क्रेतिरस ह्यास नेमिलें; आणि नवीन लष्कर घेऊन येण्याविषयीं आंतिपातर ह्यास आज्ञापत्र पाठविलें. क्रेतिरस ह्याच्या ताब्यामध्यें, आंतिपातराप्रमाणें थिसली आणि थ्रेस हेही देश त्यानें दिले. आंतिपातर हा आपण स्वतः राजा होण्याचा प्रयत्न करीत आहे, असें देखील एकदा ओलिंपिआस हिनें शिकंदरास लिहिलें होतें. परंतु, त्याचा त्यावर पूर्ण विश्वास असल्यामुळें त्याविषयीं त्यानें कांहीं मनांत आणिलें नाहीं.

आपण इतकें इमानें इतबारें काम करीत असतां, शिकंदरानें आपणास त्यावरून काढिलें, असें वाटून, आंतिपातरास फार राग आला, आणि त्यानें सरकारी चाकरीचा मुळींच राजीनामा दिला. अशा प्रामाणिक सेवकाचा असा अपमान करणें, हें जितकें अवघड आहे, त्यापेक्षां, मातुश्रीचें मन दुखविणें हें सुशील आणि कृतज्ञ पुत्रास अधिक अवघड आहे. ह्याचा अनुभव मातृभक्त पुत्रांनीं आपले ठायीं पाहावा.

ओपिस येथें कांहीं दिवस राहून शिकंदरबादशाहाची स्वारी मीदिआदेशामध्यें एकबातना येथें गेली. तेथें ग्रीस देशांतून आलेले लोक त्यास मिळाले. त्यांमध्यें नुसते नाचे पोऱ्ये २००० होते! ह्या मुक्कामीं शिकंदरानें पुनः आपल्या लोकांस आठचार दिवस ऐषआरामांत घालविण्यास फुरसद दिली; आणि आपण स्वतःही नाचरंगांत निमग्न झाला. त्यानें सर्व लोकांस एक मोठी टोलेजंग मेजवानी दिली. तिजमध्यें, एकमेकांच्या चढाओढीनें, बादशाहास खूष करण्याकरितां, लोकांनीं अतिशयित मद्यपान केलें. तें इतकें कीं त्याच्या योगानें पुष्कळ लोक आजारी पडले. त्यांतच बादशाहाचा जिवलग मित्र हेफीस्तियन हा एकाएकीं अतिशयित दुखणाईत होऊन मरण पावला. तेणेंकरून बादशाहास फार दुःख झालें. कारण, त्याचेइतका जिवास जीव देणारा दुसरा एकही मित्र त्यास नव्हता, हें तो जाणत असे. तो मोठा विचारी असून सहनशील होता. त्यावर बादशाहाचा इतका लोभ असे कीं, त्याचा शब्द त्यानें कधीं खालीं पडूं दिला नाहीं. तरी त्याच्या योगानें तो तिळभर देखील उन्मत्त झाला नव्हता. तो बादशाहास जी काय भीड घाली ती कोणाच्यातरी बऱ्याकरितां घाली; स्वहितार्थ घालीत नसे.

तेणेंकरून, तो मेला तेव्हां लष्करांतले सगळे लहानमोठे लोक, जसा एकादा हितकर्ता वडील बंधु गमवावा, त्याप्रमाणें त्याकरितां हळहळले. जसा हेफीस्तियन बादशाहाच्या मेहेरबानींतला होता, तसाच क्रेतिरस हाही होता. तथापि त्या दोघांमध्यें थोडें अंतर होतें. तें शिकंदरास ठाऊक होतें. त्यावरून त्याचे तोंडांतून एकदा असें निघालें होतें कीं, "क्रेतिरस जी माझी भक्ति करितो, ती मी राजा आहें, ह्मणून करितो; आणि हेफीस्तियन जी माझी भक्ति करितो, ती मी शिकंदर आहें ह्मणून करितो." ह्यावरून तें अंतर वाचकांच्या लक्षांत येईल.

शिकंदरबादशाहाची स्वारी बाबुलोन शहराच्या जवळ जवळ, ह्मणजे दोनतीन कोसांवर येऊन दाखल झाली, तेव्हां खालदियन लोकांच्या जोशांनीं आपण होऊन त्यास अशी विनंती केली कीं, आपण ह्या शहरांत कदापि पाऊल ठेवूं नये, कारण तेथें आपला मृत्यु आहे. खालदीलोक ज्योतिषामध्यें निष्णात आहेत, अशी बादशाहाची पूर्ण खातरी होती, तेणेंकरून त्या जोशांचें सांगणें त्यास खरें वाटलें, आणि त्यानें त्या शहराचा मार्ग सोडून देऊन दुसरी वाट धरिली. त्या वाटेनें तो पांचचार कोस तें शहर मागें टाकून पुढें गेल्यावर त्यास ग्रीसच्या विद्वान पुरुषांनीं खालदी जोशांविषयीं नानाप्रकारच्या गोष्टी सांगून, त्यांचें भविष्य भ्रांतिमूलक आहे, असें त्याचे मनांत बिंबविलें. तेव्हां तो बादशाहा तेथून परतून, मोठ्या डामडौलानें आणि समारंभानें बाबुलोन शहरांत प्रवेश करिता झाला. तेथें जिंकिलेल्या बहुतेक सर्व राष्ट्रांकडील वकील नजराणे घेऊन येऊन बसले होते, हें बादशाहास पूर्वींच समजलें होतें. त्यामुळें त्यास

तेथें परत येण्याची इच्छा विशेष उत्पन्न झाली असावी, असें कितीएक सुज्ञ ग्रंथकारांचें मत आहे. तें बहुतांशीं खरें दिसतें. कारण, सर्व राष्ट्रांनीं आपणांस प्रभु मानावें, आणि देवासारखा मान द्यावा, अशी त्याला अतिशयित हौस होती. ती प्रसिद्धपणें पुरवून घेण्यास हें स्थल त्यास फार उत्तम होतें. बाबुलोन शहरामध्यें स्वारी आल्यावर त्यानें तेथें मोठमोठीं दरबारें भरून मोठ्या संतोषानें परकीय राष्ट्रांकडून आलेले बहुमोल नजराणे घेतले, त्यांच्या वकीलांचीं बोलणीं ऐकिलीं, त्यांविषयीं आपल्या मंत्रीमंडळींत वाटाघाट केली, आणि सर्व जगाचें प्रभुत्व, कांहीं दिवसपर्यंत, स्वस्थपणें उपभोगिलें. खरोखर, ह्या प्रसंगीं जसें वैभव शिकंदर बादशाहानें भोगिलें, तसें, आजपर्यंत, जगामध्यें, फार थोड्यांनीं उपभोगिलें असेल, किंबहुना दुसऱ्या कोणींच उपभोगिलें नसेल, असें ह्मणण्यास चिंता नाहीं.

ह्या ठिकाणीं इतर वकिलातींमध्यें कारिंथशहरचे वकील होते. ते, कारिंथशहर संबंधीं स्वातंत्र्य बादशाहास अर्पिण्यास आले होते. तें पतकरण्यास त्याला जेव्हां त्यांनीं विनंती केली, तेव्हां, सर्व पृथ्वीच्या राजास हें अर्पण किती अल्प आणि हास्यास्पद आहे, असें त्याचे मनांत आलें असें त्याच्या चर्येवरून स्पष्ट दिसलें. तेव्हां लोकांनीं त्यास असें सांगितलें कीं ह्या स्वातंत्र्यार्पणांत जरी फारसा लाभ नाहीं, तरी तो एक मोठा मान आहे; हा मान हर्क्युलिस ह्यासही कारिंथकरांनीं दिला होता, व तो त्यानें मोठ्या संतोषानें पतकरिला होता. हें ऐकिल्यावर कारिंथकरांची विनंती शिकंदर बादशाहानें मान्य केली.

हेफीस्तियन हा आपला परम मित्र मरण पावला, त्याचें

नांव चिरकाल राही, असें कांहीं तरी त्याच्या नांवानें आपण करून ठेवावें, असें शिकंदर बादशाहाच्या मनांत आलें. त्याप्रमाणें त्यानें त्याचें थडगें बांधण्याचें काम स्तासिक्रेतिस नामक उत्तम कारागिरास सांगितलें. त्यानें तें थडगें आणि त्यावरची इमारत हीं फार उत्तम तऱ्हेनें बांधिलीं. त्या कृत्यास एकंदर एक कोटि ऐशीं लक्ष रुपये लागले असें रालिन साहेबानें लिहिलें आहे. हाच कारागीर शिकंदर बादशाहास असें सांगत होता कीं, "थ्रेस देशामध्यें आथोस नामक जो पर्वत आहे, त्याचा एक अक्राळविक्राळ पुतळा कोरितां येईल; तो एवढा कीं, त्याच्या एका हातामध्यें १०००० मनुष्यांचें एक शहर देतां येईल, आणि दुसऱ्या हातांतून नदी वाहात आहे, असें दर्शवितां येईल; आणि हें कृत्य आपल्या आश्रयानें शेवटास गेलें असतां आपलें नांव सर्व जगामध्यें चिरायु होईल." त्यावर बादशाहानें उत्तर दिलें, "*झर्क्सिझ राजाच्या नांवास त्या पर्वतावरून मोठें भूषण प्राप्त झालें आहे, तें त्याचें त्याला लखलाभ असो; त्याची अपेक्षा मी करीत नाहीं; मी काकेशस पर्वत, ऐक्सार्तिस नदी, आणि कास्पियन समुद्र हीं ओलांडून जय मिळविले आहेत, एवढें स्मारक कृत्य मला पुरे आहे."

हेफीस्तियन ह्याचें नुसतें थडगेंच बांधून शिकंदर बादशाहा राहिला नाहीं. त्याचें त्यानें आणखी पुष्कळ देव्हारें माजविलें होतें. ईजिप्त देशांतला त्याचा सुभेदार क्लिओमिनीस ह्यास त्यानें असा हुकूम पाठविला कीं, "अलेक्झांद्रिआ आणि फारोज येथें हेफीस्तियन ह्याचीं देवळें स्थापावीं. हें

* ह्या राजानें एकदा त्या पर्वतास आपली आज्ञा मानण्याविषयीं मोठ्या धमकीचें एक पत्र लिहिलें होतें, असें प्राचीन इतिहासांत प्रसिद्ध आहे.

काम तुम्ही जर फार चांगलें आणि त्वरित कराल, तर लोकांस विनाकारण गांजून, जे अपराध तुम्हीं आजपर्यंत केले आहेत, सांप्रत करीत अहां, आणि पुढें कराल, त्या सर्वांविषयीं आम्ही तुम्हांस क्षमा करूं !" ही आज्ञा किती चमत्कारिक आहे, ह्याविषयीं फारसें सांगणें नको. शिकंदर बादशाहा आपणा स्वतःला तर देवावतार म्हणवीतच असे; परंतु, ह्या प्रसंगीं त्यानें आपल्या मनुष्य मित्रास देव बनविण्याचा प्रयत्न केला होता !

बाबुलोन येथें शिकंदर बादशाहा सुमारें एक वर्ष राहिला. तेव्हां तो फारसा उद्योग करीत नव्हता. तथापि, जलमार्गानें आफ्रिकेंत जावें; कास्पियन समुद्राच्या सभोंवतीं ज्या राष्ट्रांचा शोध आपणास लागला नाहीं, तीं शोधून काढावीं; अरबस्थान जिंकावें; कार्थेज शहराच्या लोकांशीं युद्ध करून त्यांस पादाक्रांत करावें; आणि राहिलेलीं युरोपांतलीं सर्व राष्ट्रें काबीज करून त्यांचें प्रभुत्व संपादावें; असे अनेक विचार त्याचे मनांत घोळत होते. इतर लोकांस श्रमांचा शीण येतो; परंतु, शिकंदर बादशाहास स्वस्थ बसण्यानें अतिशयित शीण येत असे. त्याची महत्वाकांक्षा आणि कल्पनाशक्ति ह्या त्यास कधींही स्वस्थ राहूं देत नसत. हें सर्व जग जिंकिल्यावर, आपली हांव तृप्त करून घेण्यास त्यास एकादें नवीन काल्पनिक दुसरें जग उत्पन्न करावें लागलें असतें, असें एका सुज्ञ ग्रंथकारानें लिहिलें आहे.

बाबुलोन शहर युफ्रेतीस नदीच्या कांठीं होतें. त्या नदीच्या लोटानें एके वेळीं त्या शहराचा फार नाश झाला होता. तिचा बांध अगदीं कोसळून गेला होता. त्यामुळें तिचें पात्र इतकें उथळ झालें होतें कीं, तिजमधून लहानसाहान होडी

चालण्यास देखील मोठी अडचण पडे. हें पाहून शिकंदराच्या मनांत आलें कीं, हा जो बांध कोसळला आहे, तो पुनः पहिल्याप्रमाणें बांधून नदी पूर्वस्थितीस आणावी. ह्या गोष्टीचा विचार करण्यास तो कांहीं खालदी लोक बरोबर घेऊन एका लहानशा होडींत बसून त्या नदीमध्यें इकडे तिकडे फिरावयास गेला. त्यांत कांहीं खालदी जोशी होते. त्यांस लावून तो ह्मणाला, "तुह्मीं मला उगाच एकाद्या बायकोप्रमाणें भिवविलें होतें. बाबुलोन शहरामध्यें मोठ्या थाटानें प्रवेश करून मी आज सुरक्षितपणें बाहेर पडलों कीं नाहीं, पहा बरें!" त्यावर त्यांस कांहीं एक उत्तर देतां आलें नाहीं.

शिकंदराच्या इच्छेप्रमाणें त्या नदीच्या बांधाचें काम सुरू झालें. त्यावर सहस्रावधि लोक लाविले होते. तें काम कांहीं दिवसपर्यंत मोठ्या झपाट्यानें चाललें, आणि तो बांध कितीएक कोसपर्यंत तयारही झाला. हा असाच पुढें चालून जर शेवटास गेला असता, तर त्या नदीपासून तिच्या आसपासच्या प्रदेशास जें भय होतें, तें नाहींसें होऊन, ती नदी चांगली-मोठी गलबतें चालण्यासारखी झाली असती. परंतु, मध्यें कांहीं ठिकाणीं माती फार खराब लागली, ह्यामुळें तें काम थोडेसें मंदावलें; आणि पुढें थोड्याच दिवसांनीं शिकंदरबादशाहा मरण पावल्यामुळें अर्धेंच बंद पडलें. नाहींतर खरोखर ह्या कृत्यानें त्याचें नांव चिरायू झालें असतें. परंतु, होणारापुढें कोणाचा उपाय नाहीं. ह्या बांधाचें काम बंद पडण्यास, मुख्य कारण, बाबूलोन शहरास खिस्ती पवित्र शास्त्रामध्यें जो परमेश्वरानें शाप* दिला होता, तें होय, असें प्राचीन ग्रंथकारांचें मत आहे.

---

* जुन्या करारामध्यें इर्मया ह्याचे अ. ५० आणि ५१ ह्यांत पाहा.

बाबुलोनामध्यें बेलस नामक मूर्तीचें एक मोठें देवालय होतें. त्यांतील मूर्ति सेरस ह्यानें फोडून टाकिली होती, व तें देवालय झर्कसिझ ह्यानें जमीनदोस्त केलें होतें. तें पुनः बांधावें, असें शिकंदरबादशाहाच्या मनांत आलें. त्या कामावर त्यानें एकदम १०००० मनुष्यें लाविलीं, आणि तें मोठ्या आवेशानें चालविलें. परंतु, त्या इमारतीच्या दगडमातीच्या राशी एवढाल्या पडल्या होत्या कीं, त्या एकीकडे करून देवळाच्या कामास हात लागण्यापूर्वींच शिकंदरबादशाहा मरण पावला. ह्मणून तें तितकेंच राहिलें.

शिकंदराची स्वारी बाबुलोन शहरामध्यें असतां, जे अनेक विचार चालले होते, त्यांमध्यें अरबस्तानावर स्वारी करण्याची मसलत पुढें सरसावली; आणि, त्या काळच्या रीतीप्रमाणें तिच्या तयारीच्या मेजवान्या चालल्या. त्यांमध्यें दारू पिण्याची तर कांहीं शिकस्त झाली. एके रात्रीं शिकंदरानें आपले येथें सगळी मंडळी मेजवानीस बोलाविली होती. तेथें अपरात्र होई तोंपर्यंत यथेच्छ मद्यप्राशन झाल्यावर, इतर लोकांबरोबर शिकंदरबादशाहा उठून निजावयास चालला. इतक्यांत, मीदियस ह्या नांवाचा त्याचा कोणी एक सरदार त्यास आपले येथें उभ्याउभ्यांनीं मंडळीस दर्शन देण्याविषयीं विनंती करूं लागला. हा मनुष्य अगदीं साधारणांतला होता. परंतु, हेफीस्तियन मेल्यापासून ह्याचें माहात्म्य किंचित् वाढतें होतें, व ह्याजवर बादशाहाचा बराच लोभ बसला होता. ह्याची विनंती त्यास अमान्य करवेना. तो त्याच्या आग्रहास्तव त्याच्या घरीं गेला. नंतर जें कांहीं घडलें, त्याची हकीकत बादशाहाच्या दिनचर्येच्या पुस्तकांत लिहून ठेविलेली आहे. तिचें तात्पर्य असें:—" बादशाहानें मीदिय-

साच्या पंक्तीस बसून यथेच्छ मद्यपान केलें; नंतर तो उठला, आणि स्नान करून, आपल्या बिछान्यावर जाऊन निजला. नंतर तो पुनः उठला, पुनः थोडेंसें मीदियसाबरोबर खाल्लें, आणि पुनः स्नान करून शयन केलें. नंतर त्याला ताप भरला. तरी त्याला तसेंच रथांत बसवून त्याच्या घरीं नेलें. तेथें त्यानें नित्याप्रमाणें आपला देवदेव केला. नंतर तो रात्र पडेपर्यंत आपलें स्वारीचें काम पाहात होता. पायमार्गानें जाणाऱ्या सैन्यानें त्या दिवसापासून चवथे दिवशीं तेथून निघावें, आणि आरमारानें आपलीं जाहाजें पांचवे दिवशीं हांकारावीं असा त्यानें हुकूम केला. नंतर तो एका तरींत बसून नदीपलीकडच्या एका विश्रामबागेंत जाऊन राहिला. तेथें तो, तापास न जुमानितां, रोजच्यारोज स्नानें करून, आपल्या नित्यपाठाप्रमाणें भजन पूजन करी. तेथें त्याचें दुखणें फारच बळावलें. तरी, आपल्या स्वारीविषयीं हुकूम देण्यासवरण्याचें काम त्यानें सोडिलें नाहीं. त्याची प्रकृति दिवसेंदिवस अधिकाधिक बिघडत चालली, ह्मणून त्याच्या लोकांनीं त्यास त्या विश्रामबागेंतून काढून, डोलींत घालून, नेहमीं राहण्याच्या वाड्यांत आणिलें. ह्याप्रमाणें सत्तावीस दिवस लोटले." अठ्ठाविसावे दिवशीं त्याची जीभ वांकडी पडून हळूहळू वाचा बसली. त्या पूर्वीं कांहीं वेळ, हें आपलें राज्य आपले मागें कोणास मिळावें, असें त्यास कोणीं विचारिलें असतां, जो सर्वांत प्रबल असेल त्यास मिळावें, असें त्यानें उत्तर दिलें, असें कोणी ह्मणतात; आणि कोणी असें ह्मणतात कीं, जो सर्वांत शाहणा असेल त्यास मिळावें, असें त्यानें उत्तर दिलें होतें. असो. अशा प्रकारचें कांहीं एक उत्तर दिल्यावर, ज्याच्या नांवानें दशदिशा दणाणून गेल्या होत्या,

ज्याच्यापुढें मोठमोठे पराक्रमी राजे थरथरां कांपत होते, ज्यांच्या हृदयाला भय कसें तें शिवलें देखील नव्हतें, आणि भुजबलगार्विष्ठ भूपतींस जो साक्षात् मृत्यूसारखा भासत होता, तो, फिलिपराजाचा पुत्र, इसवी सनापूर्वीं ३२३ वे वर्षीं बाबुलोन येथें मरण पावला. तेव्हां तो बत्तीस वर्षें आणि आठ महिने इतक्या वयाचा होता. त्यानें बारा वर्षें आणि आठ महिने राज्य केलें.

बादशाहा मरण पावल्याचें वर्तमान लष्करांत पसरतांच जिकडे तिकडे एकच हाहाकार होऊन गेला. ज्या शूर पुरुषांनीं समरांगणामध्यें मोठमोठे पराक्रम केले होते ते शोकाकुल होऊन जागचे जागीं स्तब्ध बसले. पुढें काय करावें हें त्यांस मुळींच सुचेना. शरीरांतून प्राण निघून जाऊन जसें प्रेत पडावें, तसें तें सर्व सैन्य दिसूं लागलें. कोणी कोणाचा धनी ना कोणी कोणाचा चाकर, अशी अवस्था झाली. सर्वांनीं आपापल्या बुद्धीप्रमाणें मासिदोनिया देशास लवकर जाण्याची सिद्धता केली. आणि पुढें त्या सैन्याची फुटाफूट झाली.

शिकंदरबादशाहा बरेच दिवस आजारी असून थकत थकत जाऊन, शेवटीं मरण पावला; ह्मणजे, त्यास कोणी विषप्रयोग केला कीं काय, असा नुसता संशय देखील त्या वेळीं कोणास आला नाहीं. परंतु, पुढें — लागलेंच — तें प्रकरण पुनः उद्भवून, बादशाहाची आई ओलिंपिआस हिनें त्याची चौकशी चालविली. तिजमध्यें नानाप्रकारचे अनेक संशय उत्पन्न झाले. त्यांत आंतिपातर आणि आरिस्तातल यांचींही नांवें निघालीं होतीं. आंतिपातर ह्याचे कारभारांत फार घोंटाळा झाला होता; तो शिकंदर

बादशाहास फार भीत होता; आणि त्याचा वडील मुलगा बादशाहाच्या मुदपाकखान्यावर मुख्य कामदार होता; हीं आंतिपातर ह्यावरच्या संशयाचीं कारणें होतीं.—आरिस्तातलानें, यथाकालीं चांगली मसलत देण्याकरितां ह्मणून कालिस्थिनीस हा विद्वान पुरुष बादशाहाचे बरोबर दिला होता; त्यास त्यानें क्षुल्लक कारणावरून, किंबहुना कांहीं कारण नसतां, ठार मारिलें, येणेंकरून त्यास क्रोध आला असावा, आणि ह्मणून त्यानें बादशाहास मारण्यास उपाय योजिण्यामध्यें आंतिपातर ह्यास साह्य केलें असावें, हें आरिस्तातलावरच्या संशयाचें कारण होतें. वास्तविक म्हटलें असतां, ह्या दोघांही पुरुषांचे मनांत असा अविचार कधीं आला नव्हता, असा पुष्कळ सुज्ञ ग्रंथकारांचा अभिप्राय आहे.

शिकंदराच्या मरणानें ओलिंपिआस हिला अत्यंत दुःख झालें हें सांगावयास नकोच; कारण, तो तिचा प्रत्यक्ष पोटचा गोळा होता; आणि तो पोटचा गोळा उगाच सामान्य नव्हे, तर सर्व जगामध्यें पराक्रमाचा विजयध्वज उभारलेला असा. प्रत्येक मुलगा आपले आईचा शिकंदर आहे, ही गोष्ट तर खचीत आहे; परंतु, प्रत्येक आईच्या नशीबीं ओलिंपिआस हिचे सारखें मातृसुख भोगावयाचें नसतें; हें लक्षांत ठेविलें पाहिजे. शिकंदर बादशाहा एवढा पराक्रमी, दुराग्रही आणि हट्टी होता, तरी, त्यानें आपल्या आईची अवज्ञा कधींही केली नाहीं. तो पांच वर्षांचा असतां जसा तिजशीं वागत असे, तसाच राजपदारूढ झाल्यावरही वागला. त्यांत त्यानें तिळभर देखील अंतर पडूं दिलें नाहीं. ही तर प्रत्यक्ष मातुश्रीच, हिची गोष्ट असो. परंतु, दारयसाची आई सिसिग्यांबिस हीही शिकंदर बादशाहाच्या मरणाची वार्ता

ऐकून अत्यंत शोकाकुल होऊन गेली. हिची नात हेफीस्तियन ह्यास दिली होती, ती नुकतीच विधवा झालेली तिजपाशीं होती; त्या दुःखांत आणखी हें दुःख प्राप्त झालें. तिला दुःखाचा प्रसंग एवढाच आला होता असें नव्हे. तिचा बाप, तिचा नवरा, आणि तिचे ऐशीं भाऊ ह्यांस ओकस ह्यानें एके दिवशीं ठार मारिलें, तें अत्यंत भयंकर दुःख तिनें सोशिलें होतें. परंतु, शिकंदराच्या मरणाचें जें दुःख तिला झालें, तें तिला परम दुःसह वाटलें. त्याच्या मृत्यूचें वर्तमान कानीं पडतांच ती मोठा आक्रोश करून म्हणाली, "अरे शिकंदरा, कसारे टाकून गेलास! आतां ह्या माझ्या मुलींस कोणरे संभाळील! देवा, आम्हां अनाथांला आतां दुसरा शिकंदर कोठें सांपडेल!" जवळच्या लोकांनीं तिचें पुष्कळ सांत्वन केलें. परंतु तें सर्व व्यर्थ गेलें. शिकंदराची वार्ता कानीं पडल्यापासून तिनें जें अन्न टाकिलें तें टाकिलेंच. शेवटीं, उपवासांनीं शरीर क्षीण होऊन होऊन, जगविख्यात पराक्रमी राजा जो दारयस त्याची आई, शिकंदर शिकंदर ह्मणून मरण पावली! ह्यावरून तो तिशीं आणि आपल्या आईशीं कसा वर्तत असे, ह्याची सहज कल्पना करितां येईल.

शिकंदरबादशाहा जीवंतपणीं ह्या जगामध्यें चोहींकडे सिंहाप्रमाणें गर्जत फिरत होता, व त्याचें नुसतें नांव ऐकून पराक्रमी राजांचा थरकांप होत होता; परंतु, चमत्कार पाहा कीं, त्याचा प्राण निघून गेल्यावर, त्याचें प्रेत जागचे जागीं कितीएक दिवस पडलें होतें; त्यास कोणी हात लावीना. तो मेला ह्मणून चोहींकडे रडारड झाली, आणि त्याच्या गादीवर कोणीं बसावें ह्याविषयीं वाटाघाट चालली, त्या गडबडींत त्याच्या प्रेताकडे कोणीं लक्ष दिलें नाहीं. तें खालदी आणि

इजिप्शियन ह्या लोकांनीं उचलून, त्यामध्यें, आपल्या देशरीतीप्रमाणें मसाले भरून, तें मासिदोनिआ देशास पाठवून दिलें, आणि मग त्याची मूठमाती झाली. ह्या कृत्यास पुरीं दोन वर्षें लागलीं. साधारण प्रतीच्या मनुष्याच्या प्रेतसंस्कारास एक दोन दिवस देखील लागत नाहींत. आणि आपणास सर्व जगाचा प्रभु ह्मणविणारा जो शिकंदर बादशाहा त्याचें प्रेत दोन वर्षें तसेंच पडावें काय?

येथपावेतों ज्या गोष्टींचें कथन झालें, त्यांवरून शिकंदर बादशाहा हा कोठचा कोण, ह्यानें काय काय केलें, आणि ह्याचा स्वभाव कसा होता, ह्या गोष्टींविषयीं वाचकांचे ठायीं संशय राहणार नाहीं; ही गोष्ट खरी आहे. तथापि अशा प्रकारचे जे लेख असतात, त्यांच्या शेवटीं चरित्रनायकाच्या स्वभावाचें सामान्य वर्णन करावें, असा ग्रंथकारांचा परिपाठ आहे, आणि तो फार उत्तम आहे. त्यास अनुसरून शिकंदर बादशाहाच्या स्वभावाविषयीं एकदोन शब्द बोलून हें चरित्र आह्मी संपवितों. जगामध्यें आजपावेतों जे कोणी विलक्षण पराक्रमी पुरुष होऊन गेले, त्यांतील श्रेष्ठांमध्यें शिकंदर बादशाहाची गणना आहे. हा उपजत बुद्धिवान् होता; आणि त्यांत, त्याचा पिता फिलिप राजा ह्याच्या उत्तम योजनेनें, त्यास आरिस्तातल गुरु मिळाला. तेणेंकरून त्याची बुद्धि प्रगल्भ होऊन तिजपासून नानाप्रकारचीं चमत्कार वाटण्यासारखीं अनेक कार्यें झालीं. आरिस्तातलाच्या हाताखालीं विद्याभ्यास करण्यास त्याला जर न सांपडतें, तर तो इतके देश जिंकण्यास समर्थ झाला नसता, असें आमचें ह्मणणें नाहीं. कारण, हल्ले, युद्धें, वेढे इत्यादिकांमध्यें ज्या गोष्टींची त्यास गरज पडत गेली, त्या गोष्टी तो त्याजपाशीं शिकला

नव्हता, व त्या त्यास कोणापासूनही संपादितां आल्या नसत्या, हें खचीत आहे. तथापि, व्याकरणकाव्यादिकांचे ठायीं अभिरुचि लागून त्यास मोठमोठे इतिहास आणि दंतकथांचे ग्रंथ वाचून त्यांवर विचार करण्याची उत्तम संवयी जी त्यास बालपणांत लागली होती, तीस मुख्य कारण किंबहुना मूळ कारण आरिस्तातलाचें शिक्षण होय. तो जन्मापासून स्वभावतःच मोठा अभिमानी होता असें दिसतें. त्यास कोणाचें उणें उत्तर बिलकूल सोसत नसे. आणि बुद्धिकौशल्यामध्यें आपणावर कोणाची छाप बसूं नये, अशी त्याची फार इच्छा असे. ही इच्छा एका पक्षीं चांगली आहे; कारण हिच्या योगानें, आपलें वर्चस्व राखण्याकरितां, मनुष्य निरंतर ज्ञानसंपादनाच्या व्यवसायांत गढून जातो. आणि तेणेंकरून त्याचें ज्ञान वृद्धि पावतें. त्या इच्छेच्या ह्या सद्गुणाबरोबर तसाच जबरा एक दुर्गुण मनुष्याच्या अंतःकरणांत शिरतो. तो हा कीं, काय तो मोठा मी, आणि शाहणा मी, असें त्यास वाटूं लागून, तो अगदीं अंध होऊन, लहान थोर न पाहतां, सर्वांस सरसकट यःकश्चित् गणूं लागतो. हा दुर्गुण, ह्मणजे गर्व हा अत्यंत भयंकर होय. हा ज्याचे आंगांत संचारतो त्यास आपलेंसें करून टाकून त्याजकडून अनन्वित कर्में करवितो, आणि शेवटीं त्यास मोठ्या संकटांत घालितो. एका मेजवानींमध्यें शिकंदर हा आपला पिता फिलिप ह्याशीं कसा वागला, त्या उभयतांचीं काय काय भाषणें झालीं, आणि, मंडळी मध्यें न पडती तर फिलिप राजाच्या हातून शिकंदराची अवस्था काय झाली असती, ह्याविषयीं मागें जें आह्मीं सांगितलें आहे, त्याचें स्मरण करावें, ह्मणजे, आह्मीं जें वर ह्मटलें आहे, त्याची सत्यता लक्षांत येईल.

सिंहासनारूढ झाल्यावर, शिकंदर बादशाहानें, इतर राजे-लोकांप्रमाणें, ऐषआरामांत आणि विषयविलासांत आपलें आयुष्य घालविलें नाहीं. तो एकदम मोठें सैन्य जमा करून देश जिंकण्याच्या कामास लागला; आणि तो क्रम त्यानें मरण येई पर्यंत अखंड चालविला. दुसऱ्यांचीं राज्यें घेऊन आपण अपार संपत्ति मिळवावी, आणि त्यावर मजा मारीत राहावें, ही कल्पना त्याचे मनांत कधींच आली नाहीं. शौर्य आणि शाहाणपण ह्यांविषयींच्या श्रेष्ठत्वापेक्षां अधिक असें त्याला कांहींच वाटत नसे. जीं राष्ट्रें त्याच्या इच्छेस आड आलीं अथवा त्याचे ह्मणण्यास कबूल झालीं नाहींत, त्यांस मात्र त्यानें धुळीस मिळविलें. परंतु, जीं त्यास प्रभु मानून त्याच्या मनाप्रमाणें वागण्यास तयार झालीं, त्यांचे वाटेस तो गेला नाहीं. इतकेंच केवळ नव्हे, तर त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यानें त्यांस सोई करून दिल्या. ह्यावरून त्यास क्रूर ह्मणतां येत नाहीं.

दारयस हा शिकंदर बादशाहाचा मोठा शत्रु होता, तरी, शेवटीं, त्याचें प्रेत पाहून त्यास रडें कोसळलें; ह्यावरून, आणि त्याची अनाथ मातुश्री सिसिग्यांबिस हिला त्यानें ज्या उत्तम रीतीनें वागविलें तिजवरून, तो मनाचा मोकळा आणि खरोखर थोर होता, असें दिसतें. दारयसाच्या लोकांच्या हातून त्याच्या सैन्याची पुष्कळ हानि झाली होती, तेव्हां, एकादा दुसरा दांडगा अविचारी बादशाहा त्याच्या कुटुंबाचाच काय, पण त्याच्या प्रेताचा देखील सूड उगविण्यास चुकला नसता. परंतु, तसें ह्यानें कांहींएक केलें नाहीं. त्याच्या थोरपणाची किंमत सांगण्यास दारयस तर मागें राहिला नव्हता. परंतु, सिसिग्यांबिस ही 'शिकंदरा, शिकंदरा' करून मरण पावली; ह्यावरून त्याचा थोर-

पणा तिला किती पूर्णपणें समजला होता, हें सहज लक्षांत येतें.

कुटुंबामध्यें पुष्कळ माणसें असलीं, ह्मणजे त्या सर्वांचीं मनें आपणाकडे वळवून घेऊन संसाराचा गाडा सुरळीतपणें हांकणें हें किती अवघड आहे, ह्याचा अनुभव बहुतकरून सर्वांस आहे. त्यावरून विचार करून पाहतां, दाहा- बारा प्रकारचे लोक ज्या सैन्यामध्यें होते, आणि जें सैन्य त्या लोकांच्या स्वदेशांपासून शेंकडों कोस दूर गेलें होतें, त्या सगळ्या लोकांस आंवर घालून, आपलेसे करून घेऊन, परकीय राष्ट्रांशीं त्यांच्या हातून मोठमोठीं तुमुल युद्धें करविणें, हें कृत्य किती शाहाणपणाचें आणि किती धूर्ततेचें आहे, ह्याचें अनुमान सहज समजतें. हें कृत्य शिकंदर बादशाहानें उत्तम रीतीनें साधिलें होतें, ह्यास्तव त्याबद्दल त्याची स्तुति केल्यावांचून राहवत नाहीं. आपल्या शिपायांस खूष ठेवण्याकरितां तो फार जपत असे. तरी दोन तीन वेळा त्यांमध्यें मोठ्या गडबडी झाल्या होत्या. त्या अशा कीं, दुसरा एकादा अल्प धीराचा भितरा बादशाहा तेव्हांच भयभीत होऊन गेला असता. परंतु, आर्जव करून, धमकी देऊन, पोटांत शिरून, अथवा निस्पृहता दर्शवून, कोणत्या प्रसंगीं आपल्या बिथरलेल्या शिपायांचीं मनें कशीं वळवावीं, हें शिकंदर बादशाहा उत्तम प्रकारें जाणत होता, ह्मणूनच तो तगला. ज्याला देश काबीज करावयाचे असतात, त्याला, आपलें लष्कर आपल्या अर्ध्या वचनांत राखणें हें एक मोठें काम नेहमीं साधावें लागतें. राजा स्वतः मोठा शूर आहे, पण जर त्याला सैन्य अनुकूल नाहीं तर त्याचे हातून कांहीं महत्कृत्य व्हावयाचें नाहीं, एवढेंच नव्हे; तर, तो एका-

दे प्रसंगीं उगाच पटकर प्राणांस मुकावयाचा. त्यांत, स्वदेशीय सैन्य आपल्या आज्ञेप्रमाणें वागे असें करण्यास राजास फार मेहनत पडावयाची नाहीं; परंतु, बारा राष्ट्रांतले बारा प्रकारचे लोक एकत्र जमवून, ते सर्व संतुष्ट राहात अशी तजवीज ठेवणें हें खरोखर मोठ्या शाहाणपणाचें कृत्य आहे.

शिकंदर बादशाहानें मोठें थोरलें सैन्य बरोबर घेऊन अनेक राष्ट्रें जिंकिलीं, आणि अनेक युद्धें करून सहस्रावधि लोकांच्या प्राणांस मूळ आणिलें, हें मागें वर्णिलें आहे. ह्यांतील कितीएक राष्ट्रांनीं, वास्तविक पाहिलें असतां, त्याचा कांहीं एक अपराध केला नव्हता, किंबहुना तो कोठचा कोण हें त्यांस माहीत देखील नव्हतें; अशा राष्ट्रांवर त्यानें स्वाऱ्या करून, त्यांस जर्जर करून, त्यांची सर्व संपत्ति घेऊन तीं होतीं कीं नव्हतींशीं करून टाकिलीं, हें कृत्य चांगलें कीं काय, असा एक प्रश्न आहे. ह्याचें उत्तर असें आहे कीं, शुद्ध नीतिशास्त्रदृष्ट्या पाहिलें असतां, हें कर्म अगदीं अप्रशस्त आणि पापमूलक आहे, असें दिसतें. परंतु, जगाच्या उत्पत्तीपासून, किंवा मनुष्यांमध्यें राजा आणि प्रजा हा संबंध उत्पन्न झाल्यापासून, फारसा न्यायान्याय न पाहतां, बाहुबलेंकरून राष्ट्रां मागून राष्ट्रें जिंकणें हें राजास मोठें भूषणप्रद आहे, असें मानण्याचा प्रघात पडला आहे. हा जर प्रघात नसता, तर राज्यांमध्यें उलटापालटी कधींही झाल्या नसत्या. हा प्रघात चांगला आहे किंवा वाईट आहे, ह्याविषयीं तूर्त विचार कर्तव्य नाहीं. परंतु, ह्या प्रघातानें शिकंदर बादशाहास व त्यासारख्या दुसऱ्या कितीएक पुरुषांस लोकांमध्यें महाशूर ही पदवी प्राप्त झाली आहे.

शिकंदर बादशाहा हा अतिशयित रागीट स्वभावाचा

होता. त्यास एकदा राग आला ह्मणजे तो त्याचा त्याला आंवरेनासा होऊन त्यापासून कधीं कधीं फार वाईट परिणाम घडत. हा त्याचे ठायीं मोठा दोष होता, असें ह्मणणें भाग पडतें. कालिस्थनीसासारख्या महाविद्वान पुरुषांस, कांहीं विशेष कारण नसतां, केवळ रागाच्या आवेशासरसें त्यानें ठार मारून टाकिल्याच्या कितीएक गोष्टी आह्मीं पूर्वीं वर्णिल्या आहेत. हा त्याचा दुर्गुण त्याला फार भोंवला; किंबहुना ह्याच दुर्गुणाचे पायीं इतक्या अल्पवयांत तो मरण पावला, असें ह्मटल्यास चिंता नाहीं. थोरल्या स्वारीस बाहेर पडेपर्यंत त्याची वृत्ति कांहीं बरी होती. परंतु, ह्या स्वारीस बाहेर पडल्यावर तो आपल्या इच्छेच्या स्वाधीन झाला. ह्मणजे, जी गोष्ट मनांत आली ती पूर्ण केल्यावांचून त्यास कधीं चैन पडलें नाहीं. आपल्या मनोवृत्ति आंकळण्यास आरिस्तातलानें ह्यास ह्मणजे कमी बोध केला असेल, असें वाटत नाहीं. कांकीं, ह्या सद्गुणाची किंमत त्यास चांगली समजली होती, असें त्याच्या कितीएक लेखांवरून स्पष्ट दिसून येतें. परंतु, अंगामध्यें तारुण्याचें आणि राजाधिकाराचें वारें शिरलें ह्मणजे बालपणांत प्राप्त झालेले सगळे बोध एके बाजूस राहतात, आणि अंतःकरणामध्यें इच्छेचें प्राबल्य माजतें, असें वारंवार दृष्टीस पडतें. त्यांतलेंच शिकंदर हें एक उदाहरण होय.

शिकंदरामध्यें जे कितीएक उत्तम गुण होते, त्यांमध्यें एकतर फारच वर्णनीय होता. तो हा कीं, त्यानें ज्यास एकदा आपला मित्र मानिलें, त्यापाशीं तो अगदीं मोकळ्या मनानें आपले सर्व विचार सांगत असे. मित्र ह्मटल्यावर तो त्याच्या उंचनीच स्थितीकडे लक्ष देत नसे, आणि त्याच्या ह्मणण्याचा

तो योग्य विचार करी. राजाला स्नेही ह्मटले ह्मणजे लबाड, तोंडपुजे, आणि कार्यवादू असे मिळावयाचे; आणि त्यांच्या सहवासानें त्याची दुर्दशा व्हावयाची; असें इतिहासादिकांवरून पुष्कळ दिसून येतें. परंतु, शिकंदराची गोष्ट तशी नव्हती. तो अशा लोकांच्या संगतींस लागला नाहीं; आणि त्यानें आपला मुख्य हेतु, लोकांच्या नादानें, एके बाजूस कधीं ठेविला नाहीं. पोंहणारा कच्चा आणि अशक्त असला ह्मणजे त्याचें शरीर बहुतकरून प्रवाहाच्या हवालीं होतें, आणि तो नेईल तिकडे जातें. परंतु, तोच पोंहणारा पक्का असून सशक्त असला ह्मणजे प्रवाहाच्या वळणास एकीकडे ठेवून, पाणी तोडून, तो नेमल्या ठिकाणीं परतीरास जाऊन लागतो. त्याप्रमाणेंच जगामध्यें मनुष्याचें आहे. विद्येच्या संस्कारानें ज्याचें मन प्रगल्भ दशेस पावलेलें असतें, आणि विचाराच्या योगानें ज्याचे ठायीं इष्ट कार्य करण्याविषयींचा दृढ निश्चय वाढलेला असतो, तोच मनुष्य जनाच्या नानाप्रकारच्या लहानमोठ्या अनेक पाशांस पुरून आपला हेतु सिद्धीस नेतो. आणि एतद्व्यतिरिक्त, ह्मणजे, अल्पज्ञानाचा आणि क्षणिक बुद्धीचा जो असतो, तो परपाशांनीं बद्ध होऊन, आपला मूळ हेतु विसरून, भलत्याच गोष्टींस प्रवृत्त होतो. शिकंदरबादशाहा असा नव्हता; तो प्रथम सांगितलेल्या प्रकारचा, ह्मणजे प्रगल्भ मनाचा आणि दृढ निश्चयाचा होता; असें त्याच्या सर्व कृतींवरून दिसून येतें.

"क्रियेवीण वाचालता व्यर्थ आहे" ही गोष्ट मनुष्याच्या लक्षांत येण्यास आणि तीप्रमाणें वागण्याची त्याची प्रवृत्ति होण्यास त्यास पुष्कळ ज्ञान आणि पुष्कळ अनुभव प्राप्त व्हावा लागतो. ह्यांपैकीं ज्ञानाच्या संबंधानें विचार केला असतां,

तें, लहानपणीं, आरिस्तातल ह्याच्या उत्तम शिक्षणानें शिकंदरबादशाहास प्राप्त झालें होतें, असें एक ह्मणतां येतें; परंतु, तो सिंहासनारूढ झाला आणि लक्षावधि सैन्य घेऊन परदेशांत लढाया करण्यास बाहेर पडला, तेव्हां त्याचें वय अगदीं लहान होतें, तेव्हां त्यास साक्षात् व्यवहाराचा अनुभव अगदीं अल्प होता, असें उघड दिसतें. परंतु, मोठमोठीं जीवावरचीं कामें करण्यास त्यानें आपल्या शिपायांस कोणत्या उपायांनीं प्रवृत्त केलें, हें पाहिलें म्हणजे, शेंकडों वर्षें राज्ययुद्धादिकांचीं कामें केलेला पुरुष त्याच्या पुढें कांहीं नाहीं, असें वाटतें. ह्या मोठ्या स्वारीमध्यें त्यानें जीं जीवावरचीं कामें हातीं घेतलीं होतीं, त्यांस आधीं त्यानें स्वतः आरंभ केला होता, आणि नंतर त्यांस हात लावण्यास त्यानें आपल्या शिपायांस सांगितलें होतें, ही गोष्ट त्याचे चरित्रांत स्थलोस्थलीं दृष्टीस पडते. ही अल्पस्वल्प बुद्धीची गोष्ट नव्हे. जीं कितीएक संकटाचीं कामें त्यानें केलीं, तीं तो स्वतः न करितां दुसऱ्या कोणां सरदारांस करावयास सांगता, तर, जगांतील इतर राजांच्या नित्यक्रमाहून कांहीं वेगळा प्रकार घडला नसता; परंतु, कोणतेंही लहान मोठें काम आपण स्वतः हातीं घेतल्याखेरीज त्याविषयीं इतर लोकांचे मनांत अगत्य उत्पन्न व्हावयाचें नाहीं, असें पक्कें समजून त्यानें तो क्रम धरिला होता. त्याचे लोक प्रवासास कंटाळून स्वदेशीं लवकर परत जाण्याविषयीं उतावीळ झाले होते, आणि त्यांस तो मान्य होईना ह्मणून त्याजवर फार रागावले होते, त्या प्रसंगीं त्यानें जें भाषण केलें त्यांत त्यांस असें ह्मटलें कीं; "अरे, मीं स्वतः ऐषआरामांमध्यें दूर राहून तुह्मांस संकटांत घातलें, असें कधीं झालें आहे काय? संकट ह्मटलें ह्मणजे आधीं मी आणि मग तुह्मी,-असा माझा

क्रम नाहीं काय?" हे शब्द अगदीं खरे होते. ते तात्काळ त्या लोकांच्या मनांस लागले, आणि त्यांनीं आपली सगळी कुरकूर एकीकडे ठेवून त्याचे आज्ञेप्रमाणें वागण्याचा निश्चय केला. हेंच जर शिकंदराचें आचरण तसें नसतें, तर त्याला असें बोलतां आलें नसतें; आणि असें बोलतां आलें नसतें. ह्मणजे, कदाचित् भलत्याच कांहीं गोष्टी घडून आल्या असत्या.

शिकंदरबादशाहा स्वभावानें मोठा उदार होता. त्याला द्रव्याची परवा मुळींच वाटत नसे. तो आपल्या मित्रांस आणि शिपायांस संतुष्ट करण्याकरितां वारंवार मोठमोठ्या देणग्या देई, आणि मोठमोठ्या मेजवान्या करी. त्यानें, स्वारी परत येते वेळीं, एके मुक्कामीं आपल्या लष्करांतल्या सर्व लोकांचें ऋण पंदरचा पुष्कळ पैसा खर्चून फेडिलें, हें आह्मीं मागें वर्णिलेंच आहे. त्याजपाशीं आपार संपत्ति होती, तेव्हां त्यानें असें केलें ह्यांत कांहीं नवल नाहीं, असें कित्येकांचें ह्मणणें पडतें. त्यावर उत्तर असें आहे कीं, संपत्तीची विपुलता हें औदार्याचें कारण नव्हे. थोरल्या महमुदापाशीं संपत्ति कमी नव्हती; प्राण जाते वेळीं त्यानें आपल्या द्रव्याच्या राशी आपल्या डोळ्यांपुढें घालवून, ह्या सोडून आतां आपणास जावयाचें असें मनांत आणून खळखळां अश्रु गाळिले; आणि कोणास कधीं कांहीं एक न देतां, नुसता द्रव्यसंचय करून, प्राण सोडिला. आणखी सामान्य व्यवहारांत तर असें आढळून येतें कीं, मनुष्यास संपत्ति जों जों अधिकाधिक मिळूं लागते, तों तों त्याचें कृपणपण अधिकाधिक वृद्धि पावतें. परंतु, शिकंदराचें तसें नव्हतें. त्याला जसजशी अधिकाधिक दौलत मिळत गेली, तसतसें त्याचें

औदार्य वृद्धि पावत गेलें. हा गुण खरोखर स्तुति करण्यासारखा होय.

ज्या बुद्धिवान पुरुषास आरिस्ताटलासारख्या महाविद्वानापासून अनेक विषयांचें ज्ञान प्राप्त झालें होतें, आणि जो पुढें सर्व गुणांनीं चांगला निपजावा, असा त्या काळच्या सुज्ञ पुरुषांचा अजमास होता, त्याच्या तरुणपणांत, त्याच्या खाण्यापिण्याचा नेमस्तपणा अगदीं नाहींसा व्हावा, आणि त्यास ओकारी येई तोंपर्यंत खाणें, प्राणांतिक अवस्था होईपर्यंत मद्यपान हीं दुर्व्यसनें जडावीं, ही गोष्ट फार असंभाव्य दिसते. परंतु, तसा प्रकार शिकंदर बादशाहाचे ठायीं घडून आला. आहार, निद्रा, सुखेच्छा, इत्यादिकांची तृप्ति करण्यास जोंजों प्रयत्न करावे, तोंतों त्यांची भूक अधिकाधिक वाढत जाते, आणि, आंवर घातला नाहीं, तर ती मनुष्याच्या नाशास कारणभूत होते, असें जें पूर्वीं थोर वदले आहेत, त्याचा अनुभव प्रत्येकास थोडा बहुत तरी आलेला असतो. त्यामध्यें शिकंदराचें हें उदाहरण फार ढळढळीत आहे. पाहिजे तेव्हां नकोनको होई इतकें खावें, आणि वेळ अवेळ न पाहतां स्नानें करावीं, अशी शिकंदराची वृत्ति शेवटीं शेवटीं झाली होती. आणि तिच्या नादांत जो एकदां त्याला ताप भरला, तो त्याला घेऊनच गेला. तो इतकें न खाता आणि बेताबातानें राहाता, तर तेव्हां मेला नसता, असें खातरीनें सांगवत नाहीं; तथापि, त्याचें तें आचरण अगदीं असमंजसपणाचें होतें, आणि तें त्या एवढ्या पृथ्वीपति राजास शोभत नव्हतें, असें ह्मटलें पाहिजे. तो स्वभावानें फार रागीट असे, आणि, त्याच्या मर्जीविरुद्ध जरा कोणी बोलला ह्मणजे तो त्यास शत्रु समजून त्याच्या

मागें लागे; आणि कालिस्थिनीस ह्याची गोष्ट लोकांच्या डोळ्यांपुढें नुकतीच घडली होती; तेणेंकरून, "तुह्मी करितां हें वाईट आहे," असें त्यास सांगण्यास कोणी धजेना. आणि, मानवस्वभावाच्या साधारण रीतीप्रमाणें त्याचा दोष त्याला दिसेना, अशा प्रकारें त्याचा तो दुर्गण वाढून त्यानें त्याचा प्राण घेतला. ह्याकरितां, केवळ राजे लोकांनींच नव्हे, तर साधारण मनुष्यांनीं देखील, स्वतः फार जपून वागून, आपल्या मित्रांनीं आपले दुर्गुण आपणांस मोठ्या अगत्यानें दाखवावे, अशा प्रकारें त्यांशीं वर्तावें, हें उचित होय. ह्या कृत्यास शत्रूचें सांनिध्य फार उत्तम होय. परंतु, तो जो आपला दोष ह्मणून बाहेर काढूं लागेल, तो दोष नाहीं, गुण आहे, असें मात्र दुराग्रहानें मनांत न येई. ह्याविषयीं जपलें पाहिजे.

शिकंदर बादशाहानें अल्प वयामध्यें दोन्ही किंबहुना तिन्ही खंडांचें स्वामित्व संपादिलें होतें हें त्याच्या धैर्यास आणि शौर्यास अत्यंत भूषणप्रद होय. परंतु, एवढा भगीरथ प्रयत्न करून जें एवढें राज्य त्यानें मिळविलें होतें, त्याचा उपभोग घेण्यास त्यास अवकाश सांपडला नाहीं, असें पाहून मात्र किंचित् वाईट वाटतें. त्याचा मुख्य रोंख इराणी राज्याकडे होता. तें राज्य हस्तगत होतांच, ह्मणजे दारयस मरण पावतांच, जर तो मागें फिरता, आणि स्वदेशीं जाता, तर त्याला कांहीं दिवस तरी सुखांत राहायास सांपडलें असतें. परंतु, त्याची महत्वाकांक्षा पडली फार विलक्षण ! ती त्याला मागें फिरूं देईना. तिनें त्याला नाना प्रकारच्या संकटांतून ओढीत ओढीत हिंदुस्थानापर्यंत नेलें; तिकडे त्याचे सर्व दिवस धांदलींत आणि त्रासांत गेले; आणि

पुढें परत चालला तों आयुष्यच संपलें. ह्यावरून एक बोध घेण्यासारखा आहे. तो हा कीं, शेतकऱ्यानें आपलें सगळें आयुष्य केवळ जमीन नांगरण्यांतच घालवूं नये. तर, जितक्या जमिनीचीं आपणास लागवड करितां येऊन पीक घेतां येईल, तितकीच जमीन, आपण नांगरावी, असा त्यानें योग्य वेळीं विचार करावा, हें अवश्य आहे. शिकंदर बादशाहा लवकर मेला, ही गोष्ट वेगळी; परंतु, तो जर पुढें कांहीं वर्षें जगता, तर, त्याला एवढ्या थोरल्या राज्यास आंवर घालतां आला असता कीं नसता, ही मोठी शंका आहे. वडील सांगत असतात कीं, संपत्ति मिळविणें हें सोपें आहे, परंतु, तिचें रक्षण करून तिचीं यथायोग्य योजना करणें हें फार कठीण आहे; तें शब्दशः खरें आहे. शिकंदर बादशाहा केवढाही बुद्धिवान असला, तरी तो मनुष्य होता. त्याचे ठायीं कांहीं अमानुष शक्ति नव्हती. ही गोष्ट जमेस धरून प्राचीन कालापासून तों सांप्रत कालापर्यंत जर सर्व राज्यकर्त्यांचा इतिहास धुंडून पाहिला, तर, एवढें मोठें राज्य शिकंदरास आंवरतां आलें नसतें, आणि त्यामुळें, वृद्धापकाळीं अनेक बखेडे उत्पन्न होऊन त्यास कदाचित् अत्यंत अपमानास्पद असें दुःख भोगावें लागलें असतें, असें वाटतें. त्या पक्षीं, तो अल्प वयांत, आपणास गाजी ह्मणवून, पाजी ह्मणून घेण्याची पाळी येण्यापूर्वीं मरून गेला, हें त्याच्या सुदैवाचें फल होय. फजीती करून घेऊन ह्मातारपणीं मरावें, त्यापेक्षां अब्रूनें तरुणपणांत मरावें, हें फार चांगलें.

पुष्कळ देश जिंकिल्यावर आणि आपण मोठे पराक्रमी आहों, असें शिकंदर बादशाहास वाटूं लागल्यावर, तो आपणास लोकांकडून देव ह्मणवून घेण्याचा प्रयत्न करूं लागला,

हें त्याच्यासारख्या आरिस्ततलाच्या शिष्यास अगदीं शोभत नाहीं. तो, तेव्हांच्या इतर सर्व मनुष्यांपेक्षां अधिक पराक्रमी होता, ह्याविषयीं तिळभर देखील शंका-नाहीं. परंतु, आपणास देव ह्मणविण्यासारखें कांहीं अमानुष कृत्य त्याचे हातून घडलें होतें, असें नाहीं. करांगुली कितीही सुजली तरी डोंगरा एवढी व्हावयाची नाहीं; त्याप्रमाणें, राजानें केवढेही मोठे पराक्रम केले, तरी त्यास देवपण कधींही प्राप्त व्हावयाचें नाहीं. रंक आणि राजा ह्यांच्यामध्यें जें अंतर आहे, त्याच्या सहस्रावधि पटीनें, किंबहुना अनंत पटीनें, राजा आणि देव ह्यांच्या मध्यें आहे. किंवा, हें प्रमाण पाहणें देखील अगदीं अयोग्य आहे, असें वाटतें. कारण, प्रसंगोपात्त, रंक जो आहे, तो, कांहीं आकस्मिक कारणांनीं, कदाचित् राजत्व पावतो; अशीं कितीएक उदाहरणें इतिहासांतरीं आढळतात. परंतु, राजास देवपण आल्याचें अद्याप पावेतों एक देखील उदाहरण घडलें नाहीं, आणि पुढें कधीं घडावयाचें नाहीं. देव सर्व शक्तिमान् आहे, आणि सर्व जग त्याच्या केवळ इच्छामात्रेंकरून चाललें आहे, हा सिद्धांत जगांतील सर्व धर्मशास्त्रांत आहे; तो मासिदोनियन लोकांच्या धर्मशास्त्रांतही असला पाहिजे. तो लक्षांत न आणून, आणि राष्ट्रें जिंकण्यास आपणास एवढालीं संकटें भोगावीं लागत आहेत, हें देवपणाचें लक्षण नव्हे, तर हें मनुष्यपणाचें लक्षण आहे, हें विसरून, शिकंदरानें आपणास देव ह्मणून घेण्याची हांव धरिली होती. हें त्याच्या गर्वातिशयाचें लक्षण होय.

ह्याच्या स्वभावाचें वर्णन करितांना आरियन ह्यानें जें शेवटीं ह्मटलें आहे, त्याचें तात्पर्य येथें उतरून घेऊन हा

विषय समाप्त करितों; तें तात्पर्य येणें प्रमाणें:-"जो कोणी शिकंदराच्या योग्यतेचें वर्णन करूं पाहील, त्यानें त्याच्या दुर्गुणांची याद काढून त्याजवर चर्चा करीत बसूं नये. तर त्याचीं सर्व महत्कृत्यें मनांत आणून, आणि, अल्पवयस्क असतां ज्याचें नांव दोन खंडांमध्यें गाजत होतें, आणि जो ऐश्वर्य-गिरीच्या केवळ शिखरावर जाऊन बसला होता, तो किती थोर आणि किती पराक्रमी असावा, आणि त्याच्या मानानें आपण किती यःकश्चित् आहों हें लक्षांत आणावें, हें योग्य आहे. शिकंदरबादशाहा जीवंत होता, तेव्हां त्याचें नांव माहीत नव्हतें असें एकही राष्ट्र नव्हतें, एकही शहर नव्हतें, किंबहुना एकही मनुष्य नव्हतें. ह्याविषयीं माझें स्वतःचें मत असें आहे कीं, शिकंदर हा पुरुष परमेश्वरानें कांहीं विशेष उद्देशानें ह्या जगामध्यें निर्माण केला होता; आणि त्या एवढा दुसरा राजा, जगाच्या उत्पत्तीपासून आजपावेतों कोणी झाला नाहीं, आणि पुढें उत्पन्न होण्याचा संभव दिसत नाहीं. खरोखर, जगामध्यें आजपर्यंत जे विलक्षण बुद्धीचे पुरुष होऊन गेले, त्यांतील राजांमध्यें, राज्यमहत्त्वानें, पराक्रमानें आणि ऐश्वर्यानें शिकंदरासारखा दुसरा कोणी झाला नाहीं. त्याचे ठायीं दोष होते, तसे गुणही होते. त्यांचें वर्णन पूर्वीं झालेंच आहे. त्यांपैकीं दोषांकडे लक्ष दिलें ह्मणजे मनास वाईट वाटतें खरें; परंतु, त्याची मातृभक्ति, अढळ धैर्य, विलक्षण शौर्य, आणि अतुल ऐश्वर्य ह्यांचा विचार केला ह्मणजे त्याविषयीं विस्मयपूर्वक स्तुतीचे उद्गार आपोआप बाहेर निघतात."

**समाप्त.**

BOMBAY:
PRINTED AT THE EDUCATION SOCIETY'S PRESS, BYCULLA.